सं. ठाणे.
निबंध
क्र. ३२६४



स्वप्नगात्री शांता शेळके

डॉ. स.ग. यादव

REFBK-0025613

निबंध ठेवण्याच्या सभोवताल

३२६४
२५६३
२८७८८

17 JAN 1990

स्वप्नगात्री
शांता शेळके

डॉ. स. ग. यादव

REFBK-0025613

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६००८

स्व प्न गा त्री
शां ता शे ळ के

Swapnagatri
Shanta Shelake

डॉ. स. ग. यादव

Dr. S. G. Yadav

प्रकाशन क्रमांक/८१

प्रथम आवृत्ती / जानेवारी १९८८

प्रकाशक
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४/अ
नलवडे कॉलनी – सम्राटनगर
सागरमाळ, कोल्हापूर– ४१६ ००८

मुद्रक
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटिंग प्रेस
नागाळा पार्क–कोल्हापूर. ४१६ ००३
फोन नं. २३९०६

मूल्य रुपये ६८/–

© डॉ. स. ग. यादव

'स्नेहसागर'
कसबा बावडा, कोल्हापूर–४१६००६

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
२० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर– ४१६ ००८

चि. संग्रामसिंह

व

चि. सचीन

याना . . .

प्रास्ताविक . . . .

आजची कविता प्रयोगशील आहे. तरी परंपरागत काव्यात्मकतेशी इमान राखण्याचा तिने जरूर प्रयत्न केला आहे. निदान तसा प्रामाणिक आग्रह निश्चित जपलेला आहे. अत्यंत रोमँटिसिझमपासून दूर जाण्याची तिची प्रवृत्ती असली तरी वास्तवातून उत्कट काव्यात्मकता तिला साध्य करायची आहे. "शांता शेळके सातत्याने ३५ वर्षे कविता लिहित आहेत. या ३५ वर्षात स्वप्नाळूपणाबरोबर कोवळ्या उन्हातील हिरवी आल्हाद-दायकताही त्यांनी टिपलेली आहे. स्त्री मनातील हळवे स्पंदन–प्रीतीची हळवी भावुकता, याच बरोबर सहजता, प्रसन्नता, मुग्ध–मुक्त शृंगार, सरळ–शुद्ध–निरागस आत्माविष्कार, श्रद्धा, निसर्गाचे वेड यांचा शोध त्यांच्या काव्यात आपणास घेता येईल. "

या ३५ वर्षाच्या वाटचालीतील अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून वापरलेल्या प्रतिमा, जाणीवपूर्वक वापरलेली अर्थांतर्गत लय, ही आजच्या नवकाव्याची वैशिष्टये शांताबाईंच्या कवितेत आहेत. तसेच शब्दचित्र धारण करणाऱ्या कल्पना, परखडपणे व्यक्त झालेली विषण्णता, नेमक्या शब्दातील तरलता, लय याहूनही त्यांच्या कवितेचे वेगळे जग आहे. " तिच्यामध्ये सहजता, प्रसन्नता आहे. उपदेशपरता नाही. क्रांतीकारक तत्त्वाचा सोस त्यांच्या कवितेने कधीही धरलेला नाही. मुक्तशृंगार, सरळ शुद्ध–निरागस आत्माविष्कार यामुळेच त्यांची कविता सामान्य वाचकांच्यासाठी आहे. " असे प्रा. रा. श्री. जोग याना वाटते.

उत्कट भावनेला अविष्काराची जोड शांताबाईनी आपल्या कवितेत दिली आहे. त्यामुळे त्यांची कविता अत्यंत परिणामकारक झाली आहे. त्यांच्या लेखनातून विलक्षण जिव्हाळा, गाढ दुःखे, स्वतःचा शोध, स्त्री मनाचे पैलू, स्त्रियांची स्वप्नाळूवृत्ती व कवयित्रीचे वैयक्तिक विश्व यातच रमलेली आहे. त्यांच्या काव्यातील प्रसाद व शब्दप्रभुत्व ! सौष्ठव व शुद्धता हे गुणही मनाला मोहवतात. आपल्या मनात असणारा भाव त्या बिनचूकपणे व नेमक्या शब्दात मांडत राहतात व हे मांडण्यासाठी प्रतिभासामर्थ्याबरोबर भावनेची उकल हलक्या हळुवार हाताने करता येण्याचे सामर्थ्य कवीजवळ असावे लागते ते शांताबाईंच्या जवळ निश्चितपणे आहे.

– लेखक

'वर्षा' काव्य वर्गीकरण

काव्य विषयक विचार

आत्मपरीक्षणात्मक कविता

जीवन विषयक चिंतन

प्रीती विषयक कविता

ईश्वराचा शोध

निसर्ग एक साक्षीदार

वात्सल्य

स्त्री जीवनाचा शोध

प्रासंगिक कविता

कलंदर वृत्तीची साक्ष

शांताबाईंचे एकाकीपण

शांताबाईंचे काव्यविषयक विचार समजून घेण्यासाठी कविता कशी फुलते, व माझी कविता अशी फुलते. या दोन लेखांचा विचार केला पाहिजे. एखाद्या वेलीवर फुल यावे तसेच कविला काव्य स्फूरत असते. वसंत ऋतू आल्यानंतर कोकीळेला कंठ फुटावा तसेच नविन नविन शब्द कविला भेटत असतात. रे. टिळकांच्या इतकीच ही भावना शांताबाईंना प्रिय आहे.

कविता केली जात नसते, तर ती होत असते. हे शांताबाईंचे मत सर्वांनाच मान्य होणारे असले तरी सुचलेला शब्द व ओठात आलेली ओळ शेवटपर्यंत तशीच राहते काय? असाही प्रश्न त्यांच्यापुढे पडलेला आहे. कवीचा अनुभव हा क्षण, काल या चौकटीत बद्ध असतो. तो त्याचा स्वतःचा असून एकट्याचा नसतो. भावनेच्या आवेगात ओळी खरडल्या जातात. पण ती पूर्ण कविता असत नाही. म्हणून आपण आपली कविता लिहीत असताना केशवसूत, बालकवी यांच्यापासून ते श्रीनिवास पाटणकर या कवी पर्यंत काही आदर्श समोर ठेवले.

सुरूवातीला अनुकरणप्रिय असणाऱ्या शांताबाई पुढे जेंव्हा एकट्या आणि एकाकी झाल्या, तेंव्हाच त्याना कविता सखीने अधिक साथ दिलेली आहे. शांताबाईंची कविता ही मनाच्या एकाकी अवस्थेत अधिक उमलल्याचे आपल्याला दिसून येते. म्हणून त्यांचे एकाकीपण पाहणे आगत्याचे ठरते.

शांताबाईंच्या कवितेचे स्वरूप पाहताना 'विशिष्ट अनुभूतींची स्मारके' आणि 'विशिष्ट आकांक्षाची चित्रे' असे तिचे स्वरूप आहे. या चित्रणांत अप्रामाणिकपणा यत्किंचीतही नाही. ही कवयित्रीची साक्षही महत्त्वाची आहे. या अनुभूती आणि आकांक्षा मुख्यतः प्रेम–निसर्ग-ईश्वर या तीन विषयांशी संबंधीत आहेत. त्यांच्या प्रेमगीतातील नायिका केवळ हृदय मिलनावर संतुष्ट राहणारी नसून संभोग शृंगारात रमणारी आहे, तिचा हा क्षणभरचा अनुभव - - - - - - -

" श्वास उष्ण तव अजून भासती या गालावरती
दीर्घ चुंबने अजून तुझी ती ओठावर जळती
पुष्क उभारे तुझ्या मिठीचा अजूनी सर्वांगी
स्मरणाने तव वीज सळसळे अजून अंतरंगी
अंगप्रत्यांगातील यौवन घेतलेमी लुटूनी
मीठीत तव पहुडता संपली पळामध्ये रजनी
घटकेचे मधुमीलन होता निरोप घेऊन
क्षणार्धात पावलास फिरुनी तू अंतर्धान "

असे काही क्षण सोडले तर तिचा अनुभव–

'जीवन म्हणजे एक दीर्घ विरह गीत
क्षण मीलन, चिरवियोग हीच इथे रीत'

असा निराशाजनक आहे. 'सदाच मी एकटी जीवनी' सदाच मी एकटी ही एकटेपणाची जाणीव तिला सदैव जाळीत आहे. ज्या निसर्गाशी त्यांचे 'मुग्ध नाते' आहे. त्याच्या सहवासात त्यांच्या एकलेपणाची तीव्रता कमी झालेली आहे. 'लिंब' या कवितेत त्यानी म्हटले आहे.

" माझ्या नयनाची भाषा
सारी कळता मला ही
मूक भाषेत आपुल्या
मज दिलासा तो देई ।।
स्नेहभाव आम्हातील
नाही कुणा कळायचे
ज्ञात आहे आम्हालाच
मुग्ध नाते हे आमुचे ।। "

" प्रभूच्या स्मरणानेही ' आज सरे मम् एकाकीपण ' असा कवयित्रीला अनुभव आलेला आहे. सूर्याचा प्रखर प्रकाश, पर्जन्य, वसंताचे आगमन, भव्य सागर यात त्यांना प्रभूचे अस्तित्व जाणवले आहे. "

(म. वा. इतिहास – देशपांडे पृ. ५०५, ५०६)

प्रभूचा - ईश्वराचा ठावं घेणारी कवयित्री प्रेमभंगाच्या दारुण निराशेपुढे–

आता रचितेच काव्य, परि ते दावु कुणा वाचूनी ?
तू नाहीस म्हणून आज सखया । ही आंसवे लोचनी

अश्रूंच्या पाण्यास बरोबर घेऊन जीवनाची वाटचाल एकाकीपणे करते आहे. शांताबाईंचे सारे आयुष्य एक एकाकी वाटचाल आहे. असे त्यांच्या कवितेतून जाणवत राहते.

❖

शांताबाईंचे काव्यविषयक विचार

संजीवनी मराठे यांच्याप्रमाणेच शांताबाईंच्या काव्यात एक प्रकारची स्वप्नाळू वृत्ती आहे. आपल्या स्वप्नांना काव्यात मूर्त झाल्याचे त्याही पाहतात व समाधान पावतात. 'काव्य' हा त्यांचा आवडता विषय ! वर्षा संग्रहातील 'माझ्या

कविते' ही कविता त्या दृष्टीने पाहता येईल. आपले हृदय हर्ष-विषादाने जेंव्हा भरून आले, तेंव्हा, प्रीती भास्कराने हृदयात प्रवेश केला. तेंव्हा अशा वेगवेगळ्या वेळी आपल्या सर्व भावना विश्वासूपणाने, प्रांजलपणाने आपण या मैत्रिणीजवळ बोलून दाखविल्याचे त्या सांगतात. कारण–

" जीवन मार्गावरती क्षणभर ।
येती जाती किती सुहृजन ।
सखे आपुला युगयुगांचा ।
स्नेह परि राहील चिरंतन । "

अशी त्यांची तिच्याविषयीची गाढ विश्वासाची व श्रद्धेची भावना आहे. कविता सखिवरील त्यांच्या प्रेमाबरोबरच, जीवनात आपण एकाकी आहोत, निराधार आहोत.इतर सुहृद आपल्याला केव्हा अंतर देतील कोण जाणे, ही भावनाही या कवितेत प्रकट झाली आहे. अशा त्यांच्या व्याकुळ मनस्थितीचे चित्रण त्यांच्या अनेक काव्यांतून झाले आहे.संजीवनीबाईही आपल्या कवितेवर अद्याप लोभ करतात–

' आणि, कविते रुसलीस कां ?
तुझ्यावाचून झाला मनोविहंग मुका '

असे म्हणून तिचा लटका रुसवा काढण्यासाठी तिची आर्जवही करतात. विषय एकच असला तरी शांताबाईंच्या काव्यातील भावनोत्कटता व प्रांजलपणा मनाची पकड घेतात.

हीच कविता सखी शांताबाईंच्या रोषाचाही विषय होते. जगातील स्वार्थांधता, विफलता, अन्याय सारे बघीतले की, मन उद्वेगाने म्हणते,

" जा जा कविते, आता न लगे मजला तव सहवास
तोडू दे मज कोमलतेचा अखेरचा हा पाश । "

' पुस्तकी जगातच आपण वावरल्याने जीवनातील कोमल सौंदर्याला मुकलो म्हणून वाटणारी हळहळ त्यानी,

' काव्यातील जीवनी दगले
जीवनातल्या काव्या मुकले '

म्हणून व्यक्त केली आहे. 'काव्य हे जीवन दर्शनातून निर्माण होते. याची जाणीव होऊन,

'अफाट जीवन पसरे भवती
'काव्य झरे त्यातून पाझरती'
तयात होवो विलीन वृत्ती

अशी इच्छा त्या प्रकट करतात.

जीवन एक खडकाळ पाऊलवाट आहे. काही वेळा जीवन हे देवालय नाही तर ते एक रणांगण आहे. याची जाणीव कवयित्रीस होते. या रणांगणात, मग तिला साथ मिळते, ती कविता सखीची.

कविता शांताबाईंना 'सखी', जिवाभावाची मैत्रीण वाटते. काव्यविषयक भूमिका स्पष्ट करताना त्या म्हणतात, 'कविते तूच माझी मैत्रीण आहेस. हे जग कठोर आणि निष्ठूर आहे. या जगात स्वप्नाना स्थान नसतेच मुळी ! पण तू तर माझी सहचारिणी आहेस. तुझ्याचमुळे मला स्वप्नांचा भास झाला. विषण्णता, क्रुरता या जगतास व्यापून उरल्या आहेत. पण तूच मला आनंददायी मार्ग दाखवलेस ना ? कोमल, मोहक वीसतंतुनी तूच बद्ध केलेस ना ? भोवतीचा चिखल मला तुझ्यामुळे नंदनवनासारखा वाटला. मी तुझ्यामुळे भोवतीच्या फुलांचो चाहूल घेऊन जगले. या दुर्भागी जीवा सभवती फुले मिळालीच नाहीत तर भेटले ते सारे काटे. त्यांच्या रुतण्यामुळे जीव भानावर आला. पण तेवढ्यात तू रमणीय इंद्रजाल माझ्या सभोवर तयार केलेस. नेत्र उघडता मात्र सारेच विरून गेले. जी स्वप्ने वास्तवात येणारच नाहीत तीच तू मला दाखविलीस. आणि माझा घात केलास. जीवनात सुख मिळण्यापेक्षा दुःखच मिळाले म्हणून कवयित्री म्हणते,

" या स्वप्नांची संपुनी रजनी येवो प्रखर प्रकाश
जा जा कविते ! न लगे आता मजला तव सहवास "

स्फूर्तीचा मौलिक क्षण पकडण्यासाठी नित्यचं कवीची धडपड चाललेली असते. ते हृदयीचं पाखरू चंचल असतं. त्याला पकडताना भाजण्याचीच शक्यता अधिक असते. त्याच्या पायात वारा असतो. निळे नभ दिसताना ते फडफड करते. आपल्या चिमुकल्या पंख सामर्थ्याने गगनात ते विहार करु बघते. कुठे तरी एखादा बहरलेला ताटवा दिसतो. मनास आनंद होतो. मनांत या पाखरांच मंजुळ, कोमळ, अस्फुट स्वर उमलू लागतात. ते जवळ येते अगदी जवळ आणि–

" निज जातीचे दिसता कोणी
खुळे तयाला बसे बिलगूनी
शब्दहीन भाषेत आपुल्या हितगुज लागे करु!
माझ्या हृदयाचे पाखरू
अस्थिर, चंचल भारी, कसे तया आवरु? "

स्वतःस साथ देईल असे कुणीही दिसतानां हे हृदयपाखरं जवळ जाते. हितगुज करु लागते. आपला पिसारा फुलवून, सारा आसमंत न्याहाळत, भवतीचा पसारा विसरण्याचा प्रयत्न करते. इवल्या नयनातील स्वप्ने हळू हळू पण विरू लागतात. मन खिन्न होते. हे मनाचे पाखरु जाता जाता दुःखी करून जाते.

कविता सखी, तुझ्या संगतीत मी माझे जीवन रंगवले, तुझ्यामुळेच दगडांना पाझर फुटले, जेंव्हा जेंव्हा हर्ष उरात दाटून येतो तेंव्हा तेंव्हा मनात मधूर भाव उसळतात. दुःखाचा कटू चषक घेऊन ही नियती दारी उभी राहीली. ती सारी कटूता तुझ्यामुळे सहन केली मी माझ्या अंधारमय मनांत जेंव्हा प्रीती सूर्य उगवला, तेंव्हा ते गोड गुपीत मीच तुला प्रथम सांगितले. जगापासून लपविलेले सारे गुज, मूक-लाजऱ्या मनोभावना मीच तुझ्या पूढे प्रकटविल्या. बाह्य जगाला विटून माझे चित्र अंतर्मुख झाले. त्यावेळी तूच माझ्या मनाला शीतलता दिलीस.

" जेथे कष्टक पथी पसरले
तुला तेथे फुलबाग फुलविली
अमूर्त माझी सारी स्वप्नें
तुझ्यामध्यें गे मूर्त जाहली "

जीवनाच्या मार्गावर किती सुहृदचजन येतील आणि जातील पण कविता सखी तुझा नी माझा स्नेह चिरंतन राहील.

भा. रा. तांबे रसिकांना उद्देशून म्हणतात,

" कुस्करू नका ही सुमनें
अर्पिली मी जी सुमनें
मधु नसे तीळ भरी अंतरी
तरी करी ही धरणे– "

आपल्या काव्यसुमनांना किती हळूवारपणे कवी रसिकांच्या हातात देत असतो. शांताबाईसुद्धा

' हे प्रिय रसिका ! दुर्बल मी तर,
तू जाणूनी घे मम अन्तर '

अशी कैफीयत मांडतात–

हृदयात मधुभाव उसळतात. गीत सागरांना भरती येते पण मनातले सारे भाव बाहेर पडत नाहीत. अस्फूट स्वर बाहेर पडतात. उत्कंठतेने उर दाटून येतो. ते व्यक्त करण्यास मन आतूर बनते पण शब्द गवसत नाही. मग कविते कशी रचू ? काही केल्या स्फूर्ती ही येत नाही. लहरी पांखरासारखी ती उडून जाते. पण रसिक मित्रा तू–

" कला मूर्त मी तू मम प्रियकर
माझ्या नवतीचा शाहीर
अधूऱ्या गीतांमागील निर्भर
भावपूर भे जाणुनिया तर– "

रसिकांना प्रियकर मानण्याची त्यांची ही वृत्ती वेगळी वाटते.

' कविता-रसिक ' हे कवयित्रीचे भावविश्व वाटते. कवितेत जाणवत राहते.

❖

आत्मपरीक्षणात्मक कविता

शांताबाई शेळक्यांच्या आत्मपरीक्षणात्मक कविता मनोहरी वाटतात. कारण कोणत्याही कवीला आपल्या " काव्याच्या मर्यादा व गुणविशेष " नेमक्या व सुंदर रीतीने सांगता येणे कठीणच आहे. पण शांताबाईंनी हे काम कुशलतेने केले आहे. त्यांच्या 'मी' या कवितेत जीवनात कोमल, मुग्ध, संयत अशा प्रकाराचे सौंदर्य ज्या ज्या गोष्टीत आहे ते ते आपण व्हावे, कुणाच्यातरी जीवनात आनंदाचे चांदणे पसरावे अशी उत्कट ओढ त्यांच्या मनाला अहोरात्र वाटते. मेघांची पटले भेदून गगनात संचार करणारा गरुड मी नव्हे तर मी हिरवळीतील कोमल फुलावरील फुलपाखरं आहे. गगना–गगनात लखलखणारी मी विद्युल्लता नव्हे, तर इवली मी चांदणी मानिनी गुलाब कलिका मी ? छे. " मी साधीभोळी तुळशीची मंजिरी असे त्या स्वत:चे वर्णन करतात. काव्याच्या शेवटी उदात्ततेचा फार सुंदर स्पर्श शांताबाईंनी केला आहे. " द्वेषाचे नाही भंयकर मी तांडव " तर " जे फुले अकारण चिमण्या गालावरी । त्या हास्यामधली केवळ मी माधुरी " असे त्या सांगतात. ही कविता वाजल्यानंतर कवी अनंत आठले यांची–

" मला वाटते केंव्हा केंव्हा व्हावे पर्जन्याची धार
हिरव्या हिरव्या नवांकुरांनी फुलवावा संभार "
अंधाऱ्या रात्रीत कुणाच्या हाती दीपक व्हावे
उजळूनि त्याची वाट, सुखाने हसत विझुनी जावे "

या काव्यपंक्तिची आठवण होते. असे दुसऱ्यासाठी जगणारे कवयित्रीचे मन आहे.

' अनंत स्वप्ने फुलवून दु:खी जीवन कंठणारी शांताबाईंची कविता निराशेने काळवंडल्याचे काही वेळेला दिसून येते. "

पण या निराशेतूनच–

' द्वेषाचे नाही भयंकर मी तांडव
क्रोधाची नाही ज्वाला मी अभिनव
जे फुले अकारण चिमण्या गालावरी
त्या हास्यामधली केवळ मी माधुरी '

स्वत:ला कवयित्री चिमुकले फुलपाखरू, इवली चांदणी, कलख करणारा निर्झर समजून स्वत:कडे लघुत्त्व घेते आहे आणि इतरांचे जीवन सुखी व्हावे अशी आशा मनांत बाळगते आहे.

वर्तमान व भविष्यकाळ या दोन काळांचा झगडा नेहमी शांताबाईंच्या मनात चाललेला दिसतो. भविष्यसुखाची आस त्या कधीच धरत नाहीत. दमलेल्या, थकलेल्या जीवाला पुढे सराई मिळेल पण आज सावलीला झुडूपही मिळत नाही. तहानेने व्याकुळ झालेल्या जीवाला भरविण्यात गार पाणी मिळेल. पण आज मात्र जीव व्याकुळ झाला आहे. पुढे कोणाचे तरी स्नेहाळ डोळे स्वागत करतील पण आज निर्जिव पत्थर सोबत करीत आहेत. कुणाच्यातरी करस्पर्शाने मायेचे संजीवन लाभेल पण आज मात्र कवयित्री उदास आहे.

' मधुसंगीत देईल चैतन्य जीवास
आज मात्र ऐकते मी येथ माझेच नि:श्वास !
लाभतील तेंव्हा पुढे लाभोत ही सौख्ये सारी
आज मात्र विषण्णता दाह चित्ताचा करी '

अशी भीषण उदासीनता त्यांच्या जीवनाला व्यापून राहिलेली आहे.

" मनीषा " या कवितेत स्वत:चे जीवन चंदनासारखे दुसऱ्यासाठी जळावे अशी अपेक्षा त्या बाळगतात. त्यांचे मन सहज मिळणाऱ्या तृप्ततेत रमत नाही. जे असाध्य आहे त्या ठिकाणी ते धाव घेते. कधी आभाळाला भेदून वीजेचे तेज उराशी कवटाळते, तर पाणी होऊन पर्वताचा माथा चुंबू लागते. जेथे बुद्धी आहे, धीर आहे अशा हृदयात अवगाहन करावे असे कवयित्रीला वाटते. पण ही सारी स्वप्ने ठरतात.

" स्वप्नामध्ये अज्ञात सुखे गळा घालिती मिठी
जागृतीत परी शैयेवर मी तळमळते एकटी
कधी न ये अनुभूति जयांची निष्ठूर या जीवनी
फसवी स्वप्ने रंगविते का निद्रा ती मन मनी ?"

स्वप्न आणि जागृती यातील सीमारेषा हळूवारपणे शांताबाईंनी टिपलेल्या आहेत. स्वप्नामध्ये पुष्पांचे नंदनवन दिसते. पण प्रत्यक्षात काटेरी रान असते. करपाशांच्या सुंदर माला, भेदक कटाक्ष प्रत्यक्षात उरत नाहीत. तर अश्रुंचा पूर मात्र नजरेला दिसतो. स्वप्नातले ते अपार वैभव व सुखमय जीवन मनाला मोहवते. पण क्षणात त्याची जागा कठोर समरांगण घेत असते.

कलंदराचे गीत गाण्यासाठी व जीवन जगण्यासाठी मन बंड करून उठते. सुख-दु:खाशी समयज्ञ असणारा, स्थितप्रज्ञ युयुक्षू म्हणजे कलंदर. अशा कलंदराचे

रसिकांना प्रियकर मानण्याची त्यांची ही वृत्ती वेगळी वाटते.

' कविता-रसिक ' हे कवयित्रीचे भावविश्व वाटते. कवितेत जाणवत राहते.

❖

आत्मपरीक्षणात्मक कविता

शांताबाई शेळक्यांच्या आत्मपरीक्षणात्मक कविता मनोहरी वाटतात. कारण कोणत्याही कवीला आपल्या " काव्याच्या मर्यादा व गुणविशेष " नेमक्या व सुंदर रीतीने सांगता येणे कठीणच आहे. पण शांताबाईंनी हे काम कुशलतेने केले आहे. त्यांच्या 'मी' या कवितेत जीवनात कोमल, मुग्ध, संयत अशा प्रकाराचे सौंदर्य ज्या ज्या गोष्टीत आहे ते ते आपण व्हावे, कुणाच्यातरी जीवनात आनंदाचे चांदणे पसरावे अशी उत्कट ओढ त्यांच्या मनाला अहोरात्र वाटते. मेघांची पटले भेदून गगनात संचार करणारा गरुड मी नव्हे तर मी हिरवळीतील कोमल फुलावरील फुलपाखरं आहे. गगना–गगनात लखलखणारी मी विद्युल्लता नव्हे, तर इवली मी चांदणी मानिनी गुलाब कलिका मी ? छे. " मी साधीभोळी तुळशीची मंजिरी असे त्या स्वत:चे वर्णन करतात. काव्याच्या शेवटी उदात्ततेचा फार सुंदर स्पर्श शांताबाईनी केला आहे. " द्वेषाचे नाही भंयकर मी तांडव " तर " जे फुले अकारण चिमण्या गालावरी । त्या हास्यामधली केवळ मी माधुरी " असे त्या सांगतात. ही कविता वाजल्यानंतर कवी अनंत आठले यांची–

" मला वाटते केंव्हा केंव्हा व्हावे पर्जन्याची धार
हिरव्या हिरव्या नवांकुरांनी फुलवावा संभार "
अंधाऱ्या रात्रीत कुणाच्या हाती दीपक व्हावे
उजळूनि त्याची वाट, सुखाने हसत विझुनी जावे "

या काव्यपंक्तिची आठवण होते. असे दुसऱ्यासाठी जगणारे कवयित्रीचे मन आहे.

' अनंत स्वप्ने फुलवून दु:खी जीवन कंठणारी शांताबाईंची कविता निराशेने काळवंडल्याचे काही वेळेला दिसून येते. "

पण या निराशेतूनच–

' द्वेषाचे नाही भयंकर मी तांडव
क्रोधाची नाही ज्वाला मी अभिनव
जे फुले अकारण चिमण्या गालावरी
त्या हास्यामधली केवळ मी माधुरी '

स्वत:ला कवयित्री चिमुकले फुलपाखरू, इवली चांदणी, कलख करणारा निर्झर समजून स्वत:कडे लघुत्त्व घेते आहे आणि इतरांचे जीवन सुखी व्हावे अशी आशा मनांत बाळगते आहे.

वर्तमान व भविष्यकाळ या दोन काळांचा झगडा नेहमी शांताबाईंच्या मनात चाललेला दिसतो. भविष्यसुखाची आस त्या कधीच धरत नाहीत. दमलेल्या, थकलेल्या जीवाला पुढे सराई मिळेल पण आज सावलीला झुडूपही मिळत नाही. तहानेने व्याकुळ झालेल्या जीवाला भरविण्यात गार पाणी मिळेल. पण आज मात्र जीव व्याकुळ झाला आहे. पुढे कोणाचे तरी स्नेहाळ डोळे स्वागत करतील पण आज निर्जिव पत्थर सोबत करीत आहेत. कुणाच्यातरी करस्पर्शाने मायेचे संजीवन लाभेल पण आज मात्र कवयित्री उदास आहे.

' मधुसंगीत देईल चैतन्य जीवास
आज मात्र ऐकते मी येथ माझेच नि:श्वास !
लाभतील तेंव्हा पुढे लाभोत ही सौख्ये सारी
आज मात्र विषण्णता दाह चित्ताचा करी '

अशी भीषण उदासीनता त्यांच्या जीवनाला व्यापून राहिलेली आहे.

" मनीषा " या कवितेत स्वत:चे जीवन चंदनासारखे दुसऱ्यासाठी जळावे अशी अपेक्षा त्या बाळगतात. त्यांचे मन सहज मिळणाऱ्या तृप्ततेत रमत नाही. जे असाध्य आहे त्या ठिकाणी ते धाव घेते. कधी आभाळाला भेदून वीजेचे तेज उराशी कवटाळते, तर पाणी होऊन पर्वताचा माथा चुंबू लागते. जेथे बुद्धी आहे, धीर आहे अशा हृदयात अवगाहन करावे असे कवयित्रीला वाटते. पण ही सारी स्वप्ने ठरतात.

" स्वप्नामध्ये अज्ञात सुखे गळा घालिती मिठी
जागृतीत परी शैयेवर मी तळमळते एकटी
कधी न ये अनुभूति जयांची निष्ठूर या जीवनी
फसवी स्वप्ने रंगविते का निद्रा ती मन मनी ?"

स्वप्न आणि जागृती यातील सीमारेषा हळूवारपणे शांताबाईंनी टिपलेल्या आहेत. स्वप्नामध्ये पुष्पांचे नंदनवन दिसते. पण प्रत्यक्षात काटेरी रान असते. करपाशांच्या सुंदर माला, भेदक कटाक्ष प्रत्यक्षात उरत नाहीत. तर अश्रुंचा पूर मात्र नजरेला दिसतो. स्वप्नातले ते अपार वैभव व सुखमय जीवन मनाला मोहवते. पण क्षणात त्याची जागा कठोर समरांगण घेत असते.

कलंदराचे गीत गाण्यासाठी व जीवन जगण्यासाठी मन बंड करून उठते. सुख-दु:खाशी समयज्ञ असणारा, स्थितप्रज्ञ युयुक्षू म्हणजे कलंदर. अशा कलंदराचे

रसिकांना प्रियकर मानण्याची त्यांची ही वृत्ती वेगळी वाटते.

' कविता-रसिक ' हे कवयित्रीचे भावविश्व वाटते. कवितेत जाणवत राहते.

❖

आत्मपरीक्षणात्मक कविता

शांताबाई शेळक्यांच्या आत्मपरीक्षणात्मक कविता मनोहरी वाटतात. कारण कोणत्याही कवीला आपल्या " काव्याच्या मर्यादा व गुणविशेष " नेमक्या व सुंदर रीतीने सांगता येणे कठीणच आहे. पण शांताबाईंनी हे काम कुशलतेने केले आहे. त्यांच्या 'मी' या कवितेत जीवनात कोमल, मुग्ध, संयत अशा प्रकाराचे सौंदर्य ज्या ज्या गोष्टीत आहे ते ते आपण व्हावे, कुणाच्यातरी जीवनात आनंदाचे चांदणे पसरावे अशी उत्कट ओढ त्यांच्या मनाला अहोरात्र वाटते. मेघांची पटले भेदून गगनात संचार करणारा गरुड मी नव्हे तर मी हिरवळीतील कोमल फुलावरील फुलपाखरं आहे. गगना–गगनात लखलखणारी मी विद्युल्लता नव्हे, तर इवली मी चांदणी मानिनी गुलाब कलिका मी ? छे. " मी साधीभोळी तुळशीची मंजिरी असे त्या स्वत:चे वर्णन करतात. काव्याच्या शेवटी उदात्ततेचा फार सुंदर स्पर्श शांताबाईनी केला आहे. " द्वेषाचे नाही भंयकर मी तांडव " तर " जे फुले अकारण चिमण्या गालावरी । त्या हास्यामधली केवळ मी माधुरी " असे त्या सांगतात. ही कविता वाजल्यानंतर कवी अनंत आठले यांची–

" मला वाटते केंव्हा केंव्हा व्हावे पर्जन्याची धार
हिरव्या हिरव्या नवांकुरांनी फुलवावा संभार "
अंधाऱ्या रात्रीत कुणाच्या हाती दीपक व्हावे
उजळूनि त्याची वाट, सुखाने हसत विझुनी जावे "

या काव्यपंक्तिची आठवण होते. असे दुसऱ्यासाठी जगणारे कवयित्रीचे मन आहे.

' अनंत स्वप्ने फुलवून दु:खी जीवन कंठणारी शांताबाईंची कविता निराशेने काळवंडल्याचे काही वेळेला दिसून येते. "

पण या निराशेतूनच–

' द्वेषाचे नाही भयंकर मी तांडव
क्रोधाची नाही ज्वाला मी अभिनव
जे फुले अकारण चिमण्या गालावरी
त्या हास्यामधली केवळ मी माधुरी '

स्वत:ला कवयित्री चिमुकले फुलपाखरू, इवली चांदणी, कलख करणारा निर्झर समजून स्वत:कडे लघुत्व घेते आहे आणि इतरांचे जीवन सुखी व्हावे अशी आशा मनांत बाळगते आहे.

वर्तमान व भविष्यकाळ या दोन काळांचा झगडा नेहमी शांताबाईंच्या मनात चाललेला दिसतो. भविष्यसुखाची आस त्या कधीच धरत नाहीत. दमलेल्या, थकलेल्या जीवाला पुढे सराई मिळेल पण आज सावलीला झुडूपही मिळत नाही. तहानेने व्याकुळ झालेल्या जीवाला भरविण्यात गार पाणी मिळेल. पण आज मात्र जीव व्याकुळ झाला आहे. पुढे कोणाचे तरी स्नेहाळ डोळे स्वागत करतील पण आज निर्जिव पत्थर सोबत करीत आहेत. कुणाच्यातरी करस्पर्शाने मायेचे संजीवन लाभेल पण आज मात्र कवयित्री उदास आहे.

' मधुसंगीत देईल चैतन्य जीवास
आज मात्र ऐकते मी येथ माझेच नि:श्वास !
लाभतील तेंव्हा पुढे लाभोत ही सौख्ये सारी
आज मात्र विषण्णता दाह चित्ताचा करी '

अशी भीषण उदासीनता त्यांच्या जीवनाला व्यापून राहिलेली आहे.

" मनीषा " या कवितेत स्वत:चे जीवन चंदनासारखे दुसऱ्यासाठी जळावे अशी अपेक्षा त्या बाळगतात. त्यांचे मन सहज मिळणाऱ्या तृप्ततेत रमत नाही. जे असाध्य आहे त्या ठिकाणी ते धाव घेते. कधी आभाळाला भेदून वीजेचे तेज उराशी कवटाळते, तर पाणी होऊन पर्वताचा माथा चुंबू लागते. जेथे बुद्धी आहे, धीर आहे अशा हृदयात अवगाहन करावे असे कवयित्रीला वाटते. पण ही सारी स्वप्ने ठरतात.

" स्वप्नामध्ये अज्ञात सुखे गळा घालिती मिठी
जागृतीत परी शैयेवर मी तळमळते एकटी
कधी न ये अनुभूति जयांची निष्ठूर या जीवनी
फसवी स्वप्ने रंगविते का निद्रा तो मन मनी ?"

स्वप्न आणि जागृती यातील सीमारेषा हळूवारपणे शांताबाईंनी टिपलेल्या आहेत. स्वप्नामध्ये पुष्पांचे नंदनवन दिसते. पण प्रत्यक्षात काटेरी रान असते. करपाशांच्या सुंदर माला, भेदक कटाक्ष प्रत्यक्षात उरत नाहीत. तर अश्रुंचा पूर मात्र नजरेला दिसतो. स्वप्नातले ते अपार वैभव व सुखमय जीवन मनाला मोहवते. पण क्षणात त्याची जागा कठोर समरांगण घेत असते.

कलंदराचे गीत गाण्यासाठी व जीवन जगण्यासाठी मन बंड करून उठते. सुख-दु:खाशी समयज्ञ असणारा, स्थितप्रज्ञ युयुक्षू म्हणजे कलंदर. अशा कलंदराचे

गीत त्यांना प्रिय आहे. पायाखाली विशाल धरती पसरलेली असते, आभाळाची निळी छाया माथ्यावर, यातूनच दिनरात भ्रमण करणे प्रिय आहे. कधी सराईत विश्रांती घेता घेता रेशमाचे करपाश कंठी पडले होते. आसवांच्या बरोबर प्रीती रंगवलेली होती. पण या मोहात या कलंदराचे मन गुंतत नाही. मदिरेचा मादक प्याला प्राशन केल्यानंतर बेहोषी, धुंदी, कैफ मनाला चढत नाही आणि विरक्तताही अंगात बाणत नाही. या कलंदराने षड्रिपूंवर मात केली. जीवनातील नव्या नव्या अनुभूती घेण्यासाठी तो आतुर झाला आहे. पण कशाचेही संस्कार त्याच्या मनावर न उमटता अलिप्त कमलपत्राप्रमाणे राहिला आहे आणि आज स्वतःचे संगीत सुखाने गात,

' मी मुक्त कलंदर, चिरकालाचा पांथ
ही अज्ञातातून चालत आलो वाट '

शांताबाईंची ही कलंदर वृत्ती पाहता, कुसुमाग्रजांचा कलंदर आपल्याला नजरेआड करता येत नाही-

' माझ्या राज्यात मीच भूप, मीच प्रजा
माझ्या देवळात मीच देव, मीच पूजा '

जीवनाला वैतागलेली कवयित्री गूढ, तरल लाजऱ्या कल्पनांना व कोमल, मुग्ध उज्वल भावनांना सावरत प्रीतीचा यज्ञ पेटवून उभी आहे. स्वतःचे जीवन जाळून कणाकणाने सर्वस्वाचा त्याग करण्यास ती आतूर आहे. मनावरती सूड घेणारी ही कवयित्री अखेरची आहुती देऊन-

' यज्ञ देवते ! तव वेदीवर
समर्पिले हृदयरत्न मनोहर
आता तरी निष्कटंक हो मम जीवनमार्ग '

अशी आळवणी करते आहे.

काही वेळा शांताबाईंच्या कवितेत तांबे संप्रदायाचे सूर उमटल्याचे दिसतात. भा. रा. तांबे यांचे शिष्य बा. भ. बोरकर यांना-

अमृत घट भरले तुझ्या घरी
का वणवण फिरशी बाजारी

अशी जी खंत असते तीच खंत, तीच - - - - पश्चातापाची भावना मनात खंत निर्माण करते. तीच भावना स्पष्ट करताना कवयित्री म्हणते-

' प्रिय भगिनीचे ओठ कोवळे
भावाचे वा जावळ काळे

अधीरतेने कधी न चुंबिले
कधी न त्या पोटाशी धरिले
कारण,
काव्यातील जीवनी रंगले
पण यामुळे-
जीवनातल्या काव्या मुकले ! '

गंधमाधुरी घेऊन वारा दाराशी आला होता. नवशृंगाराने पृथ्वी नटली होती. सुमनांच्यावर भ्रमर रुंजी घालत होते. पण या मोहक जीवनात कवयित्री गुंतून न पडता मी पुस्तकात आणि पुस्तकातल्या शद्वात वेडावून गेली. जीवनातल्या खऱ्या काव्याला सोडून पुस्तकातल्या अचेतन जीवनाला तिने कवटाळले त्यामुळे–

" सदाच मी एकली जीवनी सदाच मी एकली
अफाट जीवन मार्गावरती
जरी शोधिल्या किती संगती
दुरावल्या त्या सकलही अंती
साथ द्यावया अता राहिली केवळ मम सावली
हे दुःख उराशी आले. "

कुणाच्या नयनाला नयन खेळवून स्वप्नात मन गुंतून गेले, हसण्यात रंगून गेले, अश्रुने व्याकुळले, वसंतात बहरले, शिषिरात बधिरले. पण ही बधीरताच टिकली, फुलणे नाही. म्हणून आज नवीन सृष्टी उभारण्याचे कवयित्रीस वेड नाही. कारण, एकांतात तिच्या जीवाची काहिली झाली आहे. त्यामुळे ती स्वतःचा वेगळा मार्ग निवडते. पण तिचे हे जीवन पाहिल्यानंतर भोवती वादळ उठते. जीवनातल्या माधुर्याला कटूता येते. स्वप्ने अग्नीसारखी दाहक वाटू लागतात. मुक्त जीवनाची ओढ मनात असते. पण पिंजऱ्यातील सारिकेसारखी कवयित्री बंदिस्त असते.

आज जीवनपुष्पाचा गंध उडून गेलेला असतो, पाकळ्या जीर्ण झालेल्या असतात, नेत्रात अश्रू दाटून येतात. शैशवातील उत्फुल्ल जीवन कधीच संपलेले असते. पण कधीतरी कवयित्रीचा गाव तिला आठवतो. ज्या शिवारात तिने जन्म घेतला, ज्या मातीचा ठसा तिच्या मनांवर उमटला, ज्या भूमीवर तीचे मुग्ध शैशव गेले, जिथे ती नाचली, बागडली, नीलवर्ण टेकड्या पायी तुडवल्या, खगांची किलबिल ऐकली–

" मी शेतामधल्या पाऊलवाटातून
हिंडले कितीकदा होऊनीया उन्मन

बांधावर चिमणी रानफुले डोलती
पाहून तयांना विस्मित झाली माती ''

हे सारे वातावरण शांताबाईना आवडते. लिंबाच्या मोहोराने त्यांचे मन मोहरून येते. बांधावर उभ्या असणाऱ्या बाभळी–

' या विनयशील बाभळी बालिकागुणी
शैशवी जाहल्या माझ्या प्रिय भगिणी '

निसर्गाकडे त्या अपत्त्याच्या भावनेने पाहतात. दिवसेदिवस मानवी जीवन यंत्रवत होते आहे. पण मनाला समाधान देणारे कवयित्रीचे गाव अजूनही मनावर तरळत आहे.

एकूण शांताबाईची आत्मपरीक्षणात्मक कविता पाहता जीवनातल्या दुःखाने ती कालवंडून गेली आहे. तर दारुण प्रेमभंगाच्या दुःखाने ती व्याकूळली आहे. जीवनाची वाटचाल चालताना जशा त्या एकाकीच राहिल्या,

'' अजूनी चालतोचि वाट माळ हा सरेना
विश्रांतीस्थल केव्हा यायचे कळेना ''

ही रेंदाळकरांची तळमळ त्यांच्याही काव्यात आहे.

' कुणी न सांगाती ज्याच्या वक्षावर
ठेवीन हे शीर निश्चीत मी ! '

जीवनाचे फार मोठे अपयश या कवयित्रीने पचविले आहे असे वरील ओळी वाचल्यानंतर वाटत राहते.

❖

शांताबाईंचे जीवन विषयक चिंतन

शांताबाईच्या कवितेतला मोठा भाग त्यांच्याच जीवन विषयक विचारांनी व्यापलेला आहे. कधी 'जीवन म्हणजे एक दीर्घ विरह गीत! क्षण मीलन चिरवियोग हीच इथे रीत' असे त्याना वाटते. माणसाचे मन जीवनातील वसंताच्या आनंदाने उत्फुल्ल होते.तोच त्याला शिशीराचा हिमस्पर्श होतो. प्रीतीच्या स्कंधावर विश्वासाने मान ठेवावी तर ती फसवून जाते, तेंव्हा काय करायचे रडून कुठून ? ' चल जीवा एकाकी मार्ग आक्रमीत ' । कारण 'क्षणीक येथला निवास । हंसुनी घे करूनी गोड' हेच गोड असा इशारा त्या आपल्या मनाला देतात, तर कधी रस्ता चुकलेल्या वाटसरूला ' घेई विसावा येथे घडीभर ।
जा नंतर आपुल्या घरा '

असे म्हणून त्या आवर्जून प्रार्थना करतात. 'रखरखलेल्या' दुपारी वैरांणातून 'भराभरा' वाट कापणारा वाटसरू ,त्याच्या चर्येवरची सुकलेले मार्दव, त्याची शांत मूर्ती आणि स्नेहल छायेसाठी त्याचा उत्सुकलेला जीव, याचे करुणामय चित्र शांताबाईंनी काढले आहे. अर्थानुकूल अशी त्यांची विशेषणे त्यांच्या कवितेत केवढा जीवंतपणा ओततात–

'तृषा श्रमावी कुणाची तरी यास्तव' हा 'तळमळे' झरा - - - - या शब्दात शांताबाईंनी आपले मनोगत प्रांजलपणे खोलले आहे. कसली तरी स्वार्थी-संकुचित भावना आहे, का याच्या पाठीमागे ? शांताबाईंची ही निरपेक्षवृत्तीची मधुर भावना त्यांच्या जीवनविषयक काव्यातून अनेक वेळा प्रकट झाली आहे. कधी जीवन हा हर्षाने भरलेला प्याला आहे. असे म्हणून पिण्यासाठी ओठाला लावावा, तो नियती त्यात विषबिंदु टाकते म्हणून जीवनाबद्दल त्यांचे मन कडवट बनते.

प्रा. किर्लोस्कर यानी म्हटल्याप्रमाणे 'जीवनाचे कडवट अनुभव' शांताबाईंच्या काव्यात आहेत. हे जीवनाचे कडवट अनुभव त्यानी अधिक विस्ताराने पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

श्रद्धा आणि बुद्धी यातला झगडा कवयित्री स्पष्ट करताना म्हणते–

" श्रद्धा जी जी पूजास्थाने मजलागी
बुद्धी त्यातील दोष नेमके शोधुनिया काढिते । "

श्रद्धा ही माणसाला विजयी करते. परमेश्वरांकडे नेण्याचा तो एक मार्ग आहे. एवढेच नव्हे तर प्रीतीमध्ये विलीन व्हायचे असेल तर श्रद्धा हवीच ! पण प्रीतीच्या प्याल्यातील प्रेमाची व्यंगे मात्र बुद्धी स्पष्ट करते. म्हणून श्रद्धा ही साध्या–भोळ्या स्त्रीप्रमाणे आहे. तिला बुद्धी पायबंद घालू शकणार नाही.

" बुद्धी आपुले पायबंद नच शकेल घालु जिला
भोळी, सुंदर, निर्भय श्रद्धा मिळेल का ती मला ? "

मानवाच्या जीवनात श्रद्धेचे केवढे महत्त्वाचे स्थान आहे हे शांताबाईंनी स्पष्ट केले आहे.

जीवनाचा वेध घेत असताना त्या परत म्हणतात–

" जीवन म्हणजेच एक दीर्घ विरह गीत
क्षण मीलन, चिरवियोग हीच इथे रीत "

पुष्पगुच्छ बहरल्यावर जीवनात वसंत येतो. पण एवढ्यात शिशीराचा स्पर्श होतो. मधुमीलनात चित्त तल्लीन होते. तोच विरहकाळ येतो आणि क्रांतीची भैरवी आळवावी लागते.

एखाद्या मूर्तीकाराने जन्मभर खपून मूर्ती तयार करावी. काळाने मात्र ती

क्षणात भग्न करावी. जीवनाची ही कठोर वाटचाल करावी मग–

" अश्रु का मग नयनी ?
शोकगीत का वदनी ?
'सांगाती' हो न कुणी
चल जीवा एकाकी मार्ग आक्रमीत ! "

डोळ्यातल्या अश्रुना सांवरत, शोक गीत गात, बरोबर कुणीच नाही, एकटा आणि एकाकी जीव एकाकी मार्गावरून चालू लागतो. जीवन म्हणजे-

" भवतांशी तोड पाश
हृदयाची सोड आस
क्षणिक येथला निवास
हंसुनी घे करूनी गोड; हेच तुज विहीन! "

इथे पाश तोडावे लागतात. हृदयाची आंस सोडावी लागते कारण, येथला निवास क्षणिक आहे. जे चार दिवस मिळाले ते गोड मानून गेले पाहिजे. हे दिवस जगत असताना जीवनांत अनेक वादळे आली. ' वादळ सरले, आली अन्ती नाव बंदरात! ' असे मनास वाटते. किती संकटातून रखडत ती आलेली असते. तुफानासवे तिचा झगडा चाललेला असतो. प्रचंड लाटावर ती दिनरात्र असते. प्रकाशाचा कवडसा ही जवळ नसतो. भवती तर भयंकर अंधार, या तग्गतही धैर्याने पथ आक्रमित जातो. कधी तरी समजून जाते धैर्य सरले आहे हात फाटून गेला आहे. दर्यावरची मर्दुमकी खूप जाहली आहे.

" हातही थकले वल्ही मारुनी
शिणला जीवही प्रवास करुनी
आणि लागले किनाऱ्याकडे डोळे हे शांत! "

थकल्या मनाची अचूक अवस्था टिपल्याचे दिसून येते. जीवनात जे वादळ निर्माण झाले ते अंती तरी शांत होईल कां? असा प्रश्न त्या स्वत:शीच विचारत राहतात.

' एक जलसंचय ' या काव्यात तर हे जीवन निरर्थकच आहे असे त्याना वाटते. इथे कसली खळबळ नाही. हे गढूळलेले जल मात्र भवती पसरून आहे. येथले कमळ कधी फुललेले नाहीत. इथल्या हंसानी चंचलता दाखविली नाही. मनोरंजन केले नाही. उषासुंदरीने आपले रुप दर्पणात पाहिले नाही. उदास मनाने शैल मात्र गुरफटून गेले आहे. तरंग्या सावल्या खिन्न झाल्या आहेत मग–

" काय अर्थ तरी आहे सांगा निर्जीव या जीवात
हास्याची वा अश्रुंचीही उत्कटता जेथ ना !
उसडून जावे जीवन अवघे तुफान धन येऊनी
ग्रीष्माने वा समूळ जावा संयम हा आटुनी! "

अश्रू-हंसू काहीच नाही! मग जीवनात अर्थ तरी काय ? सारे जीवन त्यांना निरर्थक वाटते.

काही वेळेला या व्यवहाराशी त्यांना जमवून घेणे, कठीण वाटते. इंदिरा संतानी हाच अनुभव साकारला आहे. वृथा जीवनाचा अट्टाहास करत आपण चालतो. हाताशी काहीच येत नाही. वैराण वाळवंट कापीत राहणे एवढेच उरते! तहानेने जीव व्याकूळ होतो. भवती उन्हाच्या वाफा असतात तर–

" शैशवीची निरागस स्वप्ने पूर्ण मावळली
व्यवहारवादामध्ये हीच जीवाची काहिली "

येथे पैशावर जग चालते. माल हवा तर पैसा टाका. भावनांची कोमलता इथे चालत नाही. अंतरीचे दुःख कोणास सांगता येत नाही. ध्येये दूरच राहतात. आपणच मरण ओढवून घेतो. जग मात्र उपहासानें, आपल्या मूर्खपणावर हसत राहते.

जीवनात यशापेक्षा अपयश, प्रेमापेक्षा निराशा, ध्येय सफलते ऐवजी विफलता अधिक प्राप्त झाली आहे. त्यामुळे शांताबाईंनी जीवन–विषयक निराशाच व्यक्त केली आहे. जीवनाच्या एकाकी मार्गावरून प्रवास करत असताना जे जे जाणवले, भावले ते तेच काव्यबद्ध झाल्याचे जाणवते.

❖

सहवास तुझा जर नित्य मिळे

शांताबाईंच्या प्रीती विषयक कविता वाचनिय आहेत. परंतु त्यांत विफलतेचे, निराशेचे सूर अधिक आहेत. शारीरिक सुखाशिवाय खऱ्या प्रेमाची तृप्ती होत नसल्याचा विचारही अनेकवार स्पष्ट झाला आहे.

' सहवास तुझा जरि नित्य मिळे तरी गुढ तुझे मज नच उकले ' पण ' घेशी मजला जें करपाशी । हर्ष तेधवा भरे मानसी ! आणि नयन मिळता नयनासी क्षण गमे ऐक्य झाले आपुले ! ' पण ' शिथील होता तव अलिंगन - ' त्यावेळी 'चित्तात पुन्हा अन् द्वैत सले' अशी भावना त्या प्रकट करतात. किंवा ' राजसा, वक्षावरी तुझ्या मला घे ओढूनिया । '

क्षणात भग्न करावी. जीवनाची ही कठोर वाटचाल करावी मग–

" अश्रु का मग नयनी ?
शोकगीत का वदनी ?
'सांगाती' हो न कुणी
चल जीवा एकाकी मार्ग आक्रमीत ! "

डोळ्यातल्या अश्रुना सांवरत, शोक गीत गात, बरोबर कुणीच नाही, एकटा आणि एकाकी जीव एकाकी मार्गावरून चालू लागतो. जीवन म्हणजे-

" भवतांशी तोड पाश
हृदयाची सोड आस
क्षणिक येथला निवास
हंसुनी घे करूनी गोड; हेच तुज विहीन! "

इथे पाश तोडावे लागतात. हृदयाची आंस सोडावी लागते कारण, येथला निवास क्षणिक आहे. जे चार दिवस मिळाले ते गोड मानून गेले पाहिजे. हे दिवस जगत असताना जीवनांत अनेक वादळे आली. ' वादळ सरले, आली अन्ती नाव बंदरात! ' असे मनास वाटते. किती संकटातून रखडत ती आलेली असते. तुफानासवे तिचा झगडा चाललेला असतो. प्रचंड लाटावर ती दिनरात्र असते. प्रकाशाचा कवडसा ही जवळ नसतो. भवती तर भयंकर अंधार, या तग्गतही धैर्याने पथ आक्रमित जातो. कधी तरी समजून जाते धैर्य सरले आहे हात फाटून गेला आहे. दर्यावरची मर्दुमकी खूप जाहली आहे.

" हातही थकले वल्ही मारुनी
शिणला जीवही प्रवास करुनी
आणि लागले किनाऱ्याकडे डोळे हे शांत! "

थकल्या मनाची अचूक अवस्था टिपल्याचे दिसून येते. जीवनात जे वादळ निर्माण झाले ते अंती तरी शांत होईल कां? असा प्रश्न त्या स्वतःशीच विचारत राहतात.

' एक जलसंचय ' या काव्यात तर हे जीवन निरर्थकच आहे असे त्याना वाटते. इथे कसली खळबळ नाही. हे गढूळलेले जल मात्र भवती पसरून आहे. येथले कमळ कधी फुललेले नाहीत. इथल्या हंसानी चंचलता दाखविली नाही. मनोरंजन केले नाही. उषासुंदरीने आपले रुप दर्पणात पाहिले नाही. उदास मनाने शैल मात्र गुरफंटून गेले आहे. तरंगच्या सावल्या खिन्न झाल्या आहेत मग–

" काय अर्थ तरी आहे सांगा निर्जीव या जीवात
हास्याची वा अश्रुंचीही उत्कटता जेथ ना !
उसडून जावे जीवन अवघे तुफान धन येऊनी
ग्रीष्माने वा समूळ जावा संयम हा आटुनी! "

अश्रू-हंसू काहीच नाही! मग जीवनात अर्थ तरी काय ? सारे जीवन त्यांना निरर्थक वाटते.

काही वेळेला या व्यवहाराशी त्यांना जमवून घेणे, कठीण वाटते. इंदिरा संतानी हाच अनुभव साकारला आहे. वृथा जीवनाचा अट्टाहास करत आपण चालतो. हाताशी काहीच येत नाही. वैराण वाळवंट कापीत राहणे एवढेच उरते! तहानेने जीव व्याकूळ होतो. भवती उन्हाच्या वाफा असतात तर–

" शैशवीची निरागस स्वप्ने पूर्ण मावळली
व्यवहारवादामध्ये हीच जीवाची काहिली "

येथे पैशावर जग चालते. माल हवा तर पैसा टाका. भावनांची कोमलता इथे चालत नाही. अंतरीचे दुःख कोणास सांगता येत नाही. ध्येये दूरच राहतात. आपणच मरण ओढवून घेतो. जग मात्र उपहासानें, आपल्या मूर्खपणावर हसत राहते.

जीवनात यशापेक्षा अपयश, प्रेमापेक्षा निराशा, ध्येय सफलते ऐवजी विफलता अधिक प्राप्त झाली आहे. त्यामुळे शांताबाईंनी जीवन–विषयक निराशाच व्यक्त केली आहे. जीवनाच्या एकाकी मार्गावरून प्रवास करत असताना जे जे जाणवले, भावले ते तेच काव्यबद्ध झाल्याचे जाणवते.

❖

सहवास तुझा जर नित्य मिळे

शांताबाईंच्या प्रीती विषयक कविता वाचनिय आहेत. परंतु त्यांत विफलतेचे, निराशेचे सूर अधिक आहेत. शारीरिक सुखाशिवाय खऱ्या प्रेमाची तृप्ती होत नसल्याचा विचारही अनेकवार स्पष्ट झाला आहे.

' सहवास तुझा जरि नित्य मिळे तरी गुढ तुझे मज नच उकले ' पण ' घेशी मजला जें करपाशी । हर्ष तेधवा भरे मानसी ! आणि नयन मिळता नयनासी क्षण गमे ऐक्य झाले आपुले ! ' पण ' शिथील होता तव अलिंगन - ' त्यावेळी 'चित्रात पुन्हा अन् द्वैत सले' अशी भावना त्या प्रकट करतात. किंवा ' राजसा, वक्षावरी तुझ्या मला घे ओढूनिया । '

वेळ साजे ही प्रीतीच्या विश्रब्ध केली । अशा प्रकारच्या पार्थीव सुखाचे चित्रणहि त्यांच्या काव्यात आढळते. अंतःकरणात निराशेचा अंधार पसरल्यानें तुझ्याजवळ प्रकाश मिळेल म्हणून मी धावले. पण –

' हाय परी तुझे बंद हे कवाड
दर्शनाच्या आड येई सख्या
दूर हे व्हायचे कधी अंतराय
कधी तुझे पाय लाभणार ? '

अशी आर्ततांही त्यांच्या काव्यात आहे. ' तू कृष्ण मी राधा ! तू भृंग मी सुमन ! तू रविकिरण मी दवबिंदू होऊन ' मी विलीन अंती होईन रे तुज ठायी ' अशी आत्मसमर्पणासाठी उत्सुक, अधिर अशी वृत्तीही त्यांच्या काव्यात दिसते. काही वेळा त्यांच्या प्रेम काव्यात भडक व काहीसा उत्तान शृंगार रंगविलेला आहे. याचे कारण संस्कृत वाङमयाच्या अभ्यासाने त्यांच्या मनावर झाला असावा " संस्कृत वाङमयातील प्रेमाचे चित्रण हे बरेचसे भडक व मूलतः शारीरिक स्वरूपाचे असते. पण नव्याने येऊ पाहणारा लिंग संप्रदाय त्यामध्ये मुळीच नाही. "

शांताबाईंच्या प्रीती कवितेत शारीरिक मीलनाची आस, व भडक प्रीतीचे रंग आहेत असे मालतीबाई किर्लोस्कर यांना वाटते. वरील विधान जरी सत्य असले तरी याचे मूळ संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासाने झाले आहे, हे त्यांचे विधान अर्धसत्य आहे. शांताबाईंच्या काव्यावर माधव ज्यूलीयनांच्या काव्याचा फार मोठा परिणाम झाला आहे. स्वतः त्या तशी कबूली देतात. माधवरावांचे व्यक्तिमत्त्व या दृष्टीने स्पष्ट करताना प्रा. गिरीश म्हणतात, " त्याना प्रीतीची झळ लागली ती दग्धपक्ष पतंगाला लागलेल्या झळीसारखी होती. आणि तो पतंग ज्याप्रमाणे दग्धपक्ष होऊन तळमळत पडला होता. त्याप्रमाणे माधवराव हे जन्मभर तडफडत राहिले. माधवराव हे वृत्तीने स्वैरालापी, प्रेमनारायण, पुष्पविलासी व कविताचारण होते, आणि म्हणून अंतःकरणातील उर्मिना त्यांनी गीतातून वाट करून दिली "

वैयक्तिक जीवनात जो अनुभव प्रीतीच्या बाबतीत माधव ज्युलीयन यांना आला. तीच झळ शांताबाईना बसलेली आहे. त्यामुळे या दोहोंची प्रीती नीराशेची भावना समरूप आहे.

' विरहतरंग ' या काव्यात नायिका नायकाचे चुंबन घेते. असा एक भ्रम आहे.

प्रा. रा. श्री. जोगाचे हे विधान व एकूण माधवरावांची काव्यवृत्ती पाहता शरीर सुखाची भावना त्यानी आपल्याहि काव्यात व्यक्त केली आहे व स्वतः शांताबाई माधव ज्युलीयनांच्या काव्याचा परिणाम आपल्या मनावर झाला अशी स्पष्ट कबुलीही देतात. ❖❖

शांताबाई नायक की - - -

साधारण एखाद्या कविचे व्यक्तीमत्त्व त्या कविच्या काव्यात स्पष्ट होत असते. 'वर्षा' या संग्रहात शांताबाईंचे हे व्यक्तीमत्त्व साकारले आहे. रविकिरण मंडळाचा परिणाम म्हणून कांहीवेळा त्या स्त्रीरुपापेक्षा पुरुष रुप धारण करतात. प्रियकारास स्त्रीरुप देतात व स्वतःच्या भावना त्या व्यक्त करतात. खरे म्हणजे त्याना हे सारे बोलणे–लिहीणे प्रियकरास उद्देशून करावयाचे असते.

"कठोर माझ्या स्पर्शानेंही क्षणांत करपेल सुमासम मृदूल तव काया"

असे, किंवा

आणिसी वेडे ! कशाला आंसवे ही लोचनी

असे जेंव्हा त्यांचा नायक बोलतो तेंव्हा ते बोलणे कवयित्रीचे असते.

❖

प्रीती तरंगातील विफलता

गोविंदाग्रजांची 'निर्दय बालेस' ही कविता शांताबाईंचा प्रकृतीधर्माची आवडती आहे. गोविंदाग्रजांच्या निर्दयी बालेने एका कविचे जीवन उध्वस्त करायला नको होते, असे त्याना वाटते. म्हणून त्या तिची विनवणी, समजावणी करतात. ' निर्दय बाले' काही दिव्य उदात्त असणारी ही प्रीती, त्या प्रीतीचे दर्शन तू त्या कवीस दे. ज्यामुळे तो कवी उन्मत्त होईल. तुझी बुद्धी तीव्र आहे. सौंदर्य मनोहर आहे. त्यामुळेच सौंदर्यातुर असणारा तो कवी खुळा होऊन गेला. सर्वस्वासह तुला आपले हृदय त्याने अर्पण केले. प्रीतीचे सुकुमार पुष्प तुझ्या पावलांवर अर्पण केले. तुझे प्रेम मिळेल ही भावना त्याने मनांत बाळगली. या वेडचा स्वप्नातच तो वेडा गुंतून गेला. अंतःकरणपूर्वक रुजलेली ही प्रीतीभावना तुला अपूर्ण का वाटावी ?' या निराशेतूनच त्याने जी काव्ये निर्माण केली. ती वाचून कित्येक त्यांचे भक्त झाले, पूजक झाले. पण तू मात्र 'निर्दय ठरलीस' म्हणून–

" अश्रूंची प्रतिवर्षि ते उधळती पुष्पे समाधी वरी
त्यांनी आग विझेल काय परि ती जी त्याचीया अंतरी । "

तो वेडा कवी त्यांच्या अंतरीची आग कधीच विजणार नाही कारण–

" होईल होईल वाटत होते ते अखेरीस झाले ।।
नाव घेतल्यावाचून आता मनात झुरणे आले ।। "

मनात झुरणाऱ्या कवीच्या प्रियतमेची समजावणी करणारी ही कवयित्री आगळीच नव्हे काय ?

प्रियकरासाठी स्वतः त्याही आतूर झाल्या होत्या. देहावरती बहुमोल वस्त्रालंकार लेवून, मोहक शृंगार करून त्या नटल्या होत्या. फुले वेचून, रम्य तयांची माला गुंफीली होती. तो दुरून येता मनास हर्ष झाला होता. त्याचे मधुस्मित मनास मोहून टाकणारे होते. पण क्षणभरच नेत्रांचे मीलन झाले आणि तू पुढे गेल्यास तरीही माझे डोळे तुला न्याहाळीत होते, शेवटी उमगले–

"आणिक नंतर कळले माते की, तुझीयासाठी
गुंफीयली जी माला पडली ती नच तव कंठी"

प्रीती म्हणजे योगायोग असे त्याना वाटते. योगायोगात आपण जवळ येतो. ओळख होते, संभाषण मनास गोड वाटते. ' फिरून कधी भेटणार ?' प्रश्नही विचारला जातो.

शुक्लपक्षातील चंद्रकोर वृद्धींगत व्हावी, तशी प्रीती वृद्धींगत होते. मैत्री, निर्भेळ स्नेह उरत नाही, तो प्रीतीरुप बनतो. "स्नेहाची सख्या । पुढे परिणती प्रीतीमध्ये जाहली।" गांभीर्याने तू म्हणालासही– 'येथून पुढे संगे गुंफू जीवन! ' पण–

"योगायोगच आणि आज फिरुनी दूरावितो आपणां
दैवाची जर ही कठोर करणी, कां दोष देऊ कुणा"

योगायोगाने एकत्र आलो–योगायोगाने दुरावलो

प्रेमाच्या प्राथमिक अवस्थेचे वेधक चित्रणही शांताबाई रंगवितात. अभ्यासात गुंतून पडावे म्हणून पुस्तक घ्यावे पण त्यात तुझेच रुप दिसते. त्यातील विचारवैभव चित्तास आकर्षून घेत नाहीत. या अशाच संध्याकाळी तू माझ्याकडे येत होतास, आताही संध्याकाळ झाली आहे. मग मन–चित्त शांत कसे होणार ? दारात पाऊल वाजता, वाटते तूच आलास. जीव अधिर होतो. आपोआप नेत्र दाराकडे वळतात. वाटते तुझा मंजुळ आवाज कानावर येईल. पण तू दिसत नाहीस. मन मात्र व्याकूळ होते. वेळ जसा निघून जाईल व तू दिसणार नाहीस तसे मन कातर बनते. हळूहळू मन निराशेने काळवंडते, पण–

"झाला श्रान्त ! क्षणात भास्कर आता होणार अस्तंगत
जीवा शांतविण्यास या पण गडे ! कोठे तुझी संगत"

प्रीतीगीत गात असताना अनेक माध्यमांचा वापर त्यानी केला आहे. त्या राधा बनतात तर तो श्रीकृष्ण असतो, त्या सुमन बनतात व भृंगास विनवितात–

"खुलवीन आपुले हृदय सख्या तुज पुढती
ते खुशाल लुटूनी तयात भरली प्रीती ?"

त्याच्या देहाभवती विळखा घालून, त्या वृक्षास वेढणे या लतेस बरे वाटते. रविकिरण झालेल्या प्रियकरास ' दंवबिंदू ' होऊन आभूषणू इच्छितात. 'मी विलीन अन्ती होईन रे तुज ठायी ' ही ओढ आहे. हे अद्वैत आहे.

प्रियकर निघून गेला आहे. उरात आग आहे. त्याचे जीवन मात्र फुललेले आहे. पाना आडून हसणारी कळी ती, तो तर वठलेला वृक्ष. तुझा जर स्पर्श झाला तर –

" कठोर (माझ्या) स्पर्शानेही क्षणात करपेल (त्याच्या)
सुमासस मृदूला (तव) काया (तिची)
अस्फुट कोमल कळी – हवा कर बालकीचाच
तिथेच फुलवाया हृदया ! "

पहिल्या प्रेमात अपयश मिळाले म्हणून दुसऱ्याच्या शोधात त्यांच्यातील प्रियतमा आहे :–

" भग्न मूर्तिचे व्यर्थ कशाला पूजन करिसी या-
आपुल्या प्रीतीच्या सुमनी ?
शोध चंद्रमा दुजा, जयाच्या स्निग्धमधुर तेजे
पौर्णिमा फुलेल तव नयनी "

शांताबाई प्रथम प्रियकरास विसरून दुजा चंद्राच्या शोधात जशा आहेत; तशाच, ' त्याचे ' लग्न झाल्याने तर ' तू नाही मिळालास तरी चालेल, मी तुझ्या प्रीतीचिंतनात दंग होऊन राहीन. हे श्रेय दैवही काढून घेणार नाही. तसा विचार– ही स्पष्ट करणाऱ्या आहेत.

" आज संसारी नव्या जासी, तिथेही हो सुखी,
मात्र जा गे विस्मरोनी प्रीती गाथा ही जुनी !
आणि मी राहीन आता मग्न तुझ्या चिंतनी
श्रेय माझे दैव ही घेणार ना ते काढुनी ! "

प्रेमात सफलता लाभेलच असे नाही. जी क्षणांची प्रियता लाभली तीच जीवनभर टिकावी अशी त्या वांच्छाही धरतात. सुमनांचा बहार लुटणे नशीबात नाही. अन्य ज्या कुणास तो लाभणार तो लाभू दे. मला मात्र दूरस्थ राहून सुगंधाचे समाधान लुटू दे अशी याचना करतात.

" प्रीतीची उन्मत्त भाषणे तव अन्यासाठी
तयांचा हेवा नच माते,
सहानुभूति सवे जयातून असे तुझे बोल
तृषित मी ते ऐकायाते "

प्रीतीचा हव्यास धरणाऱ्या बाई फक्त मधुर शब्दासाठी आसुसलेल्या आहेत. तू सुखी असलास तर मी सुखी राहीन. तुला दुःख झाले तर त्याने माझे अंतःकरण पोळेल. असे हे विचित्र आपले नाते आहे. तेच सदैव राहू दे. ' विरह ' हा प्रीतीस पोषकच असतो. ' तू नाहीस म्हणून आज सख्या हे काव्य मी रचिलेले

तू नाहीस म्हणून आज सखया हे काव्य तूज वाहिले ' अशी त्यांची अवस्था आहे.

' तेव्हा आणि आता ' ही शांताबाईंची उमेदवारीच्या काळातली कविता. ज्या काळात काव्य व प्रीती या दोन भावनांची जागृती मनात झाली होती. वृत्तीने त्यांचा प्रियकर हाही कवी असावा असे वाटते. कारण, एखादी कल्पना चमकली की त्यावर चांगले काव्य लिहावे व तुला ते दाखवण्यास यावे. खरं म्हणजे त्यात विशेष काही नसते. पण तू ते फार चांगले आहे, असे म्हणायचास. ' माझी काव्ये वाचून त्यावेळी तू माझे कौतूक करायचास. आपल्या त्यावेळच्या सहजीवनात, चर्चेत, वादविवादात केवढी काव्यात्मकता होती. आपण एकमेकांना मनीचे गुज, विनोद सांगितले पण तू दूरावलास आणि आज–

" आताहि रचितेच काव्य, परि ते दावु कुणा वाचूनी ?
तू नाहीस म्हणून आज सखया ! ही आंसवे लोचनी "

काव्यात्मकवृत्ती असणाऱ्या प्रियकराने निघून जावे. कवयित्रीच्या मनात एक पोकळी निर्माण करणारे झाले आहे.

' गेयता ' हा शांताबाईंच्या कवितेचा अनिवार्य भाग अगदी सुरुवातीपासूनच दिसतो. त्यांची प्रीती गीते अशीच गेय बनली आहे. ' भेट न होवो पुन्हा कधीही, दुःख तयाचे वाटत नाही. ' अज्ञात सख्या ' चिरकाल तुला जागा हृदयी दिधली. ' अज्ञात प्रियकरास हृदयात चिरंतन जागा देणारी ही भाऊक, श्रद्धाळू प्रियतमा आहे. क्षणभरच आपुली भेट झाली होती. त्या प्रथम भेटीत अंतरीच्या खुणा उमगल्या होत्या. गालांवर हंसू उमटले होते. गूढभाव नेत्रात तरळले होते, प्रीतीचे रहस्य आल्यावर अनोळखीपण येईलच कशाला ?

" दिठी दिठीला क्षणभर मिळली
अस्फुट वचने ओठी स्फुरली
आणि विजेची चमक जणू की देहामधूनी गेली "

लौकिक परिचय नसतानासुद्धा, युगायुगाची ही ओळख मनात पडली होती. लौकिक परिचय काय कामाचा ? स्पर्शसुखाची दुरून अनुभवलेली नव्हालीच श्रेष्ठ नाही काय ? दूर राहून प्रीतीचा मौलीक ठेवा जो त्यानी अनुभवला तो आगळाच मानावा लागेल. दिठी–दिठीला भेटवण्याने मात्र त्यांची मीलनासक्ती स्पष्टच होते.

❖

होनाजी बाळाशी नाते

होनाजीने आपल्या काव्यात प्रियतमेची आतुरता अधिक जाणीवपूर्वक स्पष्ट केली आहे. पावसात भिजत प्रीती शोधणारी होनाजीची प्रियतमा म्हणते,

' पाऊस तर पडतो आहे
रात्र सख्या अंधारी
एकलीच भिजत उभी
केव्हाची द्वारी ! '

होनाजीची ही आतुरता आणि, चौकटीला हात देऊन, दारात उभी असणारी, प्रतिक्षा करणारी स्वतः कवयित्री. वीज चमकते, तिचा प्रकाश चेहऱ्यावर येतो, निर्जन रस्ता–दीर्घ भयाण वाट असते. पण याच वाटेवरून कोणीतरी यायचे असते. ही अज्ञानाची वाट व हा अज्ञात प्रियकर ! तेच स्वरूप

' मात्र एवढे खरे, उभी मी राहुनिया दारात
बघते आहे वाट सारखी, जरी हो इतुकी रात । '

आणि होनाजीची रसवत्ता इथेही जाणवून येते.

'सौदामिनी' सारखी ही प्रीती काही वेळा विषारी ' नागीन ' वाटते. निष्ठूर अंग्नीचे तिचे रुप आहे. म्हणून या सौदामिनीपेक्षा मिणमिणणारी पणती बरी वाटते. वादळातून, झंझावतातून ती तारुन नेईल असाही विश्वास आहे. पणती व सौदामिनीची तुलना करत त्या ' सातत्य ' स्पष्ट करत आहे.

प्रियकराने भेटायास यावे ही अपेक्षा अनेक कवयित्रींनी साकारली आहे. शांताबाई प्रियकरास बोलावतात. तू येत असताना ' कसा ये ' हे समजावतात. प्रियकरासंदर्भात त्यांच्या कल्पना स्पष्ट करत असताना त्या म्हणतात, येईन म्हणतोस, तर सुखाने प्रियकरा माझ्या घरी ये. पण येत असताना तुझी अमित वैभवे बरोबर आणू नकोस. बहुमोलाची वस्त्र भरणेही अंगावर धारण करू नकोस. कारण त्याखाली आपली प्रीती लपून जाईल. राजमुकूट मस्तकावर नको, त्याने माझे मनास स्तिमीत होईल. बरोबर तुझी अफाट सेनादले नकोत. त्यामुळे माझी झोपडयातली द्ररिद्रता लाजून जाईल.

' वैभवयुक्त सम्राट कुठे तूं– आणि कुठे दीन मी !
कळते सारे जरी प्रेम हे लवहि न होई कमी !
ये माझ्यास्तव वैभव अपुले दूर जरा सारूनी
तरी येईल धीर जरासा माझ्या वेडया मनी

प्रीतीचा हव्यास धरणाऱ्या बाई फक्त मधुर शब्दासाठी आसुसलेल्या आहेत. तू सुखी असलास तर मी सुखी राहीन. तुला दुःख झाले तर त्याने माझे अंतःकरण पोळेल. असे हे विचित्र आपले नाते आहे. तेच सदैव राहू दे. ' विरह ' हा प्रीतीस पोषकच असतो. ' तू नाहीस म्हणून आज सख्या हे काव्य मी रचिलेले

तू नाहीस म्हणून आज सखया हे काव्य तूज वाहिले ' अशी त्यांची अवस्था आहे.

' तेव्हा आणि आता ' ही शांताबाईंची उमेदवारीच्या काळातली कविता. ज्या काळात काव्य व प्रीती या दोन भावनांची जागृती मनात झाली होती. वृत्तीने त्यांचा प्रियकर हाही कवी असावा असे वाटते. कारण, एखादी कल्पना चमकली की त्यावर चांगले काव्य लिहावे व तुला ते दाखवण्यास यावे. खरं म्हणजे त्यात विशेष काही नसते. पण तू ते फार चांगले आहे, असे म्हणायचास. ' माझी काव्ये वाचून त्यावेळी तू माझे कौतूक करायचास. आपल्या त्यावेळच्या सहजीवनात, चर्चेत, वादविवादात केवढी काव्यात्मकता होती. आपण एकमेकांना मनीचे गुज, विनोद सांगितले पण तू दूरावलास आणि आज–

" आताहि रचितेच काव्य, परि ते दावु कुणा वाचूनी ?
तू नाहीस म्हणून आज सखया ! ही आंसवे लोचनी "

काव्यात्मकवृत्ती असणाऱ्या प्रियकराने निघून जावे. कवयित्रीच्या मनात एक पोकळी निर्माण करणारे झाले आहे.

' गेयता ' हा शांताबाईंच्या कवितेचा अनिवार्य भाग अगदी सुरुवातीपासूनच दिसतो. त्यांची प्रीती गीते अशीच गेय बनली आहे. ' भेट न होवो पुन्हा कधीही, दुःख तयाचे वाटत नाही. ' अज्ञात सख्या ' चिरकाल तुला जागा हृदयी दिधली. ' अज्ञात प्रियकरास हृदयात चिरंतन जागा देणारी ही भाऊक, श्रद्धाळू प्रियतमा आहे. क्षणभरच आपुली भेट झाली होती. त्या प्रथम भेटीत अंतरीच्या खुणा उमगल्या होत्या. गालांवर हंसू उमटले होते. गूढभाव नेत्रात तरळले होते, प्रीतीचे रहस्य आल्यावर अनोळखीपण येईलच कशाला ?

" दिठी दिठीला क्षणभर मिळली
अस्फुट वचने ओठी स्फुरली
आणि विजेची चमक जणू की देहामधूनी गेली "

लौकिक परिचय नसतानासुद्धा, युगायुगाची ही ओळख मनात पडली होती. लौकिक परिचय काय कामाचा ? स्पर्शसुखाची दुरून अनुभवलेली नव्हालीच श्रेष्ठ नाही काय ? दूर राहून प्रीतीचा मौलीक ठेवा जो त्यानी अनुभवला तो आगळाच मानावा लागेल. दिठी–दिठीला भेटवण्याने मात्र त्यांची मीलनासक्ती स्पष्टच होते.

❖

होनाजी बाळाशी नाते

होनाजीने आपल्या काव्यात प्रियतमेची आतुरता अधिक जाणीवपूर्वक स्पष्ट केली आहे. पावसात भिजत प्रीती शोधणारी होनाजीची प्रियतमा म्हणते,

' पाऊस तर पडतो आहे
रात्र सख्या अंधारी
एकलीच भिजत उभी
केव्हाची द्वारी ! '

होनाजीची ही आतुरता आणि, चौकटीला हात देऊन, दारात उभी असणारी, प्रतिक्षा करणारी स्वत: कवयित्री. वीज चमकते, तिचा प्रकाश चेहऱ्यावर येतो, निर्जन रस्ता–दीर्घ भयाण वाट असते. पण याच वाटेवरून कोणीतरी यायचे असते. ही अज्ञानाची वाट व हा अज्ञात प्रियकर ! तेच स्वरूप

' मात्र एवढे खरे, उभी मी राहुनिया दारात
बघते आहे वाट सारखी, जरी हो इतुकी रात । '

आणि होनाजीची रसवत्ता इथेही जाणवून येते.

'सौदामिनी' सारखी ही प्रीती काही वेळा विषारी ' नागीन ' वाटते. निष्ठूर अंग्नीचे तिचे रुप आहे. म्हणून या सौदामिनीपेक्षा मिणमिणणारी पणती बरी वाटते. वादळातून, झंझावतातून ती तारुन नेईल असाही विश्वास आहे. पणती व सौदामिनीची तुलना करत त्या ' सातत्य ' स्पष्ट करत आहे.

प्रियकराने भेटायास यावे ही अपेक्षा अनेक कवयित्रींनी साकारली आहे. शांताबाई प्रियकरास बोलावतात. तू येत असताना ' कसा ये ' हे समजावतात. प्रियकरासंदर्भात त्यांच्या कल्पना स्पष्ट करत असताना त्या म्हणतात, येईन म्हणतोस, तर सुखाने प्रियकरा माझ्या घरी ये. पण येत असताना तुझी अमित वैभवे बरोबर आणू नकोस. बहुमोलाची वस्त्र भरणेही अंगावर धारण करू नकोस. कारण त्याखाली आपली प्रीती लपून जाईल. राजमुकूट मस्तकावर नको, त्याने माझे मनास स्तिमीत होईल. बरोबर तुझी अफाट सेनादले नकोत. त्यामुळे माझी झोपडचातली द्ररिद्रता लाजून जाईल.

' वैभवयुक्त सम्राट कुठे तूं– आणि कुठे दीन मी !
कळते सारे जरी प्रेम हे लवहि न होई कमी !
ये माझ्यास्तव वैभव अपुले दूर जरा सारूनी
तरी येईल धीर जरासा माझ्या वेडचा मनी

असा निरंकारी तू आल्यावर–

' विश्रब्धपणे ठेवुनि मग हे शिर तव वक्षावरी
कथीन सारे हृदयगत तुजला लपलेले या उरी '

शारीरिक मीलनाच्या कल्पना त्यांच्या काव्यात जाणवत राहते.

होनाजी बाळा आपल्या लावणीत जो विरह व्यक्त करतो–नर्मशृंगार रंगवतो तो विरह, तो शृंगार शांताबाईंच्या कवितेत आहे.

❖

शारीरिक मीलनाची आसक्ती

प्रियकर रस्त्यावरून येताना दिसतो. चित्त मोहरून येते. ही जशी कल्पना शांताबाईंना प्रिय आहे तशीच शारीरिक सुखाची. शरीरसुखाविना प्रीती अपूर्णच आहे–

' क्षण घेतलेस तू मज अपुल्या करपांशी
धरिलेस कवळूनी मजला निज हृदयापाशी
ठेविलेस माझ्या ओंठावरती ओठ
'क्षण' जीवनात मम झाला तो अविनाशी '

' क्षणाला ' पकडणारे फार थोडे असतात. अशा उन्मुक्त क्षणास कवयित्रीने पकडले आहे. धडधडत्या वक्षा तुझा आधार मिळतो. मनातले विकल्प नाहीसे होतात. "दृढ मिठी तुझी ती पडता देहाभंवती । उन्मादभरेन यनांची मिटली पाती । क्षण वितळून गेली धरणी पायाखाली । अन् जीव तरंगत गेला वरतीवरती । " सुखाच्या तृप्तीने नयनांची पाती मिटून जातात. कायारोमांचित होते. दशदिशातून आनंद फुटतो.भंवतीचा कोलाहल शांत होतो. रात्र मधुर स्वप्ने घेऊन येते.एवढ्यात

' चंद्राची लपली कोर ढगांच्या मागे
त्या क्षणी जाहला आपुला तो एकान्त '

असे हे अलौकिक मीलन स्पष्ट करताना बा. भ. बोरकर म्हणतात–

' तुझं नी माझं होता मीलन
अवचित असलं घडलं ग !
पहा ! पहा ! पर सात हरिंच्या
रुमडाला सुम आलं ग ! '

शारीरिक मीलनाची ओढ दोघांच्याही काव्यात आहे. हे मीलन घडताना पृथ्वीचे

भ्रमण थांबते, दोन-हृदयाचे स्पंदन थांबते, आपण मधुर कुंजात नसतो तरी गंध दरवळत राहतो. कोणी वीणा छेडीत नसते, पण सूर उमटत असतात. मधूर संगीत भवती असते.

' श्वासात मिळुनिया गेले आपुले श्वास
जाहली क्षणभरी शांत जिवाची प्यास
ते चुंबन अपुले एकच जमले सत्य
अन् जग भवतीचे केवळ जणू आभास '

श्वांसात श्वास मिसळून एका चुंबनात तहान शमवणारे मीलन, ' तो क्षण ' बाई अचूक टिपतात. या ' एका ' क्षणासाठी त्या वेडच्या होतात. एकटीच मी येथे । वाट तुझी रे बघते । उल्लंघुनी सागर हा येशील कोण्या राती ? ' त्या रात्रीसाठी त्यांचे मन परत उत्सुक बनते.

❖

प्रीतीची दाहकता

प्रीती ही मोहक तशी दाहक आहे. शांताबाईंच्या जीवनात मात्र तिचे दाहक रुप आहे. मोहकतेपेक्षा ती दाहकतेकडे अधिक झुकणारी आहे. प्रियकर जवळ असताना बोलायला सुचत नाही. मौलिक क्षण आपण वाया घालवलेला असतो. रविचा अस्त होतो. छटा काळवंडून येतात आणि याचवेळी त्याना उमगते, 'प्रीतीची दाहकता येई यदा मज कळुनी । म्हटले की 'मोही या नाही पडणार फिरुनी । प्रीतीने दग्ध होण्याचा जणू काही रमणीय शापच दिला आहे. सख्यास प्रार्थना करते, घेशील का मज तव करपाशी । घट्ट बिलगुनी वक्षाशी' हे पदरी पडत नाही तर ' खिन्न पणे मी बसते या खिडकीपाशी ? '

प्रियकर म्हणजे 'दूरदेशीचे पाखरु' आहे. त्याचे सूर मनास भुरळ पाडणारे आहेत. त्याची कीर्ति अनमोल असते. या पांखराचे दर्शन मात्र होत नाही.

" दूर देशीच्या पांखरा
कधी देशील दर्शन
अशी आशाही कराया
धजले न माझे मन "

दारात हे पांखरु दिसते. आपण स्वप्नात तर नाही ना !

असा आभास कवयित्रीस होतो. त्याच्या चरणस्पर्शाने वेली पालवलेल्या असतात. फुले उमलून गीत गात असतात. वेड लावून दूर देशी उडून जाणारे असे हे वेडे

पांखरु, क्षणात निळचा नभी दिसेनासे होते, परत मन काळवंडून यते.

'दूर देशीच्या पाखरा घडे नवल जीवनी
क्षण येऊन गेलास माझी बाग फुलवूनी
आंस आता अन्य कांही उरलीच नाही मनी
–तुझे गीतस्वर मात्र येती अद्यापीही कानी

प्रियकराचे पांखरासारखे येणं, तसेच निघून जाणे पण कवयित्रीचे स्वर टीपत जगणे मार्मिक व हृदयस्पर्शी आहे.

प्रेमभंगाच्या या दारुण निराशेत प्रतिभादेवी ही आपल्याला सोडून गेली आहे. मनाचा प्राजक्त सुकला आहे. ज्याच्यासाठी प्राजक्ताचा तरु बहरला तो तर अजून येत नाही ही आस आहे, ओढ आहे. दरवेळी मात्र भास होतो की, तो येईल म्हणूनी. पण खिन्नताच मनात भरून येते. शेवटी कवयित्रीस रसिकाला विनंती कराविशी वाटते की, माझी कविता ही त्याच्या येण्याजाण्यावर अवलंबून आहे.

बहर संपला ! प्रेमळ रसिका जा जा येथून
सुकली सुमने बघुनि वृथा का होता खिन्न

प्रीतीने मन तर व्याकुळलेले–

' रे वियोग घटिका सान्निध्य आली, आता
अनुभवु दे क्षणभर तुझ्या मिठीची दृढता '

किंवा–

' दे निरोप सखया हसऱ्या ओठानी
ती स्मृती मधुर मी ठेवीन नित्य जपूनी '

स्वत:चे हृदय काढून त्या प्रीती सम्राटाचे चरणपूजन केले होते व बापडयाने दिले ते एक उध्वस्त जीवन !

❖

मी त्यात फुलवते . . . कविता–

प्रेमात दारुण निराशा आली तरी प्रीतीपुष्प फुलवणे कवयित्रीस प्रिय आहे. हे प्रेम समजून करण्याच्या वयात जमलेले मधुकवने याचवेळी कानावर पडलेली. ' प्रीती म्हणजे अभिसार ' हे तेव्हाच उमगलेले. खरं म्हणजे शांताबाईंच्या दृष्टीने 'चांगल्याचा शापच आहे तुझ्या प्रीतीला' असे त्यांचे जीवन. ज्या प्रियकराचे चरण हृदयपुष्पांनी त्यानी अलंकारिले त्यालाच त्या ' परि नाही रे निर्दया । ' असेही चिडू म्हणतात. रातराणीच्या गंधात प्रीतीने न्हाऊन निघावे ही मनस्वी इच्छा.

पौर्णिमेच्या चांदण्यान शृंगारून स्वत:ला त्या प्रतिक्षा करत राहतात, प्रियकराची–

' वाऱ्यावरती तरंगती – रातराणीचे उच्छवास
माझ्या अंतरंगी सख्या तुझ्या भेटीची रे आस
गुच्छ नाजूक हिरवे, चिंब जाहले दंवाने
माझे नेत्र ओलावले – सख्या तुझ्या वियोगाने ?

मात्र घडते ते असे–

मीलनाच्या मोहक सुखात स्वर्गाची तृप्ती मिळते. मीलनाचा हा अनुभव फारच थोडच्या कवयित्रीनी साकारला आहे. इंदिरा संत, बहिणाबाई यांच्या काव्यात तर दुर्मिळच आहे. कवयित्रीला जर प्रियकराचा सहवास मिळाला तर, त्याच्या अलिंगणात मौलिक सुख आहे पण मीलनाचे सुखपूर्ण होता मात्र द्वैत जाणवते.

' तोच परंतु ये दुसरा क्षण
शिथिल होतसे तव अलिंगन
घेई गुढता तुजला ओढून
चित्तात पुन्हा अन् द्वैत सगळे '

तृप्तीनंतर जाणवणारी 'द्वैतांची' भावना यथार्थ शब्दांत मांडली आहे. याच प्रीतीतून आपण नवीन विश्वाची निर्मिती करू असा ही विश्वास बाईंना वाटतो. केशवसुतांनी स्वर्गधरेचे स्वप्न पाहिले. इथे आपल्या मीलनातून नवीन विश्वच साकारेल असे कवयित्रीस वाटते. ओठ, मिठी, वक्षावर विश्रांती या बाईंच्या आवडत्या उपमा आहेत.

' आणि पुढे माझ्या ओठाना
ओठ तुझे ते स्नेहल भिडले
जग पूर्वीचे विलया जाऊन
नूतन विश्व जन्मले ! '

यासाठी–

'राजसा ! वक्षावरी तुझ्या मला घे ओढूनी' अशी इच्छा त्या प्रकट करतात.

❖

मीलनाच्या संकल्पना

प्रीती ही मीलनाशिवाय पूर्ण होतच नाही. हे विचार शांताबाईनी आपल्या प्रीतिविषयक गीतात स्पष्ट केले आहे. मीलनांच्या सुखानंतर द्वैत जाणवत असेल. तरीही अद्वैत होणे हे प्रिय आहे. यासाठी माणसाची श्रद्धा असते. ते अद्वैत

खालीलप्रमाणे बाई व्यक्त करतात–

" लवलवती बिजली क्षणी बिलगे मेघाला
तुझ्या माझ्या मीलनाचा तिने देखिले सोहळा "

किंवा

" भंवताली नव्हत कुणी एकली रात्री पोर देखून
झालास लगी तू धीट नीट मला रोखून

किंवा

तुझ्या स्पर्शामधूनी भावगंगा वाहते
या समाधीतून आता जाग तू आणू नको.

किंवा

येई राजसा ! अधिर राधा येई बहुपाशांत
अखिल विश्व मग जाईल बुडूनी त्या प्रीती प्रलयात

तात्पर्य

शांताबाईंच्या प्रीतीविषयक कविता वाचकांना आनंदाच्या मौलिक ठेवा देणाऱ्या आहेत. त्यात शरीरसुखाच्या, (संभोग शृंगार) अनेक खुणा आहेत. तर प्रीतीतील दारुण निराशेची चक्रे आहेत. प्रेमभंगाचे दारुण दुःख आहे. मन कासाविस होईल. एवढी त्या निराशेची तिव्रता त्यानी साकारली आहे. शांताबाईंच्या शब्दप्रभूपणा प्रीतीविषयक कविता वाचत असताना जाणवते. वैयक्तिक जीवनात शांताबाईना प्रीतीविषयक अपयश आले आहे. त्यांची कविता त्यांचे वैयक्तिक जीवन सूचीत करणाऱ्या आहेत. एकाने प्रेमभंग केला तर दुसऱ्याच्या प्रीतीपुष्पाची पखरण करू इच्छिणाऱ्या प्रियतमेचा त्यांचा पींड आहे.

सुरुवातीच्या त्यांच्या काव्यात त्या नायक बनतात. याचे कारण रविकिरण मंडळाचा त्यांच्या मनावर असणारा पगडा होय. एवढे सारे असले तरी ' सहवासासाठी ' त्यांची अजून ओढ आहे.

❖

' क्षणभर ' एक रसग्रहण

' वर्षा ' हा शांताबाईंचा पहिलाच कविता संग्रह. या संग्रहातील ' क्षणभर ' ही कविता. कुणाही वाचकाच्या मनाची पकड घेणारी. शांताबाईचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट करणारी आहे. त्यांच्या कवितेचा पींड ही कविता हळूवारपणे स्पष्ट करते.

कवयित्रीच्या जीवनात प्रियकराचे येणे, सुखसागरात न्हाऊन निघणे, दूर निघून जाणे. एवढीच मध्यवर्ती कल्पना या कवितेत आहे. पण शब्दांचे सामर्थ्य, भावनेची प्रगल्भता, कल्पनांची मोहक निर्मिती, प्रसंगातील कारुण्य शांताबाईनी टिपलेले आहे–

प्रियकर लाथाडून निघून गेला आहे पण अजूनही-

' श्वास उष्ण तव अजून भासती या गालांवरती
दीर्घ चुंबने अजून तुझी ती ओठावर जळती
पुष्क उभारे तुझ्या मीठीचा अजून सर्वांगी
स्मरणाने तव वीज सळसळे अजून अंतरंगी '

प्रीती ही चमक आहे, वीज आहे. त्यामुळे मिठीचा पुष्क अजूनही शरीरावर आहे. ओठांतून चुंबनाची गोडी लुप्तावलेली नाही. तुझ्या विलासी नयनांत हंसलेली प्रीत मी पाहिली होती. तुझ्या स्पर्शाने मी माझे ' मी ' पण विसरले. या स्पर्शाची जादूच आगळी होती. माझ्या मिटल्या नयनापुढे स्वर्ग उभा राहिला, नंदनवन फुलले.

' अंग प्रत्यंगातील यौवन घेतलेस लुटूनी
मिठीत तव पहुडता संपली पळामध्ये रजनी '

मीलनाचे एवढे अचूक वर्णन मराठी कवितेस दुर्मिळ आहे. एका पळात रात्र संपण्याची किमया, मनास चटका लावते. भ्रमर येतो, सुंगंध पसरून निघून जातो, प्रियकर सुद्धा तसाच नाही का ? निदान बाईंच्या पुरता तरी तो ठरला आहे. त्याच्या या भ्रमरवृत्तीमुळे चिरवियोगाचे दुःख मात्र उराशी आहे. या दुःखातही सुख आहे. अशी समाधानी वृत्ती आहे.

' क्षणभर येऊनी सख्या ! केवढी केलीस ही क्रांती
उजळून गेल्या सकलही आता मम काजळराती '

काजळावर क्षणिक वीज कोसळावी, पण त्या एका कोसळण्याने एखाद्या वृक्षास मुक्ती मिळावी. काजळातून पाणी वर यावे तसाच हा मीलनाचा अनुभव !

शांताबाईंचे सारे जीवन या कवितेत सामावलेली आहे. ' वर्षा ' या संग्रहाची कवयित्रीच्या चिरंतन दुःखाचे दर्शन म्हणून ही कविता स्पष्ट होते.

❖

शांताबाईंची निसर्ग कविता

शांताबाईंच्या काव्यात निसर्गाने अपत्याची जागा घेतलेली आहे. एवढे निसर्गावर त्यांचे प्रेम आहे. पाऊस, हिरवळ, यांची त्यांना फार आवड असावी

असे दिसते. निसर्गाच्या अंगावर आपले अंग टाकून त्यातली अविट जादू पिऊन टाकावी असे त्याना कधी वाटते. तर कधी निसर्गाच्या व्यापक जीवनापुढे मानवी जीवीत म्हणजे यत्कंचित होय. तेव्हा त्या जीवाने, निसर्गातच विलीन व्हावे. अशी त्यांची आवड दिसते. आपल्या प्रिय व्यक्तीला आपल्या सर्वस्वाचे अर्पण केल्याशिवाय स्त्रीच्या मनाचे समाधान होत नाही, असे म्हणतात ना ? शांताबाईंनी निसर्गाशी एकरुप पावण्याची ही धडपड पाहिली म्हणजे त्यातही हीच भावना लपलेली आहे असे वाटते. आपल्या मनातील सुखदुःखाचे प्रतिबिंब त्या निसर्गात पाहतात. निसर्ग आपले मूक सात्वंन करतो यांचे त्याना समाधान वाटते. आपले हृद्‌गत सांगायला आम्रतरु, लिंब वा अन्य कोणीही निसर्गातला सुहृदय त्याना चालतो. काही जुन्या कवीनी सुंदर निसर्ग कविता लिहिली. तशी केवळ सुकुमार रचनेची निसर्गातील रंग, नाद, स्वर, शब्द याचे चित्रण करणारी काव्ये, लिहिण्यापेक्षा आपल्या सुखदुःखाशी समरस होणाऱ्या निसर्गाची गीते लिहिणे त्याना जास्त आवडते. ' लिंब ' ही अगदी साधीच कविता. लिंबाचा हिरवा संभार पाहून 'लाभे मनाला गारवा' ' त्याचा बलशाली बुंधा आणि विशाल दीर्घ फांद्या ' 'स्थैर्य देतात चित्राला' । त्याचा उग्र पण जरा गोड गंध 'कटु मधुर भावना । जणू माझ्याच मनिच्या । अशी प्रचीती त्यांना येते. आपल्या मूक भाषेने तो लिंब वृक्ष त्याना दिलासा देतो. कारण–

' स्नेहभाव आम्हांतील
नाही कुणा कळायचे
ज्ञात आहे आम्हालाच
मुग्ध नाते हे आमुचे '

असे त्यांचे गुपीत आहे. "निसर्गाचा हा त्यांचा जिव्हाळा अंतरीचा आहे. कल्पनेच्या भरारीसाठी किंवा शब्दांच्या प्रदर्शनासाठी उसना आव मुळीच अणला नाही. "

शांताबाईंच्या निसर्ग कवितेचे मोठे वैशिष्ठ म्हणजे त्या कविता 'गेय' आहेत त्यात 'लय' आहे. लहान मुलांच्यासाठी बडबड गीतांचा जसा वापर केला जातो तसा वापर या गीतांचा होईल–

' पावसाच्या धारा
येती झरझरा
झांकलेले नभ, वाहे सोसाट्याचा वारा '

या ठिकाणी ' धारा ' हा शब्द ' झरझरा ' मधील गती, झाकलेले नभ एक पावसाचे चित्र आपणासमोर उभे करतो. ढगांवर नाचणारी, झळकणारी वीज जणू नर्तकीच आहे. अंगाला झोंबणारा वारा व भरभरणारी काया, घरटचात

घुसून बसलेली पांखरे, डोकावणारी खार, निवास शोधणारी गुरे, ही सारी बाईंची आपली आहेत. याच पावसांमुळे नदीला पूर येतो. झाडांची पालवी चित्तास मोहविते. तर कवयित्रीस–

" सुस्तात नाहली
धरणी हसली
वरुणाच्या कृपावर्षाने संतोषली "

सन्निध जाणे असे बरे वाटते.

शहरांत मनास शांती मिळत नाही. कोलाहल, धकाधक यात मन वैतागून जाते. यासाठी कवयित्री एखादा आम्रतरु शोधते. माझ्यावर प्रेमळ सावली धरणारा मृदूल, श्यामल, साधाभोळा असा हा आम्रवृक्ष आहे. कवयित्रीचे भावगीत ऐकणे हा या वृक्षाचा छंद आहे.

" दुर्मिळ ऐशी देई शांतता सदा मला हे स्थल
ऐकू न येई इथे जगाचा कोलाहल "

व्याप जगाचा विसरण्यासाठी कवयित्री इथे येते. याच्या तळी बसून अर्धोन्मिलीत स्वप्ने पाहते

सृष्टी व आपले नाते स्पष्ट करून रसिकांसमोर मांडणे बाईंना प्रिय आहे. मेघ ढगावर कांती चढवणारा किमयागार ठरतो, कडूलिंबाचा मोहर दूरवर गंध उधळीत राहतो, हंसरी फुलपांखरे गीते गातात. कुरणात गुरे चरतात, बालके खेळतात, सारीकडे आनंद–सृष्टीत आनंद पण बाई मात्र दुःखी आहेत. ही दुःखी अवस्था इंदिरा संतही स्पष्ट करतात–

" सारी सृष्टी चैतन्याने
हर्षोत्फुल्ल झाली वाटे,
हाय ! औदासिन मग
माझ्याच का मनी दाटे ?"

हंसऱ्या निसर्गाशी समरस होता होता स्वतःचे दुःख त्याना विसरणे जड जाते आहे.

मातीशी नाते सांगणे बाईंना प्रिय आहे. निसर्गात ईश्वराचा अंश आहे. हे त्यांचे स्पष्ट निवेदन आहे. ' वर्षा ' ऋतु सुरू होतो. पृथ्वी सुखासीन होते, चित्त आनंदाने निर्भर होते. हिरवळ पाहून मनास वाटते,

" जणू गालीचेच हे अंथरले भूवरती
जडविले जयावर दवबिंदूचे मोती
या शब्दालांगणी वाटे लोळण द्यावी
अन् सस्यश्यामल भूमी ही चुंबावी "

शब्दांबरोबर स्वतः लोळण घ्यावी, ही माती चुंबावी, कारण या मातीत ईश्वराचा अंश आहे.

" जो झटे येवढा तृणासही सुखवाया
किती अगाध त्याच्या असेल हृदयी माया "

हृदयात माया असणारा ईश्वर त्या मातीत असतो असे मातीचे, निसर्गाचे त्यांचे नाते आहे.

" स्नेहभाव आम्हातील
नाही कुणा कळायचे
ज्ञात आहे, आम्हालाच
मुग्ध नाते हे आमुचे "

मीलनाचे सुख भोगल्यानंतर जे एकाकीपण कवयित्रीस जाणवत राहते. द्वैताची जाणीव होते. तशीच जाणीव काही वेळेला निसर्गात होत राहते. नयनापुढची स्वप्ने विरली आहेत, क्षितिजावरती प्रभा संपली आहे, आपण एकाकी आहोत असे वाटत राहते. निसर्गात एक वर्तुळ आहे तो परिपूर्ण आहे. पण आपण मात्र तसे नाही. याची खंत शांताबाईंना वाटत राहते. सडसडा पावसाची सर येऊन जाते. सूर्य प्रकाशतो, मेघ पांघतात आणि सृष्टीच्या विविध छटा खुलून येतात. पीके म्हणजे पृथ्वीची मनोगते असे त्याना वाटत राहते.

" झाडे वृक्षही तृप्त, शीतल, सुखे आनंदुनी डोलती
ओलावून सुरेख हिर्वळ अतां ही हासते निर्भर
पाचूचेच जणू सतेज हिरवे हे भासती अंकुर
की ही गूढ मनोगते धरणीची बाहेर डोकावती ? "

सृष्टीचे सोनेरी मृदूहास्य विलसत असते. असेच हास्य आपल्या चेहऱ्यावर विलसेल कां ? हा अंतरीचा प्रश्न आहे. हे कवयित्रीचे दुःख आहे. हे प्रेमळ गाणे ऐकून घेणारा निसर्गच आहे.

" ही प्रेमळ शीतल हिरवळ मूकपणाने
ऐकून घेई उदास माझे गाणे "

जर हे उदास गाणे निसर्ग ऐकतो, कवयित्रीस साथ देतो तर तो कवयित्रीचा प्रियकर नव्हे काय ? तशी साक्ष त्या स्वतः देतात,

" हे सख्या निसर्गा ! कोण तुझ्यावाचून
आमुची अनामिक दुःखे घे जाणून? "

अनामिक दुःखे जाणून घेणारा तो सुहृद् आहे.

' विजेची भेट ' या काव्यात शांताबाईंनी एका माळाचे भाग्य कसे उदयास आले ते स्पष्ट मांडले आहे. गोविंदाग्रजाची आठवण या ठिकाणी होते. (चिरंतन प्रेम) रूक्ष, नापीक विस्तीर्ण असा माळ, त्या बापडयाचे अंतःकरणही विशाल होते. पण कधीही त्यावर हिरवळ तरारून आली नाही. निर्झर पायात घुंगरु बांधून नाचला नाही. बोरी व कुसळे त्याची सोबत होती. पण एके दिवशी गगनाची वीज नाचत आली. विवर्ण त्याचे शरीर झाले. कडकडाट ऐकून नेत्र मात्र उघडले तर त्या माळाचे अंतःकरण फुटून त्यातून सुंदर झरा डोकावत होता.

" एकदाच गेली तया सौदामिनी अलिंगून
तेव्हांपासून तयाचे झाले स्नेहादि जीवन "

त्या सौदामिनीचे ते भेटणे चिरंजीव सुख देणारे नव्हते काय ?

शांताबाईंची निसर्ग कविता वैयक्तिक जीवनाचे दर्शन घडवते. कधी हा निसर्ग अपत्यवत् वाटतो. कधी प्रियकर बनून सुखदुःखाच्या गोष्टी करतो.

❖

वात्सल्य गीतांचा अभाव

प्राथमिक कवितांचे स्वरूप पाहत असताना शांताबाईंच्या काव्यात ' वात्सल्य ' कविता फारशा दिसत नाहीत. निसर्गाकडे मात्र त्या वात्सल्य भावनेने पाहतात. ' तान्हुल्या मीनाक्षीस ' ही एकच वात्सल्य भाव स्पष्ट करणारी बाईंची कविता. (शांताबाईंनी बालगीतांचा विचार इतरत्र केला आहे.) या कवितेत सुद्धा मीनाक्षीच्या रुपात त्या स्वतःचे रुप न्याहाळताना दिसतात. हे वात्सल्य गीतसुद्धा त्यांच्या काव्यप्रकृतीस साधले आहे असे दिसत नाही.

" नेत्राची तुझीया सतेज दिसती मीनाकृती ही दळे
' मीनाक्षी ' तव नांव ठेवूनी गमे औचित्य की साधले "

या गद्यमय स्वरुपावरून हे स्पष्टच दिसते.

हे चिमुकली, कुरळया केसांची, हिच्या हनुवटीस जर स्पर्श केला तर तिच्या ओठाला मृदूल पाकळया फुलतात. 'ओठाच्या पाकळया' ही उपमा समर्पकता साधते. लहान पोर रडतानाच हसू येते असे नाही तर चिमुकल्याचे ' रडणेही ' बरे वाटते. त्याच्या क्रीडामनास मोहवितात. या चिमुकल्याचे हसणारे, रडणारे रुप पाहिल्यानंतर–

" माते ज्ञात न ईशरुप, नच मी अद्यापी त्या पाहिला
हो किंचित परि तो प्रतित तुझीया बालस्वरूपी मला"

क्षणाक्षणाला घडतो प्रभूजी आपला साक्षात्कार तसेच हे रुप नाही कां ? ईश्वर जरुर दिसत नसेल पण त्याचे हे मोहक रुप या ना त्या प्रकारे दिसून येते.

प्रा. मालती किर्लोस्कर म्हणतात, 'इतर कवयित्रीप्रमाणे अपत्य वा वात्सल्यगीते हा शांताबाईंचा काव्य विशेष म्हणता येणार नाही' (सरिता दर्शन पृ. ४५) वरती स्पष्ट केलेल्या स्पष्टीकरणात हाच विचार स्पष्ट झाला आहे. खरे तर विद्यार्थी अवस्थेत या कविता लिहिल्या आहेत. त्यामुळे अपत्याची भावना या प्रारंभीच्या कवितांमधून नाही.

❖

कलंदर वृत्तीची साक्ष

शांताबाईंच्या काही कवितातून संत कविप्रमाणे "मी मुक्त कलंदर । चिरकालांचा पाथ । मी अज्ञातातून चालत आलो वाट ।" माझी वृत्ती कमलपत्राप्रमाणे अलिप्त आहे. असे त्यांचे मन एकीकडे म्हणत आहे. तोवर दुसरीकडे त्यांचे मन,

'शत जन्मीच्या दुःख भराचे
शिरी घेऊनी अवघड ओझे'

मंद पावले टाकीत चालत असते. आनंद व सौन्दर्यांनी नटलेल्या जगातून माथ्यावरचा भार सोशीत विचारे अंतःकरण चालत असते. त्याच स्थितीत वर्षानुवर्षे जातात. सागर, पृथ्वी हे आपापल्या सौंदर्यानंदात मग्न असतात ते पाहिले की,

"मनीत येते माथ्यावरचे
अवजड ओझे टेकावे क्षण
अन् भंवतीच्या
हळूच घ्यावा टिपुनी कणकण"

असे त्यांना वाटते.

माथ्यावरचे जे ओझे माथ्यावरच टांच मारून अंतःकरणाला दडपून ठेवते. मग मन बंडखोर होऊन प्रतिकाराला सज्ज झालेच तर ? तर काय ?

"काडकन् नियती मारी
संस्काराचा चाबुक पाठी
रक्तीची दाटून आंसवे
मुकाट झाडे अंतर पुढती"

मनाची झालेली असहाय्य, दुर्बल, अगतिक स्थिती संस्काराच्या चाबकाचा मनाला होणारा असह्य जाच याचे चित्र आहे हे !

कलावंत भोवतालच्या जगाचे सर्व अवजड संस्कार अन् रुढीचे पाश तोडायला धडपडतो आहे. पण ! सारे व्यर्थ ! वर्षानुवर्षे कलावंत व त्याचे मन आणि सामाजिक संकेत यांचा कलह चालू आहे. अन् तो असाच चालणार. मधूनच विरक्तीची अन् आसक्तीची, बंडखोराची अन् शरणागताची अशी विविध भावचित्रे शांताबाईंनी रेखाटली. तरी अखेर त्या म्हणतात,

" हृदया गात रहा निज गीत
गमली कोणा तव रीत
जरी विपरीत "

कलावंताच्या आत्म्याचे हे स्वगत आहे. फारच गोड कविता आहे ही ! ' हृदया, जिवंत अनुभूतितूनच जिवंत काव्य, अन् जिवंत वाङ्मय निर्माण होते ' तेव्हा, ' वृथा कशाला जननि देणे व्हावे तू भयकंप ? ' असा त्यांचा रोख सवाल आहे. ' अंतःकरणातली तार पिळवटून आली तरच खरे संगीत निर्माण होते, तेव्हा दुःखाचे लेणे तू आपल्या काव्यातून मिरवत ने ! निर्भयपणे गा! जिवांचा कोंडमारा करू नको ' ' कारण गान उरीचे धरता कोंडून, असह्य होईल तुजला जीवन ! ' असे त्या हृदयाला सांगतात आणि शेवटी,

" ज्ञात जगाच्या पैलतीरावरी
असेल कोठे रसिक कोणीतरी
प्रांजल तुझीया बोलांवरती जडेल त्यांची प्रीत "

त्याच्यासाठी ' तू गा खोटे, बेगडी नटवे गाणे गाऊ नको, गाऊ नको ' असे त्या जीव तोडून तळमळीने कळकळीने सांगतात. त्या भावनेतील आर्तता, त्यातले काव्य अपूर्वच आहे.

त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान असे संमिश्र आहे. कधी निराशा, कधी आशा कधी तळमळ असे विविध मनोभाव त्यातून दिसतात. मात्र कोणत्याही प्रकारची मनाची अनुदारता वा संकुचितता त्यांच्या जीवनविषयक काव्यात नाही. आपले मन व्यापक विशाल व्हावे, आपण मुक्त बनावे अशीच त्यांची ओढ दिसते. त्यांच्या जीवनविषयक कवितांचा एक विशेष गुण असा आहे की, त्यात गुढगुंजन नाही, जिवाशिवाचा त्यात जांजल्य नाही. शब्दांच्या अर्थानेच रसिकाला अडवून पाडावे अशी सुदैवाने त्यात काही रचना नाही. ज्या काळात अशा प्रकारचे गुढगुंजन लोकप्रिय होते. त्या काळात त्यांच्या प्रतिभेचा विकास होऊन त्यापासून शांताबाई बचावलेल्या आहेत.

क्षणाक्षणाला घडतो प्रभूजी आपला साक्षात्कार तसेच हे रुप नाही कां ? ईश्वर जरुर दिसत नसेल पण त्याचे हे मोहक रुप या ना त्या प्रकारे दिसून येते.

प्रा. मालती किर्लोस्कर म्हणतात, 'इतर कवयित्रीप्रमाणे अपत्य वा वात्सल्यगीते हा शांताबाईंचा काव्य विशेष म्हणता येणार नाही' (सरिता दर्शन पृ. ४५) वरती स्पष्ट केलेल्या स्पष्टीकरणात हाच विचार स्पष्ट झाला आहे. खरे तर विद्यार्थी अवस्थेत या कविता लिहिल्या आहेत. त्यामुळे अपत्याची भावना या प्रारंभीच्या कवितांमधून नाही.

❖

कलंदर वृत्तीची साक्ष

शांताबाईंच्या काही कवितातून संत कविप्रमाणे "मी मुक्त कलंदर । चिरकालांचा पाथ । मी अज्ञातातून चालत आलो वाट ।" माझी वृत्ती कमलपत्राप्रमाणे अलिप्त आहे. असे त्यांचे मन एकीकडे म्हणत आहे. तोवर दुसरीकडे त्यांचे मन,

' शत जन्मीच्या दुःख भराचे
शिरी घेऊनी अवघड ओझे '

मंद पावले टाकीत चालत असते. आनंद व सौन्दर्यांनी नटलेल्या जगातून माथ्यावरचा भार सोशीत बिचारे अंतःकरण चालत असते. त्याच स्थितीत वर्षानुवर्षे जातात. सागर, पृथ्वी हे आपापल्या सौंदर्यानंदात मग्न असतात ते पाहिले की,

" मनीत येते माथ्यावरचे
अवजड ओझे टेकावे क्षण
अन् भंवतीच्या
हळूच घ्यावा टिपुनी कणकण "

असे त्यांना वाटते.

माथ्यावरचे जे ओझे माथ्यावरच टांच मारून अंतःकरणाला दडपून ठेवते. मग मन बंडखोर होऊन प्रतिकाराला सज्ज झालेच तर ? तर काय ?

"काडकन् नियती मारी
संस्काराचा चाबुक पाठी
रक्तीची दाटून आंसवे
मुकाट झाडे अंतर पुढती "

मनाची झालेली असहाय्य, दुर्बल, अगतिक स्थिती संस्काराच्या चाबकाचा मनाला होणारा असह्य जाच याचे चित्र आहे हे !

कलावंत भोवतालच्या जगाचे सर्व अवजड संस्कार अन् रुढीचे पाश तोडायला धडपडतो आहे. पण ! सारे व्यर्थ ! वर्षानुवर्षे कलावंत व त्याचे मन आणि सामाजिक संकेत यांचा कलह चालू आहे. अन् तो असाच चालणार. मधूनच विरक्तीची अन् आसक्तीची, बंडखोराची अन् शरणागताची अशी विविध भावचित्रे शांताबाईंनी रेखाटली. तरी अखेर त्या म्हणतात,

" हृदया गात रहा निज गीत
गमली कोणा तव रीत
जरी विपरीत "

कलावंताच्या आत्म्याचे हे स्वगत आहे. फारच गोड कविता आहे ही ! ' हृदया, जिवंत अनुभूतितूनच जिवंत काव्य, अन् जिवंत वाङ्मय निर्माण होते ' तेव्हा, ' वृथा कशाला जननि देणे व्हावे तू भयकंप ? ' असा त्यांचा रोख सवाल आहे. ' अंतःकरणातली तार पिळवटून आली तरच खरे संगीत निर्माण होते, तेव्हा दुःखाचे लेणे तू आपल्या काव्यातून मिरवत ने ! निर्भयपणे गा! जिवांचा कोंडमारा करू नको ' ' कारण गान उरीचे धरता कोंडून, असह्य होईल तुजला जीवन ! ' असे त्या हृदयाला सांगतात आणि शेवटी,

" ज्ञात जगाच्या पैलतीरावरी
असेल कोठे रसिक कोणीतरी
प्रांजल तुझीया बोलांवरती जडेल त्यांची प्रीत "

त्याच्यासाठी ' तू गा खोटे, बेगडी नटवे गाणे गाऊ नको, गाऊ नको ' असे त्या जीव तोडून तळमळीने कळकळीने सांगतात. त्या भावनेतील आर्तता, त्यातले काव्य अपूर्वच आहे.

त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान असे संमिश्र आहे. कधी निराशा, कधी आशा कधी तळमळ असे विविध मनोभाव त्यातून दिसतात. मात्र कोणत्याही प्रकारची मनाची अनुदारता वा संकुचितता त्यांच्या जीवनविषयक काव्यात नाही. आपले मन व्यापक विशाल व्हावे, आपण मुक्त बनावे अशीच त्यांची ओढ दिसते. त्यांच्या जीवनविषयक कवितांचा एक विशेष गुण असा आहे की, त्यात गुढगुंजन नाही, जिवाशिवाचा त्यात जांजल्य नाही. शब्दांच्या अर्थानेच रसिकाला अडवून पाडावे अशी सुदैवाने त्यात काही रचना नाही. ज्या काळात अशा प्रकारचे गुढगुंजन लोकप्रिय होते. त्या काळात त्यांच्या प्रतिभेचा विकास होऊन त्यापासून शांताबाई बचावलेल्या आहेत.

माथ्यावरचे अवजड ओझे घेऊन, जनमानसाची पर्वा न करता त्यांची कलंदरवृत्ती प्रवास करू राहते आहे.

❖

स्त्री जीवनाचे दर्शन

शांताबाईंच्या वैयक्तिक जीवनाभूतीच्या कविता म्हणजे एका वियोगीनीचे दर्शनच होय ! प्रेमभंगाचे दुःखाने व्याकूळ झालेली ती एक मनस्वीनी आहे. अंधारात भेटून गेलेल्या एका प्रियकराची आणि आंसवात जगत राहणाऱ्या प्रियतमेची कहानी त्यानी 'अंधारातील भेट' या कवितेत मांडली आहे.

बापडी नवथर आहे. मीलनाच्या स्पष्ट खुणा अजून तिला माहीत नाहीत. तोच मध्यरात्री तिच्या दारावर थाप पडली. तिच्या मनाचा थरकाप झाला. धडधडणाऱ्या वक्षावर हात ठेवून ती कानोसा घेऊ लागली. भीतीने घाबरलेली स्त्री नेहमी वक्षावर हात ठेवते; तिचेच हे रुप होय. श्रीकृष्णाच्या बांसरीची मंजूळ धून कानी पडावी, तशीच सख्याच्या शिळेची खूण कानावर पडली. या शिळेत जणू ओळख होती. ' मीच तुला घनवीले ! ' या एका ओळखिनेच भीती नाहीशी झाली. प्रीतीने भीतीवर विजय संपादिला. आर्थन्तरण्यासाचे एक उत्कृष्ठ उदाहरण हे मानावे एवढा चरण सुरेख पद्धतीने हा साधला आहे.

स्त्रीच्या अधिर हृदयात निर्माण झालेले व्याकूळ मन, बाहेर तिष्ठत उभा असणारा तिचा चित्तचोर व याचवेळी बाई स्पष्ट करतात एक खानदानी कुलीन स्त्री.

" माथ्यावरुनी सावरुनी घेतला पदर नीट
दार उघडूनी बाहेर उभी ठाकली धीट "

माथ्यावर पदर घेऊन सामोरी येणारी ती एक कुलवंती बनते. मराठमोळी स्त्री, अशी अंधारात कुणास भेटते ? एवढ्यात परिचीत बाहूंचा दिठ दिठीला मिळाला. मीलनाचे, एकत्र भेटण्याचे हे चित्र–

" आणि मिळाले उभयंताचे श्वासांमध्ये श्वास "

या शब्दात बाई अधिक गहीरेपणे मांडतात. अधिर ओठाची थरथरती भेट पडली. हृदयीचे गुंज एकमेकांना स्पष्ट झाले. दुसऱ्या क्षणास आलिंगन थिटे घडले. भवतीच्या जगाची धुंद मनास जाणीव झाली. या अंधारातच तिचा शूर सरदार निघून गेला. खिन्न मनाने ही चंद्रकोर घरात आली. उष्ण अश्रू सोबत घेऊन या वियोगीनीसाठी वारा गात होता.

'मंद समिकरण भंवताली गाई करुणागीत
अन्य कुणा नच कळली ती अंधारातील भेट '

एका वियोगीनीचे हे शब्दचित्र आहे. (खरं तर बाईंची ती एक अनुभूती आहे.) रस्त्यातून जाणारी मुग्धा कवयित्रीस भेटते. जिने नुकतेच प्रीतीचे धागे विणणे सुरू केले आहे. रस्त्याच्या गर्दीत तो पुढे कुठेतरी दिसला. त्या सखीचे पाऊल अडखडले. नयन अचानक बावरले. राजमार्गच तो ! तिचे हे थांबणे. लोकांच्या लक्षात येणारच ! ती या जनभीतीने तरी संभ्रतीत झाली का ? उरात धडकन सुरू झाली. टपोरे डोळे फिरू लागले. आतूर ओठ विलग झाले. त्या ओठांना काहीतरी बोलायचे होते का ? की त्या गर्दीत कुणीतरी दिसलं होतं कां ? का रस्त्यातच तिला गुपीत गोड गुपीत आठवले होते ? प्रेम वेडयाचे चाळेच मांडते रस्त्यावर त्यामुळे अकुंटी भंग, चाळे रस्त्यातच या सखीचे सुरू झाले. जिला जीवनधन अर्पिले तो तिला दिसला होता का ?

' अफाट या जनसमादीतून
अचूक दिसोनी ये का साजण
ज्यास्तव हे अनुराग निबंधन ?
ज्या जीवनधनही अर्पियलें ? '

स्त्री जीवनाचे धन ज्या पुरुषास अर्पण करते त्यास ती विसरू शकत नाही याचे समर्पक दर्शन इथे घडते.

' नववधू ' या कवितेत ' कालची पोर आज नववधूच्या ' रुपात दिसली. आज आभाळाचा रंग नवीन वाटला, वीजेचे स्मरण झाले. रानावनांत हिंडताना पूर्वी या नववधूच्या बरोबर–

' आणि अदि वर्षाकाळी कडाडता सौदामिनी
तुझ्या चुंबनाच्या उर्मी उमटल्या होत्या मनी '

कधीतरी या चिमुकलीचे हळवे, अधिर चुंबन कवयित्रीने घेतलेले होते. त्याच्या उर्मी अजून दाटत आहेत. चोरटचा भेटीला तृप्तावलेली मनस्विनी, एक नववधू व लोक लाजेस न घाबरता 'ज्याच्या पावलावर जीवनधन अर्पण केले 'ती' अशी तिन स्त्रीयांची रुपे आहेत.

बाईंच्या इतर वैयक्तिक कवितात स्त्री ही नेहमी परावलंबीत असते. प्रेम त्यास कसे अपवाद असणार ? स्त्री जीवनाच्या आशा-निराशेचा खेळ त्या स्पष्ट करतात.

❖

शांताबाईंच्या प्रासंगिक कविता–

शांताबाई, इंदिरा संत यांच्या प्रमाणे विचारप्रधान काव्याच्यावेळी सुनीताचा वापर करतात. त्यांच्याही हातात सफाईदारपणा आहे. शांताबाईंच्या काव्याचा साकल्याने विचार करताना एक गोष्ट लक्षात येते, ती अशी की, या पाच कवयित्रीत त्या कनिष्ठ असूनही त्यांचे काव्य आज रूढ होऊ पाहणाऱ्या काव्यप्रवाहापासून अलिप्त राहिले आहे. अलीकडे काव्यात आढळणारी दुर्बोधता, अपरिचीत उपमाने ही त्यांच्या काव्यात नाहीत. वाचकाला उपदेश, किंवा बोधामृत पाजण्याचा वृथा अट्टाहास इथें नाही.

" गान उरीचे धरता कोंडून असह्य होईल जीवन " ही वास्तववादी भूमिका आहे.

' सुनीतासाठी ' बाई शार्दूलविक्रीडित या सर्रास वापरल्या गेलेल्या वृत्ताचाच वापर करतात. हातात खड्ग नसतांना पराक्रम करणारे साने गुरुजी एक महान वीर त्याना त्यांच्या व्यक्तीमत्त्वात दिसतो. भारतभूवरचा संग्राम लढणारे हजारो सैनिक व या सर्वांपुढती हा वीर ! राष्ट्रीय भावना, बहिर्मुखता शांताबाईंच्या कवितेत नाहीत. हा मालतीबाई किर्लोस्कर व इतर टीकाकारांचा आरोप मान्य करून ही ' या इथे एक राष्ट्रीय प्रेरणाचा मूळ आहे. हे आपणास मान्य करावे लागते. उपवासाने त्यांचा देह सुकून गेला आहे. नेत्राच्या प्रदीप्त ज्योती लेशभरही मंदावलेल्या नाहीत. चर्चा शान्त, गंभीर, मौन वृत्ती साने गुरुजीचे एक ' वेधक ' शब्दचित्र नजरेसमोर उभे राहते.

" गेला देह तृणावरी सुकुनिया कारागृही कष्टुनि
नेत्रातील प्रदीप्त ज्योति न परि मंदावल्या लेशही
चर्या शांत गंभीर मौन बसले ओठावरी येऊनी
वृत्ती नम्र विनीत ही परि किती बोलून दावी स्वप्ने "

हवन करू पहाणारे, एक मूर्त जीवन नजरेसमोर उभे राहते. शेवटी या महात्म्याच्या जीवनापुढे आपले जीवन म्हणजे ' काजवा ' असेही त्याना वाटते.

" मी खद्योतच क्षुद्र तूं झळकसी तारु स्वयंतेत रे
माझे मस्तक वांकते तुजपुढे वीराग्रणी आदरे "

या वीराग्रणी पुढे त्या नम्र होतात.

' स्वप्नानों ' ही त्यांची कविता परत त्यांचे जीवनच उलगडते ' स्वप्नानों ' जीवनास तुमचाच आधार आहे. मी त्या विना जगूच शकणार नाही हा अट्टाहासही आहे. '

स्वातंत्र्य मिळाले. नवीन दिशा, नवी माणसे, नवे युग, नवी क्षितिजें सारे काही नवीन नवीन. मग अनुभूती कशी जुनी असणार ? या नवीन अनुभूतीतूनच त्यांचे शब्द स्त्रवतात.

' स्वप्ने नूतन
सत्ये नूतन
नव चैतन्ये नटुनी झळकुनी
नव जीवन विस्तरले पुढती
ये नवलाई प्रतीची
नव्या जीवनी नव अनुभूती '

जुने सारे विसरून परत त्या नव्या जीवनाकडे झुकलेल्या आपणास दिसतात.

❖

एक विहिरणीची कविता – तात्पर्य

शांताबाई शेळके यांच्या ' वर्षा ' या संग्रहाचा विचार करता प्राथमिक अवस्थेतील कविता असूनही ती तशी वाटत नाही. ' स्त्री मनातील हळवे स्पंदन, प्रीतीची भाऊकता, सहजता, प्रसन्नता, मुग्ध मुक्त शृंगार, सरळ शुद्ध निरागस आत्माविष्कार, श्रद्धा, ' निसर्गाचे वेड यानी ती परिपूर्ण आहे.

शब्दचित्र धारण करणाऱ्या कल्पना, परखडपणे व्यक्त केलेली विषण्णता, नेमक्या शब्दातील तरलता, अंतरिक लय या गुणांबरोबर त्यांचे वेगळे काव्यविश्व आहे.

प्रा. रा. श्री. जोग म्हणतात त्याप्रमाणे – ' तिच्यामध्ये सहजता आहे, प्रसन्नता आहे, उपदेशपरता नाही. क्रांतीकारत्त्वाचा अधिकार नाही. मोकळा शृंगार सरळ शुद्ध आत्माविष्कार आहे.

१९४१ साली त्यानी पहिली कविता लिहली. म्हणजे त्यांचे काव्यलेखन सतत ४५ वर्षे सुरू आहे.

मा. ज्यूलियन, तांबे, यशवंत, गिरीश, ना. घ. देशपांडे, रविकिरण मंडळाचे संस्कार त्यांच्या काव्यावर आहेत, रविकिरण मंडळाचे ते सहीसही अनुकरण आहे. (ललीत, १९६८)

प्रारंभी त्याचे ' मी ' चे स्वरूप पुरुषी होते. त्या नायक होत्या.

ग. ह. पाटील यांच्या ' रानजाईने ' त्या काव्य लेखनास प्रवृत्त झाल्या.

' वर्षात ' जाणवणारी व्याकरणशुद्धता, शैलीचा रेखीवपणा हे रविकिरण मंडळामुळे आले असे जाणवते.

सुरुवातीच्या काव्यविषयी लिहीतांना त्या लिहीतात, " माझ्या प्रारंभीच्या कविता बहुतांशी खऱ्या नसतील पण आमचे ' कवीपण ' खरे होते. "

सुरुवातीच्या कविता आर्थिक लाभासाठी त्यानी लिहिलेल्या नाहीत.

शांताबाईंच्या वर्षा किंवा प्रारंभीच्या काव्याचा विचार करताना– आधुनिक मराठी कवितेची सेवा निश्चितपणे केल्याचे ज्या रविकिरण मंडळाला डॉ. अ. ना. देशपांडे श्रेय देतात. (मराठी वाङ्मयाचा इतिहास. पृ. ४०७) त्या रविकिरण मंडळाचा परिणाम शांताबाईंच्या काव्यावर आहे. विचारक्रांतीबरोबर साधनांची क्रांती ज्या रविकिरण मंडळाने केली, त्या ' साधना क्रांतीचा ' परिणाम बाईंच्या काव्यावर झाला आहे.

अ. ना. देशपांडे या संग्रहाविषयी लिहिताना म्हणतात, " सहज सुस्पष्ट रचना, त्यांच्या प्रसन्न कवितेचा प्रथमदर्शनी मनात भरणारा प्रमुख विशेष. त्यांच्या पुढील ओळी त्याच्या आशयाच्या स्वरूपाचा बोध होण्यास बऱ्याच उपयोगी आहेत.

' माझ्या हृदयांचे पांखरु
अस्थिर चंचल भरारी
बाई कसे तया आंवरु ?
निळे येता दिसुनी
फडफड करिते अधिर होऊनी
इवल्या इवल्या याच्या नयनी
अनंत स्वप्ने बसली फुलूनी "

स्वप्नांच्या राज्यात हरवलेली राजकन्या असावी. शांताबाई अशा स्वप्नांच्या राज्यात स्वैर, विहार करणाऱ्या वाटतात. निघून गेलेला प्रियकर परत येईल या स्वप्नाळू वृत्तीने त्या वावरतात. त्यावेळी त्यांची कविता अधिक स्वप्नाळू होते. स्वप्नानों तुमचाच आधार या जिवाला आहे असे त्या कळवळून म्हणतात.

कविता ही त्यांची सखी आहे. या कविता सखीबरोबर जीवनातील हर्ष, विषाद विषयक सुसंवाद करत राहतात. हृदय उलगडून दाखवतात.

" हर्ष स्वर वा गूज मनीचे
मूक लाजऱ्या मनोभावना
लपवी ज्या जगापासूनी
प्रकटविले तुजपुढती त्यांना
अमूर्त माझी सारी स्वप्ने
तुझ्यामध्ये गे मूर्त जाहली "

आम्रतरु श्यामल कोवळी हिरवळ, साधे भोळे गीत गाणारा झरा, लव्हाळी फुलपांखरे, निळेभुरे डोंगर, वर 'अगाध सुंदर भव्य अंबर अशा दुर्मिळ' शांततेच्या स्थळी गेल्यावर या कवयित्रीने म्हटले आहे,

" व्याप जगाचा विसराया मी
येई इथे सत्त्वर
अर्धोन्मिलीत नयनी
बघते स्वप्ने अतिसुंदर "

स्वप्नरंजन कर्त्या माधव ज्यूलीयनांचे कवितेने संस्कारित झालेल्या शांताबाईंची कविता ही अशी स्वप्नरंजनात्मक आहे.

" प्रेम होईना तुझ्याने जाऊ दे ते बापुडे
मत्स्मृतीला माळ तूं घालू नको वाया "
" होईल होईल वाटत होते तेच अखेर झाले
नाव घेतल्या वाचून आता मनास झुरणे आले "

आणि शांताबाई म्हणतात,

" आणिक नंतर कळले नाते, की तुझीयासाठी
गुंफीयली जी माळ पडली ती नच तव कंठी "

प्रेमातील ही दारुण निराशा माधव ज्यूलीयन, गोविंदाग्रज व शांताबाईंच्या अंतरंगी आहे.

' विशिष्ठ अनुभूतीची स्मारके ' आणि ' विशिष्ठ आकांक्षाची चित्रे ' असे त्यांच्या कवितेचे स्वरूप आहे. यात अप्रामाणिकपणा यत्किंचीतही नाही ' ही त्यांची साक्षही महत्त्वाची आहे. या अनुभूती व आकांक्षा मुख्यतः प्रेम, निसर्ग व ईश्वर या तीन विषयांशी संबंधीत आहे.

त्यांच्या प्रेमगीतातील नायिका केवळ हृदयमीलनावर संतुष्ट नाही. तर ती संभोग शृंगारात रमणारी आहे. तिचा 'क्षणभरचा' अनुभव–

" श्वास उष्ण तव अजून भासती या गालावरती
दीर्घ चुंबने अजून तुझी ती ओठावरती "

असे तिचे स्वरूप आहे.

" जीवनाच्या दीर्घ वाटेवरून विरहगीत गात जाणारी, स्वप्ने जपणारी, जुन्या स्मृतींचे क्षण कवटळणारी, 'तो' येईल ही प्रतिक्षा करणारी शांताबाईंची 'वर्षा' आहे. स्वतः हरवून, स्वप्ने जपत 'त्याला' शोधणारी ही कवयित्री. "

* * *

भाव विश्वात रमलेली 'रुपसी'

भाव विश्वात रमलेली रुपसी

शांताबाईंची आत्मलक्षी कविता

स्वतःचा शोध घेणारी कवयित्री

अहा ! ते सुंदर दिन हरपले

गात रहा निजगीत

तळमळणारे मन

स्त्री जीवन दर्शन

तत्त्वचिंतनात रमलेले स्त्रीमन

'रूपसी' मधील निसर्ग

तात्पर्य

भावविश्वात रमलेली रुपसी

१९५६ साली प्रसिद्ध झालेला 'रुपसी' हा शांताबाईंचा दुसरा कविता संग्रह. 'वर्षा' या त्यांच्या संग्रहानंतर जवळ जवळ सात-आठ वर्षांनंतर संग्रह रुपाने त्यांची ही कविता वाचकांच्या समोर आली आहे. 'वर्षा' या संग्रहात फोंड्या माळावर निर्जन रस्त्यात थकलेली क्षितिजाकडे पाहत प्रियकराच्या आठवणीने व्याकूळ झालेली त्याच्या स्मरणात मिटू पाहणारी नायिका दिसून आली. 'वर्षा' मधील हे स्वरूप पारंपारिकच म्हणावे लागेल.

'रुपसी' मध्ये मात्र त्यांना वेगळीच पाऊलवाट सापडलेली आहे. स्वतःचा निश्चितपणे सूर त्यांना सापडल्याचे आपल्याला दिसून येते. त्यांच्या कवितेचे रूप आत्मलक्षी आहे. बालपणाचे दिवस त्या विसरू शकत नाहीत. अहा! ते सुंदर दिन हरपले असा सुस्कारा त्यांच्या कवितेने सोडलेला आहे. धुसरती संध्याकाळ, रणरणती उन्हे, तडकलेला माळ, ओळखीची पाऊलवाट यातच ही रुपसी गढून गेली आहे.

रुपसीचा स्थायीभाव म्हणजे निराशा. ' वर्षा ' या त्यांच्या संग्रहात सुद्धा ही प्रेमाची दारुण निराशा होती. याच निराशेचे अधिक गहीरे रुप या संग्रहात वाढत गेले आहे. उदासपण, विषण्णता, जीवनविषयक निराशा व स्वतःच्या कवितेशी हीतगुज. यातूनच ही रुपसी बोलत राहते. तिचे हे बोलणे एका दुःखी स्त्रीचे आहे. या स्त्रीच्या मनाची अवस्था विषण्ण, विकल झाली आहे व यातूनच रुपसी दुःखाने झपाटलेल्या झाडाखाली उभी आहे.

'रुपसी' या शब्दाचा अर्थ सुंदर स्त्री. स्वप्नाच्या नगरीतील राजकन्या. ही राजकन्या स्वतः कवयित्री आहे. दुःखाने प्रतीक्षा करणारी प्रियकरास विसरु न शकलेली ही 'रुपसी' आहे.

❖

शांताबाईंची आत्मलक्षी कविता

" श्रीमती शांताबाई शेळके यांची कविता गेली आठ-दहा वर्षे रसिकांच्या परिचयांची आहे. 'वर्षा' हा त्यांचा पहिला संग्रह प्रसिद्ध होऊन आठ वर्षे झाली. त्याच्या आधी व त्यानंतर सतत व समृद्धपणे शांताबाईंची काव्य रचना रसिकांच्या पुढे विलसत राहिली आहे. मग या दुसऱ्या संग्रहाच्या वेळी ही दीपिका पुनरुक्ति कशाला? खरोखर कशाला ? तिची यत्किंचितही गरज नाही पण शांताबाईंची

कविता जशी अनेक वेळा लडिवाळ आग्रह धरते; पुनः पुनः आपल्या मनाभोवती रुंजी घालीत राहते, तसाच शांताबाईंचा स्नेहहि आग्रह धरतो.

शांताबाईंच्या काव्याच्या हौसेला सीमा नाही. त्यांच्या नित्याच्या संभाषणात, त्यांच्या व्याख्यानांत, चर्चेत काव्याचा आनंद ओसंडत असतो, केवळ आनंदच नव्हे, काव्याचा व्यासंग व पाठांतरहि. काव्यावद्दलचे प्रेम त्यांच्या मनात अणुरेणूंत भरलेले आहे, असे वाटते. काव्यवाचन हा त्यांचा स्वभाव होऊन बसला आहे, वाचलेल्या काव्यांच्या पंक्ति सहज त्यांच्या स्मरणात राहतात आणि संभाषणात ओसांडतात. ज्ञानेश्वरीपासून शब्द सौंदर्याने नटलेल्या लावण्यापर्यंत, केशवसुत–तांब्यापासून आजच्या कवींपर्यंत किती तरी कवींच्या कविता हुकूमीपणाने त्यांच्या तोंडी येतात. '' रुपसीच्या प्रस्तावनेत कुसुमावती देशपांडे यांनी वरील विचार व्यक्त केले आहेत.

शीळ, आज पाहटे, गृहलक्ष्मी इ० मधील भावना, प्रतीकें, शब्दसंच सर्व साधारण आहेत, नित्य परिचयाचे आहेत. अशा कविता म्हणजे काव्यवाचनाने ओथंबलेल्या मनाने सहज केलेला चाळा वाटतो. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, ' जे जे पारंपारिक ते ते सर्व काव्य शून्य. ' कधी कधी एखादा जुनाच संकेत नव्या जाणिवेने थरारुन उडतो, जुनेच वृत्त नव्या सफाईने उजळून निघते. शांताबाईंच्या कवितांत असेहि अनेक ठिकाणी झालेले आढळून येते.

शांताबाईंची कविता काही प्रमाणात पारंपारिक असली तरी तिचा मूळ प्रवाह मात्र स्वतंत्र व प्रामाणिक भावना हाच आहे. जेथे भावना उसळून येते, तेथे त्यांच्या कवितेत खरी सहजता व ओघ येतो. जितक्या सहजपणे त्या वाचलेल्या कवितांच्या ओळीच्या ओळी सांगू शकतात तितक्याच सहजपणे त्यांच्या स्वतःच्या भावनाही काव्याचे रुप धारण करित असाव्यात, असे वाटते.

सहजता हा शांताबाईंच्या कवितेचा पहिला विशेष आहे. त्यांचे अनुभूतीचे क्षण, मनातली एखादी निसटती लहर चट्टदिशी कविताबद्ध होत असावी, असे त्यांची कविता वाचताना नेहमी वाटते. अभिव्यक्तीची सहजता व सफाई हे त्यांच्या कवितेचे विशेष प्रथम नजरेत भरतात.

शांताबाईंची कविता त्यांच्या स्वतःच्या भाव विश्वातच रमलेली आहे. ती आत्मलक्षी आहे. त्यांच्या अंतर्जीवनाचा दिलासा आहे. ती त्यांची सर्वांत अधिक विश्वासाची सखी आहे. ' अंतर्मुख होऊन आपल्याच,

'' गीतांच्या नादे भरुनि अंतर्यामि
त्यात रहाते गुंगत वाटे की अविराम
दडलेली जी दुःखे हृदयी गूढ अनन्य
त्या दुःखांनी आर्द्र असावे माझे गीत

गीत ऐसी श्रवुनी यावे आश्रु नयनी
भाव समाधीमध्येच त्या मन जाते विरुनी ''

बालपणाचे विश्व हे शांताबाईंच्या भावसमाधीचा एक ठळक विषय आहे. त्यांचे मन तिकडे वळले म्हणजे त्या विश्वातील आपल्या मित्र – मैत्रिणी, ' मावळतीच्या ' दिशेवर ' उभा असलेला तांबूस पालवीचा पिंपळ, गाव शिवेवर उभी असलेली ' तरणीताठी बाभूळ ' पर्णहिन चाफ्यावर झोकलेली शुभ्र सुमनाची दाटी, सळसळत्या पालवीचा माथा हालविणारा कडूलिंब इत्यादि सारी मित्रमंडळी त्यांच्या दृष्टिसमोर उभी राहतात. कधी त्यांचे स्नेहबंध दुणावतात, तर कधी लिंबोणीच्या झाडातून डोकावणारा चांदूमामा पाहून बालपणीचा व प्रौढपणीच्या जीवनातील विरोध तीव्रपणे जाणवतो आणि मन खिन्नतेने भरून जाते. निसर्गाच्या राज्यातील बऱ्याच मंडळीचा शांताबाईंचा गाढ स्नेह असावा. धूसर संध्येच्या सुंदरतेत त्या रंगून जातात तशाच रणरणत्या उन्हात, तडकत्या माळावरच्या आगळचा क्षणाची रंगताहि त्या जाणू शकतात. त्यात मग्न होऊन स्थळ काळांचे बंधन त्या विसरु शकतात.

'' अशा एकान्ती असावी
मला माझीच संगत
आगळचा या क्षणालागी
मी असावी रंगत ''

कोठे एखादी जुन्या ओळखीची पायवाट पाहून त्यांचे चित्त तिच्या बरोबर प्रवासाला निघते. चालता चालता त्या पायवाटे भोवतीची नाजूक निसर्गदृश्य टिपता टिपता त्यांना वाटते,

'' निळचा प्रकाशामध्ये नाहती जिथे निळे डोंगर
त्या स्वप्नांच्या सृष्टीमध्ये नेते मज सत्त्वर
दूर दूर त्या नगरीमध्ये चल गे मज घेऊन
दूर कुठेंतरी जिथे गगन हो धरणीचे चुंबन

'रुपसी'तील प्रेमगीते 'वर्षा'तील प्रेमगीतांपेक्षा थोडीशी वेगळी वाटतात. पहिल्या संग्रहातील काही कवितांतील मोकळा शृंगार आता विरून गेला आहे. बहुतेक प्रेमगीतांवर उदासपणाची, विषण्णतेची छाया पसरली आहे. विषण्णता हा 'रुपसी'मधील स्थायीभाव दिसतो. जीवनविषयक निराशा, काव्यातील उल्हास व आनंद यांच्याकडे परतून पाहणारी सृष्टी, क्षणभर निसर्गदृश्यांनी उजळणारी वृत्ति या सर्व त्या विषण्णतेच्याच छटा आहेत. 'शिळा' या कवितेत त्या विषण्णतेला स्वच्छ, नितळ व त्यांच्यापुरती जणू पूर्णत्त्वाने अभिव्यक्ति मिळाली आहे.

प्रस्तावनेत पुढे सौ. देशपांडे म्हणतात, ''शांताबाईंच्या कविता क्षणाक्षणाच्या मनोलहरी सहजपणे व सफाईदारपणे व्यक्त करण्याच्या पलीकडे जात नाही. त्या मनोलहरींची वर्तुळे फार परिचीत आणि त्यांच्या अभिव्यक्तीची पद्धतही ठरावीक, बरीचसी पारंपारिक. त्यांच्या कवितेच्या बहिरंगात प्रयोगशीलतेची चुणूक नाही आणि अंतरंगात नित्याच्या अनुभूतीच्या पलीकडची छटा नाही, सामान्यांच्या जीवनाविषयी जो अभिमान शांताबाईंनी आपल्या एका कवितेत व्यक्त केला आहे तो रास्त असला तरी त्याच अनुभवाचा तळ गाठण्याचीही धडपड वा धीर त्यांच्या कवितेत दिसत नाही. जी लहर आली, जी भावना उद्भवली ती चट्दिशी व सराईतपणे व्यवत करून त्यांचे कविमन मोकळे होत असावे. पुनः पुनः तोच अनुभव आला, तेच दुःख जाणवले किंवा तेच सौंदर्य प्रकटले, तरी तो अनुभव घट्ट धरून त्याला मनात रुजवून घेण्याची शक्ती येथे जाणवत नाही. आणि म्हणूनच कदाचित त्यांच्या कवितांमधील फार थोडच्या ओळीमध्ये वाचकांच्या मनांत खोल जाऊन रुजवण्याचे सामर्थ्य असावे असे वाटते. शांताबाईंच्या काव्यातील अनुभूती विश्वात अधिक प्रकटपणाने जाणवते. तो त्यांच्या ' लपलेल्या, सौंदर्या ' विषयीच्या ओळीमध्ये, या सौंदर्याच्या क्षणोक्षणी येणाऱ्या लहान लहान नित्यांच्या अनुभवांत होणाऱ्या अविष्कारामुळे त्यांचे मन वेडावून जाते. त्या अविष्काराने त्यांना जीवन अलंकृत झालेले दिसते. कधी त्यांना त्यात ईश्वराचा साक्षात्कारही होतो. ही सौंदर्याची ओढ म्हणजे काव्यवाहिनीची गंगोत्री ठरू शकते. ''

पण त्यांनीच म्हटल्याप्रमाणे,

' ओढ लागावी वाटते
अशी लगेच ना पण
धागे क्षणांचे जोडीत
सरे दुबळे जीवन '

या पंक्तीत काव्याविषयींच्या ठरावीक अपेक्षाप्रमाणे उन्मादकता, उत्कटता, रोमांचकारिता इत्यादि काही नसले तरी त्यातील भेदक आत्मविश्लेषण व शांत प्रामाणिकता खात्रीने आकर्षक आहे. मला तर त्या ठरावीक गुणांपेक्षाही ते आत्म-विश्लेषण व ती प्रामाणिकता अधिक आकर्षक वाटते.

रूपसी या संग्रहाची प्रस्तावना लिहीताना कुसुमावती देशपांडे म्हणतात, सामान्यांच्या जीवनाविषयीचा अभिमान त्यांच्या कवितेत नाही. हा सौ. देशपांडे यांचा आरोप ' रुपसी ' या संग्रहापुरता मर्यादित आहे असे म्हणावे लागते.

तरीही एखादी अनुभवाची लहर त्या शब्दात पकडतानां त्या जाणवतात ही लहर वैयक्तिक अनुभवाची असते व त्यातूनच त्यांचे आत्मलक्षीपण जाणवत राहते. यातूनच त्यांची कविता आत्मलक्षी झाली आहे. ❖❖

स्वतःचा शोध घेणारी कवयित्री

'बालपणीचा काळ सुखाचा, आठवतो 'घडी घडी' असे गो. ब. देवलांची शारदा म्हणताना आपल्याला दिसते. त्याच शारदेचे स्वरूप.

'अहा ! ते सुंदर दिन हरपले'

या कवितेत आपल्याला जाणवून येते. ज्या गोड दिवसानी आपल्या मनाला वेड लावले होते. असे ते निरागस मधूर भावाचे दिवस अजूनही कवयित्रीला आठवतात. बालपणीचा काळच निरागस असतो. चराचरातून सौंदर्याचे किरण पडलेले दिसतात. चंद्राच्या किरणांना, आभाळाच्या निळचा रंगाला वेगळाच रथ असतो. तृण पर्णातून, रान फूलांतून, जल लहरीतून, किंवा ताऱ्यातून स्नेहलतेचे अपूर्व लेणे आपल्याला लाभत असते. उमळणाऱ्या कलिकांना कवटाळीत संध्येचे मधुरंग, फिरणे हेच बालपणीचे विश्व असते. पण दिवस बदलतात. प्रौढपण येते आणि

'आता नूरले ते समोहन
विषण्ण गमगे अवेश जीवन
बाल्य संपता आज जगाचे रूप सर्व बदलले
अहा ते सुंदर दिन हरपले'

या विशादातून कवयित्री एखाद्या भाव समाधीत बुडून जाते. तिच्या गीताचा नाद आंर्तयाम भरून उठतो. दंर्वबिदूनी फुले भिजावित तशी त्यांची कविता अश्रुनी भिजून जाते. हर्षाचा उन्माद तिला सहन होत नाही. मधूर खिन्नता चित्तावर दाटून येते. जगाचा कोलाहल ऐकायला तिचे मन तयार असत नाही. अंतर्मुख होऊन ती आपली गाणी स्वतः गाऊ लागते. त्या गीतात बुडून जाते आणि मग या दुःखी गीतातून स्वतः जीवनाबरोबर स्वतः गीताची कल्पना त्या स्पष्ट करतात.

'दडलेली जी दुःखे हृदयी गूढ अनंत
त्या दुःखाने आर्द्र आसावे माझे गीत'

स्वतःची भाव गीते स्वतः ऐकत रहावे हा ही त्यांचा छंद आहे.

'गीते ऐसी श्रवुनी यावे अश्रू नयनी
भाव समाधीमध्येच त्या मन जावे विरुनी'

शांताबाईंचे वैयक्तिक जीवन

प्रेम भावनेत अधिक दंग झालेल्या त्या आहेत. काही वेळेला त्यांची प्रिती अध्यात्म्याचे स्वरूप धारण करते. साधारणतः रविकिरण मंडळाच्या वेळी असणारी अध्यात्मीक प्रीती ही भावना शांताबाईंच्या कवितेत आहे. व त्या दृष्टीने 'आज पहाटे' ही कविता पाहण्यासारखी आहे. राधा सखीला म्हणते–

" आज पहाटे अवचित सखी तो आला माझ्या घरी
शिरला सदनी, भृंग जणू की कमल दला भेदली "

श्रीकृष्णाचे घरी येणे हे कमलिनीवर आसक्त झालेल्या भृंगासारखे आहे. स्वतःला विसरून कमलिनीवर प्रेम करणारा भृंग आणि श्रीकृष्ण या श्रीकृष्णाच्या शिरावर मुकूट नव्हता, हातात बासरी नव्हती, मग हा श्रीहरी आहे हे कसे ओळखावे. एवढ्यात त्याने जवळ येऊन माझ्या खांद्यावर हात ठेवला, नजरेला नजर भिडली त्या नजरेत तो काहीतरी बोलून गेला. त्याची ती अवखळ दृष्टी दुधारी सुरी सारखी वाटली. त्याच्या रंगल्या ओठावर स्वप्नांची माधुरी दिसली. त्याच्या स्पर्शाने हृदयात हूरहूर जागी झाली. पण एवढ्यात,

" नीज कंठीची तये काढीली सुत्र माला गोजीरी
आणि ठेवली सखे अलगद माझ्या ' वक्षावरी '

सकाळचे कोवळे किरण घरात यावे, निघून जावे तसेच त्याचे येणे आणि निघून जाणे. पण त्याच्या त्या स्पर्शाने मिळालेल्या स्वप्नातहि राधा रंगून गेली आहे.

" काय पाहिले ? काय ऐकिली आज न पडला जरी
रंगूनी त्या स्वप्नात अंध मी फिरते वेड्यापरी ! "

इथे या राधेचे वेडेपण राधेचे होत नाही तर ते शांताबाईंचे वाटते.

सामान्याच्या जगात आपली भूमिका स्पष्ट करताना कवयित्री म्हणते,

" सामान्याच्या जगी एक मी सामान्यच कि जीव
म्हणून परंतु कुणीही माझी करू नका हो कीव "

आपल्या सामान्यपणाची जरी जाणीव असली तरी इतरानी आपली किंव करू नये एवढा स्वाभिमान या ठिकाणी आहे. सामान्याच्या जगात आपले व्यवहार सामान्यच असतात. सामान्य लोकांच्याप्रमाणे आशा आकांक्षा, प्रीती आणि रीती सामान्यच राहतात. त्यामुळे सुख दुःखाची तीव्रता सामान्यच राहणार. असामान्याचे जीवन जगणे आपल्याला जमणार नाही. विशुद्ध वातावरणामध्ये श्वास घेणे ही असामान्याना अवघड असते.

पण सामान्याचे जीवन जगत असलो तरी,

" परी न समजा जीवन आमुचे केवळ अगदी तुच्छ
पहा लव्हाळ्या वरती फुलती सुंदर हसरे गुच्छ "

सामान्यांच्या जीवनातच सौख्याचे उन्मेश लाभात असतात. एवढेच नव्हे तर सामान्य लोकात परमेश्वराला अवतार घ्यावा लागतो. म्हणून सामान्य माणसे हीच असामान्य असतात.

" सामान्याच्या मूठीत दडली स्वप्ने रम्य उद्यांची
सामान्यतच अन् विस्तरी विभूती परमेशांची "

प्रियकर निघून गेला आहे, पण अंतःकरणात त्याच्या आठवणीचे दुःख दाटून राहते. आपले प्रेम आणि गूढ मन प्रियकराला कधी कळले नाही. अशी त्यांची तक्रार आहे. त्याचे प्रेम हे स्वार्थी प्रेम होते. हे स्पष्ट करताना पुरुष हा स्वार्थी असतो असे त्या म्हणतात व त्याच्यातील प्रियतमा

" हाती हात तुझे धरून तुझीया डोळ्यात मी पहाते
दूरस्थ अजूनही म्हणूनिया चिती दुके दाटते "

हे विषादाचे दुःख अंतरंगात असल्यामुळे जीवन म्हणजे सात जन्मीच्या दुःखाचे ओझे वाटू लागले. ओझे या त्यांच्या कवितेत त्यांचे वैयक्तिक भावजीवन स्पष्ट होते. डोक्यावर अवघड ओझे व शिणलेले अंतर यातून त्या वाटचाल करत राहतात. सौंदर्याने आनंदाने नटलेल्या भावविश्वात माथ्यावरचा भार सहन करतात. उरावरचे ओझे अवघड असते. दिवसामागून दिवस जातात पण थकलेल्या मनाची अवस्था क्षणभरही कमी होत नाही, मग वाटते–

" मनात येते माथ्यावरचे
अवजड ओझे टेकावे क्षण
अनभवतीच्या उल्हासाचा
हळूची घ्यावा टिपूनी कण कण "

हे व्यवहाराचे ओझे समाजाचा भार माथ्यावरती टाच रोऊन उभा असतो. अगतिकपणा मनाला चिकटला असला तरी,

" कधो खळूनी अंतर माझे
प्रतीकारावर सज्ज जहाले
जड तर होई ओझे वरचे
खेळति भूमि लाच पादूले "

संस्काराचा चाबूक नियती मारीत असते. रक्ताची आसवे फुटत असतात आणि मग निश्चीतपणे कोणीतरी आता येईल आपल्या डोक्यावरचे ओझे उठविल असे शांताबाईंना वाटत असते.

' कधी कोण तो येईल आता
छळवारी हे उतरील ओझे
मुका, निरामय, प्रफुल्ल होऊनी
सुटल नाचत अंतर माझे ? '

सुनीत हा काव्य प्रकार शांताबाईंना अधिक प्रिय वाटतो. प्रियकराच्या आठवणीने त्या तळमळत राहतात. सारे विश्व झोपेत असते. लोक रंगलेले असतात. पण एकांती, एक कवयित्री जळत राहते. वाऱ्याने आणलेल्या गंधातून, चंद्राच्या चांदण्यातून असंख्य स्मृती मनाच्या खिडकीत प्रवेश करतात. चित्त विषन्न होते. डोळ्यातून अश्रूचा पूर लोटतो.

' मायेचे जन भोवती सकल ही, जागेन कोणी परी
सांगू मी कवनास खेद भरला, जो माझीया अंतरी ? '

अशी कवयित्री तळमळत राहते.

स्वतःच्या मनाची बाख खोल आहे. तिचा तळ शोधण्याचा इतरांनी व्यर्थ, खुळा प्रयत्न करू नये. असा त्या इशारा देतात. मनाच्या डोहाचे पाणी जरूर संथ निळे असेल. पण खोल तळाशी क्रुर मगरी असतील. काठावर फुललेले गवत धरण्यास याल पण पायात घुंगरु पडतील. या बाखावरती येणाऱ्या भाव गौळणी मात्र पाणी घेऊन जाण्यास त्या तयार आहेत. 'स्त्रीत्त्वाचे नाते स्त्रीशी आहे' हे असे स्पष्ट होते. या बाखाच्या अंतरंगात नाना प्रकारची खळबळ चालते. जरी संथ जल दिसत असेल तरी या बाखाची म्हणून परीक्षा घेऊ नका. मनाला बंदिस्त बाखाची उपमा देऊन अंतरंगच स्पष्ट केले आहे.

काही प्रीती गीते 'गेय रुप' धारण करतात. 'गीतरचना' हा शांताबाईंचा मूळ पिंड वाटतो. आर्ततेने त्या गात राहतात. ' ते सारे विसरलास काय ? ' या येथे आपण भेटलो होतो. या संथ जलात पाय टाकून बसलो होतो. हितगुजे केली होती. थरथरत्या, चंचल भावलहरी हिरावून घेतल्या होत्या. भविष्यकाळाचे बेत रचले होते. तू निघून गेल्यामुळे–

' बेत मनीचे मनी राहिले
मार्ग ही पुढती भिन्न जाहले '
जुन्या स्मृतींचे आज मात्र हे उरले येथे प्रेत '

' जुन्या स्मृतींचे प्रेत' ही उपमा मनात ठसणारी आहे आणि मी त्या भूतास कंटाळली आहे पण ' तू '–

' वाहत गेला दूरदूरवर
आज जिवाला लागे हूरहूर
राजमंदिरी वससी किंवा भटकतोस अनिकेत '

हे मात्र माहित नाही.

तुझ्या स्मृतीने स्थळ आठवतानां मात्र गहिवरून येते. मनांत खळबळ दाटून राहते.

' दो- दिवसाचे खुळे प्रेम ते
जुळता जुळता तुटले नाते
जाणवून ते नसते बंधन
आज जरासे हुरहुरले मन '

तुझी आठवण आल्यावर ते प्रेम तर खुळे नव्हते ना ? अशी शंका येते. सळसळणाऱ्या पाऊस धारातून जीव घाबरा होतो. पूर्वीचे दिवस आठवतात. मन हूरहूरून येते.

एकेकाळी त्यास सांगितले होते. तुझी नी माझी प्रीती कळावी ती फक्त नक्षत्रांना, तृणपर्णाना, जललहरीना, अर्ध उमलत्या कुसुमांना, डोळ्यांचे संकेत,

' नयनांचे संकेत आपुल्या
केवळ गगनानेच पहावे
आणि आपुले गुपित सुगंधी
कलिकांच्या हृदयात राहावे '

बाईचे तांबडी पाऊलवाट व्यक्तीत्त्व धारण करते. एखाद्या नखरेल बाईप्रमाणे नटत, मुरडत, चालत राहते. नदी तीरावर असणारी हिरवळ, स्वतःचे प्रतिबिंब पाहते. अशा चराचरांत फुलणारे प्रेम मात्र या जगाने पाहू नये तर,

'' तुझी नि माझी प्रीती कळावी
मात्र नभातील नक्षत्रांना
जल लहरींना, तृणपर्णाना
अर्ध उमलत्या अन् कुसुमाना ! '

पुरुषाची शीळ ही स्त्री मनास अधिक मोहवते. कुठून तरी प्रियकराची शीळ येते. त्या शिळेचे येणे हे अवचित असते. तसेच अनामिकपण! पण त्या शीळेने मात्र रोमरोम पेटून निघतो. गर्भ जांभळ्या राईतील तांबडी वाट भिजून जाते. भिजल्या पालवीतून वारा थेंब थेंब ठिबकत राहतो.

'' उरी काही उंचवळे
थरथरत्या अधरी गोड गीत घुटमळे
मन मग उताविळ
आणि मात्रात घुमते तुझी अनामिक शीळ! ''

' गात्रात शीळ घुमत राहते ' या ओळीतील काव्यपण अधिक भावनारमण करणारे आहे. या 'शिळवाल्याचे' पाऊल तर कसे आहे?

सुनीत हा काव्य प्रकार शांताबाईंना अधिक प्रिय वाटतो. प्रियकराच्या आठवणीने त्या तळमळत राहतात. सारे विश्व झोपेत असते. लोक रंगलेले असतात. पण एकांती, एक कवयित्री जळत राहते. वाऱ्याने आणलेल्या गंधातून, चंद्राच्या चांदण्यातून असंख्य स्मृती मनाच्या खिडकीत प्रवेश करतात. चित्त विषन्न होते. डोळ्यातून अश्रूचा पूर लोटतो.

' मायेचे जन भोवती सकल ही, जागेन कोणी परी
सांगू मी कवनास खेद भरला, जो माझीया अंतरी ? '

अशी कवयित्री तळमळत राहते.

स्वतःच्या मनाची वाख खोल आहे. तिचा तळ शोधण्याचा इतरांनी व्यर्थ, खुळा प्रयत्न करू नये. असा त्या इशारा देतात. मनाच्या डोहाचे पाणी जरूर संथ निळे असेल. पण खोल तळाशी क्रुर मगरी असतील. काठावर फुललेले गवत धरण्यास याल पण पायात घुंगरु पडतील. या बाखावरती येणाऱ्या भाव गौळणी मात्र पाणी घेऊन जाण्यास त्या तयार आहेत. 'स्त्रीत्त्वाचे नाते स्त्रीशी आहे' हे असे स्पष्ट होते. या बाखाच्या अंतरंगात नाना प्रकारची खळबळ चालते. जरी संथ जल दिसत असेल तरी या वाखाची म्हणून परीक्षा घेऊ नका. मनाला बंदिस्त बाखाची उपमा देऊन अंतरंगच स्पष्ट केले आहे.

काही प्रीती गीते 'गेय रुप' धारण करतात. 'गीतरचना' हा शांताबाईंचा मूळ पिंड वाटतो. आर्ततेने त्या गात राहतात. ' ते सारे विसरलास काय ? ' या येथे आपण भेटलो होतो. या संथ जलात पाय टाकून बसलो होतो. हितगुजे केली होती. थरथरत्या, चंचल भावलहरी हिरावून घेतल्या होत्या. भविष्यकाळाचे बेत रचले होते. तू निघून गेल्यामुळे–

' बेत मनीचे मनी राहिले
मार्ग ही पुढती भिन्न जाहले '
जुन्या स्मृतींचे आज मात्र हे उरले येथे प्रेत '

' जुन्या स्मृतींचे प्रेत' ही उपमा मनात ठसणारी आहे आणि मी त्या भूतास कंटाळली आहे पण ' तू '–

' वाहत गेला दूरदूरवर
आज जिवाला लागे हूरहूर
राजमंदिरी वससी किंवा भटकतोस अनिकेत '

हे मात्र माहित नाही.

तुझ्या स्मृतीने स्थळ आठवतानां मात्र गहिवरून येते. मनांत खळबळ दाटून राहते.

' दो- दिवसाचे खुळे प्रेम ते
जुळता जुळता तुटले नाते
जाणवून ते नसते बंधन
आज जरासे हुरहुरले मन '

तुझी आठवण आल्यावर ते प्रेम तर खुळे नव्हते ना ? अशी शंका येते. सळसळणाऱ्या पाऊस धारातून जीव घाबरा होतो. पूर्वीचे दिवस आठवतात. मन हूरहूरून येते.

एकेकाळी त्यास सांगितले होते. तुझी नी माझी प्रीती कळावी ती फक्त नक्षत्रांना, तृणपर्णाना, जललहरीना, अर्ध उमलत्या कुसुमांना, डोळ्यांचे संकेत,

' नयनांचे संकेत आपुल्या
केवळ गगनानेच पहावे
आणि आपुले गुपित सुगंधी
कलिकांच्या हृदयात राहावे '

बाईचे तांबडी पाऊलवाट व्यक्तीत्त्व धारण करते. एखाद्या नखरेल बाईप्रमाणे नटत, मुरडत, चालत राहते. नदी तीरावर असणारी हिरवळ, स्वतःचे प्रतिबिंब पाहते. अशा चराचरांत फुलणारे प्रेम मात्र या जगाने पाहू नये तर,

'' तुझी नि माझी प्रीती कळावी
मात्र नभातील नक्षत्रांना
जल लहरींना, तृणपर्णाना
अर्ध उमलत्या अन् कुसुमाना ! '

पुरुषाची शीळ ही स्त्री मनास अधिक मोहवते. कुठून तरी प्रियकराची शीळ येते. त्या शिळेचे येणे हे अवचित असते. तसेच अनामिकपण! पण त्या शीळेने मात्र रोमरोम पेटून निघतो. गर्भ जांभळचा राईतील तांबडी वाट भिजून जाते. भिजल्या पालवीतून वारा थेंब थेंब ठिबकत राहतो.

'' उरी काही उंचवळे
थरथरत्या अधरी गोड गीत घुटमळे
मन मग उताविळ
आणि मात्रात घुमते तुझी अनामिक शीळ! "

' गात्रात शीळ घुमत राहते ' या ओळीतील काव्यपण अधिक भावनारमण करणारे आहे. या 'शिळवाल्याचे' पाऊल तर कसे आहे?

" तुझी पाऊले पडता येथे
वठल्या तरुला अंकुर फुटला
स्मितें तुझी लाघवी उमलता
लालभडक तो मोहर फुलला "

तुझे हंसणे म्हणजे– गुलमोहरांची फुलेंच जणू ! त्यामुळे हा फुललेला मोहर तुझ्या माथ्यावर ढळू दे. हा गंध तुझ्या श्वासात दरवळू दे. तुझ्या कथा अंतरंगात राहू देत.

प्रीतीतून निर्माण होणारी वेदना ही अधिक प्रिय असते. रस्त्यावरून जातांना वळणावर तुझे घर दिसते. ते वळण, ते कोपऱ्यातले झाड, हे सारे पाहिल्यावर शरीरातून वीज चमकून जाते. ओठावर ओळी अर्धस्फुटपणे स्फुरू लागतात. मनात घुटमळणाऱ्या हळव्या ओळी जाग्या होतात. पण आज मात्र–

" आंता न उरले तसले काही
संथ जाहले उचमळूनी जल
गहन एकदा जे गमले भज
आज तयांचा सहज दिसे तळ "

या तळातील गाळावर बाई प्रेम करीत राहतात.

त्याच्या अधाराची कोवळी दुमड, त्याचे कपाळ, त्याच्या मुखावरील शैशवभोळे भाव, डोळ्याचा किंमिजी रंग, सारे काही आज आठवत राहते व प्रीती कविता अधिकच गहिरी होते.

❖

अहा ! ते सुंदर दिन हरपले–

एखाद्या क्षणाची अनुभूती टिपणे हे शांताबाईंना प्रिय आहे. तो 'क्षण' परत पकडणे मात्र इतरवेळा त्याना जमलेले नाही. इंदिराबाई संत या अधिक क्षणवादी आहेत. अशाच एका क्षणासाठी वेडावलेले शांताबाईंचे मन 'अनुभूती' या कवितेत आहे. या क्षणासाठी त्या आतूर झाल्या होत्या.

' अंतरंगी हेलावले, आले लोचनात पाणी
क्षण मोहरून आली, माझी तनु आणि वाणी '

त्याच क्षणी त्याना नाविण्याची जाणीव झाली. सांजवाऱ्यात आपोआप नाहीशा व्हावी तशी. परत तो क्षण कसा पकडावा?

' भिर भिर पाहिले मी वेड्यापरी संभोवती
नाही पुन्हा गवसली सुंदर ती अनुभूति ! '

या सुंदर अनुभूतीसाठी त्यांचे वेडे मन बालपणाच्या त्या रम्य क्षणासाठी जसे तळमळले तसे तळमळते.

' वेदना जपणे ' हा शांताबाईंचा स्वभावधर्म आहे. दुःखाच्या लतिकेवर उमललेली ही कळी त्याना रुचते. व्यवहारातील वैभवे त्याना लुब्ध करत नाहीत. ईश्वराचा एक किरण या वैभवापेक्षा श्रेष्ठ वाटत राहतो.

" परता मजला किरण रुचे एकटा
तव अस्तित्त्वाची साक्ष जिवा पटविता ! "

हे अस्तित्त्व त्यांना जसे ईश्वरांचे भासावे तसे प्रियकराचे. त्याने दिलेली वेदना ही त्याच्यापेक्षा काही वेळा बरी वाटते.

' प्रियतम माझा किती उदार !
प्रतिदिन मजला लेववितो हा अश्रुफुलांचा हार! '

विषादाची छाया इथे आहे.

त्याच्या स्पर्शसुखातून अमृत झरते. त्या स्पर्शसुखाची रुची माझ्या मनास आहे. पण तो जळणारा स्पर्श मला नको. मीलनाचा अमृत कलश नको, तर विरहाचा धगधगता अंगार! सूर्याप्रमाणे तो झळकतो. म्हणून सूर्यफुलांसारखे त्याचे दर्शन बाईंना प्रिय वाटते. त्याच्या भासानी अजून मन मोहरून येते. भास तो भास राहतो. त्यात वास्तवाचा आनंद कसा मिळणार ?

" अजून जिवाला परंतू वाटे
प्रत्यक्षामधिं तुला बघावें
जीवन तुजवरूनी ओवाळुनि
निर्माल्यापरि फेकुनिं द्यावे ! "

प्रियकराच्या पावलावर जीवनपुष्पाचे निर्माल्य झाले तरी अर्पण करण्याची इच्छा मनस्वी आहे.

त्याच्यामुळे जीवनातील कुरुपताही ' सुरुप ' झाली होती. तीव्र काळकूटा-सारखी दुःखे त्याच्या संगतीमध्यें अमृतमय वाटली होती. अजून तुझ्या अस्तित्त्वाची चाहूल मी शोधत राहते.

' जागृतित वा निद्रेतूनही
तुझीच मी नित् घेते चाहूल
तृणाकुंरावर पवन नाचता
गमे वाजते तुझेच पाऊल ! '

' तो ' भेटावा हे एक स्वप्न आहे. ते स्वप्न जपत बाई राहतात.

इंदिराबाई संत प्रियकराचे पेन, उशी, बटने या वस्तुभोवती भावविश्व निर्माण करतात. तसे भावविश्व शांताबाईंच्या काव्यात मात्र त्याना जमलेले नाही. ' ते हात ' सारखी एखादीच कविता. पण ही कविता सुद्धा Pale with hands beside the Shalimar या ओळीवरून स्फुरल्याचे त्यांना वाटते. प्रियकराचे सुकुमार हात, त्यांचा रक्तिमा ज्या हातानी गोंजारले तसेच ' नरकात ढकलून दिले. जे हात कदलीसारखे मऊ होते. ज्यांचा विळखा मानेभंवती पडला होता. ज्या स्पर्शाने भोळीभाबडी प्रीत जागवली होती, ते हात,

' सुकुमार गौर ते गोजीरवाणे हात
सुमहारापरि जे लपेटले कंठात
झाकले जयानी कितीदा मागून डोळे
गुंतली कितीकदा बोटे या केसात '

अजून तो स्पर्श आठवतो व तळमळणे पदरी पडले. चांदणे उदास वाटू लागते. मागील आठवणीमुळे मन खिन्न होते. तरलत्या पावलानें निळ्या सावल्या पुढे पुढे सरकत सरकत असतात. ' लिंब ' हा शांतांबाईंचा आवडता वृक्ष. कटू मधुर गंधाबरोबर आठवणीही या वृक्षाच्या भोवती चिकटलेल्या आहेत. हे प्रतीक मन मोहरून टाकणारे आहे.

' बाल्याचे सुखकर दिन मागे राहिले
प्रौढत्त्व न अजून पुरते वाणले '

इथे प्रौढत्त्व न भावल्याची जाणीव आहे. जे प्रौढत्त्व मात्र त्याना पुढे लाभले आहे. या प्रौढपणात मात्र ' प्रौढत्त्वी नीज शैशव ' केशवसुतानी जपलेले आहे. हे बाईंचे बालपण स्वप्न विरावे तसे नाहीसे झाले व बाई परत–

' मी एकाकी या सीमा रेषेवरी
दाटले अनामिक भय माझ्या अंतरी '

उभ्या आहेत.

आज त्यांच्या भावना जड शिलारुप झाल्या आहेत. शून्य डोळ्यानी त्या या शिलेकडे पाहत राहिल्या आहेत.

गावाची आठवण त्यांना घायाळ करते. पुन्हा ती हिरवी शेते बघावी, झुळ–झुळणारी निर्झर गीते ऐकावीत असे वाटते. कडेकपारीतून येणारा पवनाचा साद मिळावा.

' मोहरलेल्या आंब्याखाली
शीतलशा छायेत निजावें

उग्रमधुर गंधाचे आंसव
सर्वांगीनी पिऊन घ्यावे '

थकलेला शेतकरी कोर्टातून आल्यानंतर आंब्याच्या झाडाखाली झोपतो असे एक चित्र मराठी मनास परिचीत आहे. प्रसंगी आंब्याच्या झाडाखाली खेळणारी मुले, एखादी ग्राम तरुणी पुढे शांताबाईंचे शहरीपण इथे लोपते. त्या ग्रामीण स्त्री बनतात व ' स्वप्नदर्शि यौवन ' कवटाळत राहतात.

' स्व ' चा शोध घेण्याची किमया इथे ' रुपसीत ' सुरू झाली आहे. ' मीच मला कळले नाही ' हा दुःखी हुंदका इथे आहे. ' मी तुमची नाही '– निसर्ग मात्र माझ्याभवती, माझ्यात आहे. नीळचा नभाचे अंजन नेत्रात आहे. भूमातेची सृजन–शीलता त्यात आहे.

' संजीवक पवनाशी माझा श्वास एकरुप
तरुवेलीतून नित्य पाहते मी आपुले रुप '

निसर्गात स्वतःस शोधण्याची किमया इतरत्र स्पष्ट केलीच आहे. पण इथे

' समरस ऐशी मृष्टीसवे मी होऊनिया गेले
समरसतेतुनि याच निशिदिनी जीवन मम उमले '

उमलणारे जीवन आहे. असे माझेपण आज पूर्णपणे निसर्गमयी झाले आहे व

' मजमध्ये मी जरी राहते मी माझी नाही
तुमच्यामध्ये असूनियाही मी तुमची नाही '

नातेवाईक, समाज यापेक्षा त्यांना निसर्ग जवळचा वाटतो. चांदूमामा डोकावणारा अजूनही त्यांना प्रिय आहे. लहान वयात आपण ममतेच्या छायेखाली वावरतो. देव्हाऱ्यात तेवणारी ज्योत असे आपले बालपण असते, ते पवित्र बालपण आज,

' बालपण गेले संगे अजोळही दुरावले
आज संसारतापाने मन आहे पोळलेले '

संसाराचा ताप ' स्त्री मन ' सहन करते. ती स्त्रीसुद्धा आज थकून गेली आहे. या पोरळचा मनास म्हणून बालपण–चंदूमामा प्रिय आहे.

' लिंबोणीच्या झाडातून आज चंद्राला पाहिले
आणि माझ्या डोळचापुढे उभे ब्रह्मांड राहिले. ''

चांदूमामा पाहणारे डोळे ब्रह्मांड पाहू लागलेत.

जीवन म्हणजे दीर्घगीत या विचाराबरोबर ' रणरणता माळ ' असाही त्या विचार स्पष्ट करतात,

' उभी असता मी अशी
घटकेचे व्हावे पळ
माळ निर्जन सभोती
वर आभाळ नितळ ! '

आपलीच संगत आपुल्याला, उरातले कढत श्वास स्वतःलाच ! अशी आगळचा क्षणाची रंगत त्या आठवत राहतात.

स्त्री वक्षांवर मस्तक ठेवून शांत पडून राहणे पुरुषांना प्रिय असते. बाईंची प्रियतमा मात्र प्रियकराच्या वक्षावर मस्तक टेकवते भाद्रपदातील उदास रात्र असते. झिमझिमणारा पाऊस कोसळत राहतो. झोंबणारा वारा जोरदारपणे वाहतो. ' भिजल्या मम् गाली मात्र अंगुळी तुझी फिरते ' तरीही मनातल्या व्यथा मला तुला सांगताच येत नाहीत.

' वक्षावर तुझीया ठेविला शिणलेला माथा
विस्कटलेली ही जुळव रे तूच भावगाथा ! '

ही दमलेली अवस्था आहे.

आईस जीवनात अलौकिक स्थान असते. तिच्या भेटीमुळे क्षणभर का होईना शैशव भेटते. आईची आठवण झाल्यानंतर मन उमळून येते, व्यवहाराचे बंधन, प्रौढपण सारे सारे विसरले जाते. माजघरात दळणारी, बेत ऐकणारी आईची मूर्ती मनात ठसून राहते.

' दळतांना जात्यावर मांडी देग मला आई
गोड गोड ओव्या गाई लेकीसाठी '

सर्वत्र जाणवणारा हा अनुभव आहे. आईने परत वेणी घालावी. मायेची सावली द्यावी, वक्षावर डोके घुसळत राहवे, शांताबाईंचे हे मनस्वी स्वप्न प्रत्येकास आपले वाटत राहते.

राधा ही त्यांची आवडती भावव्यक्ती. राधा हरिवन झुरते, तशा या सुद्धा. अजुनही पहाटे उठून सडा शिपणे, धार काढणे, डेरा घुसळणे, शिरावर घागर घेऊन पाण्यास जाणे, 'गर्द कंदबात मोरपीस शोधणे' हा राधेचा भाव त्यांच्या मनांत आहे. असे एकटे जाता वेळी,

' सावळा कधी येऊनिया
अडविलीस माझी वाट
मी पुष्क फुलांनी फुलते
स्पर्शता तयाचा हात ! '

या नव्या जगात ही नवी राधा झुरत फिरते, हरिस्तव झुरते.

एकूण शांताबाईंची आत्मविषयक कविता, प्रीतीकविता, ही उदास वाटते

विषादाची गहिरी छाया लेवून ती चालत राहते. क्षणभर त्याच्या हातांचा, श्वासांचा भास होतो. मीलनाची आशा तरळत राहते.

भारावून मी स्तब्ध अशी ही उभीच येथे
स्वप्नाहुनिही मधुर चांदणे भवती झरते– "

अजूनही स्वप्नांच्या मधुर चांदण्यासाठी त्या आतूर आहेत.

' काजळी या वाटेवर
उभी इथे मी एकटी
पुढे जाऊ ? थांबू येथे ?
किंवा फिरू मी मागूती ? '

अशी प्रश्नांकित, संभ्रमीत अवस्था आहे. या अवस्थेनंतरच स्वत:चे जीवन,

" एकेक पाकळी गळू लागली आता
नुरलीच रूपरसगंधाचीही वार्ता
पाहता पाहता मिटिते जीवनगाथा
घे, जो न चुरडता काळाचे पाऊल
जरी झाले आहे– विगलीत खिन्न मलूल "

गळणारी पाकळी, तसे मन, मिटणारे लोचन, विगलीत जीवन, व्याकुळ, थकले मन यानीच ' रुपसी ' वेढली आहेत.

❖

गात रहा निज गीत

थकल्या मनाने गीत गाणे हा कवयित्रीचा धर्म आहे. 'गाऊ नको काय मी ही प्रभो ?' असा ईश्वरास त्यांचा सवाल आहे. तर 'हृदया गात रहा निज गीत' असे स्वत:च्या भावनेशी, हृदयाशी इमान ठेवतात व गात राहतात. त्यांच्या या गीतांची रीत समाज विपरीत मानेल, पण ती अनुभूतीची प्रामाणिक वाणी आहे. वृथा जन निंदेस घाबरण्याचे कारण ते कोणते ? या गीतांत रणभेदीची गर्जना नसेल, अुन्मादाची कल्पना नसेल, हृदयीच्या अंतरीच्या पीळ दाटून आलेल्या तारेचा सूर मात्र जरुर असणार ! आनंदाच्या उर्मितून जसे गीत साकारले तसेच ते अंतरीच्या घनदाट तमातून चंद्राप्रमाणे उसळून येते. चंद्राची किरणे ढगांच्या अभ्रात लपून का राहतात ? दु:खाच्या ढगांतून हे स्वर तसेच झरत राहतात.

" व्यथा उरीची लावी हूरहूर
आणि उमटती सुंदर हे स्वर
हे दु:खाचे लेणे जे निज शब्दातून मिरवित "

दुःख मिरवित नेणें ही किमया त्यानी साधली आहे. हा अंतरीचा प्रामाणिक सूर कोडूंन ठेवला तर ? जगणेच असह्य होईल. प्रखर विषासम तो सूर जाळीत सुटेल. सर्वांना आपले गीत प्रिय होईल असे बाईंना वाटत नाही. जगाच्या या तीरावर या गीतांवर प्रेम करणारा अज्ञात रसिक मात्र निश्चित असेल.

" ज्ञात जगाच्या पैलतीरावरी
असेल कोठे रसिक कुणीतरी
प्रांजल तुझीया बोलावरती जडेल ज्याची प्रीत !
हृदया गात रहा तू गीत "

त्यांचे हे प्रांजल बोल त्यांच्या कवितेत आहेत. म्हणूनच अनुभूतिची स्मारके असे त्या स्वतःच्या काव्याविषयी लिहीतांना म्हणतात.

ही कविता सखी त्याना अज्ञानाच्या वाटेवर नेऊन सोडते. स्वप्नाळू जग दाखवते. व्यवहाराचे कटु अनुभव स्पष्ट करते. हिरव्या सुंदर तृणपर्णातून तिचा प्रवास असतो. बाजूस सुंदर गवतांची किरणे असतात. त्या गवतावर संभ्रमात सुमने स्वप्ने घेऊन डुलत असतात. या वाटेवरून जात असतांना माया देणारा, शीतल छाया देणारा गुलमोहर उभा असतो. वड, पिंपळ मायेची पाखरं घालत असतात. दूर कोठेतरी झाडाच्या ढोलीत चिमणा पक्षी किलबिल करीत राहतो. या सखीबरोबर प्रणयाची अनभिज्ञ जोडी ही कळून राहते.

सारे जग झोपेत असते, उरात मात्र तगमग. ही तगमग कविता देखील पाहूनच दाटून येते,

' तुला पाहता दाटून येते हृदयी काही तरी
अबोध काही स्मृती चालवोनी होते मी बावरी '

या अबोध स्मृती, प्रणयाच्या रिती कवितेबरोबरच बाईंनी उपभोगलेली असते. यास्तव विश्वात त्यांचे मन कंटाळलेले असते. दैनंदिन चाकोरीस मन विटलेले असते. याचवेळी तुझ्याबरोबर यावे रमतगमत चालत राहावे. पक्षांचे थवे पाहावेत.

शेवटी त्या प्रिय मैत्रिणीस विनंती करतात, जिथे स्वप्नसृष्टी आहे, निळे डोंगर आहेत, त्या ठिकाणी तू मला नें–

" दूर दूर त्या नगरीमध्ये चल गे मज घेऊन
दूर कुठे तरी जिथे गगन घे धरणीचे चुंबन "

मानव हा वैयक्तिक सुखदुःखात चूर असतो. जो पर्यंत या वैयक्तिक सुख-दुःखाची सीमा संपली नाही. तोपर्यंत ' कविते, तू मूक रहा– " शब्दांना मूक करण्याची ही वृत्ती रविकिरण मंडळातील कवित्र्याही होती.

' आपले घर आंकुचीत असते. विश्वाचे दरवाजे आपण उघडलेले नसतात. स्वत:च्या दु:खातच आपण मग्न राहतो. मग परक्याचे दु:ख कळणार कसे ? शब्दांच्या नखऱ्यातील चतुराईच प्रिय असते. हास्यातला विषाद, अश्रूतील नवलाई अशा मर्यादित कथेत कविने ' तूं ' राहू नको. कवितेचे विश्व व्यापक असावे. ते तसे राहण्यास शब्दांची प्रामाणिक भावनेची साथ हवी याची जाणीव त्या ठेवतात.

" एक परंतु जाता जाता देऊन जा मज ग्वाही
विस्तरता हृदयाची कथा गाशील गोड रुबाई "

असे विनवित राहतात.

आपल्या कवितेचे प्रयोजन स्पष्ट करतांना, त्या ' कीर्ती मागे धावत नाही. खुळ्या अनुरागाने ' चिंतन ' करित नाही. पण शून्य नभावर डोळे खिळवून तटस्थ उभी राहीन. सुंदर काव्यरचनेत दंग होऊन जगास विसरेन ! माझे काव्यविश्व इतरांपेक्षा वेगळे असेल.

" कुणी डोलत राहो कांचन नादावरती
कुणी बसो उसासत देखुनिया नवयुवती
मी बसेन येथे निर्मनुष्य एकांती
हितगुज करीत या तृणपुष्पांच्या सांगाती

सगुण–निर्गुण अशा दांभिक वादात त्या रमत नाहीत. ' नीती अनितीत गुरफटून राहत नाही ! नदी तीरावर लव्हाळ्यासंगे अर्थशून्य गाणी गात राहतात.

आपली कविता ही ' चेटूक ' आहे. त्यामुळे कोवळी जिवणी, अर्थस्फुट वाणी, बोबडे बोल, रखरखते हृदय, दशदिशातील सुंदरता, सारी टिपते. कविता जीवनाची जोडीदारीण आहे. तिच्या अस्पष्ट दर्शनातही सुख आहे.

" क्षण अर्धक्षण दिसली तरी ही
गमते झाले जीवन सार्थक
सुंदरतेने या मजवरती
केले ऐसे अद्‌भूत चेटूक ! "

जीवनातील सुख:दुखाबरोबर, हर्षविषादाबरोबर, त्या बोलत राहतात, त्या कवितेशी; त्यावेळी समाज, समाजाचे अर्थशून्य व्यवहार त्यांना तुच्छ वाटतात व जवळिक वाटते ती कवितेबरोबर, त्या कवितेबरोबर त्या प्रामाणिक राहतात.

❖

तळमळणारे मन

जीवनातल्या चिरंतन सौंदर्यासाठी, कवितेच्या सहवासाठी शांताबाईंचे मन जसे तळमळते, तसे ते ईश्वरासाठी सुद्धा. आजकाल ईश्वरभक्तीकडे कवींचा ओढा कमी आहे, असा एक आरोप नवकवितेवर केला जातो. शांताबाई सश्रद्ध आहेत. त्यांची कविता लपलेल्या सौंदर्यास शोधणारी आहे. कधीतरी त्याचा साक्षात्कार होईल याचा विश्वास त्यांना आहे. त्याच्या दर्शनासाठी त्यांचे मन, अंतःकरण तळमळते आहे, या ईश्वराचे दर्शन त्याना–

' कधी वाऱ्याची येता चाहूल
गमे वाजले तुझे पाऊल
बघते पुढती बावरून मी जो भवती अंधार
कधी तव होईल साक्षात्कार ? '

मेघानी भरलेल्या आभाळात तू पावसाच्या रूपाने साकार होशील का ? वर्षाच्या रुपाने तू कोसळतोस. हिरवी माया करून टाकतोस, निगूढ, श्यामल वातावरणात तुझा संचार जणू वास करत असतो. वनात वाजणारी शीळ, वाऱ्याचे हास्य, नक्षत्रांचा शृंगार–साऱ्या चराचरात तुझेच अस्तित्त्व भरून राहिले आहे. दिशा-दिशात तू लपून राहिला आहेस. अनंत अवकाशाला व्यापणारे तुझे अस्तित्त्व आहे.

'' अनोळखी अधरावर फुलसी
अनोळखी नयनातून हसंसी
इथे चमकूनी, तिथे थबकूनी होशी नजरे पार ! '

सारे विश्व म्हणजे ' तू '. तू ' म्हणजे विश्व ' हा सारा तुझा अस्तित्त्व पसारा. विश्वदर्शनाची सूक्ष्म जाणीव शांताबाईंनी इथे करून दिली आहे.

भक्तीने मोहमयी होणाऱ्या मीरेस श्रीरंगाचा साद येतो, न संपणाऱ्या विरहानें व्याकुळ झालेल्या इंदिरा संतांना अजूनही ' त्याचे ' कुठे तरी दर्शन घडते. बाईना तसाच दुरून साद पुकारत येतो. या एका सादाबरोबर–अंतर थरथरून येते. श्रीकृष्णाच्या पावरीवर लुब्धावून गेलेल्या गौळणी व इथे पाऊसधारातून ईश्वरास शोधणाऱ्या शांताबाई या भिन्न नाहीत. तरुची पाने थरथरून जातात. वाऱ्याची कुजबुज होते. निळ्या नभाचा फुलोरा फुलून येतो. घरादाराचा गोड उबारा, माया ममतेची धारा, हे सारे जन्मजन्मीचे सहस्त्र स्मृतींचे चिंतन असते. या चिंतनातून–

'' रोमांचित हो अवघे तनमन
आतुर झाले अवचित उन्मन
शोधीत तुजला डोळे माझे फिरले भिरभिरुनी '

अशी अवस्था वेड्यासारखी होते. घरदार सोडून तुला शोधीत जगाच्या पाठीवर हिंडत रहावे, असे तुला शोधतच का जीवन जायचे सरून ? हा ईश्वरास विचारलेला प्रश्न, अधिक जवळिक स्पष्ट करणारा आहे.

पण तू आहेस कसा ? अनाम आणिक अरुप. त्यामुळे मी तुला कुठे शोधू ? माझे हे फुललेले मन तुझ्या पावलावर कोठे वाहू ? भावबळाने माझा उर भरून आला आहे. तुझ्या दर्शनासाठी मी वेडी झाले आहे. तुझा साक्षात्कारच होत नाही. मी दांभिक झाले असे मात्र नाही.

" प्रौढत्वाचा जरी झाला
देह मनाला स्पर्श
अजुन तुझ्या स्मृतीने
उसळे वेडा हर्ष "

सुखदुःखाच्या माझ्याभोवती लाटा फुटत असतात. हृदय मात्र कोरडे व तृषार्त असते. आणि तृषार्ततेतून लाभते ते एक शून्यपण–

' जीवन सळसळते भंवती
कोलाहल कीती चाले
शून्य मने मी उभी होते
क्षितीजी लावूनी डोळे "

अशा या अज्ञात क्षितिजावर तू दिसल्यासारखा वाटतोस. पण तो भास क्षणभर असतो. दुसऱ्या क्षणी तो भासच ठरतो. दिवस बुडतो, रात्र येते, दिशातून अंधाराचे काटे फुलून येतात. मनांवरही तसेच ! या विरहातच जीवन संपणार का ?

' विरहातच का विलयाला
जीवन हे जाणार
दर्शन आशा परमेशा
तृप्त न कधी होणार ? "

या विरहातच जीवनाचा अंत होणार ही बाईंची भीती असली तरी अंतरिक इच्छा आहे, ईश्वराच्या दर्शनासाठी तळमळणारे त्यांचे मन ' मीरा ' दर्शन घडवत राहते.

❖

स्त्री जीवन दर्शन

भारतीय स्त्री आदर्श स्वरूपातच आमच्या साहित्यीकांनी साहित्यात पाहिली आहे. हिन्दु धर्म, शील, चारित्र्य, या कल्पना तिच्या भावजीवनाशी अत्यंत निगडीत

स्वरूपात आहेत. शांताबाईंच्या 'रुपसी' या संग्रहात मात्र स्त्री–जीवन दर्शन घडवणाऱ्या दोनच कविता आहेत. वास्तविक त्यांचे वैयक्तिक जीवन, त्यांच्या आत्मपर कविता हेच त्यांचे स्त्रीदर्शन मानले पाहिजे. वैयक्तिक सुख दुःख, प्रेम, संसार, मुलेबाळे, निसर्ग या संदर्भात सामान्य स्त्री पेक्षा वेगळा विचार शांताबाई मांडतात. त्यात एकाने विस्कटलेली घरटी परत उभारायची आहे. निराशेतून आशेकडे जायचे आहे. 'जीवन हे जगण्यासाठी नसते, जळण्यासाठी असते.'

सप्तपदाची वाट चालून गृहप्रवेश करणारी गृहलक्ष्मी हा आमच्या कवयित्रींचा काव्यविषय व कवींची भाव कल्पना. शांताबाई या विषयापासून दूर झाल्या नाहीत. त्यानाही या विषयाची ओढ आहेच.

'गृहलक्ष्मी' ही त्यांची कविता, असेच शब्दचित्र स्पष्ट करणारी आहे. त्यांची घरामध्ये प्रवेश करणारी गृहलक्ष्मी सोनियाच्या पावलानी प्रवेश करते. लावण्यप्रभेने साऱ्या घराचे, आसमंताचे भाग्य उजळू देते. घरात येताना या देवतेने शुभमुहूर्त साधला आहे. तिच्या स्वागतासाठी स्थिरचर, सदर सारे काही आतुरले आहे. माहेरचे पाश, मातापित्यांची भाया, सारे पाश मोडून ती वापडी या गृहात आली आहे. 'स्त्री' ही दोन्ही कुळांना पावन करणारी सरीता असते. या गृह–लक्ष्मीने या दोन्ही कुळे पावन केलीत. तिला पाहतांना कवयित्रीचा उर भरून आला ही स्त्री मनाची कृतार्थता आहे.

"भावी भाग्य रेखलेले भव्य तुझ्या भाळावर
देती मंगल ग्वाही तुझे सुलक्षणी कर"

सून घरात येताच तिच्याकडे संसार सोपविला जातो. सासूबाई दूर होतात. गृह–मंदिरात ही लक्ष्मी वास करते. या बापडीचे डोळे वाईना–

'तुझ्या लोचनात पटे रम्य भविष्याची साक्ष
तुझ्यामुळे साधायाचे धर्म, अर्थ, काम, मोक्ष'

चतुर्विध पुरुषार्थाची प्राप्ती फक्त काव्यामुळे होते असे नाही तर ती स्त्रीमुळे सुद्धा ! धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ हे गृहलक्ष्मी तू घरात आल्यामुळे आपोआप सिद्ध पावलेले आहेत. 'स्त्री ही चतुर्विध पुरूषार्थाची प्राप्ती करून देणारी अधिष्ठाथी असते. हा नवा विचार प्रस्तूत ठिकाणी आहे.

शैशव व तारुण्य या सीमेवर उभी असणारी एखादी षोडशा, बाईना दिसते. तिच्या डोळ्यात बाईंचेच प्रतिबिंब असते. त्यामुळे स्वतःचे दुःख त्या मुग्धेवर वाहतात. चांदीच्या समईचा प्रकाश पडावा. तसे तिचे शरीर असते. गाभाऱ्यातील ज्योतीचे भाव मुखावर असतात. नेत्रात निर्मळ–निरागस भाव असतो. सारे विश्व जपायचे असते या वेडीला ! स्त्री ही स्त्रीपेक्षा 'माता' अधिक असते.

" यौवनाच्या सीमेवरी उभे राहिले शैशव
जाईजुईच्या फुलांचे अंगोपांगात मार्दव '

कोवळचा नसानसात वीजेची चमक असते. यौवनाची जाणीव शरीरास झाली आहे. त्यामुळे पदर सावरत ती चालते आहे. पुसटशी लाजेची छटा गालावर उभारली आहे. मध्येच हंसू ओठावर फुटते आहे. एका बाजूस उफाळणारे तारुण्य तर दुसऱ्या बाजूस शैशव यातून ती साकारलेली आहे.

' तारुण्य, जीवनातली रम्य पहाट असते. जीवनाचा बहर असतो. शरीर–ऋतूचा वसंत फुलतो. त्यामुळे सारी सृष्टी स्वप्नांची वाटते. रम्य फुलांचे ताटवे जागोजागी फुललेले दिसतात. या यौवनास निसर्गही साद देतो–

' सुगंधीत कुंजातून कोण घाली तुज शीळ ?
साद देई कुठूनिया तुला तुझा घननिळ ? "

हा कवयित्रीचा प्रश्न आहे.

असा प्रश्न शांताबाईंना का पडावा ? त्या स्वतःस त्या रूपात पाहतात. त्यामुळे ती षोडशा आपणच असे त्यांना वाटू लागते व प्रियकराची शीळ कानात घुमत राहते.

" बाले तुजला पाहून गेले क्षण भुलोनिया
तुझ्या जागी मूर्ती माझी मज लागली दिसाया "

एक स्त्री दुसऱ्या स्त्रीच्या रूपांत स्वतःस शोधत राहते. हेच तिचे स्त्रीपण आहे. हेच मुग्ध वेडे वय कवयित्रीसही लाभले होते. यासारखेंच तिनेही विश्व पाहिले होते, चितिले होते,– ते यौवन निघून गेले आज–

' गेले शैशव यौवन स्मृती केवळ राहिली
आठवावे त्या गे आता होते जीवांची काहीली '

सर्वत्र दिसणारा, जाणवणारा हाच अनुभव आहे. शैशव व यौवन या मधली झपूर्झामय अवस्था साऱ्यानाच प्रिय असते. वृद्धापकाळात किंवा हे दिवस निघून गेल्यावर आठवाने स्वर कातर होतो. मन दुःखी होते. निघून गेलेले दिवस हे बाणासारखे असतात. भात्यातल्या. ते परत कसे येणार ?

" येती आंसवे लोचनी न्याहाळता तुझी मूर्ति
म्हणते मी, तुझी तरी होवो सचे आश पूर्ति "

या अखेरच्या ओळीतून जाणवते. ती बाईंची भळभळणारी जखम. लग्न, सप्तपदी–मुळे हे स्त्रीत्वाचे परिपूर्नत्व असते. दुर्दैवाने हे स्वप्न अपूर्ण राहिले असावे असे वाटते. लग्नाचा मोहक सोहळा या स्त्रीस माहित नसावा, ते दुःख अंतःकरण कापत राहते.

शेवटी हे एक स्त्रीमन आहे. आपले स्वप्न पूर्ण झाले नाही. याचे दुःख जरुर

आहे. पण त्या वेडीचे तरी व्हावे ही स्त्री मनाची अंतरिक इच्छा आहे. जे दुःख, जो भोग स्वतःस भोगावा लागला तो निदान त्या मुलीस भोगावा लागू नये ही प्रार्थना आहे. शेवटी इथे शांताबाई एक स्त्री म्हणून उभ्या आहेत.

❖

तत्त्वचिंतनात रमलेले स्त्री मन

जीवन ही वेड्याची कहाणी आहे. मूर्खांचा बाजार आहे. सुखदुःखाचा झुला आहे. असे तत्त्वज्ञान आज सामान्य माणूस सहजपणे बोलताना जाणवतो. जीवनाविषयी असेच स्वतंत्र तत्त्वज्ञान शांताबाईंनी बनवलेले आहे. जीवनात आत्यंतिक अवस्थेत निराशा आली म्हणजे तत्त्वहीन स्फुरते, तुकारामाच्या अंभगातील तात्त्विक भाग हा त्या वैयक्तिक जीवनानुभूतीतून स्फुरलेले आहे. बाईंचे असेच एक तत्त्वज्ञान सूत्र त्यानी बनविले आहे.

या व्यावहारिक जीवनात जगायचे असेल तर ' प्रौढत्वी निज शैशवास जपणे ' बाणा कवीचा असे ' हे केशवसुतांचे सूत्र कवयित्रीस खोटे वाटते. आज जीवन एवढे धडपडीचे, गडबडीचे झाले आहे, की, ते मुग्धपणा जपणे अवघड होते. व हे तत्त्वज्ञान सांगून गेलेला कवी वेडा वाटतो.

या वेड्या कवीची ही काव्यपंक्ती आठवतां कवयित्री दुःखी बनते. खिन्न होते. प्रौढत्वी बाल्य जपू लागलो तर हंसू होईल, हा व्यवहारवाद आहे. काव्य व व्यवहार यांची नेहमी फारकत असते. काव्यात मांडलेले तत्त्वज्ञान प्रत्यक्षात अवतरेल असे नाही. भृंगासारखा कवी स्वप्नांत रंगून जातो व समाजाच्या उपहासास पात्र ठरतो. प्रौढत्वी शैशव टिकणे, दुःखप्राय ठरते व बालपण म्हणजे–

" वाटे शापच की भंयकर नको अव्याज ते शैशव
देवा ! कोमल बालकास पढवा प्रौढापरी कैनव "

सुनित रचनेत अखेरचे हे तत्त्वज्ञान जरी त्यानी मांडले तरी त्यांना ते जमले आहे का ? असा एक प्रश्न त्यांची बालगीते वाचतांना मनापुढे उभा राहतो.

' नवयुग ' च्या कचेरीत काम करत असताना यंत्राच्या बरोबर शांताबाईंचा संबंध येत असतो. ' मानवी जीवन ही यंत्राची खट्खट्च आहे. ' रात्र असते, यंत्राची खट्खट् सुरू असते. कुठे तरी एखादे प्रणयी युगुल आपल्यात मग्न असते. मंजुळ गीत गाणारे निर्झर पाहत असतात. अंकामागून अंक छापून निघतात. एकटीच एकाकी कवयित्री बसून राहते. पानांची सळसळ, विहंगाची आतूर किलबिल सुरू असते.

" एकच धडपड या यंत्राची
टाकी अवघे विश्व व्यापूनी "

उरी खिन्नता असते. जीव भयभित झालेला असतो. जीवन कसे कंटाळवाने वाटते. मधूनच तृणाकुंर दिसतात व पटून जाते.

" दिसे पत्थरामधून फुललें
बलशाली ते जीवन मजला
निसर्गातल्या जीवशक्तीने
मृत्यूवर की विजय मिळविला "

काळचा पत्थरातून उभारलेले ते गवत जणू या काळचा कभिन्न दगडी जीवनातून जगण्याचे संदेश देत असतात.

या जीवनातला चंद्र तर–

" चंद्र येथला क्षयरोगी अन्
उदय होतसे अस्तासाठी
पूर्णत्वाचे शिखर गांठता
अधोगती लागतसे पाठी "

हौसेने सुमने फुलवावी पण निर्माल्य हाती लागते. विविध रंगरुपात नटूनही हाती यावी असे वाटते. या संदर्भात लिहित असतात. प्रा. रा. अ. काळेले म्हणतात,

' नवकविता हा जाणूनबूजून केलेला नवा प्रयोग आहे. त्याच्या यशापयशा–बद्दल इतक्यात निश्चीत काही सांगता येणार नाही. नवकाव्याच्या पहिल्या तपामधील वाचकांच्या प्रतिक्रियांचा कानोसा घेतला तर ती प्रतिक्रिया संमिश्र, संदीग्ध वाटते. ' शांता शेळके म्हणतात, ' नव कविनी भाषेचे सामर्थ्य व सौंदर्य काही अंशी वाढवले आहे.

नवकाव्याबरोबर तात्त्विक कविता म्हणून शांताबाईंच्या या विश्वाचा विचार करतांना त्यांचे भाषेचे सामर्थ्य व सौंदर्य लक्षात येते.

मानवाला दोन डोळे मिळाले. या दोन डोळधानी तो सारे दिवस पहायला लागला. पण सारे वैभव हरवून बसला,

" दो डोळचांचे क्षेत्र संकुचित
दिसे न त्यांना काही पुरते
बघता बघता बघावयाची
अवघी त्यांची शक्ती सखे "

दोन डोळे हे सारे पाहू शकत नाहीत. त्यासाठी अंतचःक्षु हवेत ! दोन डोळचांची जाणीव दुबळी असते. गूढ रहस्ये त्यामुळे आपणास दिसत नाहीत.

" दो डोळ्यानी बघतो मानव
काही न त्याला परंतु दिसते
बघता बघता त्यचे अंध खुलेपण
उपहासे सृष्टी हंसते "

दोन डोळ्यांचा मानव खरा आंधळाच असतो. त्याला वाटते आपण सारे काही बघू शकतो. पण ते खोटे असते. त्याच्या या वेडेपणाला सृष्टी मात्र हंसत राहते जीवन ही यंत्राची धडधड आहे. मानव या जगात फक्त जगत राहतो. काही वेळा तो दगडातून उगवणाऱ्या गवतासारखा प्रयत्न करतो.

❖

' रुपसी ' मधील निसर्ग

' रुपसी ' या संग्रहात निसर्ग कवितांची संख्या अवघी दहा आहे. ' वर्षा ' मध्ये निसर्ग हा त्यांचा मित्र होता. शांताबाई जशा कवितासखीबरोबर बोलत राहिल्या तशाच निसर्गाबरोबर. इंदिरा संताच्या जीवनात जे स्थान निसर्गाचे आहे तसेच नाते शांताबाईंचे. इंदिराबाईना निसर्गातील स्थळी प्रियकराबरोबर लुटलेला क्षण आठवतो. तर शांताबाई एखाद्या पिंपळ वृक्षाबरोबर सुखदुःखाच्या गोष्टी बोलत राहतात. मानवाचे सारे आयुष्य हे भोवतालच्या निसर्गातून कमी अधिक प्रमाणात घडत असते. एक नातेच तयार होते. सामान्य निसर्गाचे दृश्य पाहून फक्त चुचकारतील ! स्वस्थ बसतील ! प्रतिभेचे अमोल देणे साहित्यीकांस लाभत असते. तेच दृष्य पाहून स्वस्थ राहणार नाही तर त्या दृष्यास शब्दातून चित्रांकित करेल. त्या दृष्याशी गप्पा करत बसेल, मित्रासारखा त्याच्याबरोबर हितगुज करेल ! आर्द समजून अश्रू येतील. अनेक ताटवातून निसर्ग साहित्यीकांच्या भार जीवनात उभा राहतो.

लहानपणीचा पिंपळ बाईना आठवतो. मावळतीला सूर्य गेलेला. त्याची किरणे पडल्याबरोबर पिंपळ स्वतःच्या छायेत मग्न झालेला. स्वतःचा जणू तो पिंपळ शोध घेतोय असेच कवियित्रीस वाटते. प्रभात काळी रविचे किरण पडतात. पिंपळातले रसरसते जीवन जागे होते. बाराचे उन्ह माथ्यावर असते. पिपंळ चमचमत असतो.

" अवती भवती सदा दाटल्या निगुढ संध्या छाया
याच पिंपळापोटी तेव्हां गाढ लाभली माया "

बाईंच्या वैयक्तिक जीवनात जेव्हा निगूढ संध्याछाया पसरल्या होत्या तेव्हा याच पिंपळाने गाढ माया दिली. काळ्या अमावस्येच्या रात्री जर भिती वाटली तर याच पिंपळाने डोळे मिचकावून धीर दिला. गावात चार–मित्र मैत्रीणी आहेत. त्या जिवलगांची ओळख पुढील शब्दात त्या करतात,

" गावशिवेवर उभी राहिली बाभळ तरणीताठी
पर्णहीन चाफ्यावर झाडी शुभ्र दिनांची दाटी "

क्षितिजातून सळसळ शोधणारा कडुनिंब, तरणीताठी बाभळ. तसाच जिवलग पिंपळ, हे सारे मधुभावाचा शेक देणारे–

" अवचित त्यांची स्मृती जागली आज आधीचे चिर्चा
हृदयी भरल्या अश्रुसागरा येई अचानक भरती "

निसर्ग हा ईश्वराचा अंश आहे. ढगातून ओघळणारे सोने, नितळ निळ्या नव्हाळीत न्हालेली तरुवरची पाने, फुललेला मोगरा, त्यांचे गंधित उच्छवास, तापलेली मध्यान्ह, कळ्यानी गाईलेली अंगाई गीते, गोड चांदण्याची रात्र यातून साकारणारी–

" निजते भरीत स्वप्नानी
येईल निद्रा आतां, प्रभुची जणु करुणावाणी "

निसर्गाच्या मायाजालातून साकारणारी निद्रा ही ईश्वराची करुणवाणी आहे.

निसर्गातून त्या शहरी जीवनात आल्या. त्यांचे ते स्वप्न हरवले. सोनेरी मुलायम, ते स्वप्न अजूनही त्यांना हवे वाटते. सोनेरी क्षणांची किमया, उत्कंठीत वातावरण, नभातील खगांचे थवे, तमात चमकणारे तारकांचे दिवे, कभिन्न काजळ, निर्झर, मृदू चरणतळीची हिरवळ, चंचल हसरे जल, या साऱ्याच्या ' स्मृतीनें मनिचा ताप नि अजून हे स्वप्न हवे! " स्वप्ने ही मानवाच्या जीवनातील सुखाची किमयागारी आहे. वास्तवात जे मिळणार नाही. ते सहजगत्या स्वप्नात मिळते. स्वप्ने जीवनाची आशा केंद्रे बनून जातात.

' माळ '– ' संध्येची मलूल किरणे ' या शांताबाईंच्या दोन कविता, त्यांच्या मनाचे स्पष्ट दर्शन घडवणाऱ्या आहेत.

' शाकुंतलेशी ' नाते–

शांताबाईंच्या निवासाचे नाव शाकुंतल. निघून जाणारा दुष्यंत आणि त्याचा शोध घेणारी शकुंतला मराठी मनास पूर्व परिचीत आहे. त्या शकुंतलेची वेदना ही कवयित्री भोगते आहे. असा आभास वारंवार मनात उभा राहतो व त्या स्पष्ट करतात त्या त्यांच्या निसर्ग कविता.

माळावर तडकत्या उन्हाच्या झळा असतात. कोठेही छाया दिसत नाही. एखादे झुडूप (कवयित्री) निस्तब्धपणे उभे असते. जागोजाग जमीन हुंगीत मुके

कोकरू फिरत असते. काटेरी निवडुंग ध्यानस्थ मुनीसारखे बसलेले असते. आभाळात मेघ नसतो. वाऱ्याच्या उठत्या झळामुळे मृगजळ हेलावत असते. अतिव दुःखाने भरकटणाऱ्या कवयित्रीस–

" घेता नेत्र मिटूनिया लाल पिवळचा रेषा पुढे धावती
होते मस्तक सुन्न, येईल जणू मूर्च्छा असे वाटते "

माळावरून जाणारी भंगलेली कवयित्री, या फोंडचा माळावर,

" वेगाने बरसेल येथ पहिली जेव्हां मृगाची सर
हा राहिल असाच रुक्ष, फुटून येतील की अंकुर ? "

अखेरच्या ओळीत प्रश्नचिन्ह टाकून कवयित्री निसर्गास चिरंतन सुख कधी तरी मिळेल. पण आपण दुःखीच राहणार. असे स्पष्ट करते. त्यामुळे ' संध्येची पिवळी किरणे मलूल ! ' वाटत राहतात. वृक्षांचा माथा वाऱ्याबरोबर डोलत राहतो. दिवस म्लान असतो. जमिनीतून वाफारा फुटत असतो. कवयित्री उष्ण निश्वास टाकत चालत राहते.

" आहे निर्जन् माळ दूरवर हा जाऊनिया पोचला
माझे नेतील पाय तोवर असे आहेच जाणे मला
एकाकी पथ आक्रमित पुढती मी चालले सारखी
नेते पाऊलवाट दूर मजला जी तीच माझी सखी "

पाऊलवाट सखी बनते–बाईबरोबर चालत राहते. पाऊलवाट धैर्याने चालते पण भीतीने कवयित्री मात्र व्याकुळ बनते. काळोख वाढतच राहतो. अचानक हा काळोख बाईंच्या मनातून क्षणिक ' नाहीसाही ' होतो.

निसर्ग फुलूनही कवयित्रीचे मन हंसत नाही. ' अजूनी रुसूनी आहे ' मधला चाफा आणि शांताबाईंची वृत्ती इथे एक आहे. मनाची मोठी, विचित्र अवस्था होते. काहीही सुचत नसते. उदासपणा जीवनास व्यापून राहतो. निसर्ग हंसत असतो. पण हंसणेही जमत नाही. आषाढाच्या प्रथम दिवशी यक्षच काय सारेजण व्याकुळ असतात. आभाळातला श्यामल ढगसुद्धा. श्वास रोखून तरु ताठ उभे राहतात.

" आतुर अंती जाहिल्या चित्ती वसंत सेना
मन मात्र हे निसर्गासवे क्षण हंसेना ! "

त्यामुळे–

" पूर लोटता नद्यांचे आले भरून उर
ओघ धावती मालिन्य नेत्री वाहून दूर "

' भरलेला उरपूर आलेल्या नदीसारखा ' सारे दुःखच शब्दात पकडलेले आहे. वसंत फुलतो, चांदणे नटते, पण मन मात्र हंसत नाही. जीवाची कळी रसरसत

नाही. मनाला कशाचेच आवाहन पोहचत नाही. शैशवातले गुपीत आज हरवलेले असते. ग्रंथाच्या जाड पानात मन गुंतलेले असते. धुंडूनही ती 'अज्ञात वाट' सापडत नाही. जीव जडमूढ बनून जातो.

हंसणाऱ्या सांजेवून, फुलणाऱ्या गुलाबातून ' तुझी ' याद मात्र येत असतेच–

" कोणी रसिक रंगेली
घरी गाळीते चंदन
धुंद त्याचा परिमल
भरे आसमंतातून
वृत्ती खिन्न मोहरली
सांज गुलाबी हसली
स्मृती तुझीच उरली
सांज गुलाबी हसली "

हसणाऱ्या सांजेतून स्तृती जागी होते.

शांताबाईंच्या निसर्ग कविता त्यांच्या मनाचे प्रतिबिंब निसर्गात शोधणारी आहे. वर्षेतील दु:ख इथे अधिक गहिरे झाले आहे–

" मनाचे पांखरु–
तिथेच लपले अजाण शैशव
तिथे पऱ्यांची नगरी सुंदर
फुलपांखरु होऊनी फिरते
अजूनही मन त्या वाटेवर "

हे मनाचे पांखरु ' गोदंण ' मध्ये स्थिर झाले कां ? एक प्रश्न !

❖

'रुपसी'- 'स्व' शोधाची पूर्वपीठीका !

' रुपसी' मधील शांताबाई तशा पारंपारिक आहेत. केशवसुतांपासून, तांबे, रविकिरण मंडळ या साऱ्यांचे संस्कार व अनुकरण त्यांच्या काव्यावर आहेत. काही प्रतीके तर नित्य परिचयाचोच आहेत. पण काव्यानुकूल गेयता, शब्दसामर्थ्य, भावनेची तीव्रता यामुळे रुपसी वाचकांच्या मनांत परत 'घर' करून राहते.

शांताबाईंची कविता पारंपारिक असली तरी तिचा प्रवाह मात्र मुळ स्वतंत्र आणि प्रामाणिक भावना हाच आहे. अशी भावना जेव्हा उफाळून येते तेंव्हाच

त्यांच्या कवितेला सहजता व ओघ प्राप्त होतो. त्यामुळे सहजता हा वर्षा सारखाच रुपसीचा काव्यगुण मानावा लागेल.

शांताबाईंची ' रुपसी ' मधील कविता ही त्यांच्या स्वत:च्या भाव विश्वात रमलेली आहे. ती आत्मलक्षी आहे. त्यांच्या अंतर्मनाचा दिलासा आहे आणि त्यांची 'ती' अत्यंत विश्वासाची 'सखी' आहे. अंतर्मुख होऊन आपल्याच बालपणाचे विश्व शोधत राहते हा त्यांचा ठळक विशेष होय.

पिंपळ, तरणीताठी बांभळ, पर्णहीन चाफा, शुभ्र सुमांची दाटी, सळसळत्या पालवीची माया, ही सारी त्यांची कुटुंबीय मंडळी आहेत. धूसरता तसेच रणरणते उन्ह, तडकता माळ हे सारे त्यांच्या मनाची अवस्था टिपणारे आहेत. आगळ्या क्षणांची रंगत जाणून त्यात मग्न होणे त्याना प्रिय आहे.

'वर्षा' पेक्षा 'रुपसी' मधील प्रेमगीते वेगळी आहेत. पूर्वी असणारा, मुग्ध शृंगार आता विरून गेला आहे व उरली आहे निराशा.

उदासपणा, विषण्णतेची छाया, रुपसीत असल्यामुळे व त्या बरोबर विष्णतेला स्वच्छ, नितळ, व त्यांच्यापुरती जणू पूर्णत्त्वाची अभिव्यक्ती मिळाली असल्यामुळे शांताबाईंची कविता क्षणाक्षणाच्या मनोलहरी सहजपणे व सफाईदारपणे व्यक्त करते. सामान्यांच्या जीवनाविषयी जो अभिमान शांताबाई व्यक्त करतात त्या अनुभवाचा तळ गांठण्याची धडपड वा धीर त्यांच्या काव्यात नाही. येणारी भावना त्यानी पटकन टिपली आहे असेच म्हणावे लागते.

काही काही अनुभव–परत परत मांडत राहिल्यामुळे त्यांची कविता काही वेळा अंतर ढवळून काढीत नाही. त्यात उन्मादकता, उत्कट रोमांचकारिता इ. काही नसले तरी आत्मविश्लेषण प्रामाणिकपणा खात्रीने आहे.

स्वत:चा शोध घेण्याचा त्यांनी यत्न सुरू केला असला तरी त्यांची ही वृत्ती ' गोंदण ' मध्ये परीपूर्ण झाली आहे असे वाटते. पण ' स्व ' शोधायचा त्यांचा प्रयत्न 'रुपसी'त सुरू आहे.

* * *

एक हळवी भाववृत्ती

'तोच चंद्रमा'

शांताबाईंची भाव कविता

कोळी गीते

कोळी गीतांचा परिसर

मी डोलकर र डोलकर

पहिली लावणीकार

हिरवा रंग एक प्रतिक

स्वरात गुंतलेली कवयित्री

भक्ती गीते

कशी गवळण राधा बारवली

द्वंद गीते

एक कथा काव्य

मरणही माथा झेलुनी घेऊ

शूर आम्ही सरदार

अंगाई गीते

बडबड गीते

बालगीते एक पुनर्विचार

बालमन– एक चिकीत्सा

टिप टिप चांदणे

स्वनाळू जग

' तोच चंद्रमा'

' रुपसी ' या संग्रहानंतर ' तोच चंद्रमा ' हा भावगीतांचा संग्रह १९७३ साली प्रसिद्ध झाला. एकशे दोन भावगीते या संग्रहात आहेत. पुस्तक प्रसिद्धीपूर्वी आकाशवाणीच्या माध्यमातून ही गीते वाचकांपर्यंत पोहोचलेली आहेत व काही गीते अजून वाचकापर्यंत पोहोचायची आहेत.

गीत लेखन हे मनाच्या विशिष्ठ अवस्थेत होत असते. वैयक्तीक भावना शब्द रुप होऊन गीतबद्ध होतात. शांताबाईंची ही गीते हेतूपूर्वकतेपेक्षा योगायोगाने अधिक लिहीलेली आहेत. कुणीतरी भरीला घालून ही गीते लिहून घेतली. अशी कबुली त्या स्वत: गीते काही अनुभव या लेखात देतात. जाणीवपूर्वक जरी हे गीत लेखन त्यांनी केले नसले तरीही लहानपणापासूनचे संस्कार त्यांच्या मनावर होते. शांताबाईंचे लहानपण खेड्यात गेले. नात्यातल्या अनेक बायकांनी त्यांचे घर गजबजून गेलेले असायचे. त्यामुळेच जात्यावरच्या ओव्यापासून ते नागपंचमीच्या गाण्यापर्यंत अनेक प्रकारची गाणी त्यांच्या कानावर पडत. या गाण्यांना ताल असे, लय असे. त्यामुळे लहानपणीच या तालबद्धतेची, लयीची त्यांना जाणीव झाली. व गाण्याचे खोल ठसे त्यांच्या मनावर रुजले गेले.

निवांत संध्याकाळी हुरहुरीच्या वेळी त्यांना खिन्न करणारे सूर भेटतात व त्याच्यातूनच त्यांची गीते जन्माला येतात. " स्त्री गीत रत्नाकर, मानसगीत सरोवर " ही गीतांची पुस्तके लहानपणीच त्यांच्या हातात पडली. आई व मावशी यांना गीतांचे वेड होतच. त्यांच्या तोंडून वरील गीते त्यांनी ऐकली व त्याचा परिणाम अजाणतेपणी त्यांच्या मनावर झाला.

आकर्षण धृपद, सोपे नादमधुर शब्द, चित्रदर्शी वर्णन शैली, प्रासादिक रचना हे सारे त्यांना जुन्या गीतात भेटले. शांताबाईचे लहानपणीचे काही दिवस गुजराथमध्ये गेले. त्यामुळे काही गुजराथी गीतांचा परिणाम त्यांच्या या गीत रचनेवर झालेला आहे.

जात्यावरच्या ओव्या, भिक्षेकऱ्यांची मागणी, लग्न समारंभातील गीते, अंगाई गीते हे सारेच मनाच्या ओल्या मातीवर रेखले गेले. रविकिरण मंडळातील काही कवींचा परिणाम व भा. रा. तांब्याची धृपद रचना, हिंदी चित्रपट गीतांचे सूर या सर्वामुळेच गीत या प्रकारातील त्यांच्या मनातील आवड अधिकच जागी झाली. वसंत पवार, भालजी पेंढारकर, सुधीर फडके यांच्यामुळेच त्यांच्या या गीतांना जन्म प्राप्त झाला, घाट प्राप्त झाला असे आपल्याला दिसून येते. शांताबाईंनी मराठीबरोबर काही बंगाली गीते लिहीली आहेत. मानस मुकर्जी हा बंगाली मधील संगीत दिग्दर्शक व त्याचे अनुभव आपल्या या गीताला कारणीभूत

झाले. अशा त्या सांगतात. लता मंगेशकर, उषा मंगेशकर यांच्यामुळे आपण अधिक गीत रचना केली, कोळी गीते लिहीली असे त्या सांगतात. ही कोळीगीतेसुद्धा अपघाताने लिहिली आहेत. असेच त्या परिशिष्ठामधील लेखात म्हणतात.

र. वा. दिघे, अनंत काणेकर, कवी आनंद या जानपद गीतांचा व सूरांनी भारलेल्या मंगेशकर घरांचा परिणाम त्यांच्या या गीतांवर झालेला आहे. तात्पर्य कुणी ना कुणी सांगितल्यामुळे त्यांची ही गीते लिहीली गेली. शब्दाला वजन असते. या जाणिवेतूनच त्यांची भावकविता लिहीलेली आहे.

❖

शांताबाईंची भावकविता

भावगीतात गेयतेपेक्षा भावाला अनेक पटीने महत्त्व असते. ' भावगीत ' या शब्दात भावाचा स्पष्ट उल्लेख असल्याने भावनेचे महत्त्व स्पष्ट होते. एका अर्थी भावगीत शब्द अतिव्यापक आहे. कोणतेही उत्तम काव्य हे उत्कट भावनांच्या शब्दांमध्ये होणारा अविष्कारच होय. या दृष्टीने सारेच काव्य भावगीत म्हणायला पाहिजे. तेंव्हा तो शब्द एका विशिष्ट प्रकारास लागल्याने त्याची व्याप्ती कमी होते. अर्थात् या प्रकारात भावना इतर प्रकाराहून अधिक उत्कठ असते. हेच कारण पुरेसे आहे.

ज्या काव्यात भावनेचा अविष्कार मुख्य असतो. सृष्टीवर्णन, कथाकथन इ० गोष्टी अतिगौण असतात. अशा काव्यास भावगीत म्हणावे. भावगीतात ज्याला गीताचे स्वरूप असेल, त्यालाच भावगीत म्हणावे.

भावगीतात एका मुख्य भावनेपेक्षा इतर भावना येऊच शकत नाहीत. या गीतात कवी स्वत:च्या भावना, स्वत.च्या म्हणून शब्दात प्रकट करीत असतो. अशा भावनांचे उद्रेकीकरण फार काळ टिकत नाही. पण ते प्रामाणिक असते. भावगीतांचा दुसरा–विशेष–म्हणजे एकपिंडता. भावना एकच असल्याने व ती उत्कठपणे बाहेर पडत असल्याने ती एकजिनसी अशी बाहेर पडते. मुख्य कल्पना, व तीचे योग्य दर्शन होण्यास आवश्यक असणारी तिची अगोंपांगे यानीच ते भावगीत बनत असल्याने एकजिनसीपणा त्यात निर्माण होतो. शांताबाईंची अशी भावगीते आहेत की, जी एकपिंडता, एकजिनसीपणा यानी युक्त आहेत. एकाच मावनेची ताण त्यात असते.

शांताबाईंच्या भावगीताची संख्या पुष्कळ असली तरी त्यांच्या निवडक भावगीतापासून व्यक्त होणारा त्यांचा आत्माविष्कार पहाण्याचा प्रयत्न इथे आहे. स्वत:ची भूमिका मांडताना ' तोच चंद्रमा नभात ' हे त्यांचे भावगीत संस्कृत

श्लोकावरून त्यांना स्फुरले असे त्यानी स्पष्ट म्हटले आहे. वास्तविक या भावगीतांची प्रवृत्ती सरळ स्पष्ट आहे. त्यामुळे शांताबाईनी असे स्पष्टीकरण केले त्यामुळे तो श्लोक समजला. अन्यथा हे भावगीत स्वतंत्रच वाटले असते.

प्रीतीचा बहर निघून गेलाय. मन अद्विग्न झालंय. पण निसर्गाचे ऋतूचक्र हे चालणारच ! अव्याहत पणे ते चालत राहणार ! शांताबाईंना हे चक्र वेडावते व तोच चंद्रमा आठवत राहतो. या गीतांची रचना करून मागीतल्यामुळे यात त्या परत नायिका होतात. आज तीच निरवता आहे, तेच धुंद चांदणे आहे, तोच जाईचा गंध, तीच प्रीती, तीच अनुस्मृती तरीही एक शून्यपण जाणवत राहते.

' ती न आर्तता उरात स्वप्न ते न लोचनी
एकांत मजसमीप तीच तूही कामिनी '

हे शून्यपण कां यावे ? रिकामेपणाची ही जाणीव नायकास का सलत रहावी ? ' तीच ' कामिनी असेल पण स्वामिनी नाही ' कारण त्या स्वत: स्पष्ट करतात.

" त्या पहिल्या प्रीतीच्या आज लोपल्या खुणा
वाळात्या फुलांत व्यर्थ गंध शोधतो पुन्हा
गीत ये न ते जूळूनी भगल्या सुरांतुनी
एकांती मजसमीप तीच तूहि कामिनी "

या चरणात त्या प्रश्नाचे उत्तर सांपडते.

ती पहिली प्रीती आज उरलेली नाही. त्या खुणा मात्र जिव्हाग्री आहेत. तो सूर भंगून गेलाय म्हणूनच ही कातरवाणी आर्त विराणी आहे.

' जीवलगा ' हे शांताबाईचे अत्यंत विरही गीत आहे. ' जीवलगाचे ' तीन अर्थ या कवितेत साकारलेली आहेत. एखादी वेडी स्त्री विरह वेदनेने व्याकूळ होऊन प्रियकराची विववणी करीत आहे. थकल्या जीवाचीं कहाणी सांगते आहे, असे शब्दचित्र नजरे समोर उभे राहते. या गीतामुळे ऐकणारा रसिक हा गायिकेच्या सुराबरोबर स्वत:ला विसरतो.

' जिवलगा राहिले रे दूर घर माझे
पाऊल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे '

या सुराबरोबर विनवणी करणारी एक विरहीणी मोठ्या आर्तपणे नजरे समोर उभी रहाते. भोवतालची वनराई किर्रऽऽ झाली आहे. संध्याकाळ दाटून आली आहे, सुख सुमनाची माया सरली आहे. ओळखीचा गाव मागे पडला आहे, पायतळीचा मार्ग दिसत नाही, दरवाजे मिटलेत आणि थकल्या मनाने ती परत विनवणी करते आहे.

' निराधार मी, मी वनवासी
घेशील केव्हा मज हृदयाशी ?

तूच एकला नाथ अनाथा महिमा तव गाजे,
जिवलगा राहिले रे दूर घर माझे '

जिवलगा या एकाच शब्दांची तीन वेळा पुर्नरावृत्ती होते. जिवलगा असे व्याकूळपणे म्हटल्यानंतर जाणारा तो तिथेच थांबला असला पाहिजे. दुसऱ्यावेळी त्याने पाठीमागे वळून पाहिले असले पाहिजे आणि शेवटी तो परत आला असला पाहिजे. शांताबाईच्या या भावगीतातील वेदना ही एका खऱ्या प्रियतमेची आहे. किंबहुना ते कवितेचे रुप आहे.

ही त्यांची थकलेली प्रियतमा गावाला जाण्यासाठी आतुरलेली असते. जेथे धरेला आभाळ मिळते. अस्ताला रवि बिंब टेकायेचे असते. खुळचा ढगांना रंगीत साज लाभलेला असतो. उन्हे सावलीला आलींगन देतात. असे हे कवयित्रीचे गाव आहे. वास्तवात प्रियकर निघून गेला आहे. त्यामुळे तोही स्वप्नातल्या गावामध्येच भेटतो, व त्या म्हणतात,

' स्वप्नामधील गावा, स्वप्नामधून जावे
स्वप्नातल्या प्रियाला मनमुक्त गीत गावे
स्वप्नातल्या सुखाचा स्वप्नीचे वेध घ्यावा
माझ्या मनातला कां तेथे असेल रावा ?

अशा स्वप्नाची ओढ त्यांच्या अंतरंगात असते म्हणून त्या रानफुलाला विचारून सजनाचा शोध घेत जातात. भग्न शिवालय, निर्जन परिसर, गर्द तरु, वेलीं, अनावर पूर या साऱ्यांना त्या सजनाचा पत्ता विचारतात, पण त्याचे अस्तित्त्व काही वेळेला भासते.

' येणार साजण माझा ' हे त्यांचे भग्वगीत म्हणजे विवाहाच्या वेदीवर चढण्यापूर्वी मांडलेले एका मनस्वीनीचे चिंतन आहे. आपल्या सख्यांना त्या सांगत असतात.

' शालू हिरवा पाचूनी मरवा वेणी तिपेडी घाला
साजणी बाई येणार साजण माझा '

बालपणीचे चिमुकले जग आता संपले आहे. भातुकलीचा खेळ आवरला आहे. लुटूपुटूच्या संसाराची वेळ संपत आली आहे. अशा वेळी–

" रेशीम धागे ओढीती मागे व्याकूळ जीव हा झाला
साजण बाई येणार साजण माझा "

लग्नासाठी आतूर झालेल्या या सजणीचा साजण घोडचावरुन येतो आहे. दारात चौघडा सनई सूर गुंफीत उभी आहेत, आणि अशा वेळी या नववधूला आठवतात ते बालपणीचे दिवस. लग्नाच्या वेळी कोणत्याही स्त्रीची असणारी

दयनीयमान अवस्था येथे आहे.

" मंगल वेळी मंगल काळी डोळा कां ग पाणी ?
साजण माझा हा पतीराज मी तर त्याची राणी
अंगावर त्या शेलारीला बांधीण त्याचा शेला
साजणी बाई येणार साजण माझा "

मोठ्या आतूरतेने ती त्याच्या स्वागताला तयार आहे.

शांताबाईच्या कवितेवर गोविंदाग्रजांच्या कवितांची छाप आहे. गोविंदाग्रजाच्या कवितेतील प्रेमाची विफलता त्या आपल्या कवितेत त्याच पद्धतीने व्यक्त करतात. ' गोफ ' या नावाची कविता गोविंदाग्रजांची आहे, या कवितेची छाप शांताबाईच्या " सर्व तू विसरून जा " या कवितेवर आहे.

" मी तुझी होते कधी ते सर्व तू विसरून जा
चांदण्या रात्रीतले ते स्वप्न तू विसरून जा
आणिले धागे तूझे तू मी ही माझे आणिले
गुंफिला जो गोफ त्याचा पिळ तू विसरून जा. "

या चरणावर सरळ-सरळ गोविंदाग्रजांची छाया आहे. ज्या वयात आपण वचने देतो. खुळचा शपथा घेतो ते सारे कधी तरी विसरणे भाग पडते,

" प्रितीचे हितगूज ते कुजबूज ती रुसवे हिते
ते हसू अन आंसवेती आज तू विसरुन जा
चंद्र ज्याला साथ होता, जे फुलानी पाहिले
रेखीले प्राणात जे मी तेच तू विसरून जा "

प्रितीच्या विफलतेचे दर्शन शांताबाईची कविता आपल्याला घडवीत रहाते, मग ही विफलता त्या स्पष्टपणे व्यक्त करतात तर काही वेळा निसर्गाच्या माध्यमातून-

काही वेळा त्या स्वत: अपर्णा बनतात, भोळचा शंकरासाठी तपश्चर्या करतात, शेवटी प्रेम ही एक साधना आहे. या साधनेसाठी, वैभवभूषीत वैकुंठेश्वराला शोधत रहतात. युगायुगाचा भणंग जोगी त्याना आवडत रहातो. आणि त्याला प्राप्त करण्यासाठी त्या गात रहातात.

कळीचे फूल कसे होते. हे काही वेळेला समजत नाही, बालपण सरुन यौवनातील पदार्पण हे ही असेच असते. डोळचांमध्ये धुंद, चांदणे येते, ओठात गीत, मन बावरते, पापणी झुकते, ध्येयाला कंप सुटतो आणि शब्दाविना मनसंगीत गात रहाते.

शांताबाईची काही गीते फसलेली आहेत. याला कारण म्हणजे त्यांनी दुसऱ्याच्या इच्छेला अनुसरून लिहीले. उदा. त्यांचे ' ना-ना-ना-ना ' हे गीत !

चांदण्यात एकांती बसुन गीत गाणारी प्रियतमा त्यांच्या रक्तात आहे. कधी तरी एक स्वप्न परत त्याच्या मनात जागे होते व त्या गाऊ लागतात.

" वर गर्द पानजाळी निद्रीस्त मूक पक्षी
छाया प्रकाश खाली गुंफे सुरेख नक्षी
चाहूल ये कशाची ? आभास काय होई ?
माझ्या मनात एका स्वप्नास जाग येई. "

हे स्वप्न मनातले असल्यामुळे अर्ध्या उघडचा डोळ्यानीं त्यांनी ते टिपलेले असते.

" अर्धेच गीत ओठी अर्धाच सूर आहे
श्वासातल्या लयीने हे उर कापत आहे
अर्ध्याच पापण्यानी मी आसमंत पाही
माझ्या मनात एका स्वप्नास जाग येई "

भीलनाच्या वेळी बोलणे नको असते मूक रहाणे प्रिय वाटते. फुलाफुलात सुवास दाटलेला असतो. तो उरात भरून घ्यावा असे वाटत असते. अंतरातले फुल पांखरु स्पर्शासाठी आतुरलेले असते. पण प्रेमात जवळ येण्यापेक्षा दूर होणे अधिक चांगले-

" मिळून दूर जाहल्या क्षणैक दोन सावल्या
गहभ त्यात मी कुणी लक्ष ज्योती लावल्या
तो प्रकाश आतला जन्मजन्म लिऊया "

मिलनाच्या सुखाची धुंदी गात्रामात्रात भरून ठेवणे. शांताबाईना प्रिय आहे. काही वेळेला शांताबाई मिश्कील लिहीताना आढळतात. आपल्या प्रियकराकडे नव्या पैठणीची मागणी करतात. सर्जाची नथ नाकात घालताना गाल हसत रहातो, पण ऐन दिवाळीत,

" हलक्या हाती फुलवून साऱ्या तबका मधल्या ज्योती
ओवाळती तुम्हा साजणा, एकांतामधी राती
एकदाच या वर्षासाठी येतो सण पाडवा
पैठणी मला नवी आणवा "

' पैठणी मला नवी आणवा ' ही भाव कविता म्हणजे दूर पराक्रमाला बाहेर पडणाऱ्या पुरूषाजवळ मागणी करणारी गृहीणी आहे.

बाईंच्या आयुष्यात भेटणारा प्रियकर हा पावसा सारखाच लहरी आहे.

त्याचा दुरावा सहन होत नाही, प्राण वेडापीसा होतो. एकलीने कसा वेळ घालवावा हे समजत नाही. विरहातच झुरत झुरत जावे असे वाटत राहाते. असे असले तरी आपल्या या प्रियकराला त्या विसरत नाहीत. एखादे पाखरू त्याची आठवण करून देतेच रात्रंदिवस ते जवळ असावे असे वाटते. पण, तो असत नाही. विरहाचे मुक हुंदके त्या देत राहतात. आणि पांखराला विनवितात.

' पांखरा गीत नको गाऊ
कातरवेळी आतूर जीवा
वेध नको लाऊ
पाखरा गीत नको गाऊ '

तरूण स्त्रीला नव्हे तर साऱ्याच स्त्रीयांना पती जवळ असावा असे वाटते. कारण त्याच्याजवळ अलल्यासच जीवनाची गोडी असते.

'' रात्रंदिन तो जवळ असावा
आज कुठे तो प्राण विसावा ?
त्या प्रीतीच्या फसव्या गावा
पुन्हा नको नेऊ
पाखरा गीत नको गाऊ ? ''

काही आठवणी अशा असतात त्या कधी होऊच नये किंवा कोणी देऊच नयेत. कवयित्रीचे मन आता थकले आहे. प्रियकराला शोधून त्यांना खरे प्रेम मिळालेच नाही. आमावस्या आणि पौर्णिमा आज त्यांना रमवित नाहीत. जीवनातले मधुगीत संपल्यासारखे त्यांना वाटते.

जीवन जगणे म्हणजे शिक्षा आहे. असा भास दशदिशांतून होत राहातो. आणि खीन्नपणे त्यांच्यातील विरहीणी गात राहते.

'' हरपली माधूरी संपली चारुता
राहीली व्यापूनी अंतरा शून्यता
आज विणेपरी मुक हो रागिनी ''
'' बोलणार कधी वेदना मनातली
पाळणार निगृहे शपथ एक घेतली
सौख्य ज्यात मन प्रिया त्यात मी सुखी सखे
ऐक गंध मालिके ''

त्यांच्या मनातील वेदना त्या कधी सांगत नाहीत, बोलत नाहीत. पण वळवाच्या पावसासारख्या सांडत जातात.

'तोच चंद्रमा' या त्यांच्या संग्रहात शांताबाई परत पुरुष रुप धारण करतात इथे रविकिरण मंळाचा परिणाम नाही तर दुसऱ्यांच्या आज्ञेने किंवा इच्छेने ही गीत रचना झाली आहे. वेदनेचा शाप फक्त आपल्याच माथी आहे. ओंजळीतले आयुष्य संपून गेले आहे आणि हात रिकामे आहेत. पण ही मनाची तडफड सांगायची कोणाला ?

" सांगू कशी कोणाला कळ आतल्या जीवाची ?
चिरदाह वेदनेचा मज शाप हाच आहे "

शांताबाईंच्या कवितेतील प्रियतमा ही एकाच प्रियकराशी एकनिष्ठ राहाण्यापेक्षा जीवनातील नवीन गीताला आसूसली आहे, असे म्हणावेसे वाटते. प्रियकराचा सहवास म्हणजे जणू निळे अवकाश पवनाला जणू त्यांच्यामुळेच गती प्राप्त झाली. हे जग त्याच्यामुळे सुरम्य ठरले. अंतःकरणात नवीन ओढ व संवेदनाजागृत झाली जणू काही इथेच स्वर्ग भेटला गेला पण तो पुढीलप्रमाणे–

' ये चाहूल नवी गोड या जीवनी
कोण छेडीत असे ही नवी रागिणी ?
हर्ष नेत्रातूनी, कंप गात्रातूनी,
प्रीत फुले माझे सोनेरी '

कवयित्रीला लाभलेली ही नवी चाहूल निश्चितपणे नव्या प्रियकराची आहे, असे दिसून येते. अजूनी मन कासावीस होते आणि प्रियकराची आठवण मनात दाटून राहते.

प्रेम ही एक भावना आहे. ही भावना कशी जागृत होते हे सांगताच येत नाही. कसे काय झाले मजला उमगलेच नाही. असे स्वतः त्या म्हणतात. घुंगुरुच्या बोलावर त्यानी पावले टाकलेली असतात. या प्रेमाच्या मैलीलीत कुणी सतारी छेडतात. कुणी तबला वाजवितात मग शब्द कसे सुचतात सूर कोठून येतात काहीच कळत नाही.

" कशी नाचले मी झाले कशी धुंद हेही,
कसे काय झाले मजला उमगलेच नाही !
सुर भरले व वाढली लय, शब्द आले वाहवा !
रात चढली चांद झुकला थंड सुटला गारवा
इथे फक्त उरलो दोघे जवळना कुणीही
कसे काय झाले मजला उमगलेच नाही "

जरी प्रेम भंग झाला असला तरी प्रियकराने हंसून बोलावे, डोळे पुसावेत, गालावरील दवाचे थेंब ओठाने टिपावेत असे वाटत राहते. कळकीच्या बेटातून

अजून ती अनामिक शीळ ऐकू येते. कुणाची तरी बोटे केसातून फिरत राहतात. 'छायेसम निकट कुणीतरी उभा राहतो' शेवटी जाणीव होते. तो ओळखीचा पाहूणा आहे.

शांताबाईंची भावकविता जसे प्रेम व्यक्त करते. तसेच स्त्री जीवनाचे दर्शन घडविते. ऐन दिवाळीच्या दिवशी भावाची प्रतिक्षा करणारी बहिण व्याकूळपणे दारात उभी असते. चंद्राहून देखणा असा तो ओळखीचा पाहुणा असतो. त्याच्या पावलाच्या आवाजाने मन भरून येते. बहिणीची ओढ उरात असते म्हणून आई नसतानाही तो इथपर्यंत आलेला असतो. त्याच्यासाठी ती केळीचं रुंद पान निवडते. जिरेसाळीचा भात करते आणि ओवाळता ओवाळता–

" प्रित हवी एक तुझी, ओवाळणी नको दूजी
आस नसे भाऊ राया
होई तू औक्षवंत, किर्तीवंत, भाग्यवंत
नित्य तुझी देई माया "

त्यांच्या कवितेतील ही स्त्री काही वेळेला हंसते तर काही वेळेला फसवे गाल फुगवून गप्प बसते. गवतात लोळणे आणि केसात फुलं माळणे हा तिचा स्त्रीधर्म आहे.

आणि शेवटी–

" बोलणार गोड गोड
घेऊन जरा मागे ओढ
हसत हसत फिरून तुझ्या मिठीत घुसणार मी
पुन्हा पुन्हा तुझ्यासंगे अशी फसणार मी! "

प्रियकराबरोबर फसणे हे त्यांना प्रिय आहे.

बोलण्यातूनच प्रीती व्यक्त होते असे नाही. श्वासातले तुषारें, त्यांची गूढ भाषा प्रणयी युगुलांना समजत असते. " माणसाचे ओठ फसवे असतात, डोळे नाही! " म्हणून त्या म्हणतात,

" शब्दाहूनी खरी ही डोळ्यामधील भाषा
येतील काय हाती पाण्यावरील रेषा?
या वाहत्या जलाला देऊ नको किनारे! "

शब्दातला सूर समजून अर्थच लागत नाही. तो ओळखावा लागतो, समजून येतो. शांताबाईंना जीवनातील इतर दुःखे फारशी जाणवत नाहींत. त्याना प्रेमभंगाचे दुःख सर्वात मोठे आहे. जीवनात चालणेच त्यांना प्रिय आहे. शिणलो तरी चालत राहिलेच पाहिजे असे त्याना वाटते. तो त्यांचा एकुलता एक मार्ग आहे.

जे सुख दिसेल त्याचा शोध घ्यायला त्या गेल्या पण ते एवढ्यात लुप्त झाले. झुरणे मात्र नशीबी आले. बघता बघता खेळ मात्र संपत आला. अंतरंगातला जाळ जरी आपण विझवू म्हटलं तरी विझत नाही.

" जगतो अजूनी जगणे म्हणुनी
जपतो जखमा हृदयी हसुनी
छळते अजुनी स्वप्न तेथला
हा माझा मार्ग एकला "

आपण कां जगतो या विषयीची त्यांची भूमिका आहे. जीवनाची कहाणी संपली आहे. असे त्या सांगत राहतात. धुंद चांदण्या रात्रीची प्रीती संपली आहे. मीलनाची आस होती, ती आसच राहिली. एखादे मूक पांखरु आजही घरी येते. त्या पांखराचे मूक बोलणे आपोआप उमगून जाते. पण एवढ्यात उडूनही जाते, त्यामुळे-

" अर्थहीन जीवन झाले
प्रेमबंध तूटता सारे
दिशांतून घेरित आले
क्रुर वादळाचे हे वारे
विना किनाऱ्याची राहे रात ही दिवाणी
संपली कहाणी माझी संपली कहाणी "

पण खरच कहाणी संपली आहे काय? नाही! ' नको! नको ते मनी येते, आता मी रडते रातीची! ' अश्रू गाळणे त्यांना प्रिय आहे. जीवनाशी त्या कदाचित टक्कर देताना दिसत आहेत.

शांताबाईंची एकूण भावगीते पाहता ' प्रीतीची अस्फूट गाणी ' गाणारी आहेत. प्रियकरावर जडणारी प्रीती त्याला न सांगताच कळावी, मनातले उमलणारे गूज त्याला न सांगताच उमलावे असे त्यांना वाटत राहते. नजरेस नजर भेटते. त्याचवेळी मनोबिंब हंसत राहते. काळजात धडधडत राहते. वीज नसातून लहरत उठते. ओठावर ते सारे सारे थरथरत राहते. तो पैल तीरावर असतो तर वाट पाहणारी इथे असते. पावरीचा सूर मात्र उरात असतो. मग प्रश्न पडतो तो एका प्रणयिणीचा. ' अंतःकरणात ते सूर तुझ्यापर्यंत कसे पोहचवू? ' वाहणारी अफाट नदी मध्ये असते ना? ती नदी म्हणजे समाजाची आहे. समाजास प्रेम मंजूरच नसते.

" ताण सोसवे मुळी न हा व्याकुळ झाला जीव आता
फुलल्यावाचून सुकायची, अशीच का ही प्रेमकथा ?
साद घातली मी तुजला, होशील तू प्रतिसाद कधी? "

ज्याला साद घातली त्याने अजूनही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे उमलण्या

अगोदर फुल सुकून गेले.

शेवटी चिरंतन टिकणार ते विरहाचें, प्रीतीचे सूर. हे जीवन नाशवंत आहे. अखेरच्या वेळी त्या अजूनही त्याची विनवणी करून राहतात.

" वेळ थोडा राहिलेला, सूर सारे संपले
या असिमाला तरिही पाहिजे ना मापले? "

सूरांची किमयागारी जपणारी कवयित्री अशी उदास का? जीवनाचा अंत जवळ आल्याची ही जाणीव का? आपण असणार नाही. पण आपली प्रीती जरूर असणार! शेवटी त्या गात राहतात त्या एकल्याच! माझेच ' गीत मी म्हणते ' असे त्यास सुनावून ठेवतात, मांडव रचतात. त्यात स्वतः एकट्याच उभ्या राहतात. गीत गात राहणें त्याना प्रिय वाटतें–

" बहरल्या स्वरांच्या वेली
दरवळे गंध भवताली
मी उभी मांडवाखाली
स्वर पुष्पांच्या मधुर मालीका विणते
माझेच गीत मी म्हणते ! "

शांताबाईंच्या एकूण भावकविता पाहता त्यांच्या एकटीच्या पदरी आलेली प्रीतीची दारुण निराशा हाच त्यांचा विषय इथे काव्यबद्ध झाला आहे. ते उदास हळवे सूर झेलत राहतात.ते झेलत राहणे त्यांना प्रिय वाटते. ते सूर म्हणजेच जीवन ही त्यांची समजूत आहे. पण गेयतेमुळे चटका लावणारी त्यांची भावगीते आहेत.

❖

शांताबाईंची कोळी गीते

मराठी वाङ्मयात ' कोळी गीते ' या वाङ्मय प्रकारास पुर्नजिवित करण्याचे श्रेय या तपात शांताबाईंना द्यावे लागते. हा वाङ्मय प्रकार दुर्लक्षित केला गेला होता व आज तो तसाच राहिला आहे. या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास किंवा लेखन तसे किरकोळ स्वरूपाचेच मराठीत आहे. जानपद गीत रचनेत या स्वरूपाचे गीत थोडे फार अभ्यासले गेले आहे. ' गेयता ' हा कोळी गीतांचा आत्मा आहे. ताल हे त्याचे प्रमुख बंधन असते. सूर व ताल यांची अचूक निवड शांताबाईंनी आपल्या कोळी गीतात केली पण–

ही कोळी गीतेही दुसऱ्याच्या इच्छेवरून लिहीली गेली. म्हणजे आत्मानुभव हा कमीच. त्यामुळे काही भावना उसन्या घेतल्या गेल्याचे आपणास स्पष्ट दिसून

येते. असे का व्हावे ? कोळी गीतातील भावना प्रामाणिक आहेत का ? त्यात रंगविलेल्या नायकाच्या वा नायिकेच्या मनोच्छटा वास्तव स्वरूपात आहेत का ? की केवळ गेयता हे पालूपद नजरेसमोर ठेवून सुरातच शब्द बांधले गेले. याचे दर्शन इथे घडते आहे.

❖

कोळी गीतांचा परिसर

कोळी गीतांचा परिसर हा शब्दप्रयोग चुकीचा असला तरी सार्थ वाटतो. कारण, ही गीते घाटमाथ्यावर होणार नाहीत, तर त्यास सागराचे खवळलेले जीवनच हवे ! घाटमाथ्यावर कोळचांची वस्ती आहे, पण घाटावरील कोळी व कोकणचा कोळी यांच्या जीवनात कमालीचे अंतर आहे.

' झुंज देणे ' झुंजत राहणे' हेच कोकणच्या कोळचाचे जीवन. आमच्या घाटावर पूर आला तर मासेमारी. अन्यथा डबक्यात म्हणजे या पावसाळचातील छत्र्या तसेच त्यांचा हा व्यवसाय तुलनेने आपणास कोकणच्या कोळी गीतांत दिसून येतो.

कारवारच्या प्रचंड किनाऱ्यापासून ते बोर्डीच्या किनाऱ्यापर्यंत मराठी भाषेवर प्रेम करणारी ही कोळी जमात आहे. कोकणी, गुजराथी या भाषांचा परिणाम या गीतांवर झालेला आहे. कोकणी भाषेतच ही अधिक उपलब्ध होत आहेत.

संध्याकाळी, भाकरीची गाठोडी बांधून प्रचंड जाळी घेऊन होडचात बसून सागरात. चंद्राच्या उगवण्यापूर्वी खूप आतमध्ये सागरात या होडचा गेलेल्या असतात. सागराचे अखंड थैमान सुरू असते. त्याशी झुंज देत मासेमारी करणे हेच काम ! प्रचंड जाळी काठापर्यंत ओढत आणणे, ओढता ओढता गीत गात राहणे. मग, यात स्त्रीया फक्त ' काठावरच ' असतात आणि अशावेळी सर्व कोळी गीत म्हणतात त्यालाच ' कोळीगीत ' म्हणतात.

चंद्र माथ्यावर येतो, सागरास उधाण येते तसेच काव्यासही येते. कधी कधी एखादी कोळीण शहरी बाजारात जाते. संध्याकाळपूर्वी तिला घरी परतायचे असते. मुलगा मुंबईस असतो त्याची बायको शिकलेली, त्यामुळे ती याकडे दुर्लक्षच करणार ! पण या कोळीणीना त्या गोष्टीची जाणीव आहे म्हाताऱ्याकडे लक्ष देत देत ही डोकरी म्हणते–

" वल्लव रे तारच्या होडी बेगीन
पोचव बाबा माका पैलाडी

तिनसांज् झाल्यान् घरी जावक माका
रागार भरतील माझे घरकारी. . . .
झिल असतो मुंबईवाले
बाईल गावल्यात शिकलेली. . . . ''

सागर हे कोळ्यांचे घर. दर्याचा तो राजाच. या राजाची, कांठावर न्याहारी घेऊन तिष्ठावलेली त्याची राणी. धाकला दिर याचेच हे जग; ' मर्यादा ही अपरिहार्यपणे या ठिकाणी आली ' पण या चिमुकल्या जगात, रणसंग्राम आहे, अखंड मृत्यूशी खळ खेळत राहणे, त्यातून जीवन जसे दिवस क्षण येतील तसे जगत राहणे त्याना क्रमप्राप्त असते.

सागरात अचानक वादळ सुटतं. स्वतःचा तोल सावरणं नव्हे जगणं मुश्कील होतं. मृत्यूशी झुंज सुरू असते. सीमेवरचा सैनिक आणि सागराशी झगडणारा कोळी यात फरक तो काय ? इथे झुंज आहे ती मृत्यूशी. मृत्यू जणू उभाच असतो. व्हडग्याबरोबर तो सागरात येतो. कधी जवळिक करतो, कधी साद देतो, पण या जीवनात Thrill आहे. हे Thrill टिपले पाहिजे.

' शांताबाईंच्या कोळी गीताची नायिका विरहोणी आहे. वादळवारं सुटलेल असते. दर्याला तुफान भरती आलेली असते. तो होडी पाण्यात सोडतो, मुलूखगिरीवर जातो. भिरभिर वारा, पावसाचा मारा हे तर नित्याचेच, त्यांचे नशिबी बांधलेले. ढगात बिजलीने गडगडाट करावा. या बापडीच्या उरात धडधड निर्माण होते. ती तर–

'' एकली मी आज घरी बाय
संगतीला माझ्या कुणी नाय
सळसळ माडात
खोपीच्या कुडात
जागणाऱ्या डोळ्यात सपान मिटलं
वादळं वारं सुटलं गो. . . .

ती तर एकटी. जागणाऱ्या डोळ्यात सपान घेऊन जगणारी. 'ती' तिच्या डोळ्यात स्वप्न आहे. ते ' नाखव्याचे. '

'' नाखना माझा
दर्याचा राजा
लाखाच धन त्यान जाल्यात लुटलं
वादळवारं सुटलं गो. . . ''

मुलूखगीरी करून आम्ही धन आणलं तीच शौर्याची धनखाणी इथे आहे, असेच म्हटले पाहिजे.

❖

मी डोलकर – मी डोलकर

वरील गीत हे शांताबाईंचे द्वंद गीत आहे. सागराच्या पाठीवर प्रीती जशी जन्माला येते तशीच गीतेही. या डोलकराला स्वाभीमान आहे. त्याचे घर दर्यावर आहे व बंदरास तो ये–जा करतो. तर 'ती' आईबापाची लाडाची लेक आहे. थोडी पिवळी अजिरी साडी ती नेसली आहे. त्यामुळे कुंतलात चाफ्याचा वळेसर आहे. ह्या चाफ्याचा वास साऱ्या आसमंतात वारा पसरवित आहे. तिच्या नाकात नथ, गळा भरून सोन्याचे मणी, कोळीवाड्याची ती 'राणी' आहे.

या दर्याचा दरारा मोठा आहे. पाण्यावर डोंगराएवढ्या लाटा उठतात. पण त्या कां ? तिच्याच शब्दात–

" वाट बगून झुरते पिरती
मंग दर्याला येतंय भरती
जाते पाण्याने भिजून धरती
येतंय भेटाया तसाच भरतार माजा "

भरतीचं हे सोपे तत्त्वज्ञान या कोळणीच्या शब्दांत आहे. माशाचं धन लुटणं हेच त्याच काम. तोच त्याचा स्वाभीमान–

" रात पुनवेचं चांदण प्याली
कशी चांदीची मासळी झाली
माज्या जाल्यात होऊन आली
नेतो बाजारा भरून म्हावंरा ताजा
मी डोलकर – डोलकर दर्याचा राजा "

या गीतात नाट्य आहे. पूर्वी रंगमंचावर हे गीत शाळा–कॉलेजातून सादर केलं गेलं. तसाच या गीताचा थाट आहे.

डोलकर तर सागरावर गेलेला. ही बापडी काठावर एकटी. डोळ्यांच्या सागराला भरती येऊन राहिलेली. धाकटा दिर जवळ, त्यात पौर्णिमा, म्हणजे सागरास मोठी भरती. दर्या जणू तूफान वारा प्याला आहे. ती गाते आहे –

" कोळी वारा – रं राहिला दूर
डोळी लोटीला पाण्याचा पूर

संबाल संसार सारा
राज्या सारंगा माज्या सारंगा
डोलकरा रं धाकल्या दीरा रं
चल जावंया घरा – – – ''

या गीतात जशी आर्तता आहे. तशीच भावनेची प्रामाणिक जाण आहे.

शांताबाईं कोळीगीतात जीवनाचे तत्वज्ञान काहीवेळा स्पष्ट करतात. दूर कुठेतरी वादळ गाजत असते. उशीर तर झालेला. तो ऐकत नाही म्हणून ती विनवित राहते–

'' झाला उशीर फार, ऐक ना रे
लौकरी मला जाऊ देरे सजणा !
भरला उर, नदीला पूर, दूरात राहिला गांव
कुणी ना संगे, आपण दोघे, धारेला लागली नाव
कुठे दूर दूर दूर – – – – ''

धारेला लागणारी ही नाव प्रीतीची आहे. या प्रीतीत गोडी आहे. एकांतात गोडी आहे. प्रीती ही दोन जीवाची खाणी असते. ती दोघानी चोरुन भोगायची असते.

'' कातरवेळी सजसबाली संगती आलीस आज
दुजे न कोणी, लाडके राणी, कशाला भलती लाज ?

बरोबर येताना, तू हे अपरिहार्य आहे हे ओळखायला हवं होतस ! तिला काय माहित ? सागरात ' असं भलतं वादळ सुटतं ते! तिचाही सूर अडतो, नूर पालटतो

'' मुकाट वारा, मुकाच तारा, मुकेच भोवती रान
मनीचे गुज, ऐकवी मज, जगाचे विसरभान
कुठे दूर दूर दूर – – – – ''

शांताबाईची कोळी गीते प्रीतीची छटा व्यक्त करणारी आहेत. कोळ्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब उमटल्याचे त्यात दिसत नाही. वास्तवापासून ही कोळी गीते दूरावली आहेत. गेयता–ताल या गुणांमुळे ती रसिकमान्य ठरली आहेत.

'' सागराच्या जीवनाशी कोळ्यांचे जीवन एकरुप झालेले असते. त्यामुळे सागराच्या चढउताराबरोबर त्यांच्याही जीवनात दुःखाचा चढउतार होत असतो. त्यामुळे त्यांच्या सरळ मनाचा तरल अविष्कार त्यांच्या गीतात असतो.''

कोळ्यांची गीचे मुख्यतः 'परिलीना', 'धवलचंद्रिका' या छंदोरचनेत असते. शांताबाईंची गीते या छंदापासून दूर आहेत.

❖

पहिली लावणीकार

लावणीची वाङ्मयीन परंपरा जुनी आहे. खूप दीर्घवर तिची पाळमुळं रुजली आहेत. पेशवाईपूर्वी जन्मास आलेला हा वाङ्मय प्रकार खरा तर शाहीरानी पुढे चालत ठेवला. दुर्दैवाने आज शाहीर संख्येने घटले आहेत. जे आहेत ते चावट लावण्या रचन्यात गुंतले आहे. त्याना लावणी स्फुरण्यापेक्षा त्यानी लावणी रचली आहे. लावणीच्या अनेक वैशिष्टचापैकी ' रचना, ' ' लावणी, ' ' बांधणी, ' हे तिचे बैशिष्टच जरूर आहे. शृंगारपासून दूर जाऊ नये. नर्म शृंगार हा तिचा स्थायीभावच असतो.

जवळ जवळ तीनशे वर्षाची परंपरा असणाऱ्या या वाङ्मय प्रकारात शाहीरानी भर टाकली. लावणी रचली ती पुरुषानी, स्त्रीयानी नाही. पण स्त्रीवरती ती रचली गेली, हा त्यातील विनोद. लावणी हा वाङ्मय प्रकार स्त्री लेखिका, कवयित्री यापासून दूर राहिला. खेडचात एखाद्या तमासगिराने लावणी रचली आहे पण ती अक्षरबद्ध होत नाही ! म्हणून ' लावणी रचणारी कवयित्री यादृष्टीने शांताबाईचे वेगळेपण नजरेत भरते.

लावणीत अभिप्रेत असणारे जीवन पुरुष शाहीरानी अक्षरबद्ध केलेले लावणीचे भावजीवन व शांताबाईनी रेखलेली ' लावणी ' याकडे थोडेसे तुलनात्मक दृष्टीनेच पाहिले पाहिजे.

" चांदणी रात्र असते. गावाबाहेर गर्दी असते' पेट्रोमॅक्सच्या उजेडात उलटा पदर धरून, नर्तकी नाचत राहते. सूर लागतो. ढोलकीचा ताल धरला जातो व लावणी जन्माला येते.

शांताबाईची लावणी रचना चित्रपटासाठी झालेली आहे. चित्रपटातील प्रसंग व त्याच्यासाठी शब्दांचे भांडार स्वरानी–घुंगूरात गुंतून पडलेत. लावणीची नायिका ही पूर्वी विरहणी होती. काटेवाडी पती गेल्यावर प्रतिक्षा करणारी प्रणयिनी होती. शांताबाईची लावणी याबद्दल त्या काळाचे प्रतिबिंब आहे, असे म्हटले पाहिजे. साहित्य हे काळाचे प्रतिनिधित्व करत राहते. तोच चंद्रमा मधील लावणी ही यंत्रयुगाचे दर्शन घडविणारी आहे, ती चालू व्यवहारापासून दूर झालेली नाही.

' हिऱ्याची मोरणी ' या लावणीतील नायिका तक्रार करताना दिसून येत आहे. तिचा प्रियकर जवळ बसतो. तो स्पर्शसुखासाठी आसुसलेला आहे पण तिला काय हवं नको ते मात्र विचारत नाही. नुसता गालातच हसत राहतो. नायिकेस हे मंजूर नाही. हो व्यर्थ साखरपेरणी आहे. हेही तिला माहीत आहे. नव्या नवनीत पोरपणात असणारी तिची ही हौस आहे. ती त्याने पुरवावी हा साधा तिचा हट्ट आहे. त्या मोरणीने तिचा जीव झुरणी लावलाय–

" एक सोन्याचे कोंदण घडवा
मधि लाखाची हिरकणी जडवा
राघुनाकाचा दिमाख वाढवा
किती करू तुमची मनधरणी ?
मला आणा एक हिऱ्याची मोरणी "

स्त्री मनाचे इथे दर्शन आहे. स्त्री कोणतीही असो, मग ती कोळीण असो वा लावणीची नायिका, नटणे हा तिचा स्वभावधर्मच आहे.

" हिरव्या रंगाचा छंद " ही शांताबाईंची एक वेधक लावणी. या लावणीची नायिका गृहिणी आहे. हिरवा रंग हा पावित्र्याचा असतो. त्यामुळे ती या रंगावर लुब्धावली आहे. या रंगसंगतीमुळे या नायिकेचे शालीनत्त्व स्पष्ट होते आहे–

" हिरवा रंगाचा छंद राया पुरवा
मला हिरव्या पालखीत मिरवा
हिरवं लुगुडं, हिरवी चोळी,
हिरवी गोण गोऱ्या गाली,
हिरवी तीठ कुंकवाखाली,
घाला केसात हिरवा मखा ! "

अजून त्याचे लग्न व्हायचे आहे. हिरवी पालवी मिरवीत त्याने यावे. हिरवी लेणी घेऊन ही तिची मागणी आहे. हातात हिरवा चुडा भरावा, अंगठीत पांचूचा खडा, हिरवा शेला, हिरवा साज, हिरवी सावली, हिरवी बाग, हिरवी बिछायत, केळीचे हिरवे पान, सारखेच कसे हिरवे जग ! हिरव्या रंगाची किमया स्पष्ट करून एका गृहिणीचे शब्दचित्र इथे उभे ठेवायचे आहे.

" अहो, मी तुमची हिरवी राणी !
हिरवी चाहुल माझ्या मनी
हिरवं गुपीत सांगेन कानी
उरि झरतो श्रावण हिरवा
मला हिरव्या पालखीत मिरवा ! "

हिरवा रंग हा इथे प्रतिकरुपाने उभा राहतो. मनातील हिरवेपणास गहिरेपण मात्र चढत राहते.

शरदाच्या चांदण्यारात्री सजनांने काय करावे ? नायिका मागणी करते–

" शारद सुंदर चंदेरी राती स्वप्नांचा झुलतो झुला
थंड या हवेत, घेऊन कवेत, सजणा झुलव मला
सजना रे, मोहना रे, ऐक ना रे– "

' लाटानुप्रासाची ' वृत्ती या रचनेत जाणवून जाते. ' थंड हवेत – घेऊन कवेत ! ' ही रचना सफाईदार आहे. आई वडील साऱ्यांचा तिने त्याग केला आहे. चंद्र वरती आलाय. भोळी प्रीती बहरास आलीच पाहिजे. वाऱ्याची मंद बहर आहे. फुलांचा मादक गंध आहे. जीव धुंद झाला आहे. याच वेळी त्याने-

" माझ्या देही पुनवचांदणे साजे
प्राणामध्ये प्रीतीची पावरी वाजे "

शरदातल्या चांदण्या रात्री त्याने शरिरातच चांदणे फुलवावे– पण ते कवेत घेऊन !

शरीर स्पर्शासाठी आसुरलेली नायिका फक्त लावणीत नाही तर इतर रचनेतही आहे. दर्शनसुखापेक्षा स्पर्शसुख तिला महत्त्वाचे वाटते.

कधी याच नायिकेला आपण भरल्या बाजारात कशी घेऊन जाऊ ? असा प्रश्न पडतो. या बाजाराची वाट आणि घाट अवघड असतो. न कळत जाणवणारी वाट ही वाकडी असते. माथ्यावर घडा, त्याचे पाणी उचमळत राहते. दुमडीची खप कशी न्यावी हा प्रश्न पडतो.

" टपोर डोळं उभार नाक
माझ्या रुपाचा मलाच धाक
न्याहाळून बघतात नजरा लाख "
वळख नाही पाळख नाही, हसुनी कुणाला पाहू कशी ?
भरल्या बाजारी जाऊ कशी ? "

रसिक मनाला जेवढ्या गुदगुदल्या होतील तेवढ्या कराव्या ही लावणीकाराची भूमिका असते. शांताबाई या भूमिकेस घट्ट धरून आहेत. घसरणीवर पाय फसता, कुणाचेच काही चालत नाही. लोक हंसतील पण ती काय करणार ? बोटातले जोडवे आडवे येते, त्यामुळे ती पाय टाकणार कशी ? ती तर गरत आहे– भरल्या बाजारात तिची अवस्थाच मोठी विचित्र झाली आहे.

" डूईवर देता घडयाला हात
डाव्या भुजेवर तडकला कास
उघडी पडली गोरी पाठ
हजार डोळं, करत्यात चाळं, सावरुन पदर घेऊ कशी ? "

' डाव्या भुजवर विरणार वस्त्र ! ग्रामीण स्त्री व त्यासाठी वापरलेला ' भूजवर ' हा शब्द त्या स्त्रीचे शब्दचित्र नजरेसमोर उभे करतो.

ती ' गरत ' आहे त्यामुळे तिच्या नादी लागताना विचार करावा. कारण–

" माझी संगत धरता ठरे ललाटाचा लेख
घ्यावा विनाश किंवा घ्यावे स्वर्गीय ते सुख "
" पाय टाकण्याआधी येथे विचार पुरता करा
माझ्या नखऱ्याच्या शंभर तऱ्हा "

विचार करुन निर्णय घ्यावा असा खडा सवाल करते.

शांताबाईंची नायिका जशी गरत आहे. साध्वी आहे, तसा तिचा पाय ही घसरला आहे. तिच्या या शील भंगाची गोष्ट कुणाला सांगावी? हा प्रश्न तिच्यापुढे आहे. आजपर्यंत ती त्याला नकारच देत होती. आज मात्र भलताच प्रकार झाल्याचे दिसते. म्हाऊन ती दारात उभी आहे. एवढ्यात तो दारात येतो. मनात काही तरी चमकून जातं. जवानीला जागं येते. त्याच्या नजरेतला नाग जाणवतो. तिची जवानी म्हणजे केतकीची बाग आहे. निरवा करुन ती त्यात न्याहाळते. डोळे भरुन पाहते. लाजून मनात हंसते, गालात. थोरामोठ्याची लेक आहेच! पण–

" किती रुपावर होते टपून–टपून
हेरित होते मला लपूनछपून-लपूनछपून
माझी मला तरी होते जपून-मी होवे जपून
आज झाला निरुपाय, माझा घसरला पाय "

आता यावर उपाय तीच शोधत राहते. जाता जाता पुरुष कसा तेही स्पष्ट करते.

" त्याची पारध्याची जात,
दिला हातामधी हात, झाला अवचित घात,
भोळ्या हरिणीची झाली शिकार! "

अगोदर जडते, नंतर उमगते. ती प्रित तरुणपणाची होते जीत. हे तारुण्याचे दर्शन आहे. लावणीचा नायक बिलंदर आहे. डोळ्यात वाकून बघणे त्याला आवडत असते. पण ही मासोळी गळाला लागावयाची नाही. असे ती सुनवत राहते. त्याने कसेही वागावे ती फसणार नाही, असा तिला विश्वास आहे. नजरेचा गळ टाकून, तळ जरुर त्याने ढवळून काढावा, शेवटी तो पुरुषच! कुठेवर बसणार?

" सुळकन मारीन माकान बुडी
देखता डोळा मी देईन दडी
कुठवर बसशिल
अखेर फसशिल
सोनेरी वाळूत पोळतील पाय
गळाला मासोळी लागायची नाय "

मासळी हे शांताबाईचे आवडते प्रतिक आहे.

पेशवे काळात खऱ्या लावणीस बहर आला. त्यावेळी ही नायीका जांभळ्या महालात कुणाची तरी प्रतिक्षा करणारी होतीच. जांभळी पैठणी नेसून, जळत्या रात्री ती वाट पहात थांबते. डोळे जागरणाने थकलेले असावेत. त्यात त्यानीच काजळ लावावे ही तीची ईच्छा आहे. मनातील कितीतरी गूज, त्याच्याशी बोलायचे म्हणून ती थांबली आहे. संगतीत उमलायचे ठरवून बसते, 'कळचा आजच्या, शिळचा उद्याला, ओठाशी न्याल का?' हा तिचा परत प्रश्न आहे.

" या सरत्या राती मी तळमळते अशी
लोळते पलंगी पुन्हा बदलते कुशी
मज सले बिछाना नको नको ही अुशी
हवा वाटतो हात उशाला, सजना तुमी द्याल कां ?
आल्यावर जवळ घ्याल का ?"

'लावणी श्रावणाची' ही बाईंची लावणीरचना अस्सल आहे. एक शब्दचित्र त्यात भरुन आहे. श्रावण महिना हा स्त्रियांचा उपासतापासाचा. न्हावून धुवून त्या केस बांधतात, टिळा लावतात. पाचपदरी मोहनमाळ गळचात असते. शिवमंदिरात शुचिर्भूत होवून जाऊ लागते. तेवढचात पती येतो. न्हालेले रुप पाहून तो अंगचटीस कसा येणार नाही ?

श्रावणातला हा पहिला सोमवार असतो. जलाचा एक थेंबही तिने मुखात घेतलेला नसतो. ती कासावीस होते. उपासाची सुरवात असते म्हणून की त्याची तडफड पाहून हा मनोज्ञ विचार इथे आहे. बाहेर श्रावणाची सर कोसळत राहते. अंतरंगात प्रीतीची हिरवळ, प्राजक्ताची फुले फुलून आलेली असतात. मनात-तनात श्रावणपसरी इंद्रधनु- दोघांना बहर आहेच पण श्रावण सुरू आहे. श्रावणाची लावणी उपासासारखी असावी का? ती करायची होती जरुर तशी झाली नाही मुळी! तिला उपास धरून पश्चाताप होतो. त्याची तडपड पाहवत नाही.

" या श्रावणातले उपास बाई किती
किती व्रते, किता सण, नाहि तयाना भीती,
फेडीन पारणे आज तुमासंगती
ओठ रंगवा माजे नंतर निज मुखी घाळुनी
तोवरी थांबा ना घरधनी । "

त्याने ओठ रंगवावे ते त्याच्या मुखातील विड्याने. विडा खाता खाता ओठाचे अवघ्राण करावे. त्या चुंबनात स्वतःला विसरावे व "श्रावणाची लावणी रंगत रहावी.

' साजणी सई ग' या रचनेत स्त्रीच्या विरहाचे दर्शन आहे. प्रियकर घरात

नाही. त्यामुळे ही जाई सुकली आहे. स्त्री आणि जाई या दोघींचा देह हाच मुळी सुकुमार, सुकणारा– त्याला जाऊन किती तरी दिवस झाले. ही अश्रु पुसते त्याच्या शेल्याला–

' सोन्याच्या ताटामध्ये पक्काने पांच ग
सख्याच्या आठवणीने जाईना घास ग! "
चंदनी झोपाळा झुलणारा आहे, सोनेरी पिंजऱ्यात
पोपट आहे, तो बोलतो सख्याची बोली

व त्यामुळे हीची पापणी परत ओली होते–

पलंगी शेज तिला सुरकुती पडेना
डोळ्यांच्या कांठाशी नीजही अडेना "

बहर सुकत चालतो व तिला स्त्री–धर्माप्रमाणे एक शंका भेडसावत आहे. तो वाट तर विसरला नसेल ना? 'तो' भेटत नाही म्हटल्यावर शंका येणारच!

तो येतोच! चांदण्या राती. दूर उभा राहतो. ती डोळा भरुन त्यास पहाते मनोत रुप ठसवून घेते व मीलनाने तृप्त होते.

" रातराणी फुले अंगणी
असा एकांत, रात चांदणी
नाही दोघात तिसरे कुणी
योग आला कसा राजसा
आज आला तुम्ही राजसा! "

शांताबाईंची लावणी रचना ही अशी आहे. ती सिनेमासाठी असेल पण तिच्यात अस्सल शृंगार आहे. मराठीत स्त्रीयांनी लावण्या रचल्या नाहीत. पहिल्या लावणी रचियेतेचे स्वागतच व्हायला पाहिजे. अशी त्यांची लावणी आहे.

शांताबाईंची लावणी मराठी शाहीरांची परंपरा पुढे चालू ठेवणारी आहे.

❖

स्वरात गुंतलेली कवयित्री

शांताबाईंनी भावगीते लिहिली, कोळीगीते या वाङ्मय प्रकारास परत पुर्नजिवन दिले तर काही नाट्यगीते ही लिहीली. ' जितेंद्र अभिषेकीनी सूर दिले व मी शब्द रचले अशी त्या कबुली देतात. ' नाट्यगीतांचे विषय हे नाटकानुरुप आहेत. मराठीतील भा. रा. तांबे यांची पदे मराठी वाचकांच्या पसंतीस अधिक

उतरली आहेत. तांब्यांची नाटचगीते रागावर अवलंबून आहेत. असे श्री. वा. गो. मायदेव (समग्र कविता) मध्ये म्हणतात. त्यामुळे रसिक त्यांची पदे गुणगुणत राहातो. शांताबाईंच्या काव्यात 'अनुप्रास प्रचुरता' फारशी नाही. 'प्रेम' हाच त्यांच्या नाटचपदांचाही विषय आहे.

सध्या नवीन संप्रदायातील बहुतेक कवीचे काव्य हे आत्मनिष्ठ, आत्मलक्षी असता तांबे यांची कविता अनेक वेळा इतरांच्या अंतःकरणात प्रवेश करून त्यांच्या भावना प्रकट करिती झाली. (तांबे यांची समग्र कविता. पृ. १७ प्रस्ता. रा. श्री. जोग) याच प्रकारे आजच्या कवीत शांताबाईंचे नाटचगीतात वेगळेपण जाणवते. या नाटचगीतांना इंग्रजीत 'ड्रॅमॅटिक लिरिक्स' अशी संज्ञा आहे. या संज्ञेखाली रचना करणारे तांबे जसे होते, तसेच या पिढीतील शांताबाई आहेत.

शांताबाईंच्या नाटचगीतावर भा. रा. तांबेच्या रचनेचा परिणाम झाला आहे. असे दिसून येते.

भुलविती वचने तुझी खोटी खोटी हसणे रे !
मोठी खुली प्रीत माझी पुन्हा पुन्हा फसणे रे !
नादी लागूनी तुझ्या चेटक्या जारीण मी ठरले
इहपरलोकी आंचवले रे तोंडघशी पडले !

वरील पंक्तीतील शब्दरचनाच नव्हे तर विषयही एकरूप असतात. नवीन सूर, नवीन क्षितिजांचा त्याना घ्यास लागला आहे. त्यामुळे–

" कधी न झुरेन, स्वैर मी फिरेन
तुला न स्मरेन ऐक सजणा ! "

पुरुषास विसरु पाहणारी स्त्री इथे आहे. पण तिला विसरणे जमणार आहे का ?

प्रियकरास विसरणे जमलेच नाही. " दशदिशास पुसतो " या त्याच्या नाटचगीतात त्याची मानसिक अवस्था, उध्वस्थ जीवन स्पष्टपणे मांडले आहे. तो तिचा शोध घेत जात आहे. ती मृगलोचना क्षणभर दिसते, फिरून फिरून दिसत नाही. दैव क्रूर खेळच खेळत आहे. ते स्वप्न संपले. तो मात्र स्तिमित होऊन तिथे उभा आहे.

" मज क्षणाक्षणाला रुप तिचे भासते
घडतात जीवाला दाहक आभासते
तिमिरांध सूर्य मी शोधित फिरतो नभा "

'स्व' चा शोध घेण्याचा प्रयत्न इथूनच आपणास दिसून येतो. अंधारातील सूर्याचा शोध घेत नाही तर 'स्व' चा असेच दिसून येते.

ती, घरी येता जीवन सुफलीत झाल्यासारखे वाटते. ती संजीवनी असते.

आशापूर्ती करणारी संपदा असते, स्नेहमयी असते. ' छेडियल्या तारा ' हे त्यांचे नाटचगीत त्यांच्याच मनःस्थितीचे दर्शन घडविणारे आहे. मनाची विचलीत अवस्था स्पष्ट करणारी आहे.

" छेडियाल्या तारा
हे गीत येईना जुळून
फुलते ना फुल तोच
जाय पाकळी गळून ! "

फुलण्या अगोदर गळून जाणे हे पाकळीच्या वाटचास येते. केशवसुतांच्या हरपले श्रेयची गूढगुंजनवाली प्रवृत्ती इथे आहे. त्या अतिताला शोधायचा प्रयत्न आहे; हरवल्याची जाणीव आहे. ' का धरिला परदेश ! " ही ठुमरी आर्ततेने रमणारी आहे. पती परदेशी गेला आहे. श्रावणाची पानझड सुरू आहे. त्याची आठवण होणारच ! तोच श्रावण वैऱ्यासारखा वाटतो आहे.

" श्रावण वैरी बरसे झिरमीर
चैन पडेना जीवा क्षणभर
जाऊ कोठे, राहू कैसी, घेऊ जोगीण वेश ?
सजना का धरिला परदेश ? "

तिचा प्रश्न रास्त आहे. व्याकुळमन कसे भरून आले आहे, 'जोगीणवेष' ही शांताबाईची आवडती उपमा आहे. गालाओठावर रंग उरला नाही. अश्रू झरल्याने काजळ वाहून गेले आहे. "शृंगाराचा साज उतरला, मुक्त विखुरले केश, ही तिची अवस्था. शांताबाईची कविता नेहमी शब्दचित्र रेखाटत जाते. शांताबाईची ठुमरी ही अशीच विरहाचे दर्शन घडविणारी आहे. प्रणयाच्या घटकात विरह हा घटक महत्वाचा मानला जातो.

" ही चांदरात, नीज नच त्यात,
विरह मखी, मी कुंठवर साहू ?
नाही मज चैन, क्षणक्षण झरती नयन
सांगू कोणा ?
विकल मन आज, झुरत असहाय!

चांदण्या रात्री त्याच्या आठवणीने झोपच येत नाही. झरणारे नयन, हे दुःख सांगायचे तरी कोणास ? विकल मन, झुरणारा देह सारेच असहाय–

पतीबरोबर जीवनाचा वेध घेणारी नाटचगीतेही बाईंनी लिहिली आहेत. ' दैव किती अविचारी ' हे त्यांचे उदाहरण म्हणून पहाता येईल. या समाजात विद्वानास किंमत नसते. मूर्ख माणूस राजवैभव भोगत राहतो. याची चिड आहे.

" मुर्ख भोगतो राज वैभवा
पडित फिरत भिकारी
सूरदास विनवतो प्रभूला
क्षणक्षण हो जडभारी
दैव किती अविचारी "

शांताबाईंच्या एकूण नाटचगीतांचा विचार करता, त्यांची नाटचगीते ही कुणाच्या तरी इच्छेने लिहीली गेली. स्वरासाठी रचना असाही प्रकार इथे झाला आहे. भा. रा. तांबेचे काही सूर त्यांच्या नाटचगीतात आहेत. इथे नायिका जशी विरहीणी आहे. तसाच नायकही ! जसा जीवनाचा शोध तसाच श्यामच्या मुरलीवर लुब्धावलेले मन इथे आहे. तसेच उध्वस्त जीवन आहे. प्रणयाची जाणीव आहे. तर विफलतेने भंगलेले सूर आहेत. दोन चरणी हे त्यांच्या नाटचगीताचे स्वरुप आहे.

❖

भक्ती गीते– गणराज रंगी नाचतो

शांताबाईची भक्ती गीते ध्वनी मुद्रणासाठी निर्मिली गेली. भक्तीचा भाग स्वत: कवयित्रीचा किती हा प्रश्न इथे नाही. त्यात साकारलेली भावना रसिकप्रत कुठंवर पोहोचते हे महत्वाचे ! या भक्तीगीतांचा विचार करता ती पूर्णत: यशस्वी झालेली आहेत असेच आपणास म्हटले पाहिजे. रचनादृष्टचा या गीतांचा विचार प्रथमत: केला पाहिजे.

तोच चंद्रमा या ग्रंथाची सुरवात त्यानी भक्तीगीताने केली आहे. व ' माझेच मी गीत म्हणते ' या गीतात शेवट केला आहे. श्री गणेशाच्या पावलांवर स्वत:ला विसरून नंतर त्या स्वत:चा शोध घेत राहिल्या आहेत. गणेशाची मूर्ती त्यानी काव्यबद्ध केली आहे. मोठचा भक्तीभावाने–

"जीव जडला तुझीया चरणी
आधी वंदु तुज मोरया"

वंदीत आहेत. अवघ्यांची विघ्ने विलयास नेणारा तो करुणागार आहे.

' गणराज रंगी नाचतो ' या भक्ती गीताची रचना शब्दासाठी शब्द या पद्धतीने झाली आहे. यातील कल्पना फारशी मनात ठसणारी आहे असे नाही. देवांच्या सभेत गणेश नर्तन करतो, सभागण कौतुकाने ते पहात रहातो. हाच त्यातील विषय आहे. नारद तंबोऱ्याने साथ देतो, शारदा विणावादन करते. देवगण–

" देवसभा घनदाट बैसली
नृत्यगायने मने हर्षली
गौरीसंगे स्वये सदाशिव
शिशु कौतुक पाहतो "

शिव पार्वती कौतुकाने मध्यमवर्गीय गृहस्थी प्रमाणे हे कौतुक पाहत आहेत.

गणपती वर्णन जसे आहे तसे श्रीकृष्ण वर्णन ही त्यांना प्रिय आहे. मराठी मनाला वेड लावणारे ते सावळे रुप शांताबाई मधुराभक्तीत पाहतात.

" कर घालुनी माझ्या गळा
गुजगोष्टी करी सावळा
हलकेच तये अधरात अधर जुळविले "

शांताबाईची ही कल्पना Boy Friend या कल्पनेशी जवळची आहे. ' विठोबा My boy Friend ' अशा आशयाचा लेख इरावती कर्वे यांनी (म. टाईम्स १९६८) लिहून विठोबाशी सन्निध्य स्पष्ट केले आहे. तीच भावना इथे आहे.

" मी दचकून उठले गडे
परि घडू नये ते घडे !
कपटचाने माझे हृदयच चोरिले "

श्रीकृष्णास कपटी म्हणण्याची वृत्ती– मराठी काव्यात तशीच जुनी आहे. पाण्यास गेलेल्या गौळणीचे रुपही त्यांना प्रिय आहे. श्रीकृष्णाने आपणास जाऊ द्यावे म्हणून त्याची विनवणी आहे. गोकुळ दूर आहे, यमुनातीर वाहते आहे. पावरीने याचवेळी अन्तःकरण छेडिले आहे व पाऊले तिथेच थबकली आहेत.

" पानजाली सळसळे कां ?
भिवविती रे लाख शंका
थरथरे, बावरे मन
संगती सखी नच कुणी "

व ती अशी एकटी. एकटेपणातच स्वतःला विसरण्याची किमया असते. ती इथे आहे. श्रीकृष्णाशी त्याने आईचे नाते जोडले आहे. " नका सयानो भलते बोलू " या भक्तीगीताची रचना गौळणीसारखी आहे. एकनाथाचे स्मरण या रचनेच्यावेळी पर्यायाने होतेच !

" नका सयानो भलते बोलू, माझ्या शांरगधरा !
कृष्ण केवढा, तुम्ही केवढ्या, विचार काही करा ! "

असे त्या खडसावतात, पण गौळणीची तक्रार आहे.

" म्हणता येतो अवचित सदनी
चोरून खातो दहि, दूध, लोणी
दह्यादुधाला कमती काही आहे का या धरा ? "

शांताबाईंची ही भक्ती गौळण - - - व - - -

" असा कसा खटचाळ तुझा कान्हा
ग बाई तुझा कान्हा
काही केल्या मला ऐकेना ! ग !
मध्यरात्री येतो चोरावाणी
त्याची दाढी नि माझी बांधली वेणी
ओढा ओढीत भिडल्या आमच्या माना
बाई आमच्या माना
काही केल्या मला ऐकेना ! ग ! "

एकनाथांची ही गौळण व शांताबाई हाच कथाभाग असा मांडतात–

' म्हणता भलती खोडी काढतो
झोंबुनी अंगा पदर ओढतो
स्वप्नी तरी का पाप शिवे ग इवल्याशा लेकरा
कृष्ण केवढा, तुम्ही केवढ्या, विचार काही करा "

शांताबाईंचा प्रश्न हा एका आईचा प्रश्न आहे. पोर केवढेही खटचाळ असले तरी ते आईस प्रियच असते. माझे पोर चांगले आहे. हे ती 'राणी' म्हणून सांगत नाही तर आई म्हणून–

" राणी म्हणूनी सांगत नाही
तुम्हापरी मी आहे आई
कसा आटतो हृदयामधल्या वत्सलतेचा झरा?
कृष्ण केवढा, तुम्ही केवढ्या विचार काही करा"

गौळणीना समजावण्याचे शांताबाईचे तर्कशास्त्र कोणत्याही आईचे हेच राहिल !

शांताबाईंची भक्ती गीते एकनाथी थाटाची आहेत. गौळणीत याचा सविस्तर विचार स्पष्ट केला आहे.

❖

कशी गौळण राधा बावरली !

गौळण हा वाङ्मय प्रकार एकनाथापासूनच प्रतिष्ठीत समाजात मान्यता पावलेला आहे. "गौळणी" या रचनेत उपासना दैवतावरील एकनिष्ठ प्रेम आणि सर्वांभूती भगवद्भाव अशा दोन्ही प्रकारे नाथांचा भक्तीभाव व्यक्त झाल्याचे मराठी वाङ्मयात दिसते. हमामा, हबरी, काळा, लपडाई, पिंगा, फुगडी, भोवरा, इ. गोपगोपींच्या खेळातून नाथानी अध्यात्मक बोधाची हंसत खेळत खैरात केली आहे. कृष्णाच्या बालक्रिडावरती मनोहर पदे व गोपींच्या उत्कठ भक्तिचा मधुरा–विष्कार करणाऱ्या नाथांच्या शृंगार परिपूर्ण गौळणी यांची अविट गोडी प्रत्यक्ष चाखल्याखेरीज कळणार नाही. ही सारी रचना, किर्तनोपयोगी आहे.

एकनाथानी रुढ केलेला हा वाङ्मय प्रकार त्यानंतर व स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात कुणीही फारसा हाताळला नाही. ही रचना करण्याचे, किंवा हा वाङ्मय प्रकार हाताळण्याचे श्रेय आपणास शांताबाई शेळके यांना दिले पाहिजे. शांताबाईंच्या गौळणीवर एकनाथांच्या रचनेचा परिणाम झाला आहे हे आपणास कबूल करावे लागते.

' कशी गौळण राधा बावरली ' ही शांताबाईंची चित्रपटासाठी लिहिलेली गौळण. राधेच्या मानसिक अवस्थेचे एक चित्रण इथे या गौळणीत आहे. जल आणण्यासाठी यमुनेवर गेलेल्या या राधेच्या कानावर अवचित खूणेची शिळ आली. शिळेच्या एका खुणेनेच तिची काया रोमांचित झाली. कवयित्रीच्या या गौळणीत कृष्ण सावळा व राधा गोरी आहे. कृष्णाची, त्याच्या संगतीची बाधा जडली आहे. ' कृष्णच नेत्री कृष्णच गात्री ' अशी तिची अवस्था आहे.

"लाजेची ही वसने फिटली
लोकांमधुनी राधा उठली
राधा मोहन होता मीलन
हरिकांती तनुवर पांघरली"

राधेचे व श्रीकृष्णाच्या मीलन सोहळ्याचे केलेले वर्णन म्हणजे अद्वैतवादाचा पुरस्कारच आहे.

" कृष्णरुपी भाळल्या गोपीका नारी
नित्य नवा कृष्ण जीवा आवडतो भारी
पवन वेगे चालल्या कालिंदी तीरी
चिदानंद भावे भोगावा श्रीहरी "

एकनाथांची अद्वैत भूमिका व कवयित्रीची भूमिका एक वाटते.

श्रीकृष्णाच्या पावरीने राधा तर राधेच्या दर्शनाने श्रीकृष्ण दोघेही भुललेली आहेत. वास्तवाचा त्याना विसर पडला आहे. श्रीकृष्णाची पावरी राधेच्या अणुरेणूला बदलणारी ठरली आहे. गवळ्याघरची ती कुलवंत नार आहे. तिन्ही सांजेच्या अंधुक प्रहरी पाण्यासाठी यमुनेवर आली आहे. अवचित वेणू वाजली आणि राधेचे जीवन बदलले ते कमालीचे. त्याच्या मुरलीचा वेधच जीवघेणा आहे. तो ऐकल्यावर गवळ्याच्या लेकी सुना स्वतःस विसरल्या. एवढेच नव्हे तर गाईसुद्धा. वासराला.

" आला मुरलीचा सूर माझ्या कानी
देहभान गेले मी विसरुनी
वेड्यावाणी उभी ग वृंदावनी
जमिनीला खिळले पाय जणू
या कृष्णाला काय बाई म्हणू "

या गौळणीची रचना थोडीशी खडबडीतच वाटते. परंतु कुठेतरी एकनाथांचा सूर सापडतोच. स्वतंत्रपणे शांताबाईंची गौळणीची रचना आहे, असे दिसत नाही. पावरीच्या किंवा वेणू नादाने सारे चराचर जसे भूलून गेले. श्रीकृष्ण दर्शनाने झालेली तिची अवस्था एकनाथानी मांडली आहे.

" राधेला पाहून भुलले हरी
बैल दुहितो आपले घरी
हरिला पाहून भुलली चित्ता
राधा घुसळी खडबडी डेरा रिता "

' बैल दुहितो आपल्या घरी ' या ओळीतले काव्य व ' वेड्यावानी विसरले देहभान' या ओळीतील भावना यांचा ताल कुठेतरी एक आहे.

" मी यमुनेला येता जाता
डुचमळतो कां घट हा माझा?
नटवर नागर, फोडी घागर
अडवितो जलभरणी
कशी ग हरिची न्यारी करणी? "

हरिची करणी न्यारी असेल पण त्या करणीसच समस्त गोकुळ भुलले होते. गौळणीत एकच विषय असतो श्रीकृष्ण. या श्रीकृष्णामुळे कुणाला दुःख मिळाले पण त्यांनी ते सुखच मानले, किंबहूना ते सुखच ठरले–

" सुखात असूनी झाले दुःखी
गुढ वेदना कोण ओळखी?
तनु थरथरते, लाहि नुरते
भ्रमत जशी वनहरिणी
कशी ग हरिची न्यारी करणी? "

बावरलेल्या वनहरिणीसारखी राधेची अवस्था व्यक्त करून कवयित्रीने बावरलेली संस्कृत स्त्रीची उपमा इथे अधिक वेधक पद्धतीने उभारलेली आहे. एकनाथांच्या गौळणी व शांताबाईंच्या गौळणी यांचा विषय एकच आहे. पण आधुनिक कवयित्रीत हा विषय शांताबाईं खेरीज इतर कुणीही हाताळलेला नाही.

❖

शांताबाईंची द्वंद्व गीते

शांताबाईंची द्वंद्वगीते पूर्णतः फसलेली आहेत असेच म्हणावे लागते. या द्वंद्वगीतात अभिप्रेत असणारे 'नाट्य' शांताबाईंच्या द्वंद्वगीतात नाही. ' सांग–सांग–सांग ' हे त्यांचे एक द्वंद्वगीत. ' तुझं नाव सांग यासाठी निव्वळ एक चरण कवयित्री वापरते व नाव न सांगता फक्त तुझ्या डोळ्याच्या बाणानी मी घायाळ झाले असे व्यक्त करते. रचनादृष्टचा पूर्णतः एक कविता लिहूनसुद्धा आशयाच्या दृष्टीने ही कविता पूर्णतः फसलेली आहे.

द्वंद्वगीताची रचना पाहता शांताबाई पहिल्या ओळीत सुंदर कल्पना साकारतात पण दुसऱ्या ओळीत ती पूर्णतः उध्वस्त करतात.

" डोळ्यामधून तू या शिरलास मानसात "

ही ओळ पूर्णतः गद्य आहे. तर–

" मिटुनि तुझ्यात गेलो सुमनी जसा सुगंध "

ही रचना काव्यदृष्टचा उच्च आहे.

' हा मंदमंद वारा ' हे शांताबाईंचे वेधक द्वंद्वगीत मानावे लागेल. त्याच्या स्मृतीने डोळ्यात पाणी यावे एवढी ती हळवी आहे.

" गेल्या मिळून आता छाया परस्परात
शय्येवरी विसावे प्रीती घराघरात
मी मात्र भारलेली येथे उभी दिवाणी
आले तुझ्या स्मृतीने डोळ्यात आज पाणी

नायिकेच्या विरहाचे वर्णन बोलके ठरते तिचे दिवाणेपण अंत:करण भेदीत जाते व तो त्यांचे मन–

" आहेस काय तूही माझ्यापरी उदास
असशिल का अशीच निरखित चांदण्यास ?
निशब्द हुंदका तो येतो कुठून कानी ?
आले तुझ्या स्मृतीने आज पाणी ! "

इथे मात्र स्वत: कवयित्री उभी आहे. तिच्या स्मृतीने जसा तू गहिवरलास, तशीच ती. कारण, अश्रूंची मूक कहाणी या दोघांच्याही वाटचास आली आहे. "हा मंदमंद वारा " हे गीत सोडले तर इतर दोन्हीही द्वंद्वगीते मनास समाधान देत नाहीत.

❖

पालखी हाले डोले ! एक कथाकाव्य

' पालखी हाले डोले ! ही एक स्वप्न कविता आहे. स्वप्नातल्या हळदीच्या रंगाचा तो एक भास आहे, नवरीसारखी नायिका नटून, हळदीच्या अंगाने पालखीत बसली आहे. पहाटेचा चांद उतरलाय, रात सरलीय, पालखी चालली आहे. कुणाचा तरी राजाचा वाडा सामोरी दिसतो आहे–

" उठ पोरी उठ आता– – – –
काय सारे स्वप्न होते ?
जायचे ना शेतावरी
सादवीत बाबा होते ! "

आणि स्वप्न ही सरलेले होते. इथे स्वप्न नायिकेला न उमजता ते कवयित्रीचे होते, असे वाटते. नायिकेच्या डोळ्यात कवयित्रीच्या मनाचे प्रतिबिंब पडलेले आहे. हे समजून जाते. शेवटी ते स्वप्न स्वप्नच ठरते. शेतावर कामाला जाणाऱ्या पोरीला स्वप्न कुठले ?

गरिबांना स्वप्ने नसतातच मुळी ! त्यांची स्वप्ने हे नेहमी विरण्यासाठी असतात. तरीही गरिबांनी स्वप्ने रंगवावीत. त्यातच त्यांना जीवनाचे सुख मिळत असते. स्वप्ने ही रंगवण्यासाठीच असतात. हे प्रेरक तत्त्व कवयित्री या ठिकाणी देऊन जातात.

❖

मरणही माया झेलूनी घेऊ !

ज्या ज्या वेळी आपल्या देशावर आक्रमणे झाली. त्या त्यावेळी राष्ट्रास; तरुण पिढीस प्रेरणा देण्याचे काव्य कवीनी केले आहे. फक्त राष्ट्रीय भावना जोपासण्याचेच काम या कवींनी केले आहे असे नाही तर राष्ट्र उभारणीच्या कार्यातही या कविचा वाटा आहे. राष्ट्र उभे करायचे असते ते तरुणांनी व या तरुणाना स्फूर्ती द्यायची असते ती कवींनी. कुसुमाग्रज, वसंत बापट हे चालू पीढीतील राष्ट्रीय प्रवृत्तीचे कवी.

शांताबाईंच्या काव्यात राष्ट्रीय प्रवृत्ती नाही. तरीही त्यांची काही समूह गीते विचारात घेण्यासारखी आहेत. केशवसुतांनी विश्वबंधुत्वाची जाणीव आपणास काव्यातून दिली. वसुदैव कुटुंबकम्ची जी कल्पना ज्ञानेश्वरीत आहे.

" पूजीतसे मी कवणाला
मी तर पूजी आपुल्याला
आपुल्यामध्ये विश्व पाहुनी
पूजीतसे मी विश्वला– "

केशवसुतांची ही शिकवण, मानवतेचा धर्म व–

" एक जाणतो आम्ही प्रीती
तोच वदे, ती गाथा, पोती
मंगल पावन प्रीतीसाठी
विष हो अमृत आमुच्या ओठी
या प्रीतीच्या चरणावरती
विश्व होतसे अवघे लीन !
एक दोन तीन ! "

माणूसकीचे पाईक असणारे या देशाचे तरुण, या तरुणांना मार्गदर्शन करणे हे कवयित्रीचे ब्रिद आहे.

" मरणालाही माथा झेलून घेऊ
मला तयाला धरू उराशी
उच्च असो वा अनाथ दीन
एक दोन तीन ! "

अनाथासाठी, दीनासाठी आपले जीवन असले पाहिजे. ही महतांची शिकवण इथे आहे. उच्च वा निच हा भेद न उरता साऱ्यांना उराशी धरणे हे संताचे ध्येय असते. त्या

ध्येयाचे गीत म्हणजेच हे शांताबाईंचे समूहगीत होय. समूह गीतात ओजोगुण असावा लागतो. तेथे तो भासत नाही.

' पप्पा सांगा कुणाचे ?' हे बालकांसाठी लिहिलेले समूहगीत आहे. आई किंवा बाबा असे शब्दप्रयोजन न करता मम्मी व पप्पा असे शब्दप्रयोजन कवयित्री का करते ? असा एक प्रश्न उभा राहतो. हे आमच्या बदलत्या संस्कृतीचे प्रतीक नसेल ना ?

" पंखाशी पंख हे जुळताना
चोचीत चोचही मिळताना
हासते, नाचते, घर सारे
हासती छप्पर, भिंती दारे– "

आई–वडिल यांचे जीवनच मुळी मुलांनी व्यापलेले असते. बाळांचे जग हे असेच मर्यादित विश्वाचे असते.

शांताबाईंचे समूह गीत बंधुत्वाची जाणीव करून देते तर दुसरे आई वडील यांची माया स्पष्ट करते.

पक्षीणी पिल्लांना – पंखाची उब देते, चोचीतून चारा भरवते–मुले ही त्या सारखी पिल्ले नव्हे काय ? मायेचा ओढ असामान्य असते. त्याचे प्रतीक म्हणून ही कविता अभ्यासता येईल. दुपारच्या वेळी हातात हात घालून मुले गीते गात राहतात, ताल धरतात. समूह गीते हे तालप्रधान असते. 'पप्पा सांगा कुणाचे' हे शांताबाईंचे गीत तालबद्ध आहे.

❖

शूर आम्ही सरदार

शांताबाईंच्या चित्रपट गीतांचा विचार प्रस्तुत ठिकाणी करणे योग्य नाही. असे स्वतः कवयित्रीचे म्हणणे. (मुलाखत–मुंबई) पण काव्य हा कविच्या आत्म्याचा हुंकार असतो.कवी काव्य लिहीताना, मग ते उत्स्फूर्त असो वा दुसऱ्याच्या आज्ञेने असो, त्याचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व त्यात डोकावत राहतेच ! शांताबाईंच्या चित्रपटागिताचा विचार करताना हीच भावना प्रामुख्याने स्वीकृत केलेली आहे. या गीतात वैयक्तिक शांताबाईंच्या दुःखाचा, आत्म्याचा हुंकार आहे कां ? त्या पूर्णपणे या गीत रचनेच्या वेळी अलिप्त राहिल्या आहेत कां ? एवढ्या मर्यादित प्रश्नांची तपासणी त्यांच्या काव्यात करायची आहे.

' रेशमांच्या रेघानी ' हे त्यांचे गीत स्त्रीमन स्पष्ट करणारे असले तरी त्याचा घाट लावणीचा आहे. रेशमांच्या रेघानी, लाल काळचा धाग्यानी ती

कर्नाटकी काशिदा काढते आहे. या तिच्या साडीला कुणी हात लावू नये असे अधिकारवाणीने सांगते आहे, विनवत नाही. पण पुरुषी अहंकार कसा थांबेल ? तो स्पर्श करणारच !

" भीड ठेवा काही आल्यागेल्याची
मुरवत राखा दहा डोळ्याची
काय म्हणू बाई बाई तुमच्या या खोडीला
हात नगा लावू माझ्या साडीला "

पुरुषापेक्षा स्त्री अधिक जागरुक असते. तो घुसमुसळा असतो. पण तिला बाह्यस्थितीची जाणीव असते कवयित्री ती इथे घडवते.

मनातील गुपीत कुणाला सांगता येत नाही. काहीतरी हरवल्याची जाणीव मात्र मनाला होते. प्रितीची फुले फुलून येतात. त्याची मनाला भूल पडते. त्या रंगाचा, गंधाचा अंगावर ती साज चढविते. कुलवंताची ती पोर आहे ती लाजरी होते पण यौवनाने तिला धीट केले. त्या धीटपणामुळे ती त्यास पाहत राहिली, रीतीरिवाज विसरून–

" सहज बोलले हसले मी
मलाच हरवून बसले मी
एक अनावर जडली बाधा
नाही चालला काही इलाज
काही तरी होऊन गेलय आज "

शांताबाईंच्या अनुभव विश्वातील ही एक तरलता अनुभव आपणास मानावा लागेल. स्वानुभवाचे विश्व पूर्णतः इथे आकारले आहेत असेच आपणाला इथे दिसते.

शेतकरी मनांचे संस्कार लहानपणी त्यांच्या मनावर झाले आहेत. त्यामुळ बैल पोळा, हे जीवन त्यानी अनुभवले आहे. मातीतून पिकणारे मोती त्यानी कणग्या भरल्या आहेत. जमिनीत घाम जिरवला जातो. तेव्हाच काळीआई त्याचे मोल देते. हे सारे कष्ट घेतल्यानंतर शेतकरी स्त्रीस वाटणारच–

" धनीण मढवू सोन्यान्
बैलं माझी गुणवान "

स्त्री आणि जाई यांचे समरुपत्व असते. राघूविना मैना, तशी पतिविना सजणी एकटी झुरत राहते. कुणीतरी जाऊन सांगावे असेच वाटते. तिला जाणीव आहे ती पुरुषाच्या काळ जाची.

"कठिण किती काळीज पुरुषांचे
दिवस मज जाती वर्षाचे
जाऊनी झाला एक महिना
की घरला येईना
जा जा जा
कुणीतरी सांगा हो सजणा!"

पुरुषाचा विरह इथे दाखवला आहे. इथे त्याला जाऊन एक महिना झाला पण ते वर्षच वाटते त्या बापडीस. शांताबाईच्या अनुभव विश्वास त्यांच्या वैयक्तिक जाणीवाच्या कडा आहेत असेच आपणास दिसून येते.

कुणाही स्त्रीस आपला मुलगा शूर असावा असेच वाटते. कवयित्रीचे स्त्रीमन त्यास कसे अपवाद असणार ? आईच्या गर्भात त्यास उमगते ती झुंझाराची रीत. त्यांचं लग्न होत तेच मुळी तलवारीशी. अनेक संकटे झेलण्याची ताकद त्याच्या छातीत असते. इथे महाराष्ट्र 'भू' चा कवयित्रीचा अभिमान आहे.

"झुंजाव वा कटुन मराव हेच आम्हाला ठावं
लढून मरावं, मरुन जगावं हेच आम्हाला ठावं
देशापायी इसरु सारी माया ममता नाती
देव, देश अन् धर्मापायी प्राण घेतलं हाती"

भारतीय स्त्रीयानी हा देश बलाढच केला आहे.

पुरुषाचा पराक्रम अवलंबून असतो, ते स्त्रीच्या सद्भावनेवर, प्रेमावर. कवयित्री या भावनेची जाण प्रस्तुत ठिकाणी ठेवली आहे.

" डोंगराच्या आड माझ्या बापाचा गाव " ही शांताबाईंची रचना, रचनेसाठीच झाली आहे. या गीतात काव्य नाही. फक्त अक्षरबद्धाची जुळवणी–

" नाही मनान भलतं जपलं रं
सांज उन्हात डोळे दिपलं रं
जरि पदराच कांठ मला रुपलं रं
चल हट्ट माझ्या वाटला जाऊ नको
तुला भुलणारी मी न्हाई रं "

या गीतात अनुभव उसना आहे. त्यामुळे गीताची रचना विस्कळीत वाटते.

प्रणयी युगुल व सागराचे अखंड नाते असते. मुळात असा संकेत आहे की, यांचा परिणय पाहिल्यावर सागरास भरती येते. लाजऱ्या गालात, हृदयाच्या तालात, त्या दोघांचा सक्त एकांत असतो. लाटांवरचे नीळे गीत, काळाचे गुज

यावरच ओठावरील ओठ जुळत असतात. चंदेरी हवा परत धुंद करत असते. ' पूनवेचा चंद्र घरी आलेला ' असतो. चंद्राचे आणि कवीचे नाते पूर्वीच्याच स्वरुपात शांताबाईंनी उभे केले आहे. विरह फक्त स्त्रीसच त्रासदायक वाटतो असे नाही. पुरुषासही तेवढाच तो त्रासदायक वाटतो. शेवटी प्रणयाचो भावना दोघात एकच असते, असे दिसते.

" आता कुठंवर धीर मी धरु?
काळीज करतय बघ हुरहुरु
सजणे नको ग मागं फिरु
माझ्या सुरात ये सूर भरु "

माझे डोळे शिणले ग वाट तुझी पाहुनी ही त्यांची अवस्था असते.

शांताबाईंची चित्रपट गीते त्यांच्या भावनेशी प्रामाणिक आहेत. एखादाच ' नंबर फिफ्टी फोर ' सारखा अपवाद वगळता त्यांच्या गीसात त्याचाच सूर सापडतो असे दिसून येते.

❖

अंगाई गीते

स्त्री मुलाला जन्म दिल्यानंतरच माता बनते असे नाही. तिच्यात हे मातृत्व सुप्तावस्थेत असतेच. लहान मुली भातुलकीच्या खेळात, चिमुकला बाळ तयार करून त्याला खेळवत असतातच ! उपजतच हे मातृत्त्व स्त्रीत वसत असले पाहिजे. असे आपणास म्हणता येईल. आपला चिमणा म्हणजे स्त्रीचा अंशच असतो. त्या अंशाला गोंजारणे, त्याला जोजवणे तिला प्रिय वाटत असते. शांताबाईच्या काव्यात हे मातृत्व कसे आहे ? फुलांचे डोळे मिटलेले असतात. चिमुकल्याच्या ओठात जांभई दाटून आलेली असते. ज्योत मंदावते. सावली पडते पण बाळराजा –

" पाऊल चाळा
घुंगुर वाळा
का नीज नाही राजा तुला ?
इवल्या पापण्या शिणल्या ना ! "

कवयित्री या चिमुकल्याच्या इवल्या पापण्याचे कोतुक करीत राहते.

' चिमण्या झोपत नाही. ' ही सर्वत्र आईची तक्रार असते. शांताबाईच्या काव्यात हीच तक्रार आहे. यापेक्षा वेगळे जग कवयित्रीने साकारायला हवे होते !

" काम सारे उरकताना
थकला ग माझा जीव
नको हालू तूही राणी
येऊ दे ना जरा कीव ? "

आई बाळावर रागावते. हा अनुभव सर्वत्र आहे. तो रागावूनही झोपला तर दारी उभा बागुलबुवा, त्याच्या ताब्यात देऊ कां ? ही तिची धमकावणी असते. सर्वत्र स्त्रीमन सारखेच असते. असेच म्हणता येईल.

होनाजी बाळाने मराठीत भूपाळी लिहिली. श्रीरंगाला त्याच्या कर्तव्याची मायेच्या ममतेने जाण दिली. कवयित्रीने तोच भाव " एक एक विरतो तारा " या अंगाई गीतात ठेवला आहे. होनाजी बाळाची भूपाळी एक नादानुकरणाने परिपूर्ण आहे. तो भाव या ठिकाणी नाही असे दिसते.

" रंग वल्लीकेच्या रेखा
कुणी रेखितानी देखा
सुवासिनी जलभरणाते जाती
कठी श्रीधरा रे सरली राती "

रंगवल्लीकेच्या रेखा म्हणजे जलभरण्यास जाणाऱ्या सुवासिनी ही उपमा मोहक आहे. स्त्री मनाचे इथे दर्शन घडते.

" झोपल्या झाडवेली साऊल्या झोपी गेल्या
बागेत फुलांच्याही पाकळ्या मिटू आल्या
झोपल्या गाऊल्या रे झोपली वासरे "

चिमुकल्या बाळाला झोपवीत असताना, कवयित्री वास्तवातील दाखला देते. तसाच पुराणाचा ! झाडवेली झोपल्या, सावल्या झोपल्या असे जेंव्हा कवयित्री म्हणते तेंव्हा तिच्या मनात भावनांचे प्रतिबिंब इथे उमटल्याचे स्पष्ट दिसते. बागेत फुलांच्या पाकळ्या मिटून आल्या आहेत. ' गाऊल्या झोपल्या ' असे त्या म्हणतात. ' गाऊल्या ' हा गाईसाठी त्यानी शब्द बनविला आहे. आणि तो शब्द अधिक लाडीकपाणा स्पष्ट करतो.

' देवकी राही दूरी दाटला उरी पान्हा
यशोदेहरि वाढे गोकुळी तिचा तान्हा
पालखी जोजविते ब्रह्मरुप गोजीरे ! "

हा पौराणिक दृष्टान्त आहे. दूर मूल असले तरी स्त्रीला पान्हा फुटतो. हे मातृत्वाचे दीव्य लक्षण आहे. या श्रीरंगाची पालखी मात्र जोजविते आहे यशोदा व ब्रह्मरुप साजीरे डोलत राहते.

स्त्री म्हणजे जळणारी ज्योत असते. स्वतः जळून इतरांना प्रकाश देणारी. या स्त्रीत्वाच्या लेण्याकडे आपले लक्ष मुळीच नसते–

" बाल मनाची ओली माती
पुण्यात्मा हा घेई हाती
मूर्त नवी ये आकाराती
ज्योत जले उजळे जळताही
जो जो गाई ! कर अंगाई !

नवी मूर्ती आकारास येते. ईश्वर जणू ओली माती आईच्या हातात देतो. या मातीतून ती स्वतःचा आत्मा घडवित असते. ज्योत जळते व अंतरी उजळते. बाळ राजाला वाढवून स्वतःही उजळण्याचे भाग्य इथे लाभत असते.

शांताबाईची अंगाई गीते– बाळाला जोजवताना गाता येतील. अशा वेळचीच आहेत. स्त्री मनाचे हळवेपण इथे आहे. मातृत्व हा स्त्रीचा स्वर्ग आहे. 'गेयतानुकूल' रचना हा अविभाज्य घटक आहे.

❖

शांताबाईंची बडबड गीते

लहान मुले अनुकरणप्रिय असतात. डॉ. गायनर या भाषा पंडिताने अनुकरणाचा सिधान्त भाषाशास्त्रात मांडला आहे. मुलांचे विश्व हे इतर विश्वाहून वेगळे असते. स्वप्नाळूपणा त्यात अधिक असतो. त्यांचे विश्व नेहमी रुपेरी असते. त्यांच्या भावना अधिक संवेदनाशिल असतात. शांताबाईची बडबडगीते ही बालकांचे प्रतिक काही वेळा स्पष्ट करतात. तर ती काही वेळा प्रौढासारखी बोलू लागते. मुलेंच स्वतःचे भाव स्वतःच स्पष्टपणे मांडू शकतात, असेच म्हणता येईल.

" प्रौढाची निज शैशवाला जपणे " असे केशवसुतांनी म्हटले असेल तरी आपणास शैशवात जाता येत नाही, ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. शांताबाईंच्या काही कवितांची अवस्था अशीच झाली आहे. ' विहीणबाई, विहीणबाई ' ही त्यांची कविता खरं म्हणजे एवढं अवघड नातं मुलांना उमजणार तरी आहे का ? काव्य म्हणून ही कविता वरच्या दर्जाची आहे. पण यातील बालभावना प्रामाणिकतेपासून दूर झाली आहे, असे म्हणावे लागते.

पोर–पोरी खेळ खेळतात. एकमेकींची चेष्टा करतात. कधी या खेळात मांडव असतो, लग्न असते. वाजंत्री असतात व त्यातून पुढे चेष्टा उद्‌भूत राहते. घरातून आणलेले पदार्थ कुणीतरी एकटी पट्‌कन खाऊन टाकते. पसाभर गुळ आणला

जातो, पसाभर शेंगदाणे, एकटीच कुणीतरी फस्त करून टाकते व त्यातून ही विहीण ' खादाडखाउ ' ठरते.

" कुठून मेलं बाहुलीचं लग्न काढलं आम्ही ?
विहीण म्हणून नशीबी आलात हो तुम्ही !
बाली आमची नाजुक, तुमचा बाळ्या केवढा मोठा ! "

हा खाऊ संपल्यानंतरचा पश्चाताप असतो. बालीचे अजाणपण व बाळ्याचे द्वाडपण हे सुद्धा नजरेत असते. सोन्यासारखी लेक देऊन आम्ही फसलो, भिकाऱ्याशी नाते जोडले. हा प्रौढ पश्चाताप असतो. आणि जाता जाता ' वरमाई ' आपल्या बाजूची आहे. त्यामुळे तिचा थाट पाहून घ्यावा अशी गोड चेष्टा ही असते.

मुलांना त्या प्रौढाच्या जगाचे कुतूहल असते. त्या वयात आपण केंव्हा प्रौढ होणार ही आतुरता असते. कारण, प्रौढाना बशी बशी चिवडा, खाऊ, अभ्यास नाही. त्यामुळे ती त्यांना सुखी वाटतात. आपण ही तसेच प्रौढ व्हावे म्हणजे त्रास हा वाचेल असे त्याना वाटत राहते.

" नाही पुस्तक, नाही शाळा
हवे तेवढे खुशाल खेळा
उडो बागडो, पडो, धापडो
लागत कोणा नाही
स्वप्नी आले काहो
एक गाव मी पाहिला बाई "

स्वप्नातल्या गावाला जाणे बालकांना प्रिय वाटते. या वेगळ्या जगात वेडी गाणे गात असतात, पऱ्या हंसत असतात. झाडावर चेंडू लटकत असतात, शेतात बॅटी पिकतात. सारे कसे स्वप्नमय. या बालमनाच्या स्वप्नाळू जगाचा त्या बोध घेत राहतात. स्वतःच्या प्रकृती अभिमान लहान मुलांना भरपूर नसतो. आपण कुणालाही एका फाईटमध्ये गारद करू. त्यांची ही भावना असते. खेळता-खेळता भांडतात. मोठ्या माणसांना सुद्धा फाईट लगावण्याची धमकी देतात.

" बजरंग भाऊ माझा
भीम माझा काका
सांगून ठेवतो पुना माझ्या
वाटे जाऊ नका ! "

या चिमुकल्याचे दंडही ताकददार असतात. कारण रोज तो दुध पित असतो.

मुलांना एकमेकांना चिडवण्यात आनंद वाटत असतो. ती खेळतात, मध्येच भांडतात, चिडतात, चिडवित असतात, बहिण, भाऊ नेहमी एकमेकांना नेहमी चिडवत

असतात. ताईचा खेळ मांडण्यास दादाला आनंद वाटत राहतो. ती लग्न लावण्यात गर्क असते. हा तिच्या बाहुलीचां नवरा होण्यास इच्छुक असतो. विदूषकी चाळा करून त्याना घाबरविण्याचा प्रयत्न करत राहतो.

" दादा भलताच द्वाड आहे आई
खोड्या करून छेडतो बाई
याला ओवाळायची नाही मी यंदा
मला चिडवायचा हाच याचा धंदा "

अशा या दादाला यंदा मी ओवाळणार नाही. इथे ' बालजग ' आहे. शांताबाईंची ही वास्तवचित्रेच व्यक्त केली आहेत असे म्हणावेसे वाटते, चिमणीच्या दाताने फळे खाणे हे बालपणाचे एक वेड असते. शाळेत कैरी, चिंचा, बोरे यासाठी हे चिमणीचे दात असतात. ' एक आकडा मलाही दे रे " ही वृत्ती असते. ' झाडाखाली कुणी बापडा, लावील लाडी गोडी ' ही ज्ञानवृत्ती असते.

शांताबाईंच्या इतर बालगीतांचा एक पुनर्विचार ठेवणे आहे. प्रस्तुत ठिकाणी त्यांनी टिपलेले बालमन इथे आहे. भा. रा. तांब्रेची बालगीता प्रमाणेच त्यांची बालगीत रचना आहे असे आढळते.

❖

शांताबाईंची बालगीते– एक पुनर्विचार

" उत्तम बाल साहित्य ही समाजाची एक फार मोठी गरज आहे. ते मुलांचे मनोरंजन करतेच, पण त्याबरोबर त्यांचे मानसिक उद्‌बोधनहि करत असते. मुलांच्या प्रवृत्तीला वळण लावून, त्यावर संस्कार करून मुलांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याची क्षमता बालसाहित्यात असते. एका प्रकारे आई–वडील, शिक्षक आणि मित्र यांचेच हे कार्य साहित्य पार पाडीत असते. त्यामुळे बालवाङ्मयाविषयी समाजाने नेहमीच जागरुकता दाखविण्याची गरज आहे. दुर्दैवाने आपल्याकडे तशी परिस्थिती आतापर्यंत तर नव्हती. परिणामत: बालवाङ्मयास स्वतंत्र स्थान नव्हते. एकूण साहित्याच्या अनुषंगाने त्याची जुजबी दखल घेतली जायची. मासिकांच्या दिवाळी अंकातून वृत्तपत्राच्या रविवार आवृत्यातून त्याला थोडेफार स्थान मिळायचे. बाल साहित्य लिहीले जायचे ते मुख्यत: पैसा, प्रसिद्धी व प्रतिष्ठा यांच्यासाठी हपापलेल्या हौशागौशाकडून आणि साने गुरुजी, ना. धो. ताम्हणकर, भा. रा. भागवत यांच्यासारख्या हातावर मोजता येणाऱ्या ध्येयवादी साहित्यीकांकडून." समाजास आवश्यक असणारी बालसाहित्याची गरज व त्याचे निर्मिती

ध्येय श्री. भाऊ जोशी यांनी स्पष्टपणे मांडले आहे. हौशागौशासारखे लिखाण न करता शांताबाई शेळके यांचे नाव आज घ्यावे लागते. बाल साहित्य शांताबाईनी निर्माण केले. ते एक वेगळा दृष्टीकोन ठेवून–

१) टिप टिप चांदणी २) चिमणतारा ३) थुई थुई नाच मोरा

ही त्यांची संग्रहबद्ध बालगीते. या शिवाय त्यांच्या इतर संग्रहातून आलेली आहेत.

" मराठी साहित्यात बाल साहित्याचे दालन नेहमी उपेक्षीतच राहिले. वास्तविक असे होण्याचे काही कारण नव्हते. भारतीय भाषांची जी जननी संस्कृत तिने ' पंचतंत्र ', ' हितोपदेश ' यांच्या रुपाने हजारो वर्षा पूर्वीच भारताला बाल–साहित्याची देणगी दिलेली आहे. ' पंचतंत्र ' हा तर साऱ्या जगातील पहिला बालसाहित्य ग्रंथ होय. इसापच्या कथा त्यामानाने अलीकडच्या काळातील आहेत. आणि काही विदेशी विद्वानांच्या मते तर इसापाच्या कथानीतीचे उगमस्थान ' पंचतंत्र ' होय. बालसाहित्याची आपली परंपरा एवढी प्राचीन असली तरी मराठीत बालसाहित्याची सुरुवात १९२८ साली ' बालमित्राने ' केली.

आपल्या इतर अवीचिन साहित्याप्रमाणे याच्याही मागे पाश्यात्य वाङमयाचीच प्रेरणा होती. एवढेच नव्हे तर प्रारंभी काही काळ त्यात इंग्रजी कथांच्या अनुवादा-वरच भर देण्यात आला आहे. पाश्चात्यांपासू बालसाहित्य हा वाङमयप्रकार आपण घेतला असे श्री. भाऊ जोशी यांचे लेखावरून दिसते. हे बालसाहित्य प्रामुख्याने कथात्मक होते. मुलांचे मन संगीतप्रीय असते. कथेपेक्षा ती संगीताकडे अधिक आकृष्ट झालेली दिसतात. 'तालप्रीय-नादप्रीय' या दोन गोष्टी मानवी प्रवृतीशी निगडीत आहेत. मराठीत अशी गीते फारच थोडी आहेत. कथा, वाङमयापेक्षा गीतरचना, बडबडगीते ही अधिक मुलांना आवडत असतात असेच दिसून येते व त्यादृष्टीने शांताबाईची ही गीते अभ्यासण्यासारखी आहेत.

❖

काही अनिष्ट गोष्टी

एखादा साहित्यप्रकार नावारुपास येतो. तेव्हा त्यात दोन अनिष्ट गोष्टी निर्माण होण्याचा दाट संभव असतो. एक म्हणजे अनेक बाजारबुणगे त्यात शिरतात आणि दुसरी म्हणजे त्यात तोचतोपणा येतो. आपल्या बालसाहित्यात नेमके हेच घडले आहे. इतर काही लिहिणे जमत नाही. म्हणून मुलासाठी गोष्टी लिहिणारी मंडळी जास्त आहेत. काही साईड बिझनेस म्हणून या गोष्टी लिहित असतात. पैसाही मिळतो, नाव ही मिळते. आणि प्रतिष्ठा संपादन करता यते.

काहींचा अपवाद वगळता प्रकाश ही असल्या माणसांना जवळ करित असतात. कारण त्यांची भूमिका नेहमी धंद्याची असते. धंद्याला नवशिके लोक बरे ! शिवाय युद्धाप्रमाणे धंद्यातही सारे काही क्षम्य असते अशी पांढरपेशी समजूत असते. त्यामुळे किमान दर्जा वगैरे गोष्टी गैरलागू ठरतात.

आता ज्याला प्रतिभेची आवड आहे, त्यांच्याकडे कसलाही ध्येयवाद नाही, तळमळ नाही, कळकळ असली तरी ती पैसा व प्रसिद्धी यांची आहे. अशी माणसे काय लिहीणार ? ती माणसे राजाराणी, परी, राक्षस, राजपुत्र वगैरे चावून चोथा झालेला माल मसालाच पुन्हा पुन्हा लिहीणार हे उघड आहे. आपल्या बालसाहित्यात जो एकसुत्रीपणा आहे त्याचे कारण हेच आहे.

याचा अर्थ असा नव्हे की, नवशिक्या लेखकांना कोणी जवळ करू नये. उलटपक्षी नवनवे लेखक येतील तेवढे चांगले. पण ज्याना किमान एक पात्रता असेल त्यानाच संधी मिळावी.

साहित्य आणि बालसाहित्य यांच्यात या संदर्भात फार मोठा फरक जाणवतो. साहित्याचा वाचक प्रौढ असतो. त्याची मनोभूमिका व व्यक्तीमत्त्व बऱ्याच अंशी बनून गेलेले असते. बाल साहित्याचा वाचक हा अत्यंत संस्कारक्षम मनाचा असतो. त्याच्या भावविश्वास अद्याप आकार यायचा असतो. स्थूलमानाने जीवनदर्शन हे साहित्याचे प्रयोजन म्हटले तर बालसाहित्याचे ' प्रयोजन मनोरंजनातून उद्‌बोधन व सुसंस्कार' असेच म्हणता येईल. आता ज्याच्या सहकार्याने सुसंस्कार करायचे त्या पुस्तकांना जर काही दर्जा नसेल तर बालसाहित्याचे प्रयोजन सार्थ कसे ठरेल? उलट त्यामुळे उद्याचा समाज घडविण्याच्या प्रक्रियेत हानिकारक असा बिघाड मात्र निर्माण होईल.

❖

बालमन – एक चिकीत्सा

बालमन हे निरागस तितकेच आदर्शानुसार, भाबडे व प्रामाणिक असते. नव्याची हौस प्रत्येक मुलाला असतेच. त्याच्या जोडीला अद्‌भूताचे आकर्षण, विभूतीपूजा, कल्पनारंजन, साहस आदि प्रवृत्ती असतात. विविधता त्यांच्या मनात सुप्तावस्थेत असते व विशिष्ट वयात ते डोके वर काढू पाहतात. त्याना परिष्कृत करून योग्य वाट दाखविण्याचे, वळण लावण्याचे कार्य बालसाहित्याला साधावयाचे असते आणि तेही मनोरंजनाच्या मार्गाने.

" मोठी माणसे एखादे वेळी अनाकर्षक पुस्तकेही नेटाने वाचतील. पण लहान मुले नाही. कंटाळवाने पुस्तक ते दूर भिरकावून बाजूला होतील. यासाठीच

आपल्या बाल साहित्यात नवे विषय, नव्या कल्पना, नव्या वास्तवाचे दर्शन येण आवश्यक आहे. अर्थात हे करताना दर्शनाला फाटा देऊन चालणार नाही. मोठ्यांच्या बाबतीतही जेथे ' कथा ' हाच सर्वाधिक लोकप्रिय प्रकार आहे. तेथे मुलांचे काय ? बाल साहित्यात आशयात व विषयात विविधता आणण्याच्यादृष्टीने अशा अनुवादीत व स्वतंत्र साहित्याची फार मोठी गरज आहे. "

एकूण बालसाहित्याच्या प्रयोजनाचा विचार करता, बालसाहित्य हे मनोरंजनातून उद्‌बोधनाकडे वाटचाल करीत असते असे दिसून येते. शांताबाईंची बालगीते ही प्रसिद्धी, प्रतिष्ठा यासाठी निर्माण झालेली नाहीत तर त्यामागे एका आईचे संस्कारक्षम मन आहे. त्यामुळे ती राजाराणी, भुताटकी, परी असल्या अद्‌भूतरम्य विषयात गुंतून न पडता विविध दृष्टीने संपन्न आहेत असे दिसून येते.

❖

टिप टिप चांदणी

संग्रह रुपाने प्रसिद्ध झालेला हा शांताबाईंचा पहिलाच बालगीत संग्रह. या संग्रहास त्यांनी ' टिप टिप चांदणी ' असे नाव दिले. या नावातच असणारी 'गति' पट्‌कन लक्षात येते. मुलांचे जग हे बडबडे जग, विसरभोळे जग म्हणूनच आम्हास माहित आहे. नादानुकरता हा त्याचा व्यक्तीमत्त्वाचा घटक असतो. चांदण्याचे पीठ केले ही किमया अभिनव आहे–

" पुऱ्या केल्या सोळा
मुले झाली गोळा
मुले आली धावून
पुऱ्या टाकल्या खाऊन "

आभाळात रात्री खूप चांदण्या दिसतात. सकाळी मात्र असते एकुलती एक पहाटेची शुक्र चांदणी, साऱ्या चांदण्या निघून जातात. मुलांनी पुऱ्या खाऊन टाकाव्या तशा या चांदण्या निघून जातात तरीहि–

" एक पुरी उरली
डब्यामध्ये झाकून
पुरी ठेवली राखून
एका बाजूस एक पुरी "

कवयित्री राखून ठेवते तर दुसऱ्या एका आईचे मन ती त्यातून स्पष्ट करते. ' स्त्री ही भविष्यकाळाची नोंद ठेवणारी असते. पुरुषापेक्षा तिला ती बुद्धी अधिक उपजत

असते. पुऱ्या संपल्या तरी एखादे पोर नंतर कशावरून मागणार नाही ? आईस हा प्रश्न कधीच उमगलेला नसतो. म्हणून ती त्यातील एक पुरी झाकूनही ठेवते.

पंचतंत्रातील पक्षी बोलत राहतात. तसेच शांताबाईंशी पक्षी–प्राणी बालमनाशी हितगुज करतात. एखादी तांबडचा पिसाऱ्याची कोंबडी दिसते. तिच्या गळचात सुरेखसा पट्टा असतो. मोठचा ऐटीने ती कोंबडचापुढे उभी असते. ' लहान मुले नेहमी एकमेकांना चिडवतात. म्हणतात, ' भाव मारु नको बरं ! ' हाच आशय येथे त्या व्यक्त करतात.

" नवलपरी नवलपरी
कोंबडीने घातली गळचात सरी
पायांमध्ये बांधले चाळ
शालू नेसली तांबडी लाल "

या शालूने तिला एवढा आनंद झाला की, ती साऱ्यांना दाखवत राहिली. पण कोंबडा ओरडला व म्हणाला, " को को च को एवढी ऐट करू नको ! " शेवटी इथे पुरुष मन आहेच.

लहान मनांचे प्रश्न नेहमी अनाकलनीय असतात. त्याना उत्तर देणे आपणास जमेलच असे नाही. शास्त्रीय उत्तर त्याना देता येत नाही. मग ती बापडी स्वतःची उत्तरे स्वतः शोधून काढतात.

" रात्रंदिवस उभी राहून
भित कशी थकत नाही ?
डावीकडे उजवीकडे
थोडी सुद्धा झुकत नाही ? "

मुलांना एका ठिकाणी बसणे जमत नाही. भित मात्र एकटी उभी असते. ती कशी? व ती हालत का नाही ? हा प्रश्न परत लहान मुलांना खूपसे समजून देतो. रस्त्यावरील दृष्यात लहान मुलांना नेहमी गंमत वाटत असते. नावीण्यपणा त्याना त्यात आढळतो पण एकच दृश्य पाहून खिडकी कशी कंटाळत नाही ?

" रात्रंदिवस खिडकीसुद्धा
रस्त्यावरची गंमत पाही
तेच तेच सारखे बघून
कंटाळत कशी नाही ?"

मुलांना नेहमी नाविण्याची ओढ असते. रात्रंदिवस एकच दृष्य पाहणारी खिडकी कंटाळत कशी नाही ? हा त्यांच्या मनातला प्रश्न वेधक आहे.

फळांचे आकार नित्याचेच असतात. आपणास ते विचित्र वाटतात.कैरी वाकडी

असते. आपणास वाटते तिचे नाक कापलेले आहे. फणसांच्या अंगावर काटे असतात. सिताफळ भरपूर बियांचे असते. याला कारण-मिमांसा बालमन करित राहते. " तिने फणसाला मुरडले नाक ! नाकाला आला कायमचा बाक " या बापडीला पाहून.

" कैरीला पाहून सीताफळ हसले
हसले तर त्याचे दांतच दिसले ? "

" आम्ही नाही बोलणार जा " हंसतील तर त्याचे दांत दिसतील आम्हास काय?" यासारखे बाल प्रश्न असतात ना ? कवयित्री या प्रश्नाना अनुरुपता देते.

मुलांना ज्ञान विनोद पद्धतीने द्यावे. " अपूर्णता ही सौंदर्याची खूण आहे." हे तत्त्वज्ञान तरी आहे त्यावरील सामान्य ज्ञानाची जाणही या प्रश्नामागे आहे.

" हत्तिचे आपला
वुलनचा कोट
धावल्यावर राहिले
अर्धे उघडे पोट ! "

हत्तीचा देह प्रचंड आहे. प्रचंड देहाचा प्राणी ही शिकवण त्यात आहे. पण हे सांगत असताना त्याला उलनचा कोट हवा ही त्या बालहत्तीची हौसही आहे.

" जिराफाने आणला
गळपट्टा छान
गुंडाळल्यावर राहिली
अर्धी उघडी मान! "

जिराफाची मान मोठी-वाकडी असते. त्याला गळपट्टा कोठून पुरणार ? सशाची बायको हा परत काव्यातला विनोदाचा भाग आहे.

" सशाची बायको
पर्स आली घेऊन
सशालाच अलगद
आंत दिले ठेवून ! "

इथे विनोद आहे. चिमुकली पर्स पण त्यात ससा कसा बसला ? हा बडबड्या मनाचा प्रश्न आहे.

कीर्ति व पैसा यामागे कुणी धावू नये! सावली सारख्या असतात या गोष्टी. या सावलीचा पाठलाग करणारी पोरे, तिला सावली सांपडणार कशी ? ती पळतच राहणार. वाघाची मावशी फार हौशी आहे, ती दळून खावे मात्र उंदीर एकादशीला! मानवी प्रवृत्तीवर कवयित्रीने ओरखडा काढला आहे. ताई खोबऱ्याची खिरापत

करते. त्यासाठी खोबरे ती खिसते. हे काळे खोबरे त्याचे गाल गोबरे असतात. लहान मुलांचे गाल कुस्करणे मुलोना प्रिय वाटत नाही का ? इथे बालमनाची प्रवृत्ती स्पष्ट होते. त्याबरोबरच त्या ताईची करामत दिसून राहते. लहान मुलांचा हट्ट हा कोणालाही पुरवतः येत नाही. शेवटी तो बालहट्टच असतो. वेलीवरची एक कळी ताईसारखी हट्टी असते. ही कळी मोठ्यांचे अनुकरण करावे तशी टोपी घालून झोपी गेली पण–

"तिच्या स्वप्नात देव आला
हळूच पापा घेऊन गेला"

ईश्वराने स्पर्श केल्यावर नराचा नारायण होतो,सैतानाचा माणूस होतो मग कळीचे काय होणार ?

" दुसऱ्या दिवशी कळी उठली
खद्‌खदून हसत सुटली
इतके इतके हसू आले
कळीचे शेवटी फूल झाले"

" बालकवींच्या " हळव्या फुलराणीचे चित्र येथे आहे.

" लाज लाजली या वचनानी
साधी भोळी ती फुलराणी"

ताबाईंच्या कळीचे व बालकवींच्या फुलराणीचे नाते आहे.

आभाळात देव राहतो, पऱ्या राहतात. आपण त्या ठिकाणी गेलो तर घरच बांधून राहू. हा बालविचार इथे त्या मांडतात. आईचा मार मऊ असतो. कारण ती रोज जेवू घालते. पण ताई गोड कसे गाते ? या प्रश्नाचे उत्तर बालमनच देते--

साखरेचा खाऊ
ताई रोज खाते
तरीच ती
इतकी गोड गाते"

रस्ता आणि डोंगर याचे भांडण होते. शेवटी डोंगर मोठा आहे ना ? तो भांडत राहतो. त्यामुळे रस्ता घाबरतो व तिरका तिरका चालत राहतो.

'वेडा ग ! माझा पोर!' असे आई मुलाला ऐकत नसला तर म्हणत राहते. वेडबंबू शंभू ही कल्पना कवयित्रीस सुचली असावी. हा शंभू फुले घेतो व त्या बदल्यात नाक देतो, शाळेत जातो, पुस्तके खातो, शाई पितो, चड्डी टाकून नागडाच बसतो!' हातपाय घासणे, लोळणे हे चिमुकल्याचे रागावणे असते.

❖

स्वप्नाळू जग

लहानपणी राजा होण्याचे वेड प्रत्येक मुलाच्या मनात असते. आपण राजा झाल्यावर इतर ऐट गाजवावी असेच वाटत असते. आपण राजा झाल्यावर इतर सारे आपला हुकूम सहज मानतील. साऱ्यांना धाक वाटत राहिल. मुठीत नाक धरून सारे तो ऐकत राहतील ! आईला सांगेन जेवण वाढू नकोस, सारे डबे उघड, मला फक्त चिवडा लाडू आवडतो तेवढेच दे ! ताई सारखी आरशात पाहते. उठसूठ सिनेमातील गाणे म्हणते, ती बंद करीन! दादांच्या शीळेला बंदी, बाबाना स्कूटर आणायला सांगेन, गुरुजीच गणिते सोडवतील " पण हे केव्हा ? मी जेव्हा राजा होईन ना ? तेव्हा.

उन्हालाही थंडी वाजू लागते. मग ते धुक्याची बंडी अंगात घालून फिरत राहते. बापडे ऊन मात्र कुडकुडत राहते. तिची ती अवस्था पाहून सावली म्हणते –

" काढी शाल मी सुद्धा
दिली नसती काय ?"

एकदा मुलांना वाटते फुल व्हावे व फुलांना मुले. आलटा पालटा झाली ती जगाची. पण मूळ स्वभावधर्म जातो थोडाच ! भुंगा लागला मुला भोवती फिरायला तर फुले लागली धडा पाठ करायला. फुलांचा धडा आशाने पाठ होणारच ?

"मुले बिचारी
बागेत सुकली
फुले बिचारी
बेरजा चुकली !
बागेत मुलांचे
तोंड झाले कडू
शाळेत फुलांना
कोसळले रडू "

ज्याचे काम त्यानेच करावे. शेवटी आपण आपली वृत्ती सोडूच शकत नाही हे खरे!

या बाल जगात चिमुकल्या चिमुताईचे लग्न होते. तिला एवढा आहेर येतो की, चिमण्याचे हात तांदूळाची पोती भरून टाकतात. वाढदिवस होतो न होतो एवढ्यात एकदम ऊंची वाढते. अंकाना व्यक्तीमत्त्व लाभते. 'चार' खादाड असतो. 'पांच' नाच करतो. याप्रमाणे–

' गंमत ' या गीतात कवयित्री परत एक वेगळे जग साकारते. टेबलाला

वाटते पडून जावे, पातेले शाई खाऊन टाकते तर स्टोव्हवरचा चहा लालेलाल होतो!

तात्पर्य 'टिपटिप चांदणी' ही मुलांची गाणी आहेत. या गीतांबरोबर आपण सहज ठेका धरू शकतो. एवढी ती सहजसुंदर आहेत.

❖

चिमण चारा

कविवर्य भा. रा. तांबे यांची बडबड गीते मराठी वाचकांना ज्ञात आहेत. तांब्यानी आपल्या बाल गीतात

" आरसा लोंबे भितीला
चिमणी पाहे सवतीला "

अशी मजेशीर कल्पना साकारली आहे. शांताबाई हीच कल्पना आपल्या शब्दात पुढीलप्रमाणे व्यक्त करतात,

" चिऊ चिमणी
आली अंगणी
बघा हळूच
मारते चोंच "

लहान मुले पांखराना दाणे घालतात, तसेच त्याना पळवून लावतात. चिमणीच्या समोर दाणे टाकताना त्याना मौज वाटते. तसेच टाळी वाजवून हाकलून लावणेसुद्धा त्याना मौजेचे वाटते. शेवटी ते चिमणे जग असते. बालगीतांचा नायक बाळू हा अनेकवेळा दिसत राहतो. ' बाळू आमुचा फार हुशार, बाळू आमचा फार चतूर ' हे शब्दप्रयोग मराठी कवितेला तसे नवीन नाही.

इसापनीतीतील पक्षी, प्राणी बोलतात आणि ज्ञानरंजन करतात. ऐटदार कोंबडा कविने रंगविलेला असाच ज्ञान रंजन करतो. या कोंबड्याचा ऐटदारपणा, त्याचा तुरा, झोकदार चाल, सारेच आकर्षक असते. कोंबडा फक्त आरवत नाही, तो काही तरी शिकवत राहतो.

" कोंबडा म्हणतो
आळस खोटा
अंथरुण सोडून
झटकन उठा "

पांघरुणात पडून राहणे, झोपून राहणे, ही लहान मुलांची प्रवृत्ती असते. त्यानी आळशीपणा सोडण्यासाठी त्याना सांगणे जरुरीचे आहे, पण ते विनोदी रितीने, या

पद्धतीचा त्यांच्यावर जरुर परिणाम होतो. कवयित्री ज्ञान व रंजन करण्याचे काम वरीलप्रमाणे करते. सकाळ झाल्यावर दिवसाला प्रारंभ होतो–

" बागेत कळी उघडे डोळे
हिरवे पान ऐटीत डोले "

बालगीतात एक वैशिष्टय असावे ते असे की फुले, पशु, पक्षी व्यक्तीमत्त्व धारण करत राहतात. ऐटबाज बालराजाप्रमाणे पान ऐटीत डुलत राहते. सोनेरी किरणे वर चढत येत असतात. गाय हंबरते, सकाळ अशी अवतरते. मग आपण झोपून कसे राहणार ? चिमण्यांना हा आईचा प्रश्न आहे.

महाराष्ट्रीयन माणसांची अनेक वैशिष्टये आहेत. त्यापैकी घरी मांजर, कुत्रे दारात, पोपट हे त्यांचे जग असते. या पोपटाच्या अंगावर हिरवी शाल असते. त्याची चोंच ' लालमूलाल ' असते. ' लालमलाल ' हा कवयित्रीचा आवडता शब्द. याचा पिंजरा म्हणजे जणू महालच ! या महालात हा पोपट मोठ्या सुखाने डाळ, मिरच्या खात डोलत राहतो. मान वाकवून शीळ घालतो. ' मीठू मी ' म्हणतो, नाचत राहतो. हे नाचणे बालाप्रमाणे प्रौढांनाही आवडत राहते. " दिवाळी " ही प्रत्येकाच्या मनात घर करून राहते. या दिवशी गोडधोड खाण्याचा योग असतो. शाळेला सुट्टी असते. आई उटणें लावून अंघोळ घालते. सारे मन आनंदाने मोहून जाते. पण यात विशेष आवडीचा प्रसंग म्हणजे–

" भाऊबीजेची मौज आगळी
देऊ ताईला रुपाची चोळी "

असा हा भाऊबीजेचा सण जो सर्वावरच मोहिनी घालून राहतो.

मनी मांजरी, मोत्या यांच्या स्वभावधर्मानुसार कवयित्री त्यांचे व्यक्तीमत्त्व अक्षरबद्ध करते. मांजरीचे चमकणारे डोळे म्हणजे तिच्या डोळ्यात बॅटऱ्या असतात का ? ही मांजरी एकसारखी घुरघुरत राहते. चुलीत झोपून राहते. तरी घरी तिच्यावरच प्रेम करताना सर्वजण दिसतात. मोत्या बापडा मात्र बाहेर बसून राहतो. तो तसा शहाणा आहे. आई त्याला घरात घेत नाही. पण मनी पांघरुणात झोपून असते. मोत्याला हाक मारा तो ऐटीत चालत येईल. मनी मात्र येणार नाही.

" लठ्ठ गोरटी दूध चोरटी
मनी असे मुलखाची लुच्ची
मोत्या भोळा परी इमानी
खरी घरावर माया त्याची ! "

इथे मोत्याचे व्यक्तीमत्त्व सहज स्पष्ट होत आहे. ' चंद्र ' हा मुलांचा मामा. त्याच्या लीला मुलाना प्रिय आहेत. ढग चालतात पण चांदोमामाच ढगातून चालल्यासारखा

वाटतो. चांदोमामाचा रंग गोरा गोरा असतो. तो दुधाने अंघोळ करीत असेल का? या चांदोबाने घरी यावे, आपल्याबरोबर जेवावे हे साऱ्यानाच वाटते. पण एवढ्यात–

" अरे ! चांदूमामा तर ढगा आड गेला
लबाडाने कसे बघा फसवले मला "

या मामाला फसवणेही प्रिय आहे.

पावसात भिजणं हा बालमनाचा आवडता छंद ! होडी करणं, पाण्यात खेळणं, कागदीच होडी असते पण चिमुकल्या मनाची ऐट–

" होडीत माझ्या ऐटित बसुनी
समुद्र जाईन मी ओलांडुनि
दूरदूरचे पाहीन देश
नाना जाती नाना वेष "

नाना देशाना भेटी देणे हे त्याना प्रिय असते.

साळी, सोनार, माळी, कासार हे सारे आपला व्यवसाय करतात. त्यांचा व्यवसाय कोणता ? हे कवयित्री गीतातच समजून देते. साळीदादाकडून ती साडी घेते, सोनाराकडून कंबरपट्टा, माळ्याकडून गजरा, कासाराकडून बांगड्या. हे सारे स्त्रीचे लेणे आहे पण गीतातूनच या लेंण्यांची जाण आपल्याला येत आहे.

लहान मुलांचे मन संस्कारक्षम असते. संध्याकाळी त्यानी हातपाय धुवावेत. देवरायास नमस्कार करावा. हे प्रत्येक आईवडीलांना वाटत असते. हे सुसंस्कार कवयित्री गीतातून देते.

चिमणचारा या संग्रहातून शांताबाईंनी या संस्काराची जपवणूक केली आहे. असेच आपल्याला म्हणावसे वाटते.

❖

थुई थुई नाच मोरा

शांताबाईंचे हे तिसरे पुस्तक, या पुस्तकात त्या म्हणतात, ' हे पुस्तक थोडे मोठ्या मुलांसाठी आहे. ' ' चिमण चारा ' हा संग्रह पाच–सहा वर्षाच्या मुलांसाठी आहे. ' थुई थुई नाच मोरा ' हा त्यांच्या मोठ्या भावंडासाठी आहे. या संग्रहातील पहिलीच कविता ही अभिनव गीत आहे. नाचत–नाचत, गात–गात त्यातून ज्ञानाचे कण टिपायचे असतात. या घटनेची जाण कवयित्रीने ठेवलेली आहे. सुसंस्कारा–बरोबर ज्ञान देणे हा घटक त्या महत्त्वाचा मानतातच ! मोरांचा रंग इंद्रधनुष्या–तील रंगाप्रमाणे असतो. म्हणजे मोरांच्या रंगाची, इंद्रधनुष्याच्या रंगाची एवढी

जाणीव या वयात मुळात होऊन जाते. त्यांच्या ज्ञानात भर पडते. या पिसाऱ्याचे वर्णन करता येत नाही ! तरीही एक शंका या बालमनात आहे–

" रंगी बेरंगी छटांनी झळाळते अंग
काय इंद्रधनुष्याचे चोरीयले रंग ! "

या मोरांनी इंद्रधनुष्याच्या रंगाचो चोरी तरी केली नाही ना ! त्याचे ऐटदार नाचणे मनास प्रिय वाटते. पण त्याने येऊन आपल्या अंगणात नाचावे ही मनस्वी इच्छा असते.

लहान मुले अनुकरण प्रिय असतात. मोठ्या माणसांचे अनुकरण करणे त्याना प्रिय वाटते. बाहुलीला नटवणे ही लहान मुलीतील मातृत्त्वाचे सुप्त गुणच आहेत. ती या चिमुकल्या बाहुलीस काजळ भरते, पायात साखळ्या घालते, कपाळी चन्द्रकोर रेखते, हातात चुडा भरते, बुट्ट्याची चोळी बनविते हे सारे नटवल्यावर–

" पोर ही सुंदर
गोजीरवाणी
कोणत्या राजाची
व्हायची राणी ! "

काही वेळेला ही बाहुली निजत नाही. किती वेळ तिला अंगाई गीत म्हणत राहायचे, रडतच राहते! रस्त्यावरील गोंगाट संपलेला असतो. सारे सामसूम. कुणीही जागे नाही. तरीही झोपत नाही. शेवटी चतूर आई–

" आला बागूल दाराशी
सांग बोलावू मी त्याला
अगबाई सोनुलीचा
डोळा लगेच लागला "

असा धाक दाखविते. तरीही तिचे रडणे प्रिय असते. रडून रडून तिचे डोळे, गाल दोन्हीही लाल होतात. भातुकलीच्या खेळात तिला कुणीही घेत नाही. तिचे कुरळे केस अस्ताव्यस्त झालेले आहेत. कपाळीचे कुंकू विस्कटून गेलाय. डोळे पुसले तरी परत भरून येतात. फक्त डोळेच नाहीतर- " ओंठाच्या पाकळ्या ग थरथरतात ! " कितीही विचारलं तरी ती उत्तर देत नाही. मुका घ्यायला जावा तर मान फिरवते. तरीही आईचे लाडिक मन विचारत राहते–

" सोनुले ! हा रुसवा ग कधी सरायचा
सांग कधी सरायचा,
फुगलेला गाल सांग कधी हंसायचा ? "

घरातल्या मांजरीला पिल्ले होतात. त्यात एखादेच पिल्लू काळे असते तर बाकीची पांढरी असतात. ती मात्र त्या वेड्या पिल्लाचा दुःस्वास करतात. " एका तळचात होती वेडी पिल्ले सुरेख। होते कुरूप वेडे पिल्लू तयात एक" तसेच! पण हे काळे पिल्लू आईजवळ झोपत नाही. ते शिकारीच्या शोधात हिंडत राहते. मातीत लोळते.

" त्याचे अंग पुसता पुसता
मनीच्या डोळचात पाणी येई
म्हणे, ' काळे अगदी वेडे
याचे कसे व्हायचे बाई '

हा प्रश्न प्रत्येक आईच्या अंतःकरणातील आहे. याची दखल कवयित्री घेते.

❖

बघ आई–एक चिंतन

शांताबाईंची बालगीते हे गेयतापरिपूर्ण आहेत. ' बघ आई– ' हे असेच एक चिंतनपर बालगीत आहे. आठ ते दहा वयांच्या मुलासाठी हे आहे. अशी प्रस्तावनेत स्वतः कवयित्रीने कबुली दिली आहे. या वयात मुलाला परिसरातील रंग-गंधाची जाणीव, ज्ञान झालेले असते. सूर्य, चंद्र, तारे यांचे विश्व बनलेले असते. अंगावर भरजरी शेला पांघरून हा सूर्य येतो आहे. असे हा मुलगा कौतुकाने आईस सांगतो आहे.

लहान मुलांना उत्तर देणे म्हणजे पुढीलप्रश्नांची निर्मिती करण्या सारखेच असते. या सूर्याच्या निळचा महालास सोनेरी खांब का ? याला मोतीयाच्या झालरी कोणी लावल्या ? केशराचे सडे भूवरी कुणी घातले ? की ज्यावरून ही स्वारी मोठ्या डौलाने इकडे येते आहे.

एखादे पोर डोकावे, तसा हा डोकावत राहतो. गुलाबाची फुले उधळून देतो. चिमुकल्या कळीना गुदगुदल्या करतो. असा हा सूर्य आहे. तो जर झोप सोडून उठला तर मीच आळशी का असावे ? पावसाचे येणे झरझर असते. झरझर हा गतिमय शब्द कवयित्री वापरते. सोसाटचाचा वारा, अवखळ ओहळ, झाकलेले नभ या सर्वच वाक्यप्रयोगातून गतिमयता स्पष्ट करतात. अंगावर झोबंणाऱ्या गार वाऱ्यामुळे शरीराची काया भरभरून येते.

" पावसाच्या धारा
डोईवर मारा
झांडाचिया तळी गुरे, शोधाती निवारा "

नदीला येणारा पूर, धावणारी नागीन यात बरेच साम्य असते. झाडांची सावली चित्ताला मोहविणारी असते. सारे वातावरणच पावसाळी बनते.

या पावसामुळे धरती सुखी होते. सारी धरती हिरवीगार होते. अचानक हिरवळ का आली ? या प्रश्नाचे उत्तर बालमनाला सापडत नाही.

" लपली होती कुठे आजवर
लबाड हिरवळ मला कळेना
पाऊस पडता अवचित येते
मुळी तिची चाहूल लागेना "

असा प्रश्न बालबोध स्वरूपात असतो.

शांताबाईची बालगीते सायन्सही बोलत राहतात. उपदेशाबरोबर या गीतातून विज्ञानाची माहितीही देतात. झाडे नसती तर पक्षांनी कुठे घरटी बांधली असती ? हिरवी-हिरवी सावली कोठून मिळणार ? फळे कोठून मिळणार ? एवढेच नव्हे तर-

" झाडे जर का नसती येथे
दिसले असता भयाण सारे
रूक्ष मोकळ्या माळावरती
फिरले असते भणभण वारे "

झाडांची जोपासना मानवी जीवनाला किती आवश्यक आहे. याचे सूचन कवयित्री येथे करते. या विज्ञानाच्या बरोबर सुसंस्काराचो जोड त्या देतात-

" वृंदावनामध्ये
उजळते वात
बाळा दिव्यापुढे
जोडबरे हात ? "

हे संस्कारक्षम मनही आहे. " वाटे मिटावे पुस्तक " ही कविता बाळांबरोबर मोठ्यांना काही तरी समजून देते. मुलांना शिक्षण देत असताना त्याचे वय, वातावरण, अभ्यासक यांचा विचार करायला हवा असतो. त्याची प्रवृत्ती, त्याचा कल ओळखूनच त्यास शिकवायला हवे असते. बागेत चिमण्या नाचतात, फुलपांखरे बोलावतात, कळ्या डोलतात, रंगीत फु लपांखरे खुळी होतात यावेळी आम्ही कसे शिकावे ? अशी बालमनाची तक्रार आहे. अशा वेळी-

" वाटे मिटावे पुस्तक
नको वर्गात बसाया

गोड निळ्या आभाळाशी
पानां-फुलां-पांखराशी
जावे खुशाल खेळाया ? ''

जेव्हा त्याना खेळणे प्रिय असते. तेव्हा खेळूच देणे श्रेयस्कर असते.

लहान मुलांना भांडणे खेळण्याएवढेच प्रिय असते. शेवटी तो हंसूरुसूचा खेळ असतो, कोपऱ्यात घरकुल मांडून डाव मांडला जातो. त्यातूनच पुढे भांडणे एकमेकास चिडविणे व एकदम–

'' आल्या दोघी वर्दळीला झाली रुसारुस
उधळला खेळ आला डोळ्यात पाऊस ''

यामुळे या पंक्तीमुळे काव्यात्मता साकार होते.

डोळ्यात पाऊस येतो. दोन चिमुकले जीव वेगवेगळ्या जागी थांबतात. उन्हं पडायला हवे असते ना? एवढ्यात एखादा उंदीर दिसतो. भांडण विसरले जाते आणि उन्हं पावसाची जागा घेते.

'' भांडणाची गोष्ट गेल्या दोघी विसरून
पावसाच्या जागी आता चमकले ऊन ''

शांताबाईंची बालगीते ही संस्काराचे पाठ देतात. तसेच ज्ञानाची माहिती ही देतात. बालमनाच्या कल्पना इथे जशा स्पष्ट होतात तसेच त्यांचे उत्सुक वेगळे मन–त्याची आवस्थाही त्या स्पष्ट करतात.

'' अवघ्या त्रैलोक्याचा राजा
तोच हरी हा गोजीरवाणा ''

अशी सूचना प्रौढाना करतात. तर स्वतःची कल्पना ही मुले स्वतःच व्यक्त करतात.

'' नवलाईचीसृष्टी सारी आमच्यासाठी फुले
देवा तुझीया बागेमधली आम्ही चिमणी फुले ''

ईश्वराने हे जग निर्माण केले नाही तर ही आहे एक बाग व आपण आहोत त्यातील रम्य फुले.

राष्ट्रीय भावना मुलांच्या मनात रुजविली पाहिजे. ते कार्य त्यानी आपल्या परिने केले आहे.

'' प्रिय आम्हाला येथिल माती
जिथे हे पाणी झुळझुळते
प्रियकर ही डुलणारी शेते
प्रिय हे वारे सळसळते ''

भारतमाता आमची प्रियकर आहे. येथील माती, वारे यासाठी आम्ही प्राणाचेही तर्पण करायला हवे ही जाणीव याच बालपणात त्यानी निर्माणही केली आहे.

तात्पर्य– शांताबाईंच्या बालगीताचा एक अल्प पुनर्विचार येथे आहे. पण बालगीते लिहित असताना मनाची व विचाराची एक निश्चित बैठक कवयित्रीने ठेवली होती असेच म्हटले पाहिजे. वयाचा विचार करून भिन्न भिन्न वयाच्या भिन्न भिन्न गटाला त्यांनी ही बालगीते दिलेली आहेत. ज्यांच्यातून मनोरंजन, ज्ञान व सुसंस्काराची जाणीव होते.

❖

कोवळ्या उन्हातील - हिरवी आल्हाददायक कविता गोंदण

दुपार सुन्न करून पडलेली असते. कामाचे व्याप थांबलेले असतात. मन थोडेसं थकलेलं असते. एवढ्यात कानावर स्वर येतात– गोंदण. ती येते नवऱ्याचं नाव सांगत. आनंद कळा यातून रंगीत साज शरीरावरच तयार होतो. मन हिरवट होते. कोवळ्या उन्हात फिरल्यासारखं, शांताबाईंचा 'गोंदण' असेच सुख देऊन जातो. म. टाईम्स १ फेब्रु. १९७६ च्या अंकात या पुस्तकाचे परिक्षण करताना रेखा जोशी लिहीतात–

"गोंदण– सौंदर्य वाढविणारी कलासौंदर्याची आणि मानवी स्वभावाची निरनिराळी रुपे साकार करते. पण गोंदण्याच्या वेदनाचीही आठवण होते. तसेच शांताबाईंच्या या कविता संग्रहांचे स्वरूप! नाजूक, सुंदर, नजर खिळवून धरणाऱ्या पण वेदनेने मन अस्वस्थ करणाऱ्या कविता यात आढळतात."

माणसाची – विशेषतः स्त्रीची वेगवेगळी रुपे यात साकारलेली आहेत. कधी ही स्त्री स्वतःच्या बालपणीची चित्रे आठवते. आपल्या स्वप्नातल्या सखीला शोधण्याचा प्रयत्न करते. आटपाट नगरीची कहानी सांगते. हिरव्यागार ताटव्यातून हिंडत जाते किंवा भूतकाळाचा एक तुकडा नजरेस पडल्याने बेचैन होते. आपली सखी आपल्यासारखीच असेल म्हणून तिची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करते. 'खिडकीपाशी एक मुलगी' आपल्या शाळेतील आठवण काढते. पण हे बालपणीचे रम्य दिवस हरपलेत. या खिडकीबाहेरचे आभाळ अश्रूत विरघळले आहे आणि –

"माझे शब्द होतात मुके
गळ्यातच हुंदके अडतात"

पापणीभर पाण्यामध्ये शाळा
वर्ग, मुलगी बुडतात''

या रम्य बालपणात आजोबा, आजीच्या पैठणीच्या आठवणी डोकावतात. माजघरातल्या देव्हाऱ्याभोवती भातुकली, बाहुलीचे लग्न, सांगितल्या गेलेल्या गोष्टी. या सगळ्या आठवणी फेर धरून नाचताहेत. पण काळाने आपला हात सर्वांवर फिरवला आहे.

किती आठवू साठवू
अरे जुन्या देवपारा
तुझ्या माझ्याही वरून
किती गेल्या काळलाटा''

बालपणीच्या आठवणीतून जागे होताना प्रेमाची आठवण होते. हे सारे जीवन ओढून टाकणारे सर्वस्वाचे दान देऊन समर्पित झालेले आहे. परिस्थितीमुळे नंतर दोघांमध्ये अंतर किती वाढलेले असते. काळाच्या संदर्भात त्या शब्दांना अर्थ नसला तरी उच्चारलेले सारे शब्द निरर्थक नसतात. उलट–

''ते सारे सजून आले आहे
व्यक्तित्वातून
पावसाळचात अकारण उगवणारी
हिरवळ होऊन''

असे हे प्रेम साऱ्या व्यक्तीत्वातून सजले आहे, फुलून आले आहे. या प्रेमाची निळी गहराई, त्याची स्वप्नीलता, स्वर्गीयता, नजाकत नेमकी शब्दबद्ध केली जाते.

'' सूर गुंतले . . . मिटले . . .
लाल कमळ कळचात
एक पाऊल तळचात
एक पाऊल मळचात ''

प्रियकराचे आस्तित्व साऱ्या जीवनाला ओढून टाकते. सर्व दिशातून त्याचे आग्रही व्यक्तीमत्व उसळत असते. ही प्रेमाची तरलता अनुभवास येत असतानाही ती सत्यसृष्टीची वास्तवता विसरू शकत नाही. येणाऱ्या दिशाहीन हाकेसारख्या रात्री.

स्वच्छ, सोलीव, सरल, सत्य हळूच पुढे होते. तरीही कोण आले, कोण गेले याचे भान मात्र तिला रहात नाही. असे भान विसरणारी 'गोंदण' ही किमयागारी १९७५ मध्ये प्रसिद्ध झाली आहे.

❖

वैफल्याचा सूर

बालपणीच्या आठवणी आणि प्रेम यामागे सूर आहे तो वैफल्याचा ! सतत काही तरी हरवल्याची भावना जीवनाला ग्रासून टाकते. कळी कळी वेचताना सारे आयुष्य हातातून निसटत असल्यासारखे वाटते. एखादा शब्द, एखादा सूर 'स्मरणाच्या पार' नेऊन सोडतो. मोठ्या प्रयत्नाने हुंदका आवरावा लागतो. निर्वात क्षणी जीव घुसमटतो. कातरवेळ मनाला हुरहूर लावते. गेलेल्या असंख्य दिवसातून मन अस्वस्थ होते. 'मालभ' क्षितीजाच्या पार दृष्टी लावते. प्रत्येक सुकलेल्या पाकळीत असणारे, वेगवेगळे जीवन मनावर उदासीनतेचे सावट आणते. एकाकीपणा जीवनाला ग्रासून टाकतो. यातूनच स्वतःला अपरिचीत असणारे स्वतःचे अपरुप उभे राहते. सामोऱ्या येणाऱ्या चेहऱ्यांच्या जंगलातून स्वतःचाच चेहरा अनोखेरुप घेऊन प्रकट होतो. पडद्याआडून स्वतःचाच हुंदका ऐकू येतो. साऱ्या सृष्टीत स्वतःचे अस्तित्त्व रंगलेले दिसते.

" हा माझाच मला बहर दिसतो
विश्वात सामावला
आले लेवून रंग तेच हळवे
कित्येक जन्मातले ?

याची ओळख पटते. एखादा तिरका क्षण स्वतःच्या व्यक्तीमत्त्वाचा तिरका छेद घेतो. कधी तो तटस्थ राहू पाहतो.

मग न गवसणारे, गवसल्यासारखे वाटते. त्याचे लोट वेढून टाकतात. 'काळोखपाणी' मनावर पसरते. पाणी चांदण्यात गोंधळते.

' रितेच हात राहीले
स्मृती किती लोचुनी
निळा निळा समुद्र
गुढ मिटुनी जाय लोचुनी"

अचानकसे स्वतःचेच रुप सामोरे येत असते. त्या रुपात असते वैफल्य. या वैफल्याचा सूर ' गोंदण ' मध्ये आहे.

❖

गूढ उकलण्याचा यत्न

अशा स्वतःच स्वतःला उमगण्या मागचे गूढ उकलण्याचाही प्रयत्न केला जातो. " निरर्थकाच्या क्षणी " ' धून ' मधून ही गूढता उकलण्याचा प्रयत्न होतो. जीवनाबद्दल तटस्थतेची, तिऱ्हाईताची भूमिका बाळगली जाते. जगण्याचे भास अभास लांबतात. एकाकीपणा, सृष्टीची गूढता, मनात दाटणारी हुरहुर, माणसाची विविध रुपे, सारे काही वैफल्यग्रस्त बनलेले दिसते. उदासीनता, नैराश्य या कवितातून सतत डोकावते. जीवनातील हरवलेले रम्य क्षण, दिवस परत येऊ शकत नाहीत. म्हणून निर्माण होणारी खंत आणि जीवनाकडे पाहण्याचा उदासीन दृष्टिकोन व्यक्त होतो. ही उदासीनता केवळ दुःखामुळे नाही तर जीवनातील विविध अनुभवामुळे, तटस्थतेतून ती निर्माण झाली आहे. या उदासीनतेत हळवेपणाही आहे. निळे आकाश, हलणारी सळसळणारी पाने, समुद्र गंध, पाण्यात विरघळणारे चांदणे, अवती भोवती पसरणारी धून, स्वच्छ, सोलीव अढळ सत्य घेऊन येणारी रात्र मनाच्याही पैलतीरी गहन बोलणे, अशा नेमक्या प्रतिमातून शांताबाईंच्या कल्पना शब्दचित्र धारण करतात. माणूस एक बेटच राहतो. म्हणून त्या परखडपणे विषण्णतेने विचारतात.

" त्वचे मागील एकाकीपण
कधी सरते काय "

नेमक्या शब्दातील तरलता साधणाऱ्या आणि अंतरिक लयीत बद्ध असलेल्या या कविता मनात खोलवर पसरत जातात, खिन्नता दाटवितात. पण या तिऱ्हाईत जीवनातले, चेहऱ्याच्या जंगलातले ऊन कोपले आहे. अजून ओंजळ उत्सुक आणि फुले ताजीच आहेत. म्हणून, ' कहाणी सरेल तेव्हा सरणारी असली तरी कोवळचा उन्हातील हिरव्या सृष्टीप्रमाणे हे ' गोंदण ' आहे. '

❖

हिरवे स्वस्तिक : गोंदण

स्त्री ही जात्याच सौंदर्याची भोक्ती असते. गोंदण रेखून घेणे, तिला फार आवडते. ' मालन ' कविता या स्वरूपाने पाहता येईल. स्त्री–जीवनाचा उत्कृष्ट अविष्कार या कवितेत झाला आहे. गोरी मालन खिडकीजवळ उभी राहून ओंजळीत मुख घेऊन, क्षितिजावर डोळे जडावून माहेरच्या लोकांची वाट पाहते आहे. बालपणीचा धुसर प्रवाह, मंदमंद घिरट्या घेत तिच्या भोवती फिरतो आहे. उंच असा सखल माळ, एकटी वाट उल्लंघून ती पटकन आईलाही भेटते.

" धापा टाकीत आईच्या छातीला बिलगून
गिळू लागते कोसळते रडे अनावर "

बालपणीचे सागरगोटे, काचापाणी, भातुकलीच्या–

" खेळामधली इवली राजा आणि राणी अंगणाच्या
तुळशीजवळ रचलेल्या स्वप्नाच्या राशी सागरगोटे "

काचापाणी पण एवढ्यात हात जातो कपाळावर व आठवण होते गोंदवून घेतलेल्या स्वस्तिकाची ' आज त्या स्वस्तिकात मन गुंतून पडलं आहे.

चढून जाता पहिल्यारात्री माडीवरती
एकेक पायरी जिन्याची
झाली होती अलंग्य पर्वत "

सासुरवाशिणीचा दबलेला हुंदका जसा ' गोंदण ' मध्ये आहे. तसेच पहिल्यावहिल्या स्पर्शामधली भुलवण. लगीन चुड्यावर अवघडलेली असंख्य चित्रे या कवितेची नायिका जपते आहे. तिला जाणीव होते, कमरेला गाठ मारून जीवन जगणाऱ्या जुलमी स्त्रीपणाची, बालपणातील यक्षपुरी हळूहळू नाहीशी होते, संसाराचे ओझे पेलत ती हसत राहते. सांजसावल्या येत राहतात, मनावर, घरावर आणि ही मालन वाट पाहतच राहते.

" नसे यायचे तसे कुणी ही
कुणी न धाडिला सांगावा ही
तरी उभी खिडकीशी मालन
कठड्यावर टेकून कोणरे
ओंजळीत घेऊन मुख अपुले
बघत रहाते वाट सारखी
गणगोताची
माहेरीच्या गणगोताची

शांताबाईंच्या कवितेत स्वतःचे भावजीवन अधिक पद्धतीने मांडलेले आहे. या वैयक्तिक जीवनात स्त्रीमनाचा कानोसा आहे. सुखदुःखाचे निश्वास आहेत मावळणारी क्षितिजे, फुलणारी उषा शोधणारी, अर्घ्य जसा ओंजळीत धरावा तसा उभा शिणलेला जन्म ओंजळीत धरुन आपल्या उडून गेलेल्या रावाला शोधणारी स्वन सखी आहे. कळी कळी वेचताना संध्याकाळ होते. वाट अंधारात बुडून जाते वाटेचे वळण सर्पासारखे वाटू लागते आणि मनात एक घनदाट छाया पसरून राहते.

" चुकलेल्या गुरापरी जीवलागे हंबराया
कळी कळी वेचताना वेळ गेलीसे निघून
आता याच्या पुढे कधी व्हायचा हार गुंफून? "

खिडकीपाशी उभी राहणारी 'मुलगी' हे कवयित्रीचे स्वतःचे रुप आहे. घरटचाकडे पांखरे परतावीत, तशा आठवणी जाग्या होतात. लाल कौलाराचे छप्पर, बागेमधली फुले, गुलाबाच्या पाकळचा, खिडकीपाशी एक मुलगी स्वतःमध्येच गढलेली. गालावरती दोन्ही हात, नजर पुस्तकात बुडलेली. वास्तवात जीवनाभूती स्वतःमध्ये बघण्याची वृत्ती, एवढेच नव्हे तर शांताबाई स्वतःच 'स्व' चा शोध घेत राहतात. खिडकी बाहेरचे निळे आकाश, पाखरांची किलबिल अर्ध कच्ची स्वप्ने पाहिल्यानंतर-

" माझे शब्द होतात मुके, गळचातच हुंदके अडकतात
पापणी भर पाण्यामध्ये शाळा, वर्ग मुलगी बुडतात "

' खिडकीपाशी एक मुलगी ' ही कविता वाचताना कवयित्रीची आत्मलक्षी वृत्ती जाणवते. भातुकलीच्या खेळातील भींत, चिमुकला संसार, जीर्ण झालेला देवपाट, पाटाभोवती बसणारी पंगत सारे बालपणच नजरेसमोर उभे राहते पण आज ते भोगता येत नाही. डोळचातील अश्रूत दिसणाऱ्या प्रतिबिंबात फक्त भोगायचे असते.

शांताबाईंचे स्मरण ठिणगी डसावी तसे डसत राहते. स्मरणसुद्धा आज होत नाही. अशा त्या जुन्या आठवणी. चंद्राला तडा गेलेला असतो. हृदयाचा बांध घुसमटल्या श्वासांनी फुटलेला असतो. लिंबाच्या पालवीत चंद्रबिंब थरथरते व डोळचाच्या काठाशी एक थेंब उभा राहतो.

" पापणीत जपले तरी
मावळले चंद्र किती
विरघळल्या चांदण्यात
मनपाने थरथरती "

शांताबाईंच्या कवितेत वैयक्तिक भावजीवनाला काही वेळा अध्यात्मिक रुप प्राप्त झालेले आहे. आत्मा संथ ज्योतीसारखा तेवू लागतो. जाईची फुले चांदण्यासारखी हसत असतात. वारा शीतचंदन बनतो व कवयित्री स्वतःचीच उरत नाही.

" होता देह ही राहिला पण कुठे माझा म्हणाया मला ?
तो झाला जलबिंदू एक, विरून गेलाच मातीमध्ये
झाले काय कसे मला न कळले, ते स्वप्न की वास्तव ?
गेला तो क्षण मावलून, लहरी ती सागराला मिळे "

वास्तव स्वप्नाचा आभास नेहमी त्यांच्या कवितेत वावरताना आपल्याला दिसतो.

" धापा टाकीत आईच्या छातीला बिलगून
गिळू लागते कोसळते रडे अनावर "

बालपणीचे सागरगोटे, काचापाणी, भातुकलीच्या–

" खेळामधली इवली राजा आणि राणी अंगणाच्या
तुळशीजवळ रचलेल्या स्वप्नाच्या राशी सागरगोटे "

काचापाणी पण एवढ्यात हात जातो कपाळावर व आठवण होते गोंदवून घेतलेल्या स्वस्तिकाची ' आज त्या स्वस्तिकात मन गुंतून पडलं आहे.

चढून जाता पहिल्यारात्री माडीवरती
एकेक पायरी जिन्याची
झाली होती अलंग्य पर्वत "

सासुरवाशिणीचा दबलेला हुंदका जसा ' गोंदण ' मध्ये आहे. तसेच पहिल्यावहिल्या स्पर्शामधली भुलवण. लगीन चुड्यावर अवघडलेली असंख्य चित्रे या कवितेची नायिका जपते आहे. तिला जाणीव होते, कमरेला गाठ मारून जीवन जगणाऱ्या जुलमी स्त्रीपणाची, बालपणातील यक्षपुरी हळूहळू नाहीशी होते, संसाराचे ओझे पेलत ती हसत राहते. सांजसावल्या येत राहतात, मनावर, घरावर आणि ही मालन वाट पाहतच राहते.

" नसे यायचे तसे कुणी ही
कुणी न धाडिला सांगावा ही
तरी उभी खिडकीशी मालन
कठड्यावर टेकून कोणरे
ओंजळीत घेऊन मुख अपुले
बघत रहाते वाट सारखी
गणगोताची
माहेरीच्या गणगोताची

शांताबाईंच्या कवितेत स्वतःचे भावजीवन अधिक पद्धतीने मांडलेले आहे. या वैयक्तिक जीवनात स्त्रीमनाचा कानोसा आहे. सुखदुःखाचे निश्वास आहेत मावळणारी क्षितिजे, फुलणारी उषा शोधणारी, अर्घ्य जसा ओंजळीत धरावा तसा उभा शिणलेला जन्म ओंजळीत धरुन आपल्या उडून गेलेल्या रावाला शोधणारी स्वन सखी आहे. कळी कळी वेचताना संध्याकाळ होते. वाट अंधारात बुडून जाते वाटेचे वळण सर्पासारखे वाटू लागते आणि मनात एक घनदाट छाया पसरून राहते.

" चुकलेल्या गुरापरी जीवलागे हंबराया
कळी कळी वेचताना वेळ गेलीसे निघून
आता याच्या पुढे कधी व्हायचा हार गुंफून? "

खिडकीपाशी उभी राहणारी 'मुलगी' हे कवयित्रीचे स्वतःचे रुप आहे. घरटचाकडे पांखरे परतावीत, तशा आठवणी जाग्या होतात. लाल कौलाराचे छप्पर, बागेमधली फुले, गुलाबाच्या पाकळ्या, खिडकीपाशी एक मुलगी स्वतःमध्येच गढलेली. गालावरती दोन्ही हात, नजर पुस्तकात बुडलेली. वास्तवात जीवनाभूती स्वतःमध्ये बघण्याची वृत्ती, एवढेच नव्हे तर शांताबाई स्वतःच 'स्व' चा शोध घेत राहतात. खिडकी बाहेरचे निळे आकाश, पाखरांची किलबिल अर्ध कच्ची स्वप्ने पाहिल्यानंतर-

" माझे शब्द होतात मुके, गळ्यातच हुंदके अडकतात
पापणी भर पाण्यामध्ये शाळा, वर्ग मुलगी बुडतात "

' खिडकीपाशी एक मुलगी ' ही कविता वाचताना कवयित्रीची आत्मलक्षी वृत्ती जाणवते. भातुकलीच्या खेळातील भींत, चिमुकला संसार, जीर्ण झालेला देवपाट, पाटाभोवती बसणारी पंगत सारे बालपणच नजरेसमोर उभे राहते पण आज ते भोगता येत नाही. डोळ्यातील अश्रूत दिसणाऱ्या प्रतिबिंबात फक्त भोगायचे असते.

शांताबाईंचे स्मरण ठिणगी डसावी तसे डसत राहते. स्मरणसुद्धा आज होत नाही. अशा त्या जुन्या आठवणी. चंद्राला तडा गेलेला असतो. हृदयाचा बांध घुसमटल्या श्वासांनी फुटलेला असतो. लिंबाच्या पालवीत चंद्रबिंब थरथरते व डोळ्याच्या काठाशी एक थेंब उभा राहतो.

" पापणीत जपले तरी
मावळले चंद्र किती
विरघळल्या चांदण्यात
मनपाने थरथरती "

शांताबाईंच्या कवितेत वैयक्तिक भावजीवनाला काही वेळा अध्यात्मिक रुप प्राप्त झालेले आहे. आत्मा संथ ज्योतीसारखा तेवू लागतो. जाईची फुले चांदण्यासारखी हसत असतात. वारा शीतचंदन बनतो व कवयित्री स्वतःचीच उरत नाही.

" होता देह ही राहिला पण कुठे माझा म्हणाया मला ?
तो झाला जलबिंदू एक, विरून गेलाच मातीमध्ये
झाले काय कसे मला न कळले, ते स्वप्न की वास्तव ?
गेला तो क्षण मावलून, लहरी ती सागराला मिळे "

वास्तव स्वप्नाचा आभास नेहमी त्यांच्या कवितेत वावरताना आपल्याला दिसतो.

निसर्गातून स्वतःचा शोध घेण्याची किमया इंदिरा संतांच्या प्रमाणेच त्यांच्या ठिकाणीही आहे. चारी दिशांनी आभाळ अंधारून आलेले असते, पायातळीची जमीन आकसते. मनात पुसटशा खुणा असतात. उरलेले आयुष्य धुसर वाटत असते. दूर काळोखात विहीन सावल्या दाटलेल्या असतात. त्या सावल्यात कवयित्री असते पण तिलाच स्वतःची ओळख पटत नाही. कारण–

" तुटलेली जीभ शिवलेले ओठ
गळ्याशी दाटतो कडू कडू घोट
स्वप्नामध्ये जसा जीव कासावीस
नकळत गेला बुडूनिया दिस "

स्वप्नामध्येही कवयित्रीला मिटलेल्या सूरांचे लाल कमळ दिसते. कधीतरी लग्नाची शपथ घेतली होती, ती शपथ आज आठवते. खूप प्रयासाने हुंदका आवरावा लागतो. मनात एकाकी तार कंपत राहते. दोन मनांचे अविरत स्फंदन त्यांच्या काही कवितातून आपल्याला दिसत राहते.

शांताबाईंची कविता हिवाळ्यातील कोवळ्या उन्हासारखी असली तरी विशादाचे सुस्कारे त्यात अधिक आहेत. हरवलेल्या दूरस्थ जगाची जाणीव आहे. शेकडो चिमुकले चंद्र, पायाखाली वाहणारे वारे, खळखळणारे पाणी याच्यातून एक रितेपणाची जाणीव आहे. कितीतरी दिवसाने भोवतालची हवा निवलेली असते. स्वच्छ धुतल्यासारखा काचेप्रमाणे प्रकाश असतो. जीव मासोळी होऊन फिरत रहातो व कवयित्री एकाकी बनते.

झरे पाझर कुठून कसे
रितेपणाला येतात भरून ?
दयावंत हे दान घेताना
नको कसला अर्थ विचार

स्वतःची ओळख स्वतःला पटणे यासारखे अप्रूप इथे आहे. सावली उन्हाला मिळते त्याच वेळेला शब्दातीत भाषा संपते. अर्धाजन्म उन्हात, अर्धा सावलीत व एके दिवशी उमजून जाते.

" माझी मला घडे भेट
लक्ष युगांच्या नंतर "

" सारे संपले तांडव " या कवितेत वैयक्तिक अनुभूति असलीतरी हळवेपणाची जाणीव आहे. न बोलता सारे दुःख सहन केले पाहिजे. झाड झुडूपलेले होते, उभ्या आडव्या वाऱ्यानी प्राण कासावीस झाला, हुंदक्यानी शहाऱ्यानी. समाज, प्रियकर व स्वतः कवयित्री इथे उभी दिसते. चिवट दुःखातून पहाड

पेलण्याची ताकद तिला प्राप्त होते. हा दुःखाचा पहाड परत त्याचे स्मरणही होत नाही, असे वाटत राहते. ओसरलेल्या वादळाची पुन्हा कशाला आठवण ? पातीवरती मनाच्या दंव जपून साठवणं, दुःख जपणे प्रियच वाटते.

" उच्चारले सारे शब्द, दिलेली आश्वासने
भरून आलेला ऊर, डोळ्यात दाटलेले पाणी आज सारे "

ठिसूळ ठरले आहे. दोघांमधले अन्तर काळाच्या संदर्भात ज्याला अर्थच उरला नाही. श्वाससुद्धा विरून गेला. अनेक जन्माची कैद कवयित्री भोगते आहे. माझ्यापासून मी दूर झाले. पायवाट, रस्ते धुंडाळले, जिथं जिथं गेले तिथं भिती आड आल्या. चक्रव्यूह होता, गूढ काळोखाचे पाणी ठिबकत होते. शरीर व आत्मा यांचीच झूंज येथे आहे.

" कैद अनंत जन्माची वाटे घटका घटका
काय माझ्यातून मला नाहीच कधी सुटकारे "

असा कवयित्रीचा स्वतःला प्रश्न आहे. हा चेहरा माझा नाही तो परंपरेने लाभला आहे. कुणाचा तरी दारुण शाप ती स्वतः भोगते आहे. यातूनच वाटत राहते–

चेहरा जून होता होता एके दिवशी गळून पडेल
जुनाट वंशवृक्षाचे एक पान आणखी झडेल "

' मृत्यू ' हा झाडावरून गळणाऱ्या पानासारखाच आहे. याचा सारखा अर्थ त्या देत राहतात. ' एकटेपण ' हा आपल्याला जन्मापासून लाभलेला शाप आहे. असेच त्याना वाटते. रस्त्यावर अफाट गर्दी असते तरीही पाऊलवाट एकटयाचीच असते. झाकल्या पापणीमागे ज्याचे त्याचे खाजगी जग उभे असते. दुःख, तगमग यातूनच अंतरंगात आत्मधून साकारत राहते.

एकटेपणात विरघळून गेलेली दुनिया. हे एकटेपणाचे वर्तूळ आपणच आपल्या भोवती तयार केले. कारण, आभाळ तोंड फिरवून बसलेले असते. दिशा बंद होतात. सारे शब्द मुके झालेले असतात. आत्म्याच्या अलौकिक जवळीकीच्याही सीमा असतात. अशावेळी प्रश्न पडतो.

" अशा वेळी करशील काय? हातचा हातच सोडून घेशील?
अभिमानाने ताठ असशील, की पडून, रडशील?

आपल्या कवितेतून शांताबाई बोलत राहतात. ही भाषा एवढी जिव्हाळ्याची असते की, मनाचे कान करून ऐकत रहावेसे वाटते.

कवयित्रीला साधेपणातच गंमत वाटते. पाकळ्या, पराग, देठ, फूल अलग अलग करता काहीच अर्थ उरत नाही. जग हे दोन पावलाचेच असते.थोडीशी हिरवळ

पुढे असते, वाळवंट, कोरडे रेताड अशा या निर्वात पोकळीत प्राण गुदमरून जातात प्रत्येकाने मुखवटा पांघरलेला असतो. एका थेंबावरूनच सागराचा अर्थ कळतो. सहज खूण पटते. तसाच एक शब्द कवयित्रीला हवा आहे पण "तोच" साधा शब्द आज हरवून गेला आहे.

कवयित्रीचे दुःख समंजस आहे. द्वाही फिरवित ते कधीच आले नाही. कधी आले आणि कधी गेले हे कळलेच नाही. पण पुसटशी खूण फिकट चांदण्याची, मंदावलेल्या उन्हाची अंतःकरणात राहून गेली.

विफल प्रीती परत सांधेल असा हट्टाहास कवियित्रीला वाटतो. दोघांचे शब्द थांबा होऊन उभे असतात. निस्तब्ध डोहावर कोणीतरी पूल बांधला पाहिजे. बिलगणारी बोटे शोधली पाहिजे. कन्हणारे सूर, भटकणारे पाय, त्वचेमागील एकाकीपण सरेल काय असा प्रश्न कवयित्री विचारते. प्रियकरासाठी रक्तबंबाळ होण्याची अजूनही इच्छा आहे. शब्दामागे अर्थ उभा असतो. रक्तबंबाळ होऊन त्याला भिडावेसे वाटते व कवयित्री शब्दातूनच बोलत राहते.

शब्द म्हणजे केवळ एकमेकापासून तुटलेली, निर्बाड अरण्ये असतात. शब्द म्हणजे केवळ तारा, निर्जिव बीजवाहिन्या, क्षणकाळ पेटणाऱ्या, एरवी मनात विझलेल्या, धुळीमध्ये घनघोर निजलेल्या, शब्दांना आपण परस्परांशी भिडतो आणि लढतो पण शब्दाना शब्द भेटतीलच असे नाही. शब्दांनी शब्द पेटतीलच असे नाही. हेच दुःख आहे. म्हणून कवयित्री कित्येक शब्द पुरून ठेवते, मातीखाली, त्यावेळी आभाळातून वांझोटे ढग सरकत असतात. एक अखंड अनुभव कालातीत सामावलेला असतो. एक धावते वादळ अस्फूट ओले थेंब गालावरून फिरणाऱ्या पिसाटासारखे वाटत असतात. ढग येतात, जातात व शब्द.

" बीजामधले अंकूर तगमगतात प्रकाशासाठी
शब्द पडून आहेत खोल भूमिगत प्रवाहाकाठी "

शांताबाई शब्दांची दुनिया एकलेपणाच्या दुःखात उभी करतात. खुळचा आंधळचा बोटांनी त्यांचा प्रवाह सुरू असतो. मध्येच ओल्या आठवणी, दुरस्थ दुःखे मूढ पुतळे, वाळली फुले, विव्हल चांदणे पडलेला रस्ता, भंगलेली चित्रे याचे वेढे पडलेले असतात व कवयित्रीपुढे प्रश्न पडतो.

दारे लावून सर्व येथ मजला केले कोणी बंध ? का?
नाही मी रडले, कुठून मग हा आला बरे हुंदका ?

एका हुंदक्यातच कवयित्रीचे सारे दुःख स्पष्ट होते. शब्दांनाही खरा अर्थ कळतो असे नाही. विश्वातील सुंदर रहस्ये विश्वाला व्यापून असतात. वाटते ओंजळीत सागर रिता करावा. डोळ्यांनी क्षितिजाला प्राशन करावे पण मातीचे घर असते. त्यात भडकणारी, विझणारी ज्योत असते. जाता जाता फुलांना स्पर्श

करणारा मृत्यू असतो व कवयित्रीला वाटते

" मी पुष्पे हृदयी धरुन बघते गंधांत कोंडावया
मातीच्या पणतीत भंगूर बघे ठेवावया सूर्य मी "

वेडयासारखी कवयित्री हिंडत रहाते. त्यावेळी दिसते वृक्षाच्या मुखावरील स्मित. पानांची हळवी कुजबुज, शीळ भरणारा वारा, श्वासाचे हळवे तवंग पाण्यावर उमटत असतात व कवयित्रीचा उर भरून येत असतो. त्याचवेळी माझी ओळख मला पटली असं ती म्हणते, कारण, माझेपण विसरून मी यात सामावलेली असते

" हा माझाच मला बहार दिसतो विश्वात सामावला
आले लेवून रंग तेच हळवे कित्येक जन्मातले "

विश्वात कवयित्री स्वतःला शोधत रहाते.

भूतकाळातून वर्तमान निपजतो. एकामागून एक वर्ष जातात. धुक्क्यासारखे बालपण दूर होते. काही वेळा पायाखालची वाट बदलते, तर काही वेळा मिटून जाते. जुने वृक्ष नकोसे वाटू लागतात. व याचवेळी मन बंड करून उठते. " देऊ सोडून वाट आणि घुसू या आडरानामध्ये " असे प्रश्न विचारते. व यातूनच उत्तर मिळते अखंड चालणे.

" आता एकच सत्य तेच उरले जाणीव ही व्यापूनी
भूमि आणिक पाय आणि गति ही नाही तिला शेवट "

काही वेळा स्वःतचे रक्त स्वतःच्या वेदनेशी बेइमान झाले. असे शांताबाईंना वाटत असते. त्या म्हणतात, ' मी रक्तातून सूर्य रुजवला, चांदणे प्राशन केले, विजेचे वार झेलले, माझा जीवनरुपी वृक्ष उश्वस्त झाला. मला जर समजले असते. मी दुबळी आहे तर कधीच दान मागितले नसते. माझे वस्त्र, विशिर्ण जीर्ण अपूरे, भिक्षा तुझी घ्यावया कारण,

" नाही मी येथली, तसेच तिथली, आधार सारा तूटे
हे घेऊनी दुभंगले पण उरी जाऊ आता मी कोठे ?

व सावलीचा शोध करत त्या चालतच रहातात.

अजूनही प्रियकराची सावली उन्हात मिळते का याची प्रतिक्षा शातांबाई करतात. जीवाला धाप वगैरे लागलेली अगते. जुना सगळा प्रदेश हरवलेला असतो चालावे पुढे तर नभाची निळी रेषा पुढे असते.

" होते आखिव विश्व बालपणाचे 'आभाळ' होते खुजे
होता बाहीर आत एक भरला आनंद भोळा खुळा
होता एकच रंगदार हिरवा होती फुले पाकळ्या
होते स्निग्ध पराग कोमलपणे देहावरी वर्षत "

बालपणीच्या विश्वाची आठवण नेहमीच शांताबाईंच्या कवितेतून ठिबकत रहाते. आपण जीवन कसे जलली याचा शोध त्या करतात. पण उत्तर सापडत नाही. यावेळी सूर्य कठोर असतो, वाऱ्याला अग्नी फुटतो, डोळ्यातील बाहुली फुटू लानते. जेथे अफाट सूर्याचे उन पसरलेले असते तिथे मात्र तुझी सावली असते. प्रेमभंगाचे अतिव दुःख विसरुन सुद्धा शांताबाई अजूनही त्यांच्या चरणाला शोधत रहातात. हिरव्यागार ताटव्यातून ही त्यांची कविता मनाच्या व जीवनाच्या दोन अवस्था स्पष्ट करणारी आहे. हिरव्यागार ताटव्यातून हिंडणाऱ्या एका मुलीला माना उंचावून गुलाबाने प्रश्न विचारले होते. दूरातून लडीवाळ आवाहन आले होते वाऱ्याने वात्सल्याने गाल कुस्करला होता पण आज ताटवे स्तब्ध झालेत. गुलाबाच्या पाकळ्या गळू लागल्या आहेत. स्वर विरलेत आणि पन्नाशी उलटून पोरच राहिलेली कवयित्री घरकूल, भातूकलीचा संसार शोधते आहे. जीवनाची वाटचाल चालून ती खूप पुढे आली आहे. अजूनही तिची पावले थकलेली नाही. गोष्टीतले राक्षस अजूनही तिला संकट वाटतात. ज्यांच्याशी तिने गवताच्या तरबाटीने मुक्त बल केला होता, कठीण प्रश्नही तिने सोपे केले होते. गुंतागुंत चौकटीत बसवलेली होती. चांदण्यात सारेच नितळून जावे तसे बालपण निघून गेले. व आज ती हताश झाली आहे. मुठीतले प्राजक्त फुल कोमेजून गेला आहे. जीवाला विरंगुळा लाभावा, म्हणून ती जुने गाणे गात बसते. आज गोड गळा उरला नाही. केस पिकलेत पन्नाशी उलटली आहे. तरी ही शांताबाई स्वतःचा शोध घेत रहातात.

गोंदण ह्या संग्रहाचे वैशिष्ठ्ये आपणाला मानावे लागेल. शांताबाईंची कविता अधिक आंतर्मुख झाली आहे. ती स्वतःशी बोलते आहे. रस्त्यावरुन गर्दी संगे वाहताना ती एकटीच असते, एकांतात एकटीच असते. एकांतात एकटीच, पांढऱ्या शुभ्र ढगासह प्रवास करताना काळ्याभोर डोहात बुडताना ती एकटीच असते. मुख उमलत्या कमळासारखे शांत, तृप्त, स्वयमग्न झुळझुळणाऱ्या वाऱ्यासारखे श्वसन चालू असते. मनातल्या मनात खूप काही घडत असते मोडत असते. भोवताली माणसे गोळा असतात. तिचे उजवे पाऊल अलगद ताल देत असते. पण,

" स्वतःमध्ये खोल खोल अशीच ती रुजत जाते
हिरवागार सुर होऊन अवघेपणी प्रकट होते "

अबोल प्रीती केली याची जाणीव त्याला नव्हती. तरीही हा प्रेमभंगच होता. ढगाळलेल्या आभाळासारखे तिचे मन होते.

" डोक्यावरून पदर घट्ट दातीत्याचा शेव
दोन मोजक्या शब्दांची कायम देवघेव "

एकदा जीना उतरताना तिने सहज पाठीमागे वळून पाहीले. काय पाहीले ? ते तिलाही कळले नाही. हा जीना आयुष्याचा आहे. काळोखात गडप होऊन रडणारी फुटून फुटून हमसून उमसून चार चार दिवस भकास होणारी आवंढा गिळत मुकाट बसलेली कवयित्री फक्त दुःखासाठी जगत होती असे दिसते.

" फट्ट कपाळाच्या मागे सारे काही दडवून
उजाड डोळ्यामध्ये तिने चंद्र टाकला वुडवून "

आज बाईंची अवस्था वेड्यासारखी झाली आहे. दूरच्या ढगावर तिने दृष्टी लावलेली असते.

" दारावरून प्रेत गेलं तिला आलं हंसू
धसाधसा पदरानेच गाल लागली पुसू "

स्वतःचेच दुःख शांताबाई स्वतःच भोगत आहेत. हे जीवन जगत असताना भावूक व व्यावहारिक अशा त्यांच्या दोन प्रतिमा असतात. मावळत्यां किरणांत चमकणारे पाणी, अस्तोमुख झालेला सूर्य व अलीकडच्या काठाशी या दोघी उभ्या असतात. या दोघी म्हणजेच कवयित्रीचे रूप. यातील, प्रत्येकाचे जीवन खाजगी आणि वेगळं आहे. क्षणापुरती मनमोकळी असणारी मावळत्या सूर्याला अनोळख्या देवळाला अपरिचित रस्त्याला साक्षी ठेवून जीवन जगणारी आहे. हे जीवन जगत असताना जमिनीतून आभाळाला भिडलेले सरळ वृक्ष दिसतात. उलटचा विहिरीचा तळ, गहन गूड सावल्या, हेलकावणाऱ्या फांद्या, वेलींच्या हिरव्या नागिणी, हलक्या कवडशांचे झळझळणारे रत्नमनी हे सारेच कवयित्रीला बधीर असतात. गिळून टाकणारी शांतता, रागीट परकेपण हिरव्या रानातही धग जाणवत असते. व जीवन म्हणजे एक चक्रव्यूह भासत असतो.

" माझ्यासाठीच वळणावर टपून होते हे रान ?
इथले पान पान एक सांकेतिक लिपी भयान
वाटते कुठल्याही झाडा आडून चमकती हिंस्त्र डोळे
तानला जाईल तीर कामठा सुटेल विषाचा बान "

निसर्गाने जणू आपल्या विरूद्ध कटच रचला आहे. आपली अवस्था कळसूत्री बाहुलीप्रमाणे आहे. सूर्य सुमनाचा वसा घेतलेली, आंधळचा वेड्या वृत्ताचा वारसा लाभलेली, सूर्य माझे विश्व आता सूर्य माझे गणनही. अशी कवयित्री चालत राहिलेली आहे. ही वाट एकाकी वृत्ताची आहे. सोबतीला कुणीही नाही व यातूनच दिव्यत्त्वाचा वेध कवयित्री घेते.

" आणि आता सूर्य मी हा भेद राहिला नाही.
या परागातुन त्याला उगवताना त्याला मी पाहिला.

शाताबाईच्या कवितेत एकलेपणच फार आहे. मुकेपणाने उंच चाललेल्या पदचिन्हांची आठवण त्यांची कविता वाचल्यानंतर होते. सराटा कसा असतो ते कवत्रिला आठवत नाही. बालपण आडगावात खेड्यात गेलेले असते. काटचा-कुटचातून दगड गोटचातून लहानपणी तळपावलावर सराटे उमटलेले असतात. आज कवयित्री डांबरी रस्त्यावरून चालते आहे रस्त्याचे सराटे देहावर नाहीत पण-

" एखाद्या रात्री पहिल्या झोपेतून अचानक जाग आल्यावर
सारे अंथरूनच एक अजस्त्र सराटा कसे बनते ?

मीलनाचे अतिव सुख कवयित्रीने उपभोगले आहे. त्यामुळे अंथरून सराटचा सारख भासते.

पुनर्जन्मावरती शांताबाईंचा विश्वास आहे. आपले नाते झाडाशी आहे कारण गेल्या जन्मी आपण झाडच होतो असेच त्यांना म्हणायचे आहे.

" मातीचे झाड–झाडाची मी–माझी पुन्हा माती
याच्या पानावरच्या रेषा माझ्या तळहाती "

हे झाड जणू आपल्या रक्तातच रुजले आहे. ही कविता (हे एक झाड आहे) प्रवासात कवयित्रीला सुचली. अशी माझी कविता फुलते. या लेखात त्यांनी कबुली दिली आहे. एवढेच नव्हे तर त्यांना वाटत रहाते.

" कधीतरी एके दिवशी मीच झाड होईन
पानामधून ओळखीचे जुने गाणे गाईन "

झाडाशी त्यांचे असणारे नाते गूढता स्पष्ट करणारे आहे.

' आटपाट ' कवितेत दुःखाचे त्या सूचन करतात. जीवन ही एक आटपाट नगरीच त्यांना वाटते. जीवनाची वाटचाल आपण कशी चालत आलो, हे कळत नाही. गुदमरलेल्या गळचातील गीत अजूनही दिसते आहे. भरलेल्या आभाळात खिन्न सांज झुरते आहे व प्रश्नचिन्हाने कवयित्री दुःखीत प्रश्न विचारते आहे.

" आटपाट नगराचा
मार्ग वाहणीचा
कोठे तो शेवटल्या
गुढ कहाणीचा ?"

शेवटच्या ओळीत असणाऱ्या प्रश्नचिन्हाने दुःख अधिकच सूचित होते. मग हे दुःख मौनातच साठते, रस्ताही गोंधळून जातो. गर्भवती हवा घाबरते. मनात खूप बोलायचं असतं. पण गेलेल्या असंख्य दिवसातून कवयित्री अज्ञाताचा वेध घेत रहाते सुनेपणात काही क्षण जातात.

" अर्ध्यात मोडून पडली चित्रे अवशेष कधी घरती फेर
एकच एक निरर्थण दाटून रहाते आत बाहेर
विजनामध्ये बुडून गेल्या विजनामधल्या पाऊलवाटा
विष्पर्ण झालेल्या गुलाबासंगे बोथट होऊन झडला काटा "

आमचे संत आपल्या भावनेशी व शब्दाशी जसे प्रामाणिक राहिलेत तीच अवस्था शांताबाईची आहे. दुःखामध्ये सुद्धा त्याना आठवते.

" चूकून कधी प्रिय कवितेची अर्धिमुर्धी ओळ ओठात येई
शब्दच सारे बनती धुके पुढले मागले दिसेना काही "

या उदास संध्याकाळी सारे काही वाया गेल्यासारखे वाटते व स्वतःचा आत्मा प्रामाणिकपणे जपणारी कवयित्री

" वाहत्या जळी पायतळीची निसटते आहे वाळू सारखी
भरल्या डोळचांनी बिंब पहात माझी सावली होते पारखी "

अहोरात्र नसानसातील धडपड, गद्गदून येणारी कड देहावरून जाणारे ऋतू, भूईवरील असंख्य सावल्या व अनवाणी पायाची गाणे गुणगुणत हिंडणारी कवकित्री वाचकांनाही श्वास रोखायला लावते.

अधून मधून प्रियकराचा पुसट श्वास कवयित्रीला जाणतो आहे. वेशीवरचा प्रचंड पिंपळ आज खूजा झाल्याचा दिसतो. सळसळणारी पाने, न समजणारी भाषा बोलतात. विहीरीमधून एखादी जखम ठठाकत असते. दगडविटात पाय रोवून पडका वाडा उभा असतो. प्रत्येक जुन्या धडावरती नवीन चेहरा असतो व त्यातूनच तुझी आठवण येते.

" पावलावाचून पाय रव दचकणारे भास
पाठीवरती जाणवतो पुसट कुणाचा श्वास "

आयुष्याचा उतार मार्गाला लागलेली प्रियतमा स्वतःच्या दुःखाशी प्रामाणिक राहून प्रियकराची आठवण ठेवत आहे.

आज रस्त्यावर एखादा क्षण विरखूरतो. मुंग्यासारख्या मोटारी पळत असतात. माणसे स्प्रींगसारखी वाटतात व याच वेळी कवयित्री स्वतःला–

" माझ्या अंतस्थ स्वप्नातुन मीच मला जागे केले
भयावह प्रारब्धात मीच मला भिरकून दिले."

स्वतःच्या दुःखाशी बाई प्रामाणिक आहेत. आतल्या आत रक्तवेगाने प्राण तडफडतो आहे व दुःखाला कुडीमयला लालभडक गुलाब, एक तटस्थ साक्षीदार आहे. वर्तमानकाळात चालता चालता भूतकाळावा मागोवा कवयित्री घेते. जुन्या आठवणीचे प्रचंड वादळ भोवती घोंगावत असते. भूतकाळाचा एकेक तुकडा कापून

ठेवलेला असतो. एका अर्धवट उघड्या दारातून चमकणारा टोप पदर दिसतो. इथल्या चुलीवर सनातन अन्न शिजत असते. भाकरीच्या खरपूस घासात बाळपण रुजत असते. कवयित्री शहरात रहाते पण तिचे मन मात्र दूर भूतकाळात जुन्या वास्तुत हरवून बसलेले असते. या थकलेल्या दिवसात असाही एकादा दिवस येतो.

" या क्षणी मी पहाते आहे फक्त हे निळे भोर आभाळ
झाड, वाट, उन, वेल, फुलपाखरू, ढग, बगळ्यांची माळ "

हरवलेल्या चित्रांना बालपणासारखीच कवयित्री शोधत रहाते. खिडकीखाली उमलणारी मोगऱ्यांची फुले, आटलेले सूर्य तेज प्रकाशाची केंद्रे, अर्ध विस्मृत आठवणी, स्वप्नातील धूसरपण, गडद रात्री या सर्वातूनच कवयित्री पसरत रहाते. तिला वाटते यातच जीवन स्तोत्र आहे.

"हे भरले पण झाकून ठेवीन माझ्या दक्ष पापण्यांनी
आतल्या काळोखात उमलतील, मोगऱ्यासारखी शुभ्रगाणी

स्वतःच्या देहाची स्वतःलाच सावली घेता येत नाही. भर दुपारी रस्त्याच्या कडेला कवयित्री उभी असते. पाठीमागे एक झाड, त्याची दूरवर पसरलेली सावली. झाडाचा काळा बुंधा, काळ्या करड्या फांद्या, हिरवीगार पाने, निळा जांभळा मोहेर, काळ्या वंखाचा फांदीवरील कावळा, साऱ्या काळचा रंगाची किमया इथे आहे. बुंधा काळा, फांद्या काळचा, पालवी काळी, मोहर काळा कारण काळेपणातच झाड एकवटलेले असते. काळा रंग प्रतिक रुपाने उरतो व कवयित्रीचे दुःख मन घुसमटून टाकते.

' ऐन दुपारी माथा सूर्य–पायाखाली फुटली लाही
तरी सारे दुःसह होते असे म्हणता येणार नाही '

जीवनाचा प्रवास करत असताना दुर्गम कडेच अधिक लागलेले असतात. वाट अवघड असते. कर्कश जाळीमधून गूढ हुंकार येतो. गर्द जंजाळात स्वतःचीच पावले हरवलीत की काय असे वाटू लागते पण ओळखीची गवतपाती हसू लागतात.

" दगडालाही फुटला पान्या माझ्या कोरड्या ओठासाठी
वत्सल वारा देवासारखा भरुन होता पुढे पाठी "

जडावलेल्या श्वासाची हळव्या उन्हात चालणारी कवयित्री क्षितिजाला टेकून कपाळावरचा घाम पुसते.

हरवून माझी वाट मी कुठं येऊन पोचले ? असाही प्रश्न पडतो. फुलांचे दगड होतात. पक्षी मुका होतो. दूरदूरची क्षितिजे खुणावत असतात. पण,

' हिरवेपणा हरवून या झाडे उभी परक्यासारखी
निस्तब्ध क्रूर नकार साकार आडवा कोणी धरी

फुटला न ओठी हुंदका का तोच कोणी झेलला
वळणातुनी वळतो पुन्हा रस्ता कुठे हा चालला ?

माणसे संकेत पाळताना दिसतील असे नाही. अश्रु मात्र माणसाशी कधी बेईमान होत नाहीत. जीवनाच्या या प्रवासात कोण आले, कोण गेले ! कधी उमगलेच नाही. ओळखीचा भास मात्र शेवटपर्यंत तरळत राहिला. हलणारा पडदा फक्त हलत राहिला. त्याने ओळख दिली नाही.

मधून मधून कवयित्रीला भास होत राहतात. मधूनच हंसण्याचा, शीळेचा भास होतो. मोकळ्या वाऱ्यातून कापणारा सूर येकू येतो. काळीज धडधडू लागते. उरात भीती दाटते. स्वप्न की जागृती ते कळेना. माझी अशीच अवस्था होते.

' कोण आले कोण गेले भेट ही झाली कशी ?
न कळत डोळ्यात माझ्या आंसवे आली कशी ?
पाळला संकेत कोणी कोणत्या जन्मातला ?

इथे संकेत अश्रू पाळतात. तो पाळत नाही याची तीव्र जाणीव आहे.

जी वाट आपण चालून आलो. त्या साऱ्याच पायवाटा इथे पुसणार कां ? कुणी ही ओळखीचे इथे नसणार कां ?

" उध्वस्त स्मारकातून या भग्नतेतुनी
माझेच भूत मजला दिसणार का इथे ? "

इथे स्वत:चे भूत म्हणजेच जुन्या गोष्टीचे दुखरे स्मरण. याची जाणीव शांताबाईना आहे. कारण, त्या स्वत: म्हणतात.

" पाषाण इथले एकेक, खालचे
विंचू जुन्या स्मृतीचे डसणार का इथे ? "

भावनावश होऊन कंठ दाटलेला असतो. स्वत:च्या जीवनावर स्वत:च पहारा करावा लागतो. आशाळभूत वेड्या जीवातली निर्माल्ये राखीत बसणे हेच जीवनात आता उरले आहे. हे निर्माल्याचे दु:ख त्याची बोच यातूनच बाईंची कविता उभी राहते.

शेवटी त्याना कुणीच सोबती नाही. असेही वाटते. भोवतीचे रान, इथे माणसे नाहीतच मुळी, आहेत ती क्रूर श्वापदे, विक्राळशा गुहेत हिंडणारी विश्रब्ध भावनेने शिर टेकावे पण अशी जागा कुठे आहे ?

" ही रात चेहऱ्याची घेरित ये असे
माझ्याही चेहऱ्याची मजला शाश्वती "

'स्व'ची ओळख अतदर्शनात आहे. मरण महालाचा वेध कधी कधी त्याना होतो. प्रकाश कक्षेत सारेच अलग होतात. मर्त्यतेची माहेर जागोजागी ' आ ' वासून

असतो. उध्वस्त रात्री मोजल्या जातात व त्यातून दिसतो एक

" मरण महालातून आलेला कवडसा
अनिवार्य ठसा ! "

हा ठसाच शोधणे प्रिय असते.

' गोंदणे ' मध्ये बालपणीची गहिरी स्मृती आहे. अनासक्त वारे असतात व त्यातून बाई निवडतात, स्वतःचा मार्ग, आखलेला. अनासक्त राहून, सदासक्त होऊन त्या चालत असतात. पुन्हा मात्र त्यांची भेट होत नाही.

' तेव्हांपासून, तसेच जिने तेथेच थांबले
जगण्याचे पुढे भास आभास लांबले "

गोंदणमध्ये एक प्रवास आहे. दुःखाची कहाणी आहे. बालपणात हरवणारे मन, दुःखात निथळून उठणारे मन, जुन्या घरात ' स्व ' चा शोध घेणारे अंतर्मन असा एक कवयित्रीचा प्रवास आहे. इथे दुःखाची छटा आहे. मनाचे हळवेपण आहे

" अजून थोडे आहे बाकी
या रक्ताचे करणे पाणी
अजून थोडे आणिक नंतर
सरेल तेव्हां सरो कहाणी "–

स्वप्नातल्या राजकुमारीसारखी बाई स्वतःचा शोध घेते, हरवून जाते. निश्चीत माहीत नसते. हा प्रवास कधी सरसार ? पण संपेपर्यंत चालत राहणे एवढेच माहित असते, " बाई, तू अशीच चालत रहा ! "

❖

स्वप्नामधली सखी

जीवन सहन करत जगणे. हा स्त्रीचा धर्म असतो. सोशिकपण हे पुरुषापेक्षा तिच्या ठिकाणी अधिक असते. शून्यात दृष्टी लावून 'स्व' ला परत परत न्याहाळणारी कवयित्री गोंदणमध्ये आहे. माणसाला स्वतःची ओळख दरक्षणी नव्याने होत असते. जुन्या भूतकाळाच्या मार्गावर नजर टाकिली तर–

" काजळ काळ्या ढंगावर
अचल लावून दृष्ट्री
तू ही कधी आतल्या आत
खूप होतसे कष्टी ? "

कष्टीच व्हावे लागते. कष्टी होणे माथी आले म्हणून का कुणी भूतकाळ पहात नाही? जरूर पहातेच. कवयित्री या वृत्तीस कशी अपवाद असणार? ती भूतकाळात स्वत:ला शोधत राहतेच!

तिचे हे दर्शन देणारे रुप सारखे स्वप्नात कवयित्रीस भेटत असते. स्वप्ना–तल्या या सखीचे नाव, गाव, रंग, रुप सारे ती विचारत राहते.

" लव्हाळाच्या फुलातून
झिरपताना पाणी
त्यात पावले बुडवून तूही
गुणगुणतसे कां गाणी! "

असा प्रश्न ती स्वत:ला विचारात राहते. लव्हाळी नम्र असते. दु:खास ती मोठ्या नम्रपणाने सामोरी जाते. याचप्रमाणे दु:खास सामोरी जाणारे कवयित्रीचे मन आहे. केसांमध्ये उन्हाचा झुळका खोवून, कोवळे ऊन खात बसणारी कवयित्री स्वत:चा भासच शोधत राहते.

" कुठे तरी खचीत खचित
आहे सारे खास
कुठे तरी आहे तू ही
नाही नुसता भास "

आज या थकल्या मनात, शून्यात टक लावू पहाणाऱ्या मनाला अजूनही 'तो दिसतो आहे,

'इंदिरा संताचा' तो' अत:करणावर ठसून जातो. काही वेळा तोच दिसतो. बाई पूर्णत: त्यात विलीन असतात. शांताबाईंचे प्रेमभंगाचे दु:ख आहे. त्यामुळे फक्त दु:खच निथळत राहते. 'तो' मात्र फारसा दिसत नाही. दु:खाची जाणीव एवढी काळोखी आहे की त्या काळोखात तो पूर्णपणे बडून गेला आहे. शांताबाई त्याचे रुप, त्याची माया, त्याचे प्रेम या गोष्टी फारशा स्पष्ट करत नाहीत. त्या दु:खाशी प्रामाणिक आहेत. माहेराला स्त्रीच्या जीवनात फार मोठे स्थान असते. हृदयाचा एक कप्पा निष्ठा या भावनेसाठी उघडलेलाच असतो. मग शांताबाईंची 'मालन' (हे कवयित्रीचे स्वत:चे एक स्वप्नचित्र) खिडकीत उभी रहाते. क्षितिजावर जडावून डोळे गणगोताची वाट पहात रहाते.

पाहता पाहता ती भूतकाळात हरवते. 'गोंदण' चे हे वैशिष्टच मानावे लागते की कवयित्री अचानक भूतकाळात गडप होते. त्या वास्तूशी सुसंवाद करते. मंदपणे गिरक्या घेऊन माहेरच्या वस्तू हाताळणे हा सासुरवाशीनीचा छंद इथे आहे.

स्त्रीचे मन, सासुरवाशीनीचे मन माहेराला पोहचत असेल ते सासर विसरते

का ? सासरचा प्रचंड डोलारा त्याच्या मागे उभा असतो. या प्रचंड डोलाऱ्यातून वळसे घेत, वळसे घेत ती पुढे पुढे जात रहाते. माहेरास पोहचते, फक्त मनाने. आज तेवढेच तिच्या हाती असते. शरीराने ती सासरची असते. मुक्त मनाची कल्पना इथे उभी आहे.

" चंद्राला जाय तडा
पापणीच्या केसाचा
हृदयाला बांध पडे
धुसमुसल्या श्वासाचा "

हा धूसमटलेला श्वास जपून ठेवणे. हाच स्त्रीचा धर्म आहे. वैयक्तीक भावना जीवनाशी अधिक सलगी करणारी गोदणमधील कविता आहे.

❖

मनगटावरील पुसटसा व्रण

प्रीती ही एक जखम आहे. ही जखम होणे मनाला बरेच वाटत असते. त्यातून विव्हळत राहणारे दुःख अधिकच लुभावणारे ठरते. उतरत्या उन्हात ही ओली जखम कुरवाळणे शांताबाईना अजूनही प्रिय आहे.

खिन्न कातरवेळी वारा जड झालेला असतो. दिशादिशातून काळोखाचे धूप पेटलेले असतात. गच्च अबोलपण मनांत असतो. वाटते यावेळी शब्दाची आरास नको. एखादा खरा सूर मात्र लागावा.

" स्वप्न तेवता डोळ्यात वर पापणी मिटावी
अनोळखी दुराव्यात जुनी ओळख पहावी.

दुरावा अनोळखी व्हावा पण ओळख जुनीच असावी. स्वप्नाहून सनातन व श्वासाहून जुने, अंतरीचे गूढ खोलायला मिळावे. या गजातून–

आज पाण्याहून व्हावा जीव नितळ निर्मळ
आणि भरून वाहावी तुझ्या छायेची ओंजळ "

प्रियकराची छाया ओंजळीत पकडणारी ही अपूर्व कल्पना आहे.

प्रियकराचे सानिध्य पूर्णतः प्राप्त होईल असे नाही. त्याच्या सहवासाचा एखादा क्षण जरी लाभला तरी पुरे असतो. त्याचा एखादा शब्द, एखादा सूर, एखादी उत्कठ तान, एखादा रंग, एखादे हिरवे पान सारे कसे एखादेच. त्यातूनच वाटत राहते– 'चुकल्या तारा, जुळती पुन्हा, झरेल अक्षय गान' व याचसाठी

" अशाच काही एखाद्यासाठी
निमूट सोसावे सारे
सहज लाभे एखादे फूल
तेवढे वासाला पुरे "

स्मृतीचे एखादे फूल पुढील जीवन जगण्यासाठी निश्चित पुरे असते.

कडूलिंबाचा गंध घूसमटून थांबलेला असतो. तसाच अनावर क्षण असतो. या क्षणातूनच कवयित्रीच्या जीवनात दुःख उद्भवते. हे दुःख एवढे गहीरे असते की, तीला स्वतःला उमगत नाही.

' - - - - भळभळणारे मन
खोल रुतलेली काच
माझ्या हातात बांगड्या
होत्या सहा किंवा पाच ? "

बांगड्या किती होत्या ? भळभळणारी ओली जखम मात्र असते, तळहातावर ओसरल्या रक्तात एक कापणारी जुनी आठवण असते.

' आहे मनगटावर
एक पुसटसा व्रण '

या व्रणातूनच त्यांची कविता साकारते.

मीलनाचे अतिव सुख कधी काळी शांताबाईनी उपभोगलेले आहे. जोड पावलाखाली चुरगाळलेली गवताखालची वाट असते. गुदमरलेले श्वास, उसासे, आलिंगन घनदाट असते. सळसळणारी मंद पालवी, झुलणाऱ्या तरु शाखा व त्या शाखांखाली घेतलेल्या आणाभाका. आयुष्याच्या वळणावरील अशा एकेक गोड आठवणी. काही विझलेल्या, काही तेवणाऱ्या–

' ठसठसणारे स्पर्श राखता विरघळणारी गात्रे
पुन्हा उमटती उमटून मिटती असंख्य असली चित्रे ! '

ठसठसणाऱ्या आठवणी असतात. ते सारे जुने क्षण आज मनात तरळत असतात. या क्षणांची निसर्गालाही जाण असते. द्रुत वेगाने हे जीवन चक्र फिरत असते व–

" किती उमलले गुलाब आणिक किती पाकळ्या गळाल्या
दूर कोठल्या आभाळांतून किती घनमाळा वळाल्या
कितीदा भिजली आणिक सजली मुकी अनामिक माती
क्षण अंकुरती, फुलती, सुकती युगे पालटूनी जाती "

अंकुरणारे, फुलणारे, सुकणारे हे प्रीतीचे क्षण आहेत. अजूनही येत असतात. तुझे

दशदिशातून ओले गर्द भास. त्याचवेळी शांताबाईंचा उर धपापतो. श्वास अपूरा वाटतो. प्रियकराचा हा श्वास उरात जपला आहे तसाच.

' ओले घामाने तळवे
काही श्वास तुझे भाळी

भाळावरील श्वासातून चुंबनाच्या सुखाचे संस्मरण आहे.

प्रियतमेनेच फक्त दुःख भोगायचे असे नाही. ही ओली जखम तूही सांभाळ अशी आग्रही सूचना कवयित्री त्यास करत असते. हजारो वर्षानंतर तुझे पाप, पुण्य, सुख, दुःख काहीच असणार नाही. आजची धाप, आजचे काम, भाळावरील घाम त्यावेळी मुळीच असणार नाही, तेंव्हा गवत असेल. गवताची पाती, त्यावरील फुले खात्रीने असतील, निळ्याभोर नभाखाली लाटाही उमटत राहतील. सळसळणाऱ्या धमण्यातून लाल रक्त वाहत राहिल. पण तू मात्र जपत रहा.

" तोवर सक्त हास्यामागे
आजचा अश्रू राखून ठेव
जाड सोशीक त्वचेमागे
एक जखम आंकून ठेव "

अश्रू बरोबर त्याने जखम राखून ठेवावी एवढीच त्यांची इच्छा आहे.

शांताबाईंच्या प्रेमकवितेत दुःखाचीच भावना अधिक आहे. प्रियकराच्या अस्तित्त्वापेक्षा दुःखाचा काळोखच अधिक जाणवतो. वेलीवरील फूल मिटत असताना, दूरच्या निळ्या रेषाशी घनगर्द मेघ उठत असताना त्याची आठवण येते. निशब्द हिरवळीवर मुकी पाकळी झडताना दिसते. त्याच वेळी कवयित्रीचे मन विकल होते. काळोख छायेतून हे दुःखच घेरत असते. भिजलेल्या गालांवर शांत पापणी लवताना कवयित्री विसरू बघते. ते दुःखच, हे दुःख विसरता येत नाही. जपत राहण्याचा आनंद आहे. काही वेळेला शांताबाई स्वतःला विसरतात, दुःखाला नाही. देहाचे शत तुकडे होवोत मात्र तो अभंग राहो. त्याला जपण्यासाठी कवयित्रीचा आत्मा हळवा होतो. कवयित्री म्हणते–

" कालची न मी आज, आजची
पुन्हा उद्याला मी नाही
अंतर्यामी त्याला देते
तरीही माझी मी ग्वाही "

प्रियकराला जपण्यातच कवयित्री स्वतःला धन्य मानते. कारण वस्तुच्या आधारावरून त्याची जुनी ओळख पटत असते. आभाळ दूर जाते. झाडांचा हिरवेपणा हरवतो. दिशा पारख्या होतात, पायाखालची भूमी सरकते. विषण्णता दाटून उठते.

कवयित्रीचा मुखवटाही गळून पडतो. रित्या मनात काही तरी दाटून येते. ओसाड वाळूसारखे ज्या वस्तूला स्पर्श करावा ती वस्तूच फुटून जाते आणि कवयित्रीला वाटते हा शाप असेल–

मी माझ्यातच खोल खोल बुडूनी तेव्हा तुला शोधते
झंजावत बनून वेढीत मला येतोस तू निष्ठूरा
घेशी तीक्ष्ण विजेपरी कवळूनीया मूढ गात्राप्रती
होशी ओघ अनाधनेत मजला खेचित न्यायापुढे

मीलनाच्या सुखाला शांताबाई उत्सुक असतात. खग्रास ग्रहण पडावे तसे प्रियकराने आपल्याला झोकून घ्यावे. कारण या प्राणांतिक मीलनात जीवनाचे सायूज्य असते.

" घे खग्रास मला गिळून असली तुझी कठोर दया
या प्राणांतिक मीलनातच परी सायुज्य लाभे प्रिया "

नकळत डोळ्यात आलेल्या आसवांनीच प्रेमाचा संकेत पाळलेला असतो. प्रियकर नाही, अजूनही कवयित्री उत्सुक मनाने त्याच्या स्वागताला तयार आहे.

' अजून माझी
उत्सुक ओंजळ
अजून ताजी फुले

गोंदण मधल्या प्रीतीविषयक कविता शांताबाईंचे उध्वस्त जीवन, व्याकुळ मन वाचकांच्या समोर स्पष्ट करतात. मीलनाच्या सुखापेक्षा दुःख जपणेच कवयित्रीला अधिक प्रिय वाटते. मनगटावर असणारा व्रण जपणे हाच ध्यास त्यांच्या कवितेत आहे.

❖

ओढ मातीची मातीला

आजच्या नियोजन युगामध्ये नोकरीच्या निमित्ताने माणसे विखूरली गेली आहेत. तरीही त्यांच्या अंतःकरणातील मातीची ओढ संपलेली नाही. खेडयातून मुंबईमध्ये नोकरीच्या निमित्ताने आलेल्या शांताबाई अजून तीव्र मातीची ओढ जपत आहेत. ही ओढ जपत असताना त्याना म्हातारे आजोबा दिसतात. त्यांचं वय सत्तरीच्या पलीकडे असते. उभे आयुष्य पिकलेल्या फळासारखं ते कधी गळून पडेल हे सांगता येत नाही. जुना कसदार देह, बळकट अंगकाठी, जीवनाचे धक्के

त्यांनी भोगलेले त्यांच्या कपाळावरच्या आठ्यावरूनच स्पष्ट दिसतात. रिते घर हिंडताना भिंती पुढे पुढे येतात. फेर धरून भूतकाळ नाचू लागतो. आणि याच वेळेला–

" कधी कातरवेळेला
मन उदासीन, भुके
घूरकट काचा आड
दाटे आठवाचे धुके "

सुखदुःखाची वजाबाकी करत करत साऱ्यांच्या ओठावरचे आशिर्वाद घेत घेत कवयित्री जगत असते. मन थकलेले असते पण मातीची ओढ अधिक असते. ज्या मातीत माणसाचा जन्म होतो. त्या मातीशी माणूस फारसा बेईमान होत नाही.

" संसाराच्या सरणात
देह कधीच घातला
आता लागलेली आहे
ओढ मातीची मातीला "

शांताबाईंच्या प्रासंगिक कवितांचा विचार करत असताना जुन्या भूतकाळात आपल्याला फिरावे लागते. पडताळात एखादे गाठोडे असते त्याच्या तळाशी, जिथे जुने कपडे बांधून ठेवलेत त्या ठिकाणी एखादी पैठणी असते, नारळी पदराची. सुंदर रंगाची, ही पैठणी शांताबाईंच्या आजीची. त्या पैठणीला अजूनही गंध आहे, ओळखीचा अनोळखीपणाचा गूढ वास आहे. या पैठणीने एक तन, एक मन जपून ठेवला आहे. या पैठणीला शेवंतीच्या चमेलीचा वास आहे. या पैठणीच्याच आधारानेच एक आयुष्य घडत गेलय.

" पैठणीच्या घडीघडीतून अवघे मनुष्य उलगडत गेले
अहेवपणी मरण आले, आजीचे माझ्या सोने झाले "

आजीचे स्मरण देणारी ही पैठण आज कवयित्री उराशी कवटाळून धरते, त्या मऊ स्पर्शात तिला आजी भेटते, व गदगदलेली कवयित्री बोलून जाते.

" मधली वर्षे गळून पडतात, कालपटाचा जुळतो धागा
पैठणीच्या चौकडयानो, आजीला माझे कुशल सांगा "

'पैठणी' ही कविता अनेक अर्थाने बोलकी आहे. ती जरूर प्रासंगिक असेल पण भूतकाळात कवयित्रीबरोबर वाचकांनाही घेऊन जाणारी आहे.

फोर्ट मधली एक दुपार शांताबाईनी कवितेत साकारली आहे. मुंबई ही यंत्रवत नगरी आहे. रस्त्यावरून चालणारी माणसे उलटसुलट दिशेने जात असतात.

उन्हाची झिंगलेली नशा त्यांच्या डोक्यात असते. ही चालताना थबकणारी माणसे तरंगल्यासारखी वाटतात. घामट, तिरकी, निरर्थक हसणारी याचवेळी अर्थशून्य आवाजांचा गोतावळा वाढलेला असतो. त्यांचे आक्रंदन विनले जाते. बसचा लाल वळसा, टॅक्सीची धडधड, यंत्राचे स्पंदन या आवाजातून असंख्य आकृती उमटतात, बदलतात. या आवाजातून निर्जिव पुतळे बनतात. आभाळालाही भोवळ येते. जमीन पायाखालून सुटते, उन्हाच्या काचा तडकतात. आणि पाणावलेल्या डोळ्यांची धडधडणाऱ्या छातीची कवयित्री चालत राहणे एवढाच धर्म मानते.

" डोळ्या मागल्या मेंदूत तडकते काही, फुटते. पसरते अस्ताव्यस्तआत
माझे पाय माझ्यापासून अलग होतात, दूर निघून जातात "

फोर्ट मधल्या एका रस्त्याचे एक शब्दचित्र उभे राहते.

पैठण या तीर्थक्षेत्रावर अशीच प्रासंगिक कविता निर्माण झाली आहे. गोदेच्या काठावरील दीर्घ उघडे वाळवंट, निर्जन पाषाण व हरवून गेलेल्या अवस्थेत उभी एकटी कवयित्री पिंपळ पानाची गर्द सळसळ व याच्यातूनच जाणवते विरक्त उदास पैठण.

शांताबाईंच्या कविता म्हटल्या तर प्रासंगिक आहेत, पण प्रसंग पाहिल्यानंतर त्याचे नंतर लेखन केल्याचे जाणवत नाही. त्याच्यात अंतःस्फूर्तीचा भाग आहे.

❖

पिकनिक् अखेरची कविता

' गोंदण ' या शांताबाईंच्या नव्या संग्रहात ' पिकनिक् संपत आली आहे. ' ही कविता आहे. या कवितेत संपत आलेल्या पिकनिकचे त्या वेळच्या पिकनिक स्पॉटचे साधे पण जीवाला हूरहूर लावणारे चित्र आहे.

पहिल्या दोन ओळी, विशेष करून पहिली ओळ. ध्रुपदासारख्या आहेत. पिकनिक् ही सहसा लवकर संपणारी एक गोष्ट आहे. (त्या चार मात्रांच्या चार अक्षरी शब्दातल्या नादात सुद्धा तो अर्थ जाणवतो) म्हणून ती लवकर संपू नये, असे वाटते. पण ती तशीच संपते. दिवसभर रंगलेली, पिकनिक आता संपत आली हे सायं सावल्या वरून समजते. त्या सावल्या पाय न वाजवता येतात. ' बागेवर संध्याकाळच्या शांत सावल्या लांबत आहेत. ' या दुसऱ्या ओळीतल्या शब्दात ' आ ' कार अधिक आणून त्या सावल्यांची ' चाल ' सुचवली आहे. पहिल्या ओळीतल्या आहेशी दुसऱ्या ओळीतल्या आहे यमक जुळून अधिक उरणाऱ्यांत मधून सुद्धा अशीच जाणीव होते. शब्दांच्या नादातून सावल्या दिसू लागतात.

पिकनिक संपत आली आहे.

पिकनिक संपत आली आहे.
बागेवर संध्याकाळच्या शांत सावल्या लांबत आहेत
सकाळचा कोवळा उल्हास
आणि दुपारच्या उन्हाचे चटके
गप्पा गोष्टी तोंडी लावत केलेला फराळ,
गर्दीत अवचित गवसलेला एकांत
हास्याचे रंगीत गुच्छ - - सुरांचे तुरे - -
सारेच कसे बघता बघता ओसरून गेले
आता झाडांचे हळूहळू बनत आहेत राक्षस
आणि त्यांच्या तळाशी साचत आहे काळोखाचा डोह
उरलेल्या अन्नावर मुंग्या जमू लागल्या
एखादा कावळाही करकरत घिरटचा घालू लागला
पिकनिक संपत आली आहे
बागेवर संध्याकाळच्या शांत सावल्या लांबत आहेत,

यथामर्म विशेषण–

पुढल्या सहा ओळीच्या कडव्यात, दिवसभरात पिकनिक मध्ये ज घडले त्याचे वेचक स्मरण आहे. त्यांच्यातल्या उल्हास, चटके, एकांत, फराळ, गुच्छ, तुरे या वस्तुंच अर्थपूर्ण वर्णन करणारी विशेषणे किती यथा मर्म आहेत ते पाहण्यासारखे आहे. सकाळी पिकनिक सुरू होताना एक निरुद्देश, मोकळचा सकाळच्या वेळी कोवळचा उन्हासारखा उत्साह होता. दुपारच्या उन्हाचे चटकेच असतात तसे होते. बस्स इतकेच म्हणून त्यांचे वेगळे वर्णन आवश्यक नव्हते.

पिकनिक मधल्या फराळात गप्पा गोष्टीच तोंडी लावायच्या असतात. पिकनिकच्या मन उघडचा वातावरणात, दोन जीवांना गर्दीत अवचित एकांत आढळतो आणि सगळचा पिकनिकला एक धुंद गहिरा अर्थ प्राप्त होतो. गाणे हसणे तर अखंड फुलत बहरत असते. या कडव्याच्या पहिल्या पाच ओळीत, विशेष अर्थ प्राप्त झालेल्या अनेक वस्तूंचा एका पाठोपाठ निर्देश आहे. सहाव्या ओळीतला पहिला 'सारेच' हा शब्द पूर्व निर्देशित वस्तूचे विशेष अर्थ पुसून टाकतो. पहिल्या पाच ओळी आणि सहावी ओळ यांच्यातला ताण सहज समजण्यासारखा आहे. ' बघता बघता ' या शब्दप्रयोगाने आधीच्या या वस्तूंचे अस्थिर जीवीत्त्व सुचवले जाते. ओसरून गेले या भूतकाळी क्रियापदाने तान कसा तीव्र होतो ते पहा.

पुढल्या कडव्यात संध्याकाळच्या सावल्यांना यथाकाळ प्राप्त होणाऱ्या भेसूर, भयकारी रूपाचे चित्र आहे. दिवसभर हिरवी पाखरे धरणाऱ्या, क्रीडेला साथ देणाऱ्या झाडांचे हळूहळू राक्षस बनत चालले आणि त्यांच्या तळाशी आतापर्यंत असलेल्या शीतल सावल्यांचे थंडगार काळोख डोह बनत चालले आहेत. या आणि या पुढल्या कडव्यातल्या अन्नावर जमू लागलेल्या मुंग्या, घिरटचा घालू लागलेला कावळा यांच्या उल्लेखात विनाशाचे सूचन आहे. रमणीय पिकनिकचा अटळपणे विद्रुप शेवट होणार आहे. हा अटळपणा धृपदासारख्या पहिल्या कडव्याच्या अखेरच्या पुनरावृत्तीने मोठ्या परिणामकारक रीतीने सुचवला आहे.

आतापर्यंतच्या विवेचनात ' या कवितेतल्या बागेला आणि पिकनिकला काही प्रतिकात्मक अर्थ आहे– असू शकेल हे सांगायचंय. '

अनंत भावे यानी पिकनिक या कवितेवरील मांडलेली भूमिका वास्तव अर्थाने खरी असली तरी त्याच्यात अध्यात्म आहे, कारण, गोंदण या संग्रहात ही कविता मुद्दाम शेवटी टाकली आहे. पिकनिक याचाच अर्थ जीवन असा समजून घेतला तर कवितेला अधिक अर्थ सुलभता लागते.

❖

गोंदण मधील निसर्ग

गोंदणमधील निसर्ग कविता या शांताबाईंच्या जन्म गावावर आधारित आहेत. या निसर्ग कवितांतूनही त्यांचे व्यक्तीमत्त्व डोकावत राहते. दूर पायथ्याशी खचलेला माळ असतो. पुन्हा तुटणारी पुन्हा जुळणारी बगळ्यांची माळ आहे. लवणातुन एखादी पाऊलवाट चाललेली असते. आपल्याच तंद्रीत एखादा पाट वाहत असतो आणि सावल्यामधून सांज सरकत असते. एखाद्या फुलासारखी कवयित्री मिटून जाते.

" हळूहळू हळू वाढतो काळोख माझ्या भोवताली
काळोखाचा डोह दाटत राहतो पावलांच्या तळी
मिटाया लागते कुठेतरी आत पाकळी पाकळी "

ही पाकळी कवयित्रीच्या मनाची असते. या पाकळीबरोबर कवयित्री मिटते.

झाडे सावल्या ओढून घेतात. उन्हेही मंद झालेली असतात. साऱ्या वस्तूंचे आकार, रंग, मंद–मंद होऊ लागतात. दृष्टी–स्पर्श सारे मिटून जातात. दिशा अंधःकाराने गडद होतात. उर खालीवर होतो व त्या गडद काळोखात एक सुन्नपण कवयित्रीस जाणवत राहते. अज्ञातातून छातीवर एखादा पूर कोसळत राहतो व–

" दिशाहीन हाक यावी तशी रात्र येते
स्वच्छ सोलीव तरल सत्य हळूच पूढे जाते "

दिशाहीन हांकेतच ' तो ' असतो. अंतरीचा सूर असतो. हा सूर मोठा प्रामाणिक आहे. कारण, तेच कवयित्रीच्या जीवनातील अटळ सत्य आहे.

कवीला उमलावं वाटते, सुगंधाची गाथा, उमलण्याची व्यथा एकत्र असते. वाटांवर लिहिलेले उश्वास असतात. उन्हानी केलेले सोनेरी संकेत, संकेताच्यामागे असणारी पाण्याची ओळ, का त्याची सल– प्रत्येक सुकलेल्या पाकळीत अनंत संभव असतात. स्थळ काळाचा दुवा जोडणारे–

" जसा प्रत्येक शब्द उमटलेला, न उमटलेला
अथवा जन्मताना विझलेला ओठी
ज्यांच्या पुढे आणि पाठी
उभे असते एकादे विश्व "

उमटलेल्या न उमटलेल्या शब्दातील दुःख हीच शांताबाईंची अंतर्वेदना.

निसर्गाकडे पाहत असताना त्या लडीवाळ रूप धारण करतात. ओले हिरवेपणा, राकट, उग्र बुंधे, वेडीतली लाडकी वलये, आतुरलेली बुडबुडे यांचे सारे चित्र अंतरंगात असते. पण भेट होती ती दुःखाशी.

" गेले अंग भूईमध्ये मिसळुनी मातीत माती जशी
गेले श्वासही दूर दूर, उतरे आभाळ डोळ्यामध्ये
पक्षाची किलबिल मंद विरली, निःस्तब्ध झाले पण
मी जन्मामधुनी फिरले माझेपणा सोडूनी "

मातीत मिसळून, श्वास जपणारी, डोळ्यात आभाळ भरून ठेवणारी कवयित्री जन्मामधून फिरत राहते. माझेपण सोडता येत नाही पण तेही सोडून देतो.

'गूढ' या कवितेत जीवनातील टप्प्यांची मीमांसा निसर्गातून केली आहे. झाडे श्वास रोखून उभी असतात. पान पान थबकलेले असते, चाहूल कसलीच नसते. वाऱ्याचा पायरव थांबलेला असतो. आभाळाचे अर्थपूर्ण मौन, डोंगर रांगाचा जागता पहारा, पायतळीचे भारवलेले गवत, मधूनच हिंदकळणारा शुभ्र परिसर, आंसवांचा वास, व इथेच एखादे वावरणारे गूढ दिसते. अदृष्यपणे या गुढातून जाणवत राहते.

" कुठल्या अपूऱ्या स्वप्नाचे तुकडे इथे विखुरलेले?
कोणते जीवन नाटच इथे कधी घडून गेले ?"

निसर्गातच प्रेमभंग झाला. हेच ते जीवननाटच असते. याच गूढातून कवयित्रीस कळते. उदास धून, सावळ्या गाई, निळी लाट, मोकळा फेस हे सारे पुकारत

असतानाही जाणवत राहते एक रितेपण–

" रितेच हात राहिले स्मृती कितीच वेचुनी
निळा निळा समुद्र गूढ मिटून जाण लोचनी "

स्मृती वेचणे हा कवयित्रीचा छंदच बनला आहे. निळ्या समुद्रातील गूढ तिला उकलत नाही, न उकलताही डोळ्यात मात्र मिटून जाते. वारा, डोंगर, झाडे या सर्वच वस्तूना शांताबाई एखादे विशेषण देतात. अवखळ वारा, झळझळती पालवी, पानावरील टवटवी, ताट बुंधा, उभार मूठ या साऱ्यातून त्यांना 'त्याचा' अंश दिसतो. 'तो' फारसा नाही. सळसळणाऱ्या पानातून प्रियकराचा वेध घेत त्या राहतात.

" याच्या मुळासह मी भूईतला काळोख चाचपते
याच्या पानांसह सळसळत आभाळाचा वेध घेते "

माळावरून सरकत येणारा ढग, क्षितिजा आडचा फिक्कट गुलाबी संधीप्रकाश, गवतातून फिरणारी उन्हाची संथ बोटे, ओल्यागार हवेतील भास आभास, कोरडी धूळ, शहारत उठणारे हिरवे गर्द वनमोर, यांची घनदाट चित्रावली हृदयात भरून राहते.

'चांदणे' या कवितेत असाच एक दुःखी अनुभव आहे. चांदणे मंद, पाण्याहून नितळ, कवितेसारखे मृदू, मनात सजणारे, चांदणे जाईजूई चमेलीचे, चांदणे अपार–अपरंपार, धुवाधार वर्षणारे चांदणे आग्रही, अतिरेकी, थंड, क्रूर, अनिवार, चांदण्यावर उमटणारी कवयित्रीची मन छाया, अमानुष बोटे आत्म्यावर फिरावी तसे भूक हरवलेल्या श्वासाचे चांदणे या चांदण्याला स्मशानगंधही असतो.

असे हे चांदणे पसरत जाते, रक्तभर पेशी पेटवते. निळे काळे जहर गळ्यातून वर चढते, जिभेवर उलटून येते, गोठत जातो शब्द–शब्द. आत्मा मरून पडतो. विरहाची दाहक कल्पना चांदण्यातून निथळणारी इथे शब्दाकार होत आहे. चांदण्यात आत्मा मरतो म्हणजेच दुःखाचे अतिवपण वाचकांचे मनांत डसत राहते.

शांताबाईंच्या निसर्ग कवितांचा विचार करताना एकच गोष्ट अधिक स्पष्ट होते, ती म्हणजे त्यांच्या वैयक्तिक सुख दुःखाची. स्वतःचे दुःख निसर्गातील वास्तूतून त्या पाहत राहतात, शोधत राहतात.

❖

शांताबाईंची – गोंदण मधील आत्मलक्षी कविता

शब्दासाठी शांताबाईंना थांबावे लागत नाही. सैनिकाप्रमाणे ते समोर उभे असतातच. वारे थकून आभाळाच्या वक्षावर विसावलेले असतात. शेवटच्या पक्षावर घरटे छाया धरते. कवयित्रीचे वात्सल्य ' घरटे धरते वत्सल छाया शवटच्या

पक्षावर ' या ओळीतून प्रकट होते. सुगंधाचे सैल झालेले पीळ, या सर्वांच्या पार्श्वभूमीवर शांताबाई एक विचार स्पष्ट करतात.

–प्रत्येक फुलाचे विश्व आपल्यातच मिटलेले.

मानव शेवटी फिरून फिरून आपल्या जवळच येत राहतो दूर चंद्र–तारे आभाळ असते. पुसट चंद्रबिंब ओल्या रेतीवर असते. सुरातून सुर उलगडत जातो. शब्द शब्द स्वतःचा अर्थ निवडतो. अशा वेळी मात्र–

" गालावरची ओली खूण अदृष्याचा हात पुसतो
अशा निरर्थाच्या क्षणी आपण सुद्धा आपले नसतो "

निरर्थाच्या क्षणी गालावरची ओली ओळ कवयित्री शोधत राहते. स्वतःत गढून जाते.

अफाट विश्वात आपले स्थान सूक्ष्म असते. एकाकी पथ आक्रमित राहणे हेच आपले काम ठरते. काळ्याभोर अरण्यात, एक अद्भूतरम्य दुनिया नांदत असते. सारे कसे शून्यवत या शून्यपणातून–

" शून्याला परिणाम देत चमके भित्री वरी चांदणी
काळोखातच श्वास हा घुसमटे, काळोख दाटे मनी "

शून्याला अर्थ प्राप्त करून देणारी चांदणी, काळोखात घुसमटणारा श्वास यातून एक ' गूढ ' जग उभे राहते. ज्या जगातून निथळत असतो फक्त काळोख. मनात सूर कुठून उमटतो ? या प्रश्नाचे उत्तर कवयित्री असे देते. प्रत्येकाच्या मनाचा आरसा एकादे प्रतिबिंब, टिपत असतो. त्या आरशातच तार छेडली जाते. देहाची त्वचा गळून पडते. अस्तित्त्वाचे वारे वाहून जातात. प्राणातून एखादी अनामिक धून वाजत असते. बालपणीचे आभाळ एखादे रूप घेऊन येते. सांजेवर उमटत राहतात, अंगाई गीते व याचवेळी कर्णात होतो स्वर डोळ्यातून आसवे येतात. काळीज ओलावते. परि हृदय आरशावर.

" जाते छेडून कोण तार हृदयी ? हा सूर येतो कसा ?
भूताची भलती भुलावण करी तो कोणत्या आरसा ?"

मनाच्या आरशात डोकावणारी, तार छेडणारी दुसरी कुणी नसते. तर ती कविता-सखी असते.

आपल्याला आरसे महालात कोंडून ठेवले आहे असे कवयित्रीला वाटत राहते. या आरसे महालाच्या काचा बदलणाऱ्या आहेत. जीवन एक बंदीस्त महालाच आहे. इथून पळ काढता येत नाही. पाय खिळल्यासारखे तटस्थ उभे राहते.

" जिकडे पाहीन तिकडे मला माझी प्रतिबिंबे दिसतात
माझी अनतरुपे, निरुपे, अपरुपेही त्यात असतात "

या प्रतिबिंबातून जाणीव होते ती ' एको ऽ हं बहुस्या ' ची ! एकूण त्यांची कविता आत्मलक्षी आहे, असे जाणवते.

शांताबाईंच्या काव्याचे हे आत्मलक्षीपण विषद करताना जाणवते की, व्यथा जपणे हे त्यांना प्रियच वाटते. दुःखाचा समूळ नाश कधी होत नाही. दुःखातच आनंद असतो. कितीतरी जन्म आपण हिंडत असतो. अंतरंगात कळा सहन करतो तेव्हाच तपस्या फलास येते. खरे मीलन आत्म्याचे होतेच कां ? असा एक ' प्रश्न ' या कवितेत शांताबाई विचारतात. त्यांना वाटते मीलन म्हणजे दोन त्वचा एकत्र येणे. याचवेळी वाटते. ' तुझे श्वास ' खुडून घ्यावेत. स्वतःची व्यथा तोलून जीवन जगावे. या व्यथेतून निश्चित एखादी कथा साकारणारी असते.

" जरी भोग हा भोगणे ही चुकेना व्यथेचीच होवो कथा सुंदर
जिव्हाळीतल्या रक्तधारेस देवा असू द्या अमृताचा वर "

रक्तधार अमृताची व्हावी. व्यथेची कथा व्हावी. इथेच जीवन नाट्य लपलेले असते. जीवनाचे विशिष्ट तत्त्वज्ञान शांताबाईंच्या उरी आहे.

" घनदाट विविध मन
अथांग जल सावले
बुडणारे काही
आत संथ मावले "

मनाच्या निबिड घनदाट अरण्यात स्वच्छ कोवळी तनू फेकण्यात मौज आहे. घटकेत ही मनबाहुली इवली वाटते तर घटकेत चाहूल घेणारी या चाहूलीतूनच बुडणारे दुःख कर तळी घ्यावे लागते. " एक लहान मूल " ही शांताबाईंची कविता अनिलांच्या निर्वासित चीनी मुलाची आठवण करून देते. हे मूल का रडते आहे ? ढसढसून, असहाय, अगतिक, त्या खाऊ कुणी पळविला. त्याचे खेळणे हरवले की त्याची ' आईच हरवली. ' हुंदक्याने गदगदणारे त्याचे उर, पाणावलेले डोळे, मुद्रेवर वेदना. हेच मूल मोठे झाले. अमृताचा पहिला घोटच जहराचा ठरला. अकस्मात त्याला प्रौढपणा प्राप्त झाला.

" इथून पूढे त्याचे डोळे अधिकच खोल होतील
आणि त्याचे कोवळे हात चरक्याना सरावतील "

जीवन एक जहर आहे. प्यालेच पाहिजे. हेच जीवनाचे तत्त्वज्ञान कवयित्री इथे स्पष्ट करते आहे.

प्रलयाच्या काठाशी उभी असणारी कवयित्री त्याने मनाजोगती साथ केली नाही. या भावनेने खंतावलेली आहे. तरीही ती त्याला आधारीत राहते.

" कळते सारे तरी सांगते स्मरूण माझ्या हृदया
हास्यामागे आंसू भरली सतत आठवण होती
बरसत गेले मेघ नभातून किती व गणती केली
आज परंतु मुकी आणखी सोशिक आहे माती "

कवयित्रीचे सारे हसणे हे दुःखाचे भरणेच होते का ? नभातून मेघ बरसत गेले. त्याची गणती केली नाही. कारण कवयित्री स्वतः माती आहे. मातीचा गुणधर्मच असतो सारे सहन करण्याचा. माती हे पूर्णत्वाचे प्रतीक आहे. माती ही मुकी आणि सोशिकतेची प्रतीक आहे म्हणून हा आत्मा मातीचा व्हावा. हा कवयित्रीचा विश्वास सार्थ वाटतो.

मनातल्या आभाळाचे नाते त्या आभाळाशी असते. दोन्ही आभाळ कोणत्या खूणेपाशी येतील ? सारे हेतूशून्य अधांतरी आहे. जगणे हे पुष्कळ वेळा हेतूशून्यच असते.

शांताबाईंच्या कवितेत दुःखाशी, अश्रूशी, सामोरी आलेल्या जीवनाशी केलेली तडजोड आहे. पृथगात्मकता त्यांच्या रक्तात आहे.

❖

गोंदण : एक हळवेपणा

गोंदण हा शांताबाईंचा अखेरचा संग्रह. हिवाळ्यातील कोवळ्या उन्हासारखे यातून दुःख निथळत राहते. 'स्व' चा शोध करण्यास जशी कवयित्री मग्न आहे. तशीच दुःखापाठीमागील अश्रूपान करण्यात. प्रेमभंगाचे दुःख याही संग्रहात आहेच. पण या संग्रहात त्या अधिक अंतर्मुख झाल्या आहेत. त्यांची येथील कविता ही आत्मलक्षी आहे.

शांताबाईंचा जीवनपट आपणास ज्ञात होतो, तो त्यांच्या कवितेतून. एकत्र घरकुलात वाढलेली ही पोर. प्रेमभंगाच दुःख सहन करीत एकटीच वाटचाल करीत आहे. क्षितिजापार तिचे नेत्र आहेत. त्यात त्यांच्या भेटीची अजून इच्छा आहे. त्याच्या त्वचेचे पांघरून जर पांघरता आले तर अजूनही ते त्यांना घ्यायचे आहे. हिवाळ्यातील उन्हात कोवळीकता असते, तसाच चटकाही असतो. तो चटका सहन करत बाई चालत आहेत ! बाई तू चालत रहा !

❖

शांताबाईंची कविता एकसूरी आहे का ?

या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. त्यांनी स्वतःचे पृथगात्म जीवन जरी काव्यात मांडले असले तरी त्यांचे हे जीवन सहसमाज पातळीवर येणारे आहे. कवयित्रीचे वैयक्तीक अनुभव हे समाज मनाशी निगडीत आहेत. ' गोंदण ' मधील मग ती हळवी प्रवृत्ती असो किंवा ' वर्षा ' मधील स्वप्नाळू वृत्ती असो.

स्वप्ने जपणे हा मानवाचा स्वभावधर्म आहे. त्यामुळे स्वप्नातील अधुरेपण हे वास्तव जीवनाच्या कटू अनुभूतीतून निर्माण झालेले आहे, हे जाणवत राहते.

शांताबाईंची भावगीते अभ्यासताना त्यांची कविता ही एकसूरी नाही तरी विविधतेने नटलेली आहे असे म्हणावेसे वाटते. जीवनातील दुःखाची जाणीव त्यांनी ठेवली आहे. प्रियकराने पूर्णतः फसविले तरी ' अजून तव श्वास उष्ण मम गालावरती! ' ही वृत्ती आहे. सत्याची पूजा आहे. तर–

कोळीगीते, सिनेगीते, लावणी यात विविधता आहे. मराठीत 'स्त्रीने' केलेली लावणी रचना नाही. हे मागे स्पष्ट झाले आहे. तरीही शांताबाईंच्या एकूण काव्यजीवनाचा विचार करता असे आढळून येते की, त्यांचे हे लावणी लेखणाचे कार्य सामान्य नव्हे. स्त्रीने रंगवावी ' स्त्री ' तिही पुनः नव्या रुपाची, नवेपणाची हौस असणाऱ्या शांताबाई जीवनाला काव्यात व्यापून आहेत असेच दिसेल.

शांताबाईंची कविता समाज मनाशी निगडीत आहे. याचाच अर्थ असा की, समाजातील सुखदुःखाशी ती समरस झाली आहे. समाजातील समस्या त्यांनी शब्दबद्ध केल्या नसल्यातरी समाजाला आनंद देण्याचे काम त्यांची कविता करते. शांताबाईंची कविता आनंद देते, आंतर्मुख करत नाही.

वैयक्तीक त्यांच्या जीवनाला त्यांची कविता व्यापून राहिली आहे. तरीही मालती किर्लोस्कर यांनी म्हटल्या प्रमाणे त्यांची कविता एकसूरी वाटत नाही. प्रा. रा. श्री. जोग, कुसूमावती देशपांडे, मालती किर्लोस्कर, अ. ना. देशपांडे, अनंत भावे या समिक्षकांनी शांताबाईंच्या कवितेचा विचार केलेला आहे. या सर्वानाच शांताबाई आपल्या कवितेत आपले वैयक्तीक दुःख जपत राहतात व स्वप्ने जपतात असे वाटते.

❖

शांताबाईंचे वेगळेपण

गेल्या तीस वर्षात चार कविता संग्रह व तीन बालगीत संग्रह शांताबाईंनी लिहिलेले आहेत. त्यांच्या प्रतिभेचा बहर मोजकाच पण रससंपन्न अवस्थेत जाणवत राहतो. त्यांच्या कवितातून त्यांची प्रगल्भ प्रसन्न, दृष्टी व अभिव्यक्ती सहज

आढळत राहते. आदर्शात्मक सांकेतिक काहीशा कल्पनारम्य प्रेमाच्या विविध छटा त्यांच्या वर्षा या संग्रहात आढळल्या. काव्य क्षेत्रातली ही त्यांची उमेदवारी होती.

' रुपसी ' मध्ये त्यांचे परिपक्व मन झाल्याचे दिसून आले. प्रेमातली पूर्ण निराशा या संग्रहात आढळून आली. सुंदर दिवस हरपण्याचे या कवयित्रीला उमगले तरी स्वतःच्या भावविश्वात ती पूर्णतः रमून गेली आहे. स्वतःचा शोध स्वतःच्या कवितेत घेण्याचा इथे प्रामाणिक प्रयत्न आहे. व संग्रहात त्यांना गीतांचे सूर सापडले आहेत. आपल्या कवितेत दुर्मिळ क्षणांना शांताबाईनी पकडले. त्यांच्या कवितेत सामाजिक जाणीव नसली तरी आत्मचिंतन आहे. स्वतःच्या वैयक्तिक जीवनाचे प्रेमातील नानाविध यशापयशाचे गूढ अर्थपूर्ण क्षणाचे आणि मनोवृत्तीचे मूल्यमापन व नेमकेपण हेरण्याचा या आत्मचिंतनाचा घ्यास लागला आहे. असे सतत वाटत राहते.

शांताबाईंची शब्दकला मोठी नाजूक, मुलायम आणि लोभसवाणी असते. ती मिताक्षरी असूनही मोठी बोलकी आहे. नानाविधलयी मोठ्या मोठ्या नेटकेपणानं ती पेलू शकते. जेव्हा ती संस्कृत प्रचूर शाहीरी वळणाची असते. जेव्हा भारदस्त वक्तृत्वपूर्ण आणि नाटचात्मक क्वचित नाटकीही असते. आणि पारंपारिक प्रतिमात घुटमळत राहते. जेव्हा ती सरळ शब्दांत बोलू लाभते. तेव्हां तिच्यातील भावनांना एक विलक्षण उत्कटता, आर्तता लाभते. त्यांच्या काही ओळीत तुडूंब भरलेल्या भावना हृदयाच्या सरळ अविष्कारामुळे जवळच्या वाटू लागतात. दुर्बोधतेचा धाक त्यांच्या कवितेने कुठेही दाखविलेला नाही.

यंत्रयुगाचे पडसाद जीवनातील निराशा ज्या काळात मराठीत आली. त्याच काळात शांताबाईंनी ही कविता लिहिलेली आहे. स्वतःची वेगळी वैशिष्टचे टिकविणारी ही कविता इतरांच्यापेक्षा वेगळचा वळणाची आहे. असेच आपणाला जाणवते.

❖

शांताबाईंचे काव्यदृष्टीतील विकसन

शांताबाईंची कविता पहिल्यापासुन बदलत गेली आहे. असे आपल्याला दिसून येईल. आणि हे त्यांनी स्वतःच कबुल केले आहे. काव्याची त्यांची उपजत गोडी सभोवतालचे वातावरण व भोवतालचा परिसर त्यांचा काव्यांकूर रुजवायला कारणीभूत झाला. त्यांच्या काव्यप्रवृत्ती सहजपणे याच काळात रुजल्या गेल्या. रवि किरण मंडळाचे अनुकरण त्यातील कवी व त्यांची कविता यावरील अस्मिता यामुळेच त्यांच्यातील नायिका न बोलता नायकच बोलत राहतो. ' आमच्या कविता खऱ्या नसतील तरीही आमचे कवीपण खरे होते ! ' असे त्या सांगतात.

आर्थिक लाभातून त्यांची सुरूवातीची कविता निर्माण झालेली नाही. सुरवातीला अनुकरण ढोबळपणा, उसनी ऐट, कृत्रीमता त्यांच्या कवितेत जाणवत राहते.

कविता केली जात नसते. तर ती होत असते. हे जरी खरे असते. तरी कवितेचा घाट निर्दोश सुंदर असावा याविषयी त्या जागरुक आहेत. आत्मनिवेदनातून आत्मशोधातून त्यांची 'रुपसी' वाचकांच्या समोर आली.

' तोच चंद्रमा ' हा शांता शेळक्यांच्या कवितेचा पूर्ण विकास मानावा लागेल. गीत लेखन एका मनाच्या विशिष्ट अवस्थेत होते व ते त्यांनी केले आहे. थकलेल्या मनाची आर्तपणे साद घालून व्याकूळ करणारी नायिका इथे आहे. प्रेमभंगाचे सर्वात मोठे दु:ख माथ्यावरती घेऊन चंद्राला साक्षी ठेवून त्या चालत राहील्या आहेत.

त्यांची कोळी गीते पाहिल्यानंतर मराठी वाङमयातील या जुन्या काव्य प्रकाराला शांताबाईनी फक्त पुनर्जन्म दिला असे नाही तर वाचकांचे पर्यंत पोचविण्याचे काम वाचकांच्यामदतीने केले आहे. सागराच्या जीवनाबरोबर कोळ्यांच्या जीवनात होणारा बदल त्यांनी टिपला आहे.

तीनशे वर्षाची परंपरा असणाऱ्या लावणीचा वाङमय प्रकारात हजेरी लावून मराठीतील ' पहिली लावणीकार ' असा बहुमान त्यांनी पटकावला आहे. चिमणचारा, गम्मत हे बालगीतांचे संग्रह एका आईचे मन या संग्रहातून डोकावत रहाते. तर कोवळ्या मनातील हिरवी आल्हाददायक कविता आपल्याला गोंदण या संग्रहात दिसून आली.

सौंदर्य वाढवणारी कला सौंदर्याची, मानवी स्वभावाची निरनिराळी रुपे साकार करणारी पण गोंदणाच्या वेदनेची आठण करून देणारी त्यांची ही कविता आहे.

' गोंदण ' मधील स्त्री स्वत:च्या बालपणीची चित्रे आठवते. आपल्या स्वप्नातल्या सखीला शोधण्याचा प्रयत्न करते. आटपाट नगरीची कहाणी सांगते. भूतकाळाच्या एखाद्या तुकडयाला कवटाळून बसते. अजूनही वैफल्याचा सूर त्या विसरल्या आहेत असे नाही. तर त्याच दु:खात अजूनही हातावरल्या गोंदणाला जपत तशाच उभ्या आहेत. आपल्या स्वप्नातल्या सखीशी हितगुज करीत आहेत.

❖

स्वप्ने जपणारी कवयित्री

वास्तव जीवनातील प्रेमाच्या दुर्मिळ क्षणाला कवयित्री पूर्णपणे मुकलेली दिसते. भळभळणारे रक्त, खोल रुतलेली काच एवढेच नव्हे तर आपल्या हातात किती बांगडया होत्या हे सुद्धा या कवत्रिला आठवत नाही. एवढे दु:ख अतीव आहे.

मीलनाचा दुर्मिळ क्षण कवयित्रीने उपभोगिला आहे. त्यामुळे जोड पावल खाली चुरलेली गवताखालची वाट, गुदमरलेले श्वास, उसासे, घनदाट अलींगन, सळसळणारी मंद पालवी, झुलणाऱ्या तरुशाखा, आयुष्याच्या वळणाला घेतलेली शपथ या साऱ्या ठसठसणाऱ्या आठवणी आहेत. हे जुने क्षण अजूनही मनात तरळत असतात. प्रियतमेने फक्त दुःख भोगायचे असे नाही तर तिच्या दुःखा बरोबर प्रियकराने जखम सांभाळावी अशी आग्रही सूचना तिची आहे. या कवयित्रीला मातीची ओढ आहे तर आयुष्याच्या संध्याकाळी शांत सावल्यात पिकनिक संपत आली आहे याची जाणीव आहे. एकूण शांताबाईंच्या कवितांचा विचार करताना आज ही कवयित्री पूर्णपणे थकलेली असली तरी तेच जुने शिल्पीत स्वप्न अजूनही त्यांना हवे आहे असे वाटत राहते.

१९४७ ते १९७५ असा शांताबाईंचा काव्यप्रवास आहे. ' वर्षा ' त्यांचा संग्रह १९४७ साली प्रसिद्ध झाला. व १९७५ साली ' गोंदण ' हा संग्रह. या संपूर्ण वाटचालीत शांताबाई वर्षा या संग्रहात नवोदीत होत्या असे जाणवते. विद्यार्थी अवस्थेतील स्वप्नाळू कविता असे वर्षा या संग्रहाच्या निमित्ताने म्हणता येईल. ' रुपसी ' या संग्रहात शांताबाईंना स्वतःचा सूर सापडला आहे. निराशा, प्रेमभंगाचे दुःख व त्यातून निसर्गदर्शन असे रुपसीचे स्पष्ट चित्र आहे.

लावणी, भक्तीगीते, कोळीगीते, भावगीते, बडबड गीते, सिनेगीते, अशा गीतांचा त्यांचा संग्रह म्हणजे ' तोच चंद्रमा ' या संग्रहात त्यांची लेखनी बहुप्रसवा अशीच स्थिर झाली आहे या संग्रहात त्यांचे स्थिर पाऊल, काव्याच्या क्षेत्रात झाले असेच आपल्याला म्हणावे लागते.

एकाकी जीवनाची वाटचाल, जीवनातील निराशा व त्यातून स्वप्ने पहाण्याची वृत्ती त्यांच्या ' गोंदण ' मध्ये आहे. तात्पर्याने या तीस वर्षाच्या काव्य प्रवासात शांताबाईंच्या वाटचास आलेले जीवनातील एकाकी पण, निराशा, दुःख व तरीही स्वप्ने जपण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या काव्याचा, व्यक्तीमत्वाचा अविभाज्य भाग म्हणावा लागेल. मराठीतील स्वप्ने जपणारी ही कवयित्री आहे असे जाणवते.

परिशिष्टापूर्वी - - - -

श्रीमती शांता शेळके यांनी आपल्या जवळची काही हस्तलिखिते व काही दुर्मीळ लेख दिले. तसेच मे १९७७ मध्ये व मे ७८ मध्ये कांही मुलाखती दिल्या. या मुलाखती लेख हस्तलिखीत लेखनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे वाटले. त्यांचा वापर लेखनात केलाच आहे. काही लेख अत्यंत महत्त्वाचे असल्याने ते तसेच देत आहे. व त्या लेखावरील विचार शेवटी केला आहे.

❖

परिशिष्ट

माझ्या कवितेची धूळपाटी - - - (हस्तलिखीत)

कविता वाचण्याची आवड मला लहानपणापासून असली तरी प्रत्यक्ष कविता लिहायला मी फार उशिरा सुरुवात केली मी बी. ए. च्या पहिल्या वर्गात असताना म्हणजे १९४१ साली माझी पहिली कविता ' शालापत्रक ' मासिकात छापून आली. ही कविता एक सामान्य बालगीत होते आणि ते देखील आमच्या कॉलेजचा एक बुद्धीमान पण अकाली दिवंगत झालेला विद्यार्थी कवी श्रीनिवास पाटणकर याच्या एका कवितेची चाल डोळ्यासमोर ठेवून प्रयोगादाखल असेच मी लिहून पाहीले होते. ' शालापत्रकाने ' ते बालगीत प्रसिद्ध केले. स्वतःची कविता छापील स्वरूपात पाहिल्यावर मला झालेला आनंद अवर्णनिय होता. पुढे दीर्घकाळ त्या आनंदाची धुंदी मनावरून पुसून गेली नाही.

माझ्यासारख्या नवशिक्या मंडळीना साहित्याच्या क्षेत्रात काही तरी धडपड करावीशी वाटावी, असेच प्रोत्साहक वाङ्मयीन वातावरण त्यावेळी आमच्याजवळ होते. या वातावरणाचे काही श्रेय माझ्या कॉलेजला द्यावयास हवे. मी जेथे शिकत होते, त्या सर परशुरामभाऊ कॉलेजला स्वतःची अशी एक साहित्य परंपरा होती. म. म. दत्तो वामनासारखी व्यक्ती कॉलेजशी तेंव्हा संबंधीत नसली तरी त्यांच्या नावाचा दबदबा आमच्या मनावर सतत असायचा. प्रा. बापूसाहेब माटे हे एकीकडे दररोज आम्हाला शिकवित होते तर दुसरीकडे त्यांचे साहित्य मन लावून आवडीने वाचत होते. ' उपेक्षितांचे अंतरंग ' या त्यांच्या पुस्तकातल्या कथा तर जवळजवळ आम्ही बी. ए. च्या विद्यार्थ्यांसमोर लिहिल्या गेल्या म्हटले तरी चालेल. त्यातल्या कितीतरी कथा माटचानी आम्हाला वर्गात शब्दशः आणि प्रसंगशः सांगितल्या होत्या. प्रा. के. ना. वाटवे स्वतः ललित लेखक नसले तरी नव्याने लिहिल्या जाणाऱ्या साहित्याबद्दल त्यांना जागरुक आस्था होती. तशी चोखंदळ समज होती. या वडिलधाऱ्या गुरुजनानी साहित्याचे प्रेम आमच्या मनांत रुजवले.

आमच्या कॉलेजात किती तरी छोटे छोटे लेखक त्यावेळी हौसेने लिहित असत. वि. म. कुलकर्णी कवी म्हणून विद्यार्थी जगात नाव मिळवित होते. ' उमा कुमार ' या नावाने त्यांच्या कविता 'जोत्स्ना' 'समिक्षक' अशा मासिकात

छापून येत. याचे आम्हाला विलक्षण कौतुक आणि आश्चर्य वाटे. सर परशुराम कॉलेजच्या हवेचाच काही गुण होता की काय कुणास ठाऊक, फस्ट इयरपासून ते एम. ए. पर्यंत बहुतेक वर्गातून लहान-लहान कवी आपले असायचेच. वि. स. भिडे, र. गं. विद्वास, रा. ना. नातू, पु. रा. भिडे, त्र्यं. वि. सरदेशमुख ही मंडळी जेव्हा साहित्यक्षेत्रात नाव मिळवू लागली होती. यातल्याच काही होतकरु मंडळीनी ' नवे मुशाफीर ' नावाने आपल्या ललित लेखाचा एक छोटासा संग्रह छापून प्रसिद्ध केला होता. बाहेरच्या वाङ्मयीन जगात यानी नाव मिळवले, तसे आपणही थोडे बहुत मिळवावे, असे माझ्यासारख्या विद्यार्थीनीला वाटू लागल्यास त्यात नवल नव्हते.

पुण्यातही त्यावेळी वाङ्मय विषयक उत्साह फार होता. काव्याच्या क्षेत्रात ' रविकिरण मंडळ ' आपल्या ऐन वैभवाने तळपत होते. माधव ज्यूलियनांचे निधन नुकतेच झाले होते. पण त्यांच्या स्वैर उत्कट, मादक काहीशा तऱ्हेवाईक अशा कवितेची धुंदी मनावरून यत्कींचितही उतरली नव्हती. सारी तरुण पीढी त्यांच्या काव्यावर नुसती झुलत होती. यशवंत, गिरिशांच्या कविता प्रत्येक मासिकांतून प्रसिद्ध होत होत्या. गजानन वाटव्यासारखा कल्पक व गुणी गायक तांब्याच्या, माधव ज्युलियनांच्या, ना. घ. देशपांडयाच्या कविताना भावानुकूल चाली लावून त्या कार्यक्रमातून सादर करीत होता. त्यामुळे पुण्यातली काव्यप्रेमी तरुण मंडळी सतत काव्यधुंद मनःस्थितीत असे. ज्याला कवितेबद्दल थोडेसेतरी आकर्षण आहे, असा प्रत्येक तरुण कविता जीव तोडून वाचत असे, दहा पाच गजले ज्याला मुखोद्गत नाहीत– असा तरुण विद्यार्थी त्यावेळी सापडणे अशक्य होते.

' भिल्लीण न तू सुंदरी, वाणा न शिकारी ', ' प्रेम होईना तुझ्यानें, प्रेम माझे राहू दे ', ' वेड आधि सांग कोणी लाविले ', ' जीव तुझा लोभला माझ्यावरी रे मोहना ' या सारख्या ओळी रात्रंदिवस आमच्या मनात घोळत असायच्या. माधव ज्यूलियनांचे ' विरहतरंग ' हे काव्य तर तरुण मंडळीचे ' बायबल ' होते. तसाच ' उमरखय्याम ' च्या रुबाया अत्यंत लोकप्रिय होत्या• फिट झेरल्डच्या रुबयांची एक डी-लक्स प्रत जवळ असणे ही काव्यप्रेमाच्या परमोत्कर्षाची खूण समजली जाई. ' विरहतरंगाने ' स्वप्नाळूपणा, भावूकता, आदर्शवाद यांचा वस्तुपाठच तरुणांना दिला होता. तर, ' रुबायांनी ' माफक तेवढा शून्यवाद त्यात मिसळून त्याला एक वेगळी रुची आणली होती. रात्रंदिवस हे वातावरण श्वासाने स्वतात भिनवीत मी विद्यार्थी दशा घालवित होते.

' रवि किरण ' मंडळाचे आकर्षण जबरदस्त होते. याची आजच्या पिढीला सांगूनही कल्पना येणार नाही. मी स्वतः कितीतरी दिवस यशवंताना पाहिलेले नव्हते. पण मी शाळेत असतांना त्यांची बहिण कु. काशी पेंढारकर ही जेव्हा आमच्या शाळेत असल्याचे मला कळले, तेव्हा मला किती आनंद आश्चर्य

वाटले होते. ते आजही मला चांगले आठवते. यशवंताची बहिण आमच्या शाळेत असू शकते, हेच मला अद्‌भूत वाटले. या मंडळाभोवती, त्यातल्या कवीभोवती एक सोनेरी–गुलाबी धूसर वलय असल्यासारखे वाटे. रविकिरण मंडळाच्या सभासदांच्या कवितानी तर आम्हाला वेड लावले होतेच, पण त्यांच्या खाजगी जीवनाबद्दल सुद्धा मनाला कौतुक, कुतूहल वाटे. त्यांचे छंद, त्यांच्या आवडी निवडी, त्यांचे एकमेकांच्या घरी जाऊन राहणे आणि एकमेकांच्या घरगुती गोष्टीबद्दल प्रकट लिहिणे, त्यांचे एकमेकांना खाजगी नावाने संबोधणे आणि एकमेकांच्या मुलावर कविता लिहून त्या छापून प्रसिद्ध करणे. या साऱ्यांची मोहिनी आमच्यावर पडली होती. रविकिरण मंडळाच्या सभासदानी एकमेकांवर सातत्याने आणि भरपूर लेखन करून कवीबद्दलचा आणि कवी जीवनाबद्दल विशिष्ट आदर्श जणू समाजापुढे उभा केला होता आणि त्यांचे काव्यगत विविध उल्लेख आणि संदर्भ देखील आपआपल्या परीने, त्यासाठी अधिक तपशील पुरवणारेच होते. फर्ग्युसन कॉलेजची टेकडी, तेथील पावसाळचात खंडाळचात काढलेल्या सहली, तेथे फुललेल्या गर्द चमेली, घाटातले धूके, कवितांच्या हस्तलिखित वह्या या साऱ्या भोवतीच रविकिरण मंडळाच्या कवीनी काव्यात्म, स्वानाळूपणाचे एक मोहक जडावले होते. आणि आचार्य अत्र्यानी ' झेंडूच्या फुलात ' केलेली या कवींची मनमूराद थट्टा वाचून पाहून देखील त्याची धुंदी कधी ओसरु शकली नव्हती. रविकिरण मंडळाचे कवी स्वतःचा उल्लेख सहज साध्य करीत नसत. ' म्हातारे कवि सात पाहुनी जिला आनंदुनी बोलले ' असा एखाद्या सुनितात तो उल्लेख आवर्जून केला जाई. ' फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवरचा कातळ कवी कातळावर चाखतो. कोण्या कविची माधुरी ' अशा सदंर्भात नटून येई. कवितेची वही नुसती वही नसे तर ती ' पिवळी जुनी कविता वही ' – होऊन कवितेत प्रकटत असे. मित्रमंडळीच्या बैठकीतले खाजगी संकेत देखील ' माझा मी इतिहास काय, सिसिली सांगू तुला ' – अशा गूढ रहस्यमयतेच्या झिरझिरीत अशा व गुढतातून अस्पष्ट दिसून स्वतः बद्दलचे कुतूहल चालवित आणि वाढवित.

कविता कशी असावी याचा तर वस्तुपाठ रविकिरण मंडळातल्या कविंच्या काव्यातून मिळत असे, पण कवी असा असावा, इतकेच नव्हेतर त्याने दिसावे कसे, वागावे कसे, बोलावे कसे, चालावे कसे, याचा देखील आदर्श त्यानी आमच्या पीढीला घालून दिला होता. त्या काळातले कवीच नव्हेत तर कादंबरीकार, नाटककार, कथाकार देखील सर्वजण मिळून ' साहित्यीकांची ' एक भूमिका आवर्जून सजवीत, वठवीत आहेत, असे वाटावयाचे. आणि लेखन जमो न जमो, हा साहित्यीकपणा जमलाच पाहिजे. अशी खूणगाठ आम्ही मनाशी पक्की बांधून ठेवली होती. प्रा. ना. सी. फडके यांच्यावर लिहिल्या गेलेल्या एका पुस्तकात अंगावर शाल पांघरलेला असा फडक्यांचा एक फोटो प्रसिद्ध झाला होता. तो फोटो

पाहिल्याबरोबर आमच्या कॉलेजमधल्या एका छोटया लेखकाने स्वत:चाही अगदी तसाच फोटो ताबडतोब काढून घेतला होता. इतकेच नव्हे तर आम्हा, सर्वांना देखिल त्या फोटोचे कौतुक वाटले होते.

अर्थात माझ्या प्रारंभीच्या कविता रविकिरण मंडळाचे सहीसही अनुकरण असल्यास त्यात काहीच आश्चर्य नव्हते. माधव ज्यूलीयन यशवंताच्या कविताचे इतके खोल संस्कार माझ्या मनांवर झाले होते. की, माझ्या सुरवातीच्या कवितातला 'मी' हा पुरुष असे आणि हे कोणीतरी दुसऱ्याने मला सांगितले, तेव्हा ते प्रथम माझ्या ध्यानात आले. रविकिरण मंडळाच्या कवितांचा मजवर फार प्रभाव पडला होता. तथापी, मला ज्या कविता लिहिण्यास प्रवृत्त केले ते मात्र एका अगदीच वेगळ्या कविच्या कविता संग्रहाने. हे कवी गणेश हरी पाटील. त्यांचा 'रानजाई' हा कविता संग्रह शाळकरी वयात माझ्या वाचनात आला आणि त्यातल्या कविताना मला अक्षरश: भारुन टाकले. काव्याच्या अद्भूत यक्षसृष्टीत त्यावेळी प्रत्यक्ष माझे पाऊल जरी पडले नाही तरी कल्पनाशक्तीला पंख फुटून एका स्वैर मुक्तपणाचा जीव हेलावून टाकणारा अनुभव मात्र याचवेळी आल्यासारखे वाटले. 'रानजाई' तल्या कवितांचा मजवर एवढा परिणाम होण्याचे कारण त्या कविता लिहिणारा कवी आमच्याच रहाळातला होता. त्या कवितातला निसर्ग माझ्या अगदी ओळखीचा होता. तो रानजाईचा बहर ती तरवडबाडे, तो भंगलेला गावकुस, चंदेरी रात्री निघणारी ती शिवरायांची अद्भूत स्वारी, तो घारकडयांचा भव्य विस्तार सारे मला अगदी आपले स्वत:चे असल्यासारखे वाटले. माझ्याच मनातली सृष्टी येथे शब्दरुप होऊन साकार झाल्याचा मला प्रत्यय आला. प्रत्यक्ष कविता मी फार नंतर लिहिल्या. तरी स्वत:चे एक वेगळे अस्तित्त्व मला गवसले ते याचवेळी. कविता लिहिल्यानंतर दुसरी गोष्ट म्हणजे ती छापवून आणणे. हे काम मात्र अवघड होते. कारण आजच्या सारख्या त्यावेळी मासिकांचा सुळसुळाट नव्हता. आणि दुसरे म्हणजे 'जोत्स्ना' 'समिक्षक' यासारखी त्यावेळची जी वाङ्मयीन मातब्बर मासिके होती, त्यात माझ्यासारख्या नवशिक्या कवीची डाळ शिजणे शक्यच नव्हते. पण माझी कविता लिहीण्याची हौस जेवढी अनावर होती. तेवढा त्या कविता मासिकाकडे धाडण्याचा उत्साहही जबरदस्त होता. सुरवातीला 'स्त्री' मासिकाकडे कविता पाठवण्याचे एक साधे कारण असे होते की, या मासिकाची कचेरी आमच्या कॉलेजच्या अगदी शेजारी होती. त्यामुळे निर्णय तडका-फडकी कळे. मनोहर केळकरानी माझ्या कविता हौसेने छापल्या, इतकेच नव्हे तर कित्येकदा मला गद्यलेखन लिहायला लावून तेही त्यांनी आवर्जून छापले. त्यानंतर मी जेथे रहात होते, त्या आमच्या शुक्रवार पेठेतच एक मासिक निघाल्याची शुभवार्ता कानी पडली. मासिकाचे नाव 'उदय' असे होते. त्याचा संपादक कोलमकर नावाचा कोणी साहित्यप्रेमी तरुण असून माझ्या धाकटया

भावाचा तो मित्र होता. अर्थात् 'उदय' मासिकात माझ्या कविता येणे हे क्रमप्राप्तच होते.

मला आठवते की, आमच्या कॉलेजमधले अनेक लेखक 'उदय' मध्ये तडाख्याने लिहू लागले. वि. म. कुलकर्णी यांची संपूर्ण 'आहुती' कादंबरी त्यात हप्त्या हप्त्याने छापून येत होती. 'उदय' मासिकाबद्दल आम्हाला आत्मीयता आणि जिव्हाळा वाटू लागला. तेवढचात काय झाले कोणास ठाऊक, 'उदय' मासीक अचानक बंद पडले. 'शांताबाईंच्या' कविता छापल्यामुळे 'उदय' मासीकाचा अस्त झाला. अशा कोटच्या करुन माझी भावंडे माझी चेष्टा करु लागली. 'आता तुमच्या कविता कोण छापणार?' असा खवचट प्रश्न काही वर्गबंधू विचारु लागले. पण माझी उमेद एवढचाने मावळणार नव्हती. 'जोत्स्ना' 'समिक्षक' कडे कविता पाठविण्याचा निर्धार अद्यापही मी केला नव्हता. पण इतर मासिकांचा वेध मी घेत होते. याच सुमाराला – कदाचित थोडे आगे-मागे असेल– कोल्हापूरहून 'महाद्वार' नावाचे एक मासिक निघाले. मासिकाच्या संपादकाचे नाव आता मला आठवत नाही, पण नवोदितांचे साहित्य हे मासिक आवर्जून छापत असे, एवढे मात्र स्मरते. कथा, कविता, ललित लेख सारे त्यात स्वीकारले जाई. इतकेच नव्हे तर छापलेही जाई. कवीची एक नवी पीढी हळूहळू आकार घेऊ लागली होती. कृ. ब. निकुंब, वि. म. कुलकर्णी, श्रीकृष्ण पोवळे, ग. दि. माडगुडकरांच्या पहिल्या वहिल्या कविता, 'महाद्वार' मधूनच प्रसिद्ध झाल्या होत्या. इतकेच नव्हे तर त्यांच्या कांही चांगल्या कथा 'महाद्वार' मध्येच मी त्यावेळी वाचल्या होत्या.

कविता लिहीणे, त्या छापणे या जशा माझ्या वेळच्या अनिवार भूका होत्या, त्याचप्रमाणं कवितांबद्दल बडबडत राहणे. हीही अशीच एक प्रखर भूक होती. आमचे एक छोटेसे मंडळ होते. त्याचे सभासद तीनच. मी स्वःत, विमला पंतसचिव (आता सौ. पद्मा लोकूर) आणि तिची धाकटी बहीण कमला पंतसचिव. तिघीनाही कवितेचे विलक्षण वेड होते. नव्या कविता वाचणे, स्वत. कविता लिहिणे, कविता पाठ करत राहणे. या नादात आम्ही महिने न् महिने घालविले, पद्माची धाकटी बहिण स्वतः कविता लिहित नसे, पण तिला कवितेचो आवड होती. आणि चांगली समजही होती. आमचा हा काव्यप्रेमाचा काळ फार आनंदात गेला. आणि दोन-अडीच वर्षानंतर मी एम. ए. झाल्यानंतर माझे पुणे जेंव्हा सुटले, तेंव्हा आमचे काव्यप्रेमी मंडळही संपुष्टात आले. आजही ते दिवस आठवले की, मन हुरहूरते.

याच सुमाराला मी माझी आवड भागविण्याला आणखी एका वडिलधाऱ्या व्यक्तीचा मला अवर्जून उल्लेख केला पाहिजे. ही व्यक्ती म्हणजे प्रा. रा. श्री. जोग वस्तुतः जोग हे प्रत्यक्ष माझे गुरु कधीच नव्हते. कारण, ते फर्ग्युसन मध्ये शिकवित तर मी सर परशुरामभाऊ कॉलेजची विद्यार्थीनी. पुढे एम. ए. ला आम्हाला शिकवू

लागले, पण तेंव्हा देखिल वेगवेगळी कॉलेजे लांब पडतात म्हणून मी त्यांच्या निम्म्या तासाना मी कधी हजर राहिले असेन की नाही, शंकाच आहे, पण जोगांचे तास जरी सतत मी बुडवले तरी जवळजवळ तीन एक वर्षे मी त्यांच्या घरी जात राहिले. आणि माझ्या कविता ऐकल्या, वाचल्या पण कवितेबद्दल बोलण्याची जी माझी आवड होती ती त्यांना आवडली. माझ्या कवितेतील दोषांचे जसे परखडपणे त्यानी विवेचन केले तसे मला तोंड भरून शाबासकी दिली. माझ्या कवितात जी व्याकरण शुद्धताआणि शैलीचा रेखिवपणा आहे, त्याचे श्रेय जेवढे रविकिरण मंडळाच्या कविना आहे तेवढेच ते जोग यांना द्यायला हवे. याच काळात उमर-खय्यामच्या 'रुबाया'चे सुमारे वर्षभर मला अगदी वेड लागले होते. तो सर्व काळ मी 'रुबाया' जगत होते म्हटले तरी चालेल. त्या वेडाच्या भरात मी एकटाकी शंभर रुबाया स्वत: लिहिल्या. पुण्याच्या एका जेष्ठ साहित्यीकाने त्या वाचल्या. त्याना त्या फार आवडल्या. इतक्या की, त्याचे एक छोटेसे पुस्तक काढून ते प्रसिद्ध करण्याची त्यानी तयारी दर्शविली. आपल्या रुबायाचे पुस्तक निघणार या कल्पनेने मला अतिशय आनंद झाला. आणि काही दिवस गोड अपेक्षेने गेले, पण साहित्यीकांना पुस्तक काढणे जमले नाही, तरीही त्यानी तशी इच्छा दर्शविली होती. हेच मला विशेष वाटते. ते साहित्यीक म्हणजे 'केसरी' चे सहसंपादक दा. न· शिखरे.

' अभिरुची ' मासीक याच सुमारास वाचकात आले. ' रविकिरण मंडळाने ' भारलेल्या माझ्या मनाला थोडेसे वेगळचा प्रकारच्या काव्यविषयक वातावरणात जर कोणी नेले असेल तर ते ' अभिरुची ' मासिकाने. ' कुसुमाग्रजांची ' कविताही आम्हा तरुण कविना विलक्षण प्रभावित करुन गेली होती, पण अभिरुची मध्ये येणाऱ्या ना. घ. देशपांडे, पु. शि. रेगे, अशोक शरश्चंद्र मुक्तीबोध, अनिल यांच्या कविताही काही वेगळचा रीतीने मनावर फार खोल ठसल्या. रविकिरन मंडळाचे सभासद लिहीतात ते आणि तेवढेच फक्त काव्य नाही. त्याहून अगदी वेगळे असेही रुप घेऊन काव्य अवतीर्ण होऊ शकते. आणि ते अस्सल असू शकते, याची जाणीव अस्पष्ट का होईना, झाली ती ' अभिरुची ' च्याच वाचनाने. शैलीचे अवास्तव स्तोम आणि सफाईचा अनावर हव्यास यांच्या दडपणातून मन थोडे थोडे मोकळे होऊ लागले. ' अभिरुची ' ने माझ्या काही कविताही छापल्या होत्या.

याचवेळी की, थोडेसे आधी कोण जाणे, ' जोत्स्ना ' मासिकाकडे मी एक कविता धाडली होती. मातब्बर वाङ्मयीन मासिकाकडे कविता पाठवण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. ' जोत्स्नेने ' कविता स्वीकारल्याचे कळवले. तेव्हा मला फार आनंद झाला. सोबतच्या वा. रा. ढवळचांच्या छोटचाशा प्रोत्साहनपर पत्राने. तो आनंद आजही आठवतो. ' जोत्स्नेत ' कविता छापून येण्याची मी वाट पाहू लागले. शेवटी कविता छापून आलीही. ' शान्ता ज. शेळके ' ऐवजी शान्ता प. शेळके या मुद्रण दोषाने मी काहीशी खट्टू झाले, पण कविता छापून आली हा आनंद त्यामुळे

रतिमात्र जाणवला नाही.

कवितेचे पहिले पुस्तक छापवून घेताना कवीला फार त्रास पडतो, पण माझे भाग्य असे की, माझ्या पहिल्या काव्यसंग्रहाचा प्रकाशक घरी चालून आला. ' कॉन्टीनेंटल ' चे प्रकाशक आनंदराव कुलकर्णी यांचे दुकान आणि वाचनालय आमच्या कॉलेज समोरच होते. मी त्यांच्याकडून नेहमी वाचायला पुस्तके आणीत असे. अनंतराव हे माझ्या धाकटचा भावाचे मित्र होते. पुढे एम. ए. चा अभ्यासही या दोघानी मिळून केला. मी कविता लिहीते. हे अनंतरावाना माहित होते. एके दिवशी त्यांच्या दुकानांत मी पुस्तके बघत असताना अकस्मात त्यानी मला विचारले,

'कविता लिहीता, पण संग्रह काढण्याचा कधी काही विचार केला आहात की नाही ? '

मी तसला काहीच विचार केला नव्हता. मी नकारार्थी मान हालवली. " तर मग मी काढीन तुमचा कविता संग्रह. " अनंतराव म्हणाले. माझा माझ्या काव्यावर विश्वासच बसेना. विस्फारीत नजरेने मी त्यांच्याकडे बघत राहिले. " काढीन म्हणजे आता लगेच नव्हे " अनंतराव पुढे म्हणाले. " पण वर्ष दोन वर्षात नक्की काढीन." दरम्यान तुम्ही कविता लिहित रहा. अनंतराव पुढे म्हणाले, या मधल्या काळात दुसऱ्या एखाद्या प्रकाशकाने तुमचा संग्रह घेण्याची तयारी दर्शवली तर त्याला तुम्ही तो खुशाल देऊ शकता. मला शब्द दिला आहे. याचे बंधन तुमच्यावर नाही. "

" माझा कविता संग्रह मी तुमच्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही देणार नाही. " मला आता कोठे शब्द सुचले.

" हक्काचे तुम्ही काय करणार ? " अनंतरावानी मला विचारले.

" हक्कबिक्क काय ते सर्व तुम्ही तुमच्याकडेच ठेवा ! " मी पटकन सांगून टाकले. " मला त्यातले काही एक नको ! "

अनंतराव हंसले आणि मग लहान मुलाला समजून सांगावे तशा सुरात ते मला म्हणाले, ' तुम्ही नव्यानं लिहू लागला आहांत, पण माझा एक सल्ला ध्यानात ठेवा. पुस्तकाचे हक्क कधीही प्रकाशकाकडे ठेवू नयेत. मला तुमच्या कवितासंग्रहांचे हक्क नकोत. मी तुमचे पुस्तक काढीन, चांगले काढीन. पहिल्या आवृत्तीचे तुम्हाला पैसे देईन. पुढले सर्व हक्क तुम्ही आपल्याकडे ठेवा. "

अनंतरावानी आपल्या बोलण्यातला शब्द न् शब्द पाळला. दरम्यान मी एम. ए होऊन मुंबईला आले. मुंबईला आल्यानंतर जीवनाला एक वेगळेच वळण लागले. काव्यविषयक उत्साहाचा व उमेदीचा कोवळा मोहोर झपाटचाने झडू लागला. त्याच्या जागी नवे अधिक स्थिर, अर्थपूर्ण आत्मप्रत्ययी असे काही मनात अजून उगवायचे होते. मी मधल्या रित्या हेतूशून्य अवस्थेत. हेलकावत होते. तेवढचात अनंतरावाचे पत्र आले.

" कवितांचे हस्तलिखीत धाडून द्या. मी संग्रह काढतो आहे. " मी हस्तलिखीत तयार केले. विरह तरंगातल्या वर्षा ऋतूच्या मादक चित्रणाचे संस्कार मनांत अजूनही खोल कुठेतरी रेंगाळत होते. त्यामुळे कविता संग्रहाला मी ' वर्षा ' नाव दिले.

त्यावेळचा आमचा काव्यविषयक उत्साह भाबडा असेल, चुकीचा असेल डोळस जाणतेपणाचा त्यात अभाव असेल, पण तो उत्साह खरा होता यात शंका नाही.

ते भारलेपण अस्सल होते. आमच्या सर्वच पीढीबद्दल मी असा निर्वाळा देईन. आमच्या बहुसंख्य कविता खऱ्या नसतील, पण आमचे ' कवीपण ' खरे होते.

इतर सर्व प्रेमसंबंधाप्रमाणेच प्रत्येक लेखकाच्या जीवनात हा साहित्याच्या धुंदीचा, भारलेपणाचा, वेडावून जाण्याचा काळ एकदा तरी यायला हवा. तो सतत टिकत नाही टिकणे योग्यही नाही. पण त्याचे अस्तित्त्व फार आवश्यक आहे. दुसरी गोष्ट अशी की, लेखनांच्या प्रारंभ काळी त्यातून अर्थनिष्पती किती होईल हा विचार आमच्या मनात मुळीच नव्हता. साहित्य आज जेवढे अर्थोत्पादनाचे झाले आहे. तेवढे ते तेव्हा नव्हते. हे त्याचे कारण ही असेल कदाचित, पण कविता लिहीताना जो आनंद आम्हाला वाटे, त्यात या आर्थिक लाभाचा विचार चुकूनही मनांत येत नसे.

आज त्या वेळच्या कविता वाचताना त्यातला अनुकरणाचा भाग किती मोठा होता हे कळते. त्या वेळच्या एकंदर साहित्यविषयक भूमिकेतला ढोबळपणा, कृत्रीमता, उसनी ऐट जाणवते. त्या काळापासून आज किती पुढे आलो, काय कमावले, किती प्रगती साधली याचा विचार करताना मन खिन्न होते. तरी हि काव्य लेखनाची धूळपाटी गिरवण्याचा तो काळ व्यर्थ गेला, असे मात्र वाटत नाही. तो सार्थकीच लागला. पुढे कितीही भाराभर लिहिले–वाचले. तरी जिने अक्षर तुम्हाशी प्रथम ओळख करून दिली, त्या धूळपाटीचे महत्त्व कसे नाकारता येईल ?

शांतावाईंच्या या लेखावरून काव्याची त्यांची उपजत गोडी, भोवतालचे उत्तेजक वातावरण, परिसर त्यांच्या काव्यवृत्ती जाग्या करण्यास, जोपण्यास कशा कारणीभूत झाल्या ते सहजपणाने कळते. रविकिरण मंडळाचे अनुकरण, त्यातील कवीवरांच्या जीवनावरील, लेखनावरील जागृत अस्मिता, त्यातूनच त्यांची काव्याची वाटचाल चालत राहिली. रविकिरण मंडळाचे अनुकरण त्या करत राहिल्या त्यामुळे त्यांच्या काही कवितेची नायीका ' मी ' पुरुषरुप धारते, पण त्यातल्या स्त्री मनाचे हळवेपण लोपत नाही. स्त्री मनाचा अनिवार्य उद्दार त्यातून स्फुरतोच !

❖

कविता कशी फुलते

कविता व कवी या दोघांचे नाते काय ? कविता फुलते कशी ? कविता कशी जन्मते आणि फुलत जाते, हे एक कोडेच आहे. कवींनी आणि काव्याच्या चिकीत्सक अभ्यासकांनी ते सोडविण्याचा मनोभावे प्रयत्न वेळोवेळी केलेला आहे. पण मूळ कोडे अजून तसेच राहिलेले आहे. याचे आश्चर्य किंचिदहि कमी झालेले नाही.

न कळे कोठून होते लतिकेच्या ठायी पुष्प परिपूर्ति
न कळे केंव्हा कैशी होते कविच्या मनाप्रति स्फूर्ति
न कळे कोठून येती द्विजराज नवे वसंतकाली ते
न कळे कोठून येती धावत नवशब्द भेटण्या कविते
न कळे कोठून येते शोभा आयास हास्य अधराला
न कळे कोठून येतो प्रसाद कविच्या नवीन काव्याला - - - '

हे नवल रे. टिळकांच्या इतकेच आजच्याही कविला वाटत आहे. फरक इतकाच रे. टिळकानी आपल्यापरी या नवलाचे उत्तर शोधून काढले आहे. ' वरून कोणी देवदूत कविहृदयाच्या सतारीच्या तारा छेडून पिळून काव्यझंकारकाढीत आहे. तो बोलविता धनी आहे. ' ही श्रद्धा हे कोडे उलगडून टाकते. ही कविता कोणी केली? ' हे रे. टिळकांची दुसरी एक कविता तर केवळ या श्रद्धेलाच वाहिलेली आहे. काव्य रसिकांना उद्देशून रे. टिळक उद्‌गारतात–

" जे जे मी गातो ते नाही माझे, परंतू देवाचे
कविता इती त्याची बोलवि मज पाहिजे तसे वाचे
तिची करंगुळी ह्या हृदयाला स्पर्शताच सारंगी
जैशी तसेच हेही नाद करी विरुन मला रंगी
हासुन सहर्ष जेंव्हा पाहे ती देवदूतिका याला
तत्काळ काम सोडून वेडा हा लागतोच गायाला
अस्पष्ट गोड गाणे गाई ती तेच मी पुढे करतो
मजला कवि का म्हणता, मृण्मय पात्रात देव रस भरितो
मज पामरा कशाला भान, कशाला उगाच गर्व तरी
शिपी स्वप्ने नवनीते ईश्वर तीच्यात मौक्तीका वितरी "

तेंव्हा कविला स्फूर्ती कोठून होते. शद्व कसे भेटतात आणि काव्यपात्रात प्रसाद आणि रस ओतप्रत कसा भरला जातो. याचे तसे रहस्य रे. टिळकाना

उरलेले नव्हते. जुन्या संताचीच ही भूमिका आहे आणि ते बरोबरच आहे. रे. टिळक हे अर्वाचीन काळातले संत कवीच म्हणायचे !

पण ' ईश्वर म्हंटल्याने किंवा ' परमेश्वर प्रेरित ' म्हटल्याने काय समजते ? काय उकलते ? जे गुढ आहे ते गुढतरच होते. आजच्या मनाला शास्त्रीय सोपपत्तीक रितीने जेथवर जाता येईल, तेथवर जाणे आवडते. मार्ग मार्ग कंठतो, त्यांचे मन थकत नाही, पाय थांबत नाहीत. ' कविता फुलते कशी ' हे त्याला जाणून घेण्याचे अपार कुतूहल असते. आणि त्यासाठी कवी मनाशी तो जवळीक साधू पहातो. कवीने आपल्या कवितेच्या जनकाला सांगाव्यात असा त्याचा आग्रह असतो. काव्यास्वादास त्यामुळे कितपत मदत होते किंवा काव्याच्या मूल्यमापनात त्याने किती फरक पडतो, हे सांगणे कठीण आहे, पण त्याची संवेदनशिलता जागी होण्यास अशा आत्मनुभवाचा निश्चित उपयोग होतो. एवढेच नव्हे तर, कवितेच्या अंतरंगात जाण्याच्या पाऊलवाटा त्याला सापडू शकतात. त्याच्या रसिकतेला एक प्रकारचा ताजेपणा टवटवीतपणा येऊ लागतो, प्रसंगी शास्त्राच्या मर्यादा ध्यानी घेऊन त्यातील त्याला जाणवू लागतात. पर्यायाने त्याच्या काव्यस्वादात व काव्य मूल्यमापनात नकळत सहजता, स्वाभाविकता येते, एका परिने तो कला रहस्याच्या जवळ कोठेतरी जाऊन उभा राहतो.

" आधुनिक कविता आणि काव्य विमर्शकानांही काव्याच्या जन्माचे रहस्य पुरतेपणे उमगलेले नाही. पॉल व्हेलरी सारख्या कवीची ही प्रथम एक दोन पावले जुन्या वाटेनेच जातात. तो म्हणतो,

One line is given to the Poet by God or by nature, the rest he has to discover for himself. "

(देव किंवा तसलीच एखादी अद्भूतरम्य शक्ती कविला एखादी ओळ देऊन जाते --- राहिलेले सारे त्याला स्वतःला शोधावे लागते.) ही एखाद् दुसरी ओळ कवीला स्फूर्तीच्या क्षणी कोठून तरी मिळते, काव्य निर्मितीत एक स्फूर्ती वगळता, उरलेले सारे श्रम, परिश्रम असतात. हा स्फूर्तीचा क्षण देवदत्त असतो. असेही आता निःशंकपणे कोणी मानीत नाही. पण एवढे खरे की, प्रतिभा शक्तीला असे उधान येते की, शेकडो कल्पना मनात उसळ्या मारुन वर येतात आणि कागदावर उतरायच्या आतच अंतर्धानतही पावतात, कवी तांबे यानी आपले असे अनुभव पत्रातून अनेकदा मांडले आहेत. प्रतिभेचे हे उधान– ही अनावर स्फूर्ती– कवितेला जन्म देते. अशा क्षणी एखादी प्रतिभा विपुलतेप्रमाणे तल्लख आणि चपळ बनते. व देहभान लोपलेल्या मनोवस्थेत सारी कविता देऊन मोकळी होते, तर एखादी प्रतिभा उत्स्फूर्त काव्यपंक्ती तशीच मनात घोळत ठेवते. आणि थांबत थांबत, महिना दोन महिन्यानी कधी वर्ष किंवा त्याहूनही अधिक काळ घेऊन – कविता पूर्ण करते. पुष्कळदा तर ही ती उत्स्फूर्त काव्यपंक्ती मनाच्या

तळात कायमचीच उपेक्षितपणे पडून राहते! अर्थात कवितेचे मोल ती किती काळात लिहिली गेली यावर अवलंबून नसते, तर ते तिच्या अखेरच्या निर्दोष, सुंदर घाटात असते. हे सांगायला नकोच!

प्रत्येक कविची वास्तवाशी नाते शोधण्याची जोडण्याची तऱ्हा वेगळी असते. आणि त्यातून कविता निर्माण करण्याची क्रियाही वेगळी असते. कविता केली जात नसते ती होत असते. हे सर्वांनाच मान्य असले तरी कवितेला जो निर्दोषसुंदर घाट लाभतो तो येदच्छा लाभत नाही. सुचलेला शब्द किंवा ओठात आलेली ओळ आहे. तशीच राहते की, अखेर पर्यंत बदलते ? ती का बदलते ? कशी बदलते ? हा बदल अपरिहार्य असतो का ? मग लेखनपूर्व व लेखनगर्भ आत्मनिष्ठा म्हणजे काय ? ह्या आत्मनिष्ठा पडू शकतात, बदलू शकतात काय ? तसे होत असेल तर कलाकृतीच्या घाटावर त्याचा परिणाम होतो का ? हे जे घडते ते बोधपूर्वक की अबोधपूर्वक ? बोधपूर्वक असेल तर ते चिकित्सा करण्याइतके साधेसरळ असते की, चिकीत्सेपलीकडील जटील समस्या असते ? अबोधपूर्वक असेल तर हा चिकीत्सा व्यापार खुंटलाच म्हणायचा ! की अबोधाच्या प्रांतात शिरण्यापुरता काही चोरवाटा मिळतात ? मूळ अनुभव तरी सुस्पष्ट असतो का ? की शब्दरुप घेत घेत तो अधिकाधिक स्पष्ट होत जातो. त्याला शेवटचे शब्दरुप मिळते. तेंव्हा तोही त्याबरोबरच पूर्ण होतो का ? की पुन्हा शब्दा पलिकडचे ? शब्दाहून मोठे तरल, सुक्ष्म असे कांही कवी हृदयात सांगायचे उरतेच ? असे काही मागे राहत असेल तर ते उमगते कसे ? शब्द थिटे पडतात म्हणजे काय ? कविता तिच्या अत्युच्च कलाबिंदूला पोहचते तेंव्हा ती तिच्या अविष्कार साधनाहूनही मोठी बनते. या विधानाचा अर्थ मग कसा लावायचा ? 'कवि म्हणजे शब्दसृष्टीचे ईश्वर' ही वृत्ती अर्थवादात्मकच मानायची कां ? कवितेची भाषा ही प्रतिमांची भाषा असते म्हणजे नेमके काय ? - - - असे अनेकविध प्रश्न आपल्या मनात येतात. ज्यांना प्रत्यक्ष या प्रश्नाशी झुंज द्यायची असते व काही घडवायचे असते, त्या कवीचे स्वानुभावाचे बोल अशावेळी ऐकायला मिळणे महत्त्वाचे असते. टीकाकारांपेक्षा कवीवर रसिकांच्यावर अधिक विश्वास असतो, प्रेम असते. त्यामुळे कवीच्या आत्मकथनाचा रसिक मनावर चट्कन प्रभाव पडतो. त्याच्यात एक प्रकारचे सौहार्द निर्माण होते, सामान्य वाचकालाही कवितेची गोडीं लागते.

कविचा अनुभव हा त्याचा स्वतःचा, त्या कालाचा, त्या क्षणाचा असतो. पण तो कालाच्या चौकटीबाहेरचा अधिक व्यापक आणि पूर्णतेकडे झुकलेला असतो. तो त्याचा स्वतःचा असूनही, तो त्याच्या एकटचाचा नसतो. भावोद्रेकाच्या पहिल्या लाटेत कागदावर खरडलेल्या ओळीत, नेहमीच 'कविता' असते असे नाही, तेथे काही तरी आवेगाने स्फंदन असते. ह्या स्फंदनातूनच पुढे कविता आपली लय घेते. आपले संगीत घेते. ही लय, हे संगीत तिच्या घाटात, कणाकणात, प्राणामनात

भरभरून आवतरत असते. ते पुन्हा कसे घडते ? हा असा आकृतीबंध तिला कसा येतो ? अनुभवाच्या मूळ आकृति सोडून, त्याची मूळ नाती तोडून, सारे पुन्हा नव्याने जोडून, गुंफून त्यातून एक रसरशीत, स्फंदनशील, चैतन्यमय असा नवा आकृतिबंध कसा निर्माण होतो ?

वास्तव आणि कविमन यांच्यातील अ–लौकिक पातळीवर होणाऱ्या या क्रिया प्रतिक्रियातून जन्मणारा एक भावानुभाव, वाढत वाढत विकास पावत, संस्कारित होत–होत पूर्णाकार कसा घेतो आणि या पूर्णाकारातच त्यांचे लय सौंदर्य आणि संगीत कसे एकजीव झालेले असते. हे जाणण्यात आणि अनुभविण्यात रसिक मनाला फार फार आनंद वाटत असतो.

कविच्या अशा आत्मानिवेदनातून, आत्मशोधनातून, अंतर्मुखनातून, आत्मा-वेगनातून हे मार्ग खुले होत जातात. जागेपणी, दिवसा–उजेडी कवि जी स्वप्नाची रात्र जागवित असतो. ती स्वप्ने अक्षर ब्रह्माच्या प्रकाशात उतरताच सत्ये (Truths) बनतात. त्यांना तेजाचे पंख लाभतात आणि सौंदर्याचे अंकूर फूटतात. प्रांतात ह्याचा प्रारंभ होत असला तरी पुढे जाणिवेच्या सृष्टीतच तिला आकार मिळत असतो. झाडाला पालवी फुटावी, इतक्या सहजतेने कवि मनात कविता स्फुरावी हे जरी खरे असले तरी Inspiration is the beginning of a poem and it is also its find goal - - - In between this start and the winning post there is the hard race, the sweat and toil. हे ही त्यातून अधिक खरे आहे. कवितेचे हे आदि अंत गूढ असले तरी व्यक्त मध्यातील कविमनाचा हा प्रवासही काही गूढरम्य नाही- - - या वाटेने जमेल तेवढे पुढे जावे - - - गुढतेच्या धुक्यात वाट हरवत जावे. जरा 'धीरच धरून' आणखी थोडे पुढे जावे. धुक्यात हरवण्यातही एक विलक्षण आनंद असतो. तो हरवण्याचा आनंद–शांताबाई पुढील स्वरुपात व्यक्त करतात.

" माझी कविता कशी फुलते "

(हस्तलिखित लेख)

कविता कशी फुलते ? खरेच कशी फुलते ? गेल्या अनेक वर्षातून वेळीवेळी लिहीलेल्या माझ्या कवितांकडे मी जेंव्हा थोडचा अलिप्त, तटस्थ वृत्तीने बघण्याचा प्रयत्न करते, तेंव्हा वेगवेगळचा काळातल्या कवितांच्या निर्मितीमागे वेगवेगळचा प्रेरणा उभ्या असलेल्या मला दिसतात. प्रारंभीच्या उमेदवारीच्या काळात विपूल लिहीणे या गोष्टीचेच एक पोरकट आकर्षण मनाला वाटे. दिवसाकाठी चार किंवा पाच कविता लिहील्या म्हणजे आपण काही तरी फार मोठा पराक्रम केला, याबद्दल शंका उरत नसे, आणि त्या कवितांकडे मी मोठचा आत्मीयतेने, आत्मसंतुष्ठवृत्तीने बघत नाही. कवितांचे मोठेपण त्यांचे संख्येवरून नव्हे तर त्यांच्यातून प्रकटणाऱ्या प्रामाणिक आत्माविष्कारातून आणि सतत विकासशील, सुजाण अशा कलात्म

जाणीवेच्या चढत्या आलेखावरून ठरवायचे असते. हे त्यावेळी मला माहीत नव्हते. त्याच सुमारास मला आणखी एका गोष्टीचे अपरुप वाटत असे. एखाद्या आवडत्या कवितावरहुकूम आपली कविता उतरली की जीवाला मोठा आनंद होई. केशवसूत, बालकवि सारख्या नामवंतापासून तो श्रीनिवास पाटकरसारख्या (रसिकांना अपरिचित पण व्यक्तिशः माझ्या आवडत्या) कवीपर्यंत कोणाचेही अनुकरण करणे ही माझी तेव्हांची मोठ्यातली मोठी महत्त्वाकांक्षा असे. रविकिरण मंडळाच्या कवीचा तर आदर्शच माझ्यासमोर उभा होता. त्यामुळे त्यांच्या काव्याचे पुष्ठपित्र घेऊन त्या आधारे कविता करणे यात काही गैर आहे असे वाटतच नसे. तात्पर्य, भरपूर लिहिणे आणि इतरांची हूबेहूब अनुकरणे करणे हाच या प्रारंभीच्या लाळातल्या माझ्या कविता लेखनाचा अर्थ व आकांक्षा होती. हे सर्व लेखन पोकळ पडसादासारखे आहे. हे स्पष्टपणे अन्भेदकपणे समजायला बराच काळ जावा लागला.

त्यानंतरची मधली काही वर्षे मोठ्या विचित्र अवस्थेत गेली. तेव्हांही मी कविता लिहीतच होते. (तसे तर कविता लेखन मी कधीच सोडले नाही) पण या कवितामधून आपण आपले स्वत्त्व, आपले अनुभव शोधीत आहोत. असे काही केल्या वाटत नसे. पूर्वसूरीचे संस्कार आणि त्यांचे मनावरचे दडपण इतके जबरदस्त होते की, त्यातून बाहेर पडणे फार अवघड आहे. हे लौवकरच ध्यानात आले. शिवाय मधल्या काळात मराठी कवितेनेही इतकी बहुविश्व रुपे धारण केली, इतके उलट सुलट परस्पर विरोधी प्रवाह तिच्यातून वाहू लागले की, माझ्या सारखीचे मन त्यामुळे गोंधळून गेल्यास त्यात काही आश्चर्य नव्हते. या कवितात आपली कविता नेमकी कुठे बसते हे मला कळेना. पुष्कळदा, आपण जे लिहीतो त्याला कविता तरी म्हणता येईल की नाही, हे मला समजेना. पण या साऱ्या संभ्रमपूर्ण अवस्थेतूनही माझे कविता लेखन धडपडत आपली वाट शोधीत आणि आपला आकार आपण घेत, प्रकट होतच राहिले. चाचपडत का होईना, पण मी कुठेतरी जात होते. आपले अनुभव, आपली आवड खास आपल्या पद्धतीने व्यक्त करुन बघत होते. इतरांचे पडसाद त्यात उमटू नयेत. अशी निदान माझ्याकडून मी काळजी घेत होते. त्यातूनच अलिकडच्या काळातल्या माझ्या कविता लिहिल्या जात आहेत. त्या बऱ्या असतील, वाईट असतील पण त्या 'माझ्या' आहे. असे मला प्रामाणिकपणे वाटते. या कविता लिहिताना आणखीन एक गोष्ट मी करण्याचा प्रयत्न करते. या कविता निर्मितीकडे काहीशा तटस्थ, वस्तुनिष्ठ दृष्टीने बघावे, त्यांचे स्वरुप पारखावे, त्यांतून स्वतःचे मन, स्वतःचे अनुभव कसे प्रकटतात हे जाणून घ्यावे, असे वाटते. हे नेहमी साधलेच असे नाही. पण निदान असा प्रयत्न करण्याची आवश्यकता मला भासते. या धडपडीत एखाद्या कवितेमागच्या आपल्या मानसिक प्रक्रियांचा आपल्याला शोध घेता येतो. कधी कधी कवितांपेक्षाही हा शोध अधिक

आनंददायक, अधिक उपकारक ठरतो. कविता कशी फुलते, हे देखील यातूनच केव्हातरी ध्यानात येते– –

अर्थात, हे विधान मर्यादित अर्थानेच पत्करायला हवे. याचे कारण एका विशिष्ट सीमा रेषेपलीकडे ही प्रक्रीया गुढ, अनाकलीय अशीच आहे. काही शब्द संहनी मनात कशा जाग्या होतात, शब्दांच्या साखळ्या कशा जुळत जातात, विशिष्ट प्रतिमा कोठून कशी येते, याला तसे खरोखरच उत्तर नाही. कधी कविता मनात जन्म घेते तेथून ती प्रकटते. काही वेळा ती बाहेरुन मनात शिरते. तिथे रुजते, अकुंरते. या बाहेरुन आत शिरणाऱ्या कवितांचे निर्मितीचे थोडे बहुत स्पष्टीकरण करता येते.

अशी बाहेरून माझ्या मनांत शिरलेली एक कविता मला आकवते. ती कविता ' झाड ' ही होय. तीन–चार वर्षापूर्वीची गोष्ट असेल. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मी नासिकला चालले होते. एस. टी. चा प्रवास, वेळ रात्रीची सारे आसमंत दाट काळोखात बुडालेले ! बहुतेक उतारु पेंगत होते. मला मात्र काही केल्या झोप येत नव्हती. ताठ, रकरकीत डोळ्यांनी मी बाहेरचा काखोख न्याहाळीत होते. मन संपूर्ण रिते होते. ना त्यात कसला विचार ना कसली संवेदना. असा क्षण एरव्हीच्या आपल्या धावपळीच्या कार्यमग्न जीवनात क्वचितच येतो. कधी प्रवासातच तो लाभला तर तो लाभतो. तोच दुर्लभ, अलौकीक रितेपणाचा क्षण कधी नव्हतेही. जागृति आणि सुबुद्धीच्या सीमेवर जाणीव थबकून उभी होती. इतक्यात समोरून एक भरवेगाने एक ट्रक आला. त्याचा प्रखर प्रकाशाचा झोत रस्त्याशेजारच्या काळोखावरून भर्रकन फिरला. आणि त्या काळोखात उभे असलेले एक कडूलिंबाचे झाड आपादमस्तक उजळून निघाले. एखादाच क्षण, पण त्या अल्पावधितच त्या झाडाचा बुंधा, फांद्या, पाने इतकेच नव्हे तर त्यावर फुललेल्या मोहोराचा तुरा न तुरा, फुलांची पाकळी न पाकळी सारे मला स्पष्ट अगदी स्पष्ट दिसले. आणि मनांवर रेखले गेले. दुसऱ्याच क्षणी तो लिंब तो आसमंत गाढ काळोखात बुडून गेला. पाण्यात निखारा विझावा तसे काहीतरी झाले.

पण त्या एका क्षणाने मला सचेत केले. तो लिंब माझ्या मनात शिरला. तेथेच जणू वसतीला आला. इतकेच नव्हे तर तो मला फार परिचित, एखाद्या जुन्या ओळखीच्या दोस्तासारखा वाटला. आणि मला माझ्या ध्यानात आले की, त्या लिंबाने माझ्या बालपणातल्या दुसऱ्या एका लिंबाची मला आठवण करुन दिली. हा लिंब माझ्या आजोळी अंगणात उभा होता. त्याच्या सावलीत खेळण्यात, त्याच्या लिंबोळ्या वेचून त्यांच्या आठ्या पिकविण्यात, त्याच्या फांद्याना झोका बांधून नागपंचमीला त्यावर झोके घेण्यात माझे बालपण गेले होते. नंतर मी थोडेशी जाणती झाले तेव्हा मनात नव्याने उमलू लागलेल्या गूढ भावना, संवेदनावर आकाराला येऊ बघणाऱ्या भावविश्वावर या लिंबाने आपला मोहोर ढाळला होता.

त्याच्या हिरव्या पांढऱ्या फुलांच्या कटूमधूर उग्र सुगंधाची शिंपण माझ्या अवघ्या अस्तित्त्वावर झाली होती. तो लिंब माझा जिवलग आप्त होता. माझ्या अनेक स्वप्नांचा साक्षी होता. त्याच्याकडे पाहिले की मला फार समाधान वाटे. कसले तरी खोल आश्वासन मिळाल्याचा भास होई. कित्येक वर्षातून त्या लिंबाचे आणि माझे भावबंध असे जुळत गेले होते. मी मोठी झाले, आजोळी जाई तेव्हां तो मला भेटे आणि मग, एकदा मी आजोळी गेले तर लिंब तिथे नव्हता. ते झाड मध्यंतरी तोडून टाकण्यात आले होते. मला विलक्षण धक्का बसला, लिंब नव्हे तर माझ्या व्यक्ती–मत्त्वाचा एक महत्त्वाचा भाग नष्ट झाल्यासारखे मला वाटले. मला अनावर दुःख झाले.

आणि आज इतक्या वर्षानी, नाशिकला जाताना एका अनोळखी जागी, परक्या रस्त्यावर, मध्यरात्रीच्या काळोखात हा एक दुसराच लिंब मला आकस्मात भेटला. हा लिंब वेगळा होता आणि तरी ही मला वाटले की हा तो माझा जुना परिचित मित्रच आहे. तो जुना लिंब नष्ट होऊनही नष्ट झालेला नाही. तोच इथे पुन्हा रुजला आहे. इतकेच नव्हे तर तो पुन्हा अनेक ठिकाणी असाच रुजणार आहे. अगदी अनपेक्षित ठिकाणी पुन्हा मला असाच भेटणार आहे. इथे, तिथे सर्वत्र तो असेल फार काय सांगावे, मी जरी मरुन गेले तरी ही असेल. तो रुजून उमलून येईल. माझ्या आजोळचा लिंब, मी स्वतः आणि हा अगदी अपरिचीत असा लिंब, आम्ही तिथे वेगळे नाहीच. एकाच अस्तीत्त्वाची ही तीन वेगवेगळी रुपे आहेत. बाह्यतः भिन्न दिसणारी पण अंतर्यामी स्वत्त्व असलेली. हे झाड भोवतालच्या निसर्गाचे एक प्रतिक आहे. आणि मी या निसर्गाचाच एक भाग आहे. मी झाडाची झाड मातीचे, माती माझी अशी कधीच न तुटणारी ही एक विलक्षण साखळी आहे. हे सारे मला जाणवू लागले आणि त्या जाणिवेसरसी कविता मनात आपोआप जुळू लागली. बाहेरचा तो लिंब आता कितीतरी मागे पडला. होता. भरधा व जाणाऱ्या गाडीने केवढे तरी अंतर झपाटयाने तोडले होते. पण तो लिंब मला दुरावला नव्हता. उलट तो आता कायमचाच माझ्या मनात राहायला आला होता. इतकेच नव्हे तर आता माझ्या कवितेतूनही तो अनिवार्यपणे प्रकटत होता.

मी सांगितलेला हा सर्व अनुभव नेमका असाच, याच क्रमाने मला आला असेल असे नाही. पण सामान्यतः घडले ते असेच होते. आणि कविता आकाराला आली, तीही अशाच रीतीने आली. हा सर्व अनुभव कवितेत कोणते रुप घेऊन प्रकट झाला ते बघावयाचे. मूळचा लिंब हा कवितेत फक्त ' झाड ' म्हणून आला. कारण, मला लिंबपणापेक्षा त्याचे झाडपण अधिक महत्त्वाचे, अधिक अर्थपूर्ण वाटत होते. ' झाड ' शब्द वापरल्यामुळे त्याच्या अर्थाची कक्षा अधिक व्यापक झाली. अवघी वृक्ष, सृष्टी, इतकेच नव्हेतर अवघा निसर्ग त्या शब्दाच्या द्वारा सूचीत झाला. जुना लिंब, नावलिंब मी या साऱ्याचेच रुजणे, वाढणे मला त्यातून व्यक्त करता आले. इतकेच नव्हेतर या साऱ्याची एकरुपकता ही मला त्यातून

सूचकता आली. ' झाड ' या शब्दाची जशी मी सहेतूक योजना केली त्याच प्रमाणे बालपणाशी संबंध असणारा इतर पक्षी बालगाणी या एकाच शब्दात सामावण्याचा मी प्रयत्न केला. जुन्या झाडाचे मरण मी ' ढलपी सुटून मुळे झाली सैल. ' या ओळीतून सूचीत केले. तर माझे आणि झाडाचे अतूट अपरिहार्य एकपण ' कधितरी एकेदिवशी मीच झाड होईन, या ओळीतून मला दाखवता आले. अर्थात् ' मी असे केले मी अमुक ओळ लिहीली, मी अमूक कल्पना केली किंवा 'अमूक प्रतीमा वापरली' या सारखे जे मी लिहित आहे. ते केवळ स्पष्टीकरणाच्या सोयीसाठी. कारण कविता जाणीवपूर्वक आखून रेखून ठरवून लिहीली जात नाही. ' झाड ' ही कविता ही मी त्या पद्धतीने लिहीली नाही. ती आपोआप मनात जुळत गेली आणि परिपूर्ण झाली. आता तिचे स्वरुप न्याहाळताना कोणता शब्द मी का वापरला असेल, कोणती ओळ मला का सुचली असेल. याचे ही नंतरचे मला जाणवलेले विश्लेषण आहे. कारण, 'झाड' ही कविता अशी शब्द शब्द जुळवीत मी कागदावर लिहून काढलीच नाही. त्या प्रवासातच ती संपूर्ण मनातल्या मनात जुळवून आली. कविता सिद्ध होताना मनात काय उलथापालथ होते, काय घडामोडी होतात, कोणत्या प्रक्रियेतून आकाराला येते हे खरोखरीच सांगता येत नाही. कवितेत जाणीवपूर्वक रचनेचा ' कारागिरी ' चा भाग अगदी नसतो असे नाही. कविता तयार झाल्यानंतर तीत दुरुस्ती, परिष्करण हे ही कित्येकदा केले जाते. तरी देखील तिचा मूळ आकार फारसा बदलता येत नाही. थोडीशी अतिशयोक्ती करुन बोलायचे तर असेच म्हणावे लागेल की, कविता प्रथम ' होते ' आणि मगच ती ' जाणवते ' शेवटी तिच्याकडे बघून कशी स्मिमित होते, कधी तृप्त होते, तर कधी आतल्या आत असंतोषाने घुसमटत राहते., एवढेच फक्त आपल्या हाती उरते. ते काही असो, ' झाड ' ही माझी एक आवडती कविता आहे. आणि त्या दिवशी मध्यरात्री प्रवासात मला जो विलक्षण अनुभव आला तो कवितेत पकडण्याचा माझा प्रयत्न बराचसा यशस्वी झाला आहे. असे मला वाटते. आपल्या एखाद्या कवितेवर प्रेम करण्याची मोकळीक कवीला द्यायला हरकत नसावी, नाही का? ' झाड ' ही कविता अशी आहे.

हे एक झाड आहे. याचे माझे नाते - - -
वाऱ्याची एकच झुळूक –
दोघांवरुन जाते

मला आवडतो साऱ्या फुलांचा वास
वासामधून उमटणारे
जाणीव-ओले भास

पहिल्यानेच याची मोहरताना फांदी
ठेवली होती बालपणी
याच्या कटि खांदी
माती चे झाड, झाडांची मी, माझी पुन्हा माती
याच्या पानावरच्या रेषा
माझ्या तळहाती
ढलपी ढलपी सुटून मूळे झाली सैल
रुजते आहे झाड
माझ्या रक्ताच्या पैल.

❖

गीते : काही अनुभव

माझ्या गीतलेखनाचा जेव्हा मी विचार करते, तेव्हा हेतूपूर्वकतेपेक्षा योगायोगाचा भाग त्यात अधिक आहे, असे मला वाटते. रेडिओ, चित्रपट, ध्वनिमुद्रिका यासाठी मी आतापर्यंत अनेक गीते लिहिली. नाटकांसाठी पदे लिहिली. पण यातले काहीही मी स्वत: होऊन, जिद्दीने किंवा महत्त्वाकांक्षेने केले आहे असे मला दिसत नाही. प्रत्येकवेळी कुणी ना कुणी मला सांगून भरीला घालून शब्दात गाठून माझ्याकडून गीते लिहवून घेतली नसती तर यातले काहीही कदाचित माझ्याकडून झाले नसते.

जाणीवपूर्वक जरी मी गीतलेखन केले नसले तरी गीतलेखनाला उपकारक ठरणाऱ्या अनेक गोष्टींचा फार लहानपणापासून माझ्यावर संस्कार होत गेला.कळत न कळत त्यातले बरेच भाव कुठेतरी साठत गेले असावे. ते पुढे गीते लिहिताना माझ्या कामी आले असावे. माझे लहानपण खेड्यात गेले. आमचे घर नात्यातल्या अनेक बायकांनी भरून गेलेले असायचे. त्या काळातल्या अनेक कुटूंबाप्रमाणे आमचेही एकत्र कुटूंब होते. त्यामुळे वडलांकडून काय किंवा आईकडून काय माझ्या दोन्ही आजोळी स्त्रीयांची संख्या खूप होती, त्यांच्या तोंडून जात्यावरच्या ओव्यापासून तो नागपंचमीच्या फेराच्या गाण्यापर्यंत अनेक प्रकारची गाणी माझ्या कानावर पडत. या गाण्यांना ताल असे, लय असे. या तालबद्धतेची, लयाची जाणीव फार लहानपणापासून मला झाली असावी. त्या गाण्यांचे असे खोल ठसे माझ्या मनावर उमटलेले आहेत की एखाद्या निवांत संध्याकाळी उदास हुरहूरीच्या वेळी अजूनही त्यातल्या ओळी अवचित मनात जाग्या होतात. ते शब्द, ते सूर मला खिन्न करतात. माझी आजी सर्व सणांची नावे ज्यात गुंफली आहेत असे एक लांबलचक गाणे

म्हणायची. त्याचा सुरुवातीचा भाग असा होता-

कांडून कुटून केली पंचमी
नेटकाच लागला डोळा
आला श्रावणी पोळा
श्रावणी पोळचाची काढीत होते चित्रं
आली वडिलाची पित्रं
वडिलांच्या पित्राची निशीत होते डाळ
आली घटाची माळ - - -

हे गाणे आजही मला संबंध येते. तसेच आमच्या घरी वारंवार ऐकलेले खंडोबा आणि त्याची राणी, वाण्याची लेक बाणाई यांचे एक गाणेही मला आवडायचे ते असे होते,

' बानू चल ग चाल ग सारंग्या बाजारी
तिथं उत्तरेला उतरला जेजूरीचा वाणी
त्यानं आणिल्या आणिल्या खारकेच्या गोणी

माझी मावशी एक गाणे नेहमी गुणगुणे, त्याचा प्रारंभ होता,

' साजणी सई ग, साजणी सई ग
साजण नाही घरी जाई सुकली ग '

मावशीबरोबर मलाही हे गाणे पाठ होऊन गेले. या गाण्याची सुरुवात माझ्या मनात अशी रूतून बसली होती की नंतर बऱ्याच वर्षांनी, अगदी अलीकडे, हाच प्रारंभ धरून पुढे त्याला अंतरे जोडून मी एक लावणी लिहिली.

' स्त्री गीत रत्नाकर ' आणि ' मानस गीत सरोवर ' ही बायकांच्या गाण्याची दोन पुस्तके माझ्या लहानपणी आमच्या घरी होती. ' माझी आई व माझी मावशी या दोघीजणी मराठी शाळेतल्या दोनचार इयत्ता शिकलेल्या होत्या पण गाण्याचे त्यांना फार वेड होते. त्यांच्या तोंडून वरील दोन्ही पुस्तकातली अनेक गोड गाणी मी वारंवार ऐकली. 'स्त्री गीतरत्नाकरा'त कुण्या एका 'गंगाबाई'ने लिहिलेली अनेक गीते होती.

" शरद तू हृदय चंद्राचा
वनि वृंद उभा गवळणीचा
सुगंध सुटत सुमनांचा
ये पवन मलयगिरीवरचा "

हे अतिशय हृद्य गाणे या गंगाबाईचेच. ' मानसगीत सरोवर ' हे कृष्णाबाई गाडगीळ या कवयित्रीचे पुस्तक तेव्हा स्त्रीयांना भारी आवडे. माझ्या आईच्या

वेळेपासून आमच्या घरात या पुस्तकाच्या किती प्रती आजपर्यंत आल्या असतील कोणास ठाऊक ! त्यातली गाणी घरात वारंवार ऐकल्यामुळे मला ती आपोआप पाठ होत गेली.

मला गीतलेखनातल्या अनेक गोष्टी अजाणतेपणी कळल्या असाव्यात. त्या ' मानसगीत सरोवरातल्या ' गाण्यांतूनच उत्तम गीतलेखनाला आवश्यक असे कितीतरी गुण कृष्णाबाईंच्या लेखणीत होते. अतिशय आकर्षक घृपद, सोपे नादमधूर शब्द चित्रदर्शी वर्णनशैली– हे सारे काही कृष्णाबाईंच्या गाण्यात आढळून यायचे. 'आजि कमलनायका मुरली वाजवू नका,' ' गोपीनाथा आले आले सारुनिया काम रे ! वृंदावनी वाजविसी वेणू जरा थांब रे,' ' पायात साखळ्या वाळे चाळ । दिसे मौजेचा श्रीगोपाळ, ' श्रीयाळ अंगणी शिव आले । अंगी भस्म चर्चियले । व्याघ्रग्र जघर्म ओले । डमरु त्रिशुळा करि घरिले ' अशी या कृष्णाबाईची गोड प्रासादिक रचना आहे. यातली अनेक गाणी मला अजून पाठ येतात.

माझे वडील रेंज फॉरेस्ट ऑफीसर होते. तेंव्हा एकदा आम्ही डांगमधल्या चिखलदा या गावी राहत होतो. तिथे शेजारच्या गुजराती कुंटूबाशी आमचा खूप स्नेह जडला. त्यांच्या घरी मी काही गुजराती गाणी ऐकली, काही ध्वनिमुद्रिका ऐकल्या. त्यातली दोन–तीन गाणी आजही आठवतात. एक मीरेचे गाणे होते, हूं तो प्रेमनी जोगन पियाने शोधवा चाली ' दुसरे गाणे गांधीजीना उद्देशून होते. त्यात गरीबी–श्रीमंतीचा सनातन संघर्ष मांडला होता. गांधीजीना त्या गाण्यात ' लंगोटीयार ' असे संबोधले होते. गाणारी स्त्री गांधीजीना म्हणते–

" हाय रे बाबा लंगोटीयार !
तारी टूटेली झोपडीमां कोन
रहेता ?
तारा मंगटेन टुकडा कोन
खाता ?
दुधी हलवा खानारी रे बाबा
हाय रे बाबा लंगोटीयार ! "

हे गाणे मला गमतीदार वाटायचे. त्यातला ' राष्ट्रीय ' आशय कळण्याचे अर्थातच ते वय नव्हते. दुसरे एक गुजराती गाणे होते, ' म्हारा डायल्या मंगळीया । चिकीनी डाबडी खोवानी ' याचा अर्थ असा: एक म्हातारा किंवा म्हातारी आपल्या डायल्या आणि मगळ्या या नातवंडाना आपली हरवलेली तपकिरीची डबी शोधून आणायला सांगत आहे.

आमच्या घरी लोकगीतांचा भरपूर भरणा होता. जात्यावरच्या ओव्या, दारावर येणाऱ्या भिक्षेकऱ्याची गाणी, लग्नसमारंभाच्या नाना सोहोळ्यांची गाणी,

न्हाणवलीची गाणी, अंगाईगीते, नागपंचमीची फेराची गाणी सारे मी कान भरून आणि मन भरून ऐकत होते. मनाच्या ओल्या मातीवर ते सारे रेखाटले जात होते. नादांचे, चित्रांचे, गंधाचे अनेक इंद्रियसंवेध अनुभव मला जाणवत होते. त्या काळात ऐकलेल्या गाण्यातल्या कितीतरी तुटक-तुटक संदर्भहीन ओळी कधीतरी अचानक आठवतात. न्हाणवलीच्या एका गाण्यात या ओळी होत्या-

कुणी बोलवा कासारा
चातुराला
हिरव्या बांगडचा गोरीच्या
मखराला!

आणखी एका गाण्यात या ओळी होत्या-

पाणी चढलंय ग चढलंय ग
पहिल्या पायरीवरी
घागर उचलली उचलली दंडा
भांडचावरी
चोळी तडकली तडकली डाव्या
भुजेवरी
शिपी बोलवा बोलवा मायेच्या
साजणी

या गाण्यांचे शब्द तशाच त्यांच्या चालीही मनावर ठसलेल्या आहेत. गाण्यांचे शब्द लिहून दाखवता येतात. चाली कशा लिहून दाखविणार ? लोकगीतांच्या चालींचा सगळा गोडवा सगळी हृदयता आणि सरलता त्या गाण्यांत भरलेली असायची. या गाण्यांनी मला एक महत्त्वाची गोष्ट शिकविली, ती ही की लयक्रमाचा बेशिस्तपणा वृत्तबद्ध रचनेला आवश्यक आहे. पण छंदाला, लावणीला, लोकगीताला त्याची गरज नाही. तिथे लघुअक्षर जरासे लांबवले किंवा दीर्घ अक्षर जरासे खेचले तर काही बिघडत नाही. अुलट अशा सैल रचनेमुळे गाण्याचा गोडवा वाढतो. त्याला जास्त स्वाभाविकता प्राप्त होते. ते बोलीभाषेच्या अधिक जवळ जाते. नंतरच्या काळात चित्रपटासाठी गाणी लिहिताना हे ज्ञान माझ्या उपयोगी पडले. एक उदाहरण देऊन सांगते, ' मराठा तितुका मेळवावा ' या चित्रपटाची गाणी मी लिहित होते. आवाज लताबाईनी दिला होता. त्यांनी एक चाल गुणगुणून दाखवली, पेटीवर वाजवून दाखवली. मी चालीवरहुकूम रचना करीत गेले.

रेसमाच्या रेगानी । लालकळचा
धाग्यांनी ।

कर्नाटकी कशिदा मी काढीला
हात नगा लावू माझ्या साडीला ।

या ओळीत 'कर्नाटकी' या शब्दाचे वजन 'लाललहा' असे होते. काटेकोरपणे बघायचे झाले तर वजनाच्या मात्राच्या हिशेबाने 'कर्नाटकी' शब्द तिथे बसत नव्हता. परंतु लताबाई म्हणाल्या. 'इथे कर्नाटकी' शद्वाचा जो सैल उच्चार करावा लागतो. तो लावणीच्या बाजाला उलटा खुलून दिसेल. त्याने गाण्याची गम्मत वाढेल." आणि त्यांनी तो शद्व ठेवायला लावला. लोकगीत लावणीला शद्वांची ह्रस्वदीर्घची सैल रचना उपकारक ठरते. असे माझे बऱ्याच वर्षांचे मत होते. लताबाईंच्या बोलण्यामुळे एका अधिकारी व्यक्तीकडून त्या मताला दुजोरा मिळालेला पाहून मला समाधान वाटले.

गीतलेखनाची माझी तयारी अशी आतल्या आत बरीच वर्षे चालू होती. त्याच्याच बरोबरीने मी कविता वाचत होते. माझ्या संस्कारक्षम वयात मी ज्या कविता विशेष प्रेमाने वाचल्या त्या रविकिरण मंडळातील कवींच्या आणि तांब्यांच्या. हा काळ धृपदप्रधान रचनेचा होता. ही रचनाही एका अंगाने गीताला जवळची होती.

हे माझे शाळा कॉलेजचे दिवस होते. आमच्या मोठ्या थोरल्या आणि परिस्थितीने यथातथा असलेल्या एकत्र कुटुंबात इतर कसल्याही चैनी आम्हाला तेव्हा वर्ज्य होत्या. नाटके मी अजिबात पाहिली नाहीत.

पण माझ्या काकांनी चित्रपट तेंव्हाच्या भाषेत बोलायचे तर सिनेमा मात्र आम्हाला खूप दाखवले. 'अयोध्येचा राजा,' 'मायामच्छिद्र,' अग्निकंकण' इथपासून तो 'कूंकू – माणूस पर्यंतचे प्रभातचे सर्व चित्रपट. भालजी पेंढारकरांची कथा असलेला 'श्यामसुंदर' सरस्वती सिनेटोनचे व नंतर हंस. नवयुगचे अनेक चित्रपट मी आवडीने पाहिले. गोविंदराव टेंबे, सदाशिव अनंत शुक्ल, शांताराम आठवले, राजा बढे, आचार्य अत्रे अशा गीतकारांची अनेक सुंदर गीते त्या चित्रपटातून मी ऐकत होते. या सर्वच कवींच्या रचना, प्रासादिक, नादमधूर, अर्थपूर्ण असत. टेंब्यांचे हे 'मायामच्छिद्रा' तले गीत किती गोड आहे–

" आकळे न अघटित घटना तव दयाघन
सिद्ध पुरुष सद्गुरु अजुनी
मग्न होती माया व्यसनी
केवि करिती तप नाशोनी
आत्मवंचना ! "

माडगुळकर फार नंतर चित्रपटगीते लिहू लागले– पण त्यांच्याही आधी या सर्व गीतकारांनी माझ्या मनावर सुंदर संस्कार केले होते. मराठी चित्रपटांच्या जोडीला

न्यू थिएटरचे बहुतेक सर्व चित्रपट नंतर आलेले पंजाबी ढंगाचे ' खजाँची ' 'दासी' ' जमीदार ' हे चित्रपट, नौशाद यांचे संगीत असलेला व तेव्हा फार गाजलेला ' रतन ' चित्रपट, बॉम्बे टॉकीज्चे ' कंगन, ' ' बंधन, ' ' झूला, ' ' बसंत ' ' किस्मत ' हे चित्रपट यातल्या गीतानी आमच्या तेव्हांच्या सर्वच तरुण पीढीला अक्षरश: वेड लावले होते. या सर्व मराठी-हिन्दी चित्रपटांच्या गाण्यांच्या ओळी अहोरात्र मनात भिरभिरत असत.

' अंगणात फुलल्या जाई जुई जवळी ग पती माझा नाही ' इथपासून ते ' हासत वसंत ये वनी अलबेला । प्रियकर वसंत हा मनी घरणीला ' इथपर्यंत सर्व मराठी आणि ' प्रीतम आवो बसो मोरे मनमें ' इथपासून तो ' कालिघटा छायी हो राजा काली घटा छाई शीशेके पालकी में तेरी लाल परी आयी । ' इथपर्यंत सारी हिन्दीगीते आम्हाला तोंडपाठ असत. ' बसंत ', ' तानसेन ' हे चित्रपट केवळ त्यातल्या गाण्यासाठी बारा-बारा, चौदा-चौदा वेळा पाहिल्याचे आठवते. ' बसंत ' मधले ' आया बसंत सखी विरहका अंत देखो बनबनपे छायी बहार ' हे गाणे इतके लोकप्रिय झाले होते की, वेळी अवेळी ते आम्ही 'कोरसा' त म्हणत असू.

गीत या प्रकाराबद्दलचे माझे कुतूहल आणि त्या बद्दलची माझी आवड अशी सतत जागी राहिल्यामुळे पुढे जेव्हा प्रत्यक्ष गीत लेखन करण्याची पाळी आली तेव्हा हे सारे भांडार मला खूप उपयोगी पडले असावे.

माझी पहिली वहिली गीतरचना एका गमतीदार कारणाने झाली. माझ्या धाकट्या बहिणीने नाच बसविला होता. त्यांना कृष्णाचे गाणे हवे होते. तेंव्हा " तू कौनसे बदलीमे मेरे चाँद है आजा " या गाण्याच्या चालीवर ' या सर्व जणी कुंजवनी रास रचू या । वाजवितो मधु मुरली कृष्ण कन्हैया ' हे गाणे मी त्यांना रचून दिले होते. चालीबर हुकूम गाणे लिहिण्याची माझी सवय इतकी जुनी आहे.

चित्रपटासाठी गीतलेखन करण्याची संधी दिनकर द. पाटील यांनी ' राम राम पाव्हणं ' या चित्रपटात दिली. पण चित्रपटासाठी गाणी कशी लिहावित याचा वस्तूपाठ मला भालजी पेंढारकर यानी दिला. भालजीच्या एका चित्रपटात चिंतामणराव कोल्हटकर काम करीत होते.त्या सुमारास मी मामा वरेरकर यांच्याकडे लेखनिक म्हणून जात असे. तिथे कोल्हटकरांशी माझा परिचय झाला. कोल्हटकरांना काय वाटले कोण जाणे त्यानी भालजीकडे माझ्यासाठी शिफारस केली. 'नुकतीच एम. ए. झालेली एक मुलगी आहे, हौशी व होतकरु आहे, कविता करते द्या तिला एकाद्या चित्रपटाची गाणी लिहायला ! तेवढ्या शिफारशीवर भालजीनी मला कोल्हापूरास बोलावून घेतले. ' स्वराजाचा शिलेदार ' या ऐतिहासिक चित्रपटाची लिहिण्यास मला सांगितले. संगीत दिग्दर्शक होते. दत्ता डावजेकर. बाबांचा भालजींचा स्टुडिओ सुरेख होता. राहणेची व्यवस्था ठीक होती. पण मला गाणी काही केल्या जमेनात. डावजेकराना चालीबद्दल विचारले ते म्हणाले ' तुम्हाला

हवं ते मीटर घेऊन तुम्ही गाणी लिहा. आम्ही काय पोष्ट कार्डाच्या मजकुराला देखील चाली लावतो.'

मी प्रयत्नांची शिकस्त केली. पण गाणी मला जमेनात. त्यातून ती ग्रामीण गाणी. मी रडकुंडीला येऊन बाबाना म्हटले, ' मला हे प्रकरण जमणार नाही, मी मुंबईला जाते. '

" झालं ? इतक्या सुरुवातीलाच एवढी निराशा ? अहो आहे काय या अवघड कामात ? काही तरी ल-ल-ला-ड-ड-डा गुणगुणत रहा, आपोआप शब्द सूचतील, ओळी जुळतील. ध्यानात ठेवा, सिनेमाची गाणी अगदी सोपी हवीत. तुमच वाङ्मय साहित्य सारं विसरा आणि रोजच्या साध्या बोलायच्या भाषेत लिहा बघू काही सुचेल, आपोआप सुचेल ! " बाबा हसून म्हणाले,

बाबांचे ते शब्द अजून मी ध्यानांत ठेवलेले आहेत. गाणी अवघड नकोत, सोपी हवीत. मुखडा सोपा, लोकाना सहज कळतील असे शब्द. बाबांच्या त्या मार्गदर्शनाने मुख्य म्हणजे त्यांच्या त्या प्रोत्साहनाने मला धीर आला. मग ' स्वराज्याचा शिलेदार ' ची गाणी मी केली. पुढल्या ' शिवा रामोशी ' चित्रपटाचे गीत लेखनही बाबांनी माझ्याकडून करवून घेतले.

" पार्वती होऊन भिल्लिणी हिंडते वनी
कुणी भोळा शंकर दावा हो लोचनी "

आणि – " भर्जरीच्या पदरा तुला वाऱ्यावर सोडते
शोध सख्या सजनाचा आणावया घाडते "

अशा त्या गाण्यातल्या काही ओळी आजही आठवतात.

वसंत पवारांबरोबर मी अनंत माने यांच्या चित्रपटासाठी गाणी लिहिली. वसंत पवार अत्यंत निगर्वी, गुणी माणूस होता. तो नखशिखान्त कलावंत होता. त्याना समोर पेटी घ्यावी आणि भरपूर चाली मला वाजवून दाखवाव्यात. लावण्या, कवाल्या, भावगीते, अंगाईगीते, भजने, अमुक एक प्रकार वसंतरावाना अवगत होत नव्हता असे नाहीच. गमतीने गप्पा मारित, हसत हसवत त्यानी बोल बोल म्हणता माझ्याकडून गाणी करवून घेतली. मला आठवते फार पूर्वी केव्हांतरी पाहिलेल्या ' दिल्लगी ' चित्रपटातले ' मुरलीवाले मुरली बजा । सुन सुन मुरलीको नाचे जिया । असे एक गाणे साधारण माझ्या लक्षात होते. त्या गाण्याचे वजन मनाशी धरून ' झोक तुझा न्यारा रंग गोरा गोरा डोळे मोडीत अशी जाऊ नको ' – पूनवेच्या चंद्रावाणी छान माझा मुखडा पाप्या नजर तुझी लावू नको ' असे एक द्वंद्वगीत मी लिहिले होते. वसंतरावांनी ते गाणे ताबडतोब पास तर केलेच, पण माझ्या मनात असलेली चाल ही त्यांनी पसंत केली. आणि साधारण त्याच पद्धतीने स्वररचना करून ते गाणे त्यांनी ध्वनिमुद्रीत केले.

माझे गीतलेखन सलगपणे कधीच झाले नाही. जेव्हा कुणीतरी मला गाणे लिहायला सांगे तेव्हा ते मी लिही आणि पुन्हा माझ्या नेहमीच्या उद्योगाला लागी. तरी या अनिश्चित गीत लेखनातही बरीच गीते माझ्याजवळ पडून राहिली. याचे बरेचसे श्रेय माझ्याकडून गीते लिहून घेणाऱ्यानाच द्यायला हवे. मी लिहिलेल्या गीतांच्या आठवणी रंजक आहेत, उद्‌बोधक आहेत, विनोदी आहेत, तशा हृदयस्पर्शी देखील आहेत.

❖

लोकप्रियता लाभलेली गाणी – एक स्वानुभव

सर्वात अधिक गीते मी हृदयनाथ मंगेशकर यांच्याबरोबर केली. सर्वात अधिक लोकप्रियता माझ्या त्याच गाण्यांना मिळाली. हृदयनाथ मंगेशकरांबरोबर काम करणे हा अविस्मरणीय अनुभव आहे ! गीतांचे अफाट भांडार त्यांच्याजवळ आहे. जेव्हा ते अशी गाणी गाऊन दाखवतात तेव्हां किती ऐकावे आणि किती नाही असे होऊन जाते. हृदयनाथाजवळ कल्पकता आहे. सृजनशील प्रतिभा आहे. नवनवे प्रयोग करून बघण्याची जिद्द आहे. त्यांच्या चाली मला एकदम कळत नाहीत. हळूहळू त्या मनात मुरत जातात आणि मग अचानक त्या आठवू लागतात. मला अनेक गाणी त्यांच्याकडून ऐकावयाला मिळाली. ' जिवलगा, राहिले रे दूर घर माझे ' आणि ' हे शामसुंदर मनमोहना ' ही दोन्ही गाणी आपल्या वडलांच्या मा. दिनानाथांच्या– गीतावरुन त्यांनी बांधली आहेत. त्यापैकी पहिले गाणे आधी तोकडे, अपुरे वाटत होते. म्हणजे माझ्या रचनेच्या दृष्टीने. तिथे हृदयनाथांनी ' जिवलगा ' हा शब्द सुचवला आणि गाणे एकदम साजेर, साजिवंत झाले, ' माथे तेरे चाँद का टीका अंगपे हीरे जडे हैं, दुल्हनिया तू हे सजनिया प्यारी ' असे एक गाणे त्यांनी एकदा मला ऐकवले " शालू हिरवा पाचूनि मढवा वेणी तिपेडी घाला । साजणी बाई येणार साजण माझा । " हे गाणे मी लिहिले. उषाताईनी ते ध्वनिमुद्रीत केले आहे. ' जाईन विचारित रानफुला ' ही मी लिहिलेली कविता होती. तिच्यातील आंतर्भूत गायनानुकूलता ओळखून तिला सुंदर चाल हृदयनाथांनीच दिली.

हृदयनाथांबरोबरची माझी सर्वात गाजलेली लोकप्रिय झालेली गाणी म्हणजे कोळीगीते. मी कोळीगीते कशी लिहीली हा प्रश्न अनेकजण विचारतात. 'अपघाताने' असे मी उत्तर देते. कारण खरोखर ती गीते अपघाताने योगायोगानेच लिहली गेली. बंगालमध्ये पालखी वाहून नेणारे भोई पालखी खांद्यावरून नेताना श्रमपरिहारासाठी गाणी गातात. पालखीच्या गतीशी या गीतांच्या लयीचा मनोज्ञ

मेळ जमतो. आपण याच पद्धतीने कोळीगीते करावित ही कल्पना हृदयनाथांची, त्यांनी ती मला सांगितली. लगेच ' राजा सारंगा ' आणि 'वादळं वारं सुटल गो' या दोन चालीही त्यांनी बांधल्या. लताबाई त्यावेळी परदेशच्या दौऱ्याला गेल्या होत्या. त्या आल्याबरोबर त्या गीतांचे ध्वनिमुद्रण करावयाचे होते. वेळ थोडा होता पण माझ्याकडून गाणी लिहून होईनात. होणार कशी? मला समुद्रावरचे जीवन, कोळ्यांची भाषा, त्यांचे विषय काहीच माहित नव्हते. मुळात समुद्रदेखील मी पाहिला होता तो एम. ए. च्या परिक्षेच्या वेळी. मुंबईला मी प्रथमच आल्यावर. अशा परिस्थितीत कोळीगीते लिहिणे ही गोष्ट मला जवळजवळ अशक्य वाटू लागली. मजकडून गाणी होत नाहीत हे पाहून हृदयनाथ एकदम रागावले. अर्थात ते रागवणेही खास त्यांच्या पद्धतीचे होते. त्यांनी रागाने-म्हणजेच अतिशय शांतपणे मला सांगितले, " तुमच्याकडून हे काम होत नसेल तर तसे मला सांगा. मी दुसऱ्या कुणाकडून तरी ही गाणी करवून घेईन. "

हृदयनाथांचे ते बोलणे ऐकल्यावर मात्र मी फार अस्वस्थ झाले. आता काहीतरी खटपट केलीच पाहिजे. असे मला वाटू लागले. मग मी माहिती गोळा करू लागले. कोळ्यांची पारंपारिक गीते आणून मी ती वाचली. त्यातून होळी, समुद्राची भरती-ओहोटी, स्त्रीयांचा साजशृंगार, तरुण स्त्रीपुरुषांच्या प्रेमभावना हेच सामान्यतः कोळीगीतांचे विषय असल्याचे मला दिसून आले. 'डोलकर' हः सुंदर आणि समर्पक शब्द मला र. वा. दिघे यांच्या ' गातात न वाचतात धरतीची लेकरे ' या पुस्तकात मिळाला. ' डोलकर ' हा शब्द मला फार चित्रदर्शी वाटला. समुद्रावरचे होडीचे डोलणे मला त्यात कुठेतरी जाणवले. या शब्दांबरोबर धृपदाच्या ' मी डोलकर, डोलकर डोलकर दर्याचा राजा। घर पान्यावरी बंदराला करतो ये जा ' या ओळी लगेच माझ्या मनात जुळून आल्या. 'धाकल्या दिरा'ची कल्पना काणेकरांच्या सोनकळचावर लिहिलेल्या एका लेखातून मला मिळाली.

शाळेत असताना ' महाराष्ट्र रसवंती ' या कविता संग्रहात चिपळूणचे कवी ' आनंद ' यांचे एक कोळ्याचे गाणे मी वाचले होते. ' आजच पुनवा चल ग नावे नभात चंद्रम डुले झुले ' ही त्या गाण्याची पहिली ओळ होती. कवितेवर दिलेले चित्र सुंदर होते. होडीवर उभा राहून पाण्यामध्ये जाळे फेकणारा कोळी त्यात दाखवला होता. र. वा. दिघे यांची ' दर्याची बाळे ' नावाची एक फार सुरेख कथा मी वाचली होती. त्यातलेही संदर्भ मनात कुठेतरी जागे होते. त्याबरोबरच दमान, उधाणवारा, होडीची नाळ, पाण्याचा फेस, चमचम करणारी चांदीची मासळी हेही तपशील मनात गोळा होत होते. या साऱ्यातून मी कोळीगीते लिहिली. कोळीगीतांचे काव्य माझेपण त्याचे संगीत ' वल्हव रे नाखवा ' हा कोरस ' लाटा लाटा लाटा ' ची अर्थपूर्ण पुनरुक्ती हा सारा सजावटीचा भाग हृदयनाथच्या कल्पकतेचा आणि

गाण्यांचे स्वरवैभव उच्चारांची निर्दोषता आणि रसपूर्णता ही अर्थात लताबाईची. कोळीगीते हा एक प्रयोग होता पण त्याला अपरंपार यश मिळेल याची कोणालाच कल्पना नव्हती. कोळीगीतांचा बंगाली अनुवाद सलील चौधरी यांनी केला. माझ्या मराठी शब्दांना अगदी मिळते-जुळते शब्द त्यांनी चतुराईने टाकले ' राना सारंगा ' च्या ठिकाणी ' ओ गो माँ गंगा मा गो मा गंगा, ' वादळ वारं सुटलं गो ' च्या ठिकाणी ' बादल कालो घिरलो गो ' असे बंगाली शब्द त्यांनी योजले होते. ही बंगाली कोळीगीतेही चांगली लोकप्रिय झाली.

❖

वर्षांतील संध्यारंग

१९४७ साली प्रसिद्ध झालेला शांताबाईंचा ' वर्षा ' हा पहिला कविता संग्रह. विद्यार्थी अवस्थेत माधव ज्युलीयनचे विरह–तरंग हे खंडकाव्य त्यानी वाचले होते. आणि त्याचाच परिणाम म्हणून आपल्या संग्रहाला त्यांनी विरह–तरंग वरून ' वर्षा ' हे नाव दिले. म्हणून त्या म्हणतात, " वर्षा वैभव पाहण्यास जपुनी घाटात मी जावे. किंवा वर्षतच मला पसंत अवघ्या वर्षात संतोषप्रद " या ओळी विरहतरंगावरूनच मला सुचल्या आहेत. विशिष्ठ अनुभूतीची स्मारके व आकांक्षाची चित्रे माझ्या कवितेत आहेत. "

शांताबाईंच्या 'वर्षा' या संग्रहाचा विचार केल्यानंतर आपल्याला जाणवते, ती तिच्यामधील सहजता व प्रसन्नता. आज मराठी काव्यात ती क्वचितच पाहायला मिळते. त्यांच्या मनातील अर्थ स्वच्छपणे त्यांच्या कवितेत प्रतिबिंबित झालेला असतो. तो समजून घेण्यासाठी तिच्या बरोबर झटापट करावी लागत नाही. आज मराठी कवितेत असणारा प्रतीकवाद आणि त्यामुळे निर्माण होणारे गूढगुंजन त्यांच्या कवितेत नाही. त्यांच्या काव्याचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्टय असे की, वाचकाला काहीही शिकवण्याचा प्रयत्न करत नाही. म्हणजेच प्रेशिताचे अवसान तिने आणलेले नाही. वाचकाला धक्के देऊन जागृत करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या ठिकाणी नाही. त्यामुळे स्फुल्लिंग, अंगार, स्थंडील, ज्वाला इ. आजची अपरिचीत मंडळीही त्यांच्या कवितेते आढळत नाही. मराठी कवितेत डोकावू पाहणारा विकटतेचा परिणाम अद्यापि त्यांच्यावर झालेला नाही. त्यांच्या कवितेत मोकळा शृंगार असेल पण ग्राम्यपणा मुळीच आढळत नाही, आहे तो केवळ शुद्ध, प्रामाणिक, निरागस आत्माविष्कार. त्यांच्या कवितेत असामान्य काही नसून ती सामान्यासाठी लिहिलेली आहे.

गगनोदरातील मेघाची पटले भेदून संचार करणारा गरुड त्यांना मुळीच

व्हायचे नाही. हिरवळीत जेथे कोमल फुले बहरतात त्या ठिकाणचे स्वच्छंदी फुलपाखरू होण्याची त्यांना तळमळ आहे. आपण म्हणजे काळ्याकुट्ट अंधाराला भेदून टाकणारी विजेची चमक नसून ढगाच्या आड चमचमणारी चांदणी आहे. उद्दाम सुगंध उधळणाऱ्या गुलाब कळीपेक्षा पावाच्या आड लपून राहणारी मंजिरी त्या आहेत.

दूदूंभीप्रमाणे आसमंत घुमवणारे सागराची गाज त्यांच्या कवितेत नाही तर निर्झराचा अस्फूट कलरव आहे. कुणाच्याही द्वेषाचे तांडव त्यांच्या मनात नाही तर चिमण्या गालावरील हास्याची माधुरी आहे. आपल्या काव्याच्या मर्यादा व गुण–विशेष शांताबाईना पूर्णपणे उमगलेले आहेत. आपल्या काव्याचे व आपले आत्मपरीक्षण करण्याची वृत्ती सर्वच कवींना साधते असे नाही, तर ते शांताबाईना साधले आहे. स्वतःचे व्यक्तिमत्त्व त्या आपल्या कवितेत शोधत राहतात. स्वतःचे हे आत्मपरीक्षण त्यानी दुसऱ्याही एका कवितेत केले आहे. हृदयाचे पांखरु भारी अस्थिर, चंचल असून, त्याला आवरावे कसे हे त्याना समजत नाही. हे हृदय अत्यंत काव्यात्म आहे. निळे नभ दिसताच अधीर होऊन ते फडफड करू लागते आणि आपल्या इवल्याशा पंखाने गगन भरू पाहते. कोठे बहरलेला ताटवा दिसला की, त्याला फार हर्ष होतो, व त्याचे अस्फुट, कोमल गुंजन सुरू होते. त्याला कोणी आपल्या जातीचे म्हणजे, काव्यात्मवृत्तिचे भेटले की, त्याला बिलगून शब्दहीन भाषेमध्ये त्याच्याशी ते हितगुत करू लागते. त्या हृदय पाखराच्या नयनात अनंत स्वप्ने फुलून बसलेली आहेत व त्या स्वप्नांच्या माधुरीत जीवनाची कटुता ते विसरून आते. या स्वप्नांचाच आधार आपल्या अभागी जिवास असल्याचे शांताबाईनी दुसरीकडे सांगितले आहे व त्या स्वप्नावाचून जिवीत दुःसह झाले असते असे ही त्या म्हणतात. ही स्वप्ने म्हणजे त्यांची कविता होय. रात्र संपून प्रभात आली व स्वप्नमालिका संपून गेली, तरीहि त्या स्वप्नांचो स्मृती ठेवून, त्यात आपले मन रंगवून चंडाशुचे दारुण ऊन सहन करण्याची आपली तयारी असल्याचे त्यानी आणखी एका कवितेमध्ये सांगितले आहे. या स्वप्नांच्या नादी लागून आपण काव्यातील जीवनातच रंगून गेलो व त्यामुळे जीवनातील काव्यास मुकलो असल्याचीही जाणीव त्यानी व्यक्त केली आहे. तथापि हा स्वप्नाळूपणा त्याना सोडीत नाही व आपली अमूर्त स्वप्ने जीवनात नसली तरी कवितेमध्ये मूर्त झाल्याचा त्यानी निर्वाळा दिला आहे.

या स्वप्नाळू वृत्तीमुळे स्वतःचे जीवन दुःखी झाले आहे, ते कवयित्रीस समजत नाही, असे नाही. " काही अमूर्त ध्येयाचा, वेध सारखा घेऊन ! कापीतसे जीव उगा वाळवंट हे वैराण " असे आपले जीवन चालल्याचे तिला माहित आहे,

" असे माझे मीच घेतले हो मरण हे ओढवून
ध्येये दूरच राहिली आयु चालले सरून। "

या ओळीवरून स्पष्ट होते. अशा वेळी,

" वृथाच मी जीवनाचा चालविला अट्टाहास।
श्रेय काही ये न हाती, मन मात्र हो उदास। "

असे नैराश्याचे उद्‌गार ती काढते. असे असूनही मी 'माझा मार्ग' सोडावयास तयार नाही, असे शांताबाई म्हणतात. हा मार्ग म्हणजे दारुण भोग आहे. त्या मार्गावर दाहक अग्नी लागतो. पण जे काही क्षण उत्कट असे लाभतात, त्यातील माधुरी काही आगळी असते. त्यातील उन्मादाची चटक ज्याना लागली त्याना सरळ मार्गावर आणणे कठीण आहे. म्हणून, ' मी वेडचापरि हिंडणारच सदा ' असा त्यांचा हट्ट चालूच आहे. या परिस्थितीत कलंदराचे जीवन त्याना मोठे आकर्षण वाटते पण कलंदराचे बाह्य जीवन एक वेळ स्विकारता आले तरी त्याची आंतरिकवृत्ती अंगी बाणणे सोपे नसते. कमळपत्राप्रमाणे अलिप्तवृत्तीने जीवनाचा अनुभव कवयित्रीला घेता आलेली नाही. (तसे करता आले असते तर काव्य निर्मितीचे कारणही उरले नसते.) आणि म्हणून ' सदा मी एकली, जीवनी सदाच मी एकली ' अशी रुखरुख त्याना लागून राहते. मग ' नको उभवणे नूतन सृष्टी, नको व्हावया फिरून कष्टी ' असे कलंदरवृत्तीशी निराशेचे उद्‌गार त्यांच्या मुखातून निघतात.

त्यांच्या काव्यात निर्भेळ निराशा नाही, किंबहुना ती कमीच आहे असे म्हणता येईल. जीवनातील सुखाकडे सुख म्हणूनच त्या पाहू शकतात. नैराश्यातही त्याना एक आधार वाटतो व तो म्हणजे ईश्वरावरील श्रद्धेचा.

कवीजनांच्या अलिकडील पीढीमध्ये न आढळणारी परमेश्वरावरील श्रद्धा त्यांच्या काव्यात प्रकट झाली आहे. बुद्धीपेक्षा श्रद्धेवरच त्यांचा भर अधिक आहे. मूर्तिभंजकाच्या या युगात मूर्तीपूजेचे आणि ती पाठीमागील भावनेचे त्यानी समर्थन केले आहे. तेजोनिधी भास्कर, पर्जन्याच्या धारा, वसंताचे आगमन, सुमनांचा सुगंध, भग्न सागर या गोष्टीमध्ये प्रभूचा साक्षात्कार, क्षणाक्षणाला त्यांना होतो व त्यामुळेच क्वचित ' आज सारे मन एकाकी पण ' असे ही त्यांना वाटते. प्रभूच्या साक्षात्काराचे क्षेत्र म्हणूनच काही, अथवा स्वतंत्रपणेही, शांताबाईंना निसर्गाचे प्रेम फार वाटते व त्यातल्या त्यात वर्षा ऋतूचे आकर्षण अधिक दिसते. ' पाऊस ', 'हिरवळ', 'पावसानंतर' इ. कविता याच्या द्योतक आहेत. आपल्या काव्यसंग्रहास ' वर्षा ' हे नाव त्यानी या करिताच दिले असावे. ' लिबाला ' उद्देशून लिहीलेल्या कवितेत.

' स्नेहभाव आम्हातील नाही कुणा कळायचे।
ज्ञात आहे आम्हाला मुग्ध नाते हे आमुचे। '

असे त्या म्हणतात. पण त्या आणि निसर्ग यामध्ये असणारा हा ' आंतरः को ऽ पि

हेतुः ' मुळीच गूढ राहिलेला नाही. शांताबाईंना वाटणारी निसर्गाविषयीची प्रेमभावना ही कविचे कर्तव्य म्हणून आलेली दिसत नाही, मूळची व जिव्हाळ्याची दिसते. निसर्गदर्शनाने ज्या हृदयाला इतका प्रामाणिक आल्हाद वाटतो, त्या हृदयाला विकृतीचे भय वाटायास नको.

शांताबाईचे व्यक्तित्त्व हे या स्वरूपाचे आहे. त्याचा सुंदर अविष्कार करावयास आवश्यक असणारी शद्वार्थाची त्यांच्याजवळ असणारी उपस्थिती आणि त्यांचे पद्यरचनेवरील प्रभुत्व ही दोन्ही खरोखर कौतुकास्पद आहेत. आधुनिक कवयित्रीमध्ये कोणाही मध्ये हे प्रभुत्व जाणवत नाही. विषय सुचला की त्याला अनुरूप असे शद्व आणि अर्थ त्याना सहजच स्फुरतात असे वाटते. केवळ एवढचा सामग्रीवर कित्येक लोक कवी म्हणून मिरवतात मग त्याचबरोबर उत्कट भावनेच्या जिव्हाळ्याची देणगी त्याना लाभली आहे. त्यांच्या काव्याचे तेज अधिक महत्त्वाचे भूषण आहे. त्याला बाह्यरचनेचे कोंदणसुद्धा त्यास अनुरुप सुंदरच असणार.

"आपली कविता ही आपल्या जीवनातील समाधान आहे. अशी शांताबाईंची भावना आहे. जेंव्हा जेंव्हा हृदयात हर्ष दाटून येऊन त्यांच्या मनात मधुर भाव उसळले. तेव्हा तेव्हा त्यानी ते कवितेमध्ये ओतून दिले. दुःखाचा कडू चषक घेऊन नियती जेव्हा दारी आली तेव्हाही कवितेचा आश्रय करून तिची सारी कटूता त्यानी सहन केली. जीवनाला उजाळा देत ज्यावेळी प्रीतीरवि उदय पावला, त्यावेळी आपल्या हृदयाचा उन्माद त्यानी काव्याद्वारे सांगून टाकला. जी गुंज किंवा मूक लाजऱ्या भावना त्याना जगापासून लपवून ठेवाव्या लागल्या. त्याही त्यांनी कवितेमध्ये ग्रंथित केल्या. बाह्य जगाला विटून चित्त अंतर्मुख होई, त्यावेळी कवितेबरोबरच त्यानी हितगुज केले. किंबहुना त्यांची अमूर्त स्वप्ने कवितेमध्ये मूर्त झाल्याचे त्यानी पाहिले. ज्या कवितेने त्यांच्यासाठी एवढे केले त्या कवितेचा व त्यांचा स्नेह तो युगा युगांचा आहे असे त्या म्हणतात. "

सहजता, प्रसन्नता, सरळ–शुद्ध–निरागस आत्माविष्कार, मुक्त शृंगार; स्वप्नाळू वृत्ती, ईश्वरावरील श्रद्धा, निसर्गाचे वेड, इ. मौलिक घटकांचा विचार शांताबाईंच्या कवितेत आहे असे प्रा. रा. श्री. जोग म्हणतात.

सहज, सुश्लिष्ट रचना हा त्यांच्या प्रसन्न कवितेचा प्रथम दर्शनी मनात भरणारा प्रमुख विशेष आहे म्हणूनच,

" माझ्या हृदयाचे पाखरु । अस्थिर चंचल भारी
बाई कसे तया आवरु ?
निळे निळे नभ येता दिसूनी । फडफड करते
अस्थिर होऊनी । इवल्या इवल्या याच्या नयनी
अनंत स्वप्ने बसली फूलूनी "

ही स्वने म्हणजे शांताबाईंची कविता होय.

'स्वप्नानों तुमचाच अभागी जिवाला आधार' असे त्या आणखी एका कवितेत म्हणतात. कविता ही कवीची खरी आत्मसखी असते, शांताबाईंची ती आहे, असे वाटते, आपल्या मनातले हृद्‌गत उलगडताना त्यांनी म्हटले आहे–

" हर्ष खेद वा गूज मनीचे
मुक्त लाजऱ्या मनोभावना
लपवी ज्या जगापासुनी
प्रकटविले तुज पुढती त्यांना
अमृत माझी सारी स्वप्ने
तुझ्यामध्ये गे मूर्त जाहली. "

जगाचा व्याप विसरून अधोन्मीलित नयनांनी स्वप्ने त्या जपत राहतात. स्वप्नरंजन कर्त्या माधव ज्यूलीयनांचे संस्कार त्यांच्या कवितेवर अधिक असल्यामुळे त्यांची कविता मुख्यतः स्वप्नरंजनात्मक झाली आहे.

❖

तात्पर्य

या गीतांविषयी शांताबाईंची एकूण भूमिका पाहता–

१) कुणा ना कुणा सांगून, भरीला घालून, शब्दात गाठून ही गीते लिहून घेतली आहेत. या गीतांचा संस्कार मात्र लहानपणापासून त्यांच्या मनांवर होतो. जात्यावरच्या ओव्यापासून ते नागपंचमीपर्यंतच्या गीतापर्यंत लयबद्ध रचना त्या ऐकत. त्याचा परिणाम त्यांच्या गीतावर झाला आहे.

२) आई-मावशी या गीतरत्नाकरमधील गाणी गात असत. त्यांचा परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. ' मानस गीत सरोवर ' हे कृष्णाबाईं गाडगीळांचे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. आकर्षक ध्रूवपद, सोपे, नादमधुर शब्द, चित्रदर्शी वर्णनशैली, प्रासादिक रचना या साऱ्यांचा परिणाम त्यांच्या लेखनावर झाला.

३) गुजराती गीतांचा परिणाम मनावर होता.

४) रविकिरण मंडळ, भा. रा. तांबे यांच्याबरोबर, त्यांच्या काकानी त्याना सिनेमे खूप दाखविले. त्यामुळे या गीतांच्या ओळी मनांत भिरभिरत राहिल्या.

५) चालीवरून गीते रचण्याचा प्रयत्न. बहुतेक गीते, बंगाली गीते, संस्कृत श्लोक यांच्या चालीवरून त्यांनी ही गीत रचना केली.

६) शब्दाला वजन असते याची जाणीव ठेवून त्यानी गीतरचना केलेली आहे. ● ● ●

संदर्भ ग्रंथ

१) अमृत, १९६५ मंगेश पाडगांवकर
२) वर्षा, प्रस्तावना प्रा. रा. श्री. जोग
३) ललिल, १९६८ पृ. ७२
४) सरितादर्शन, पृ. ४० प्रा. किर्लोस्कर
५) तांबे यांची कविता, कुस्करू नका ही सुमने, संपादक - मायदेव
६) मराठी माती, कुसुमाग्रज
७) अमृतघट, आनंद भैरवी, बोरकर
८) रेंदाळकराची कविता – रेंदाळकर
९) ललित, दिवाळी अंक १९७५, प्रा. गिरीश
१०) स्वप्न लहरी, पृ. १०, प्रस्तावना, प्रा. गिरीश
११) विरहतरंग, पृ. २०, प्रस्तावना रा. श्री. जोग
१२) वाग्वैजयंती पृ. १११, गोविंदाग्रज
१३) मराठी लावणी, संपादक म. बा. धोंड, होनाजी बाळाची लावणी
१४) आनंदभैरवी, बोरकर
१५) मराठी वाङ्मयाचा इतिहास पृ. ५०५, डॉ.देशपांडे
१६) स्वप्नलहरी पृ. ११२ माधव ज्यूलीयन
१७) रुपसी प्रस्तावना, कुसुमावती देशपांडे
१८) नवकवितेचे एक तप पृ. ९७ रा. अ. काळेले
१९) अभिनव काव्य प्रकाश पृ. २८४ रा. श्री. जोग
२०) तोच चंद्रमा पृ. ३, ५, ६, १४, २०, ३९, ५१, ६४, ७१, ७३, ८५, ८७, ९९, १०३, १०४, १०६, १०७, ११३, ११८, शेळके
२१) वल्हव रे तारुया (गीत पृ. ७) संपादक रुगे
२२) मराठी छंदोरचना पृ. ३५० डॉ. ना. ग. जोशी
२३) तांबे यांची समग्र कविता पृ. १७ प्रस्तावना-जोग
२४) प्रा. म. वा. स्वरूप पृ. ९९ तळटिपा-शेणोलीकर
२५) प्रा. म. वा. स्वरूप पृ. ९९ तळटिपा-शेणोलीकर
२६) झपूर्झा, नवा शिपाई संपादक–गो. म. वि. म कुलकर्णी
२७) बाल साहीत्य एक विचार–भाऊ जोशी ललिल आक्टो. १९७५
२८) टीप टीप चांदणी पृ. १, २, शेळके
२९) चिमणचारा बालगीते ,,
३०) थुई, थुई नाचमोरा ,,
३१) महाराष्ट्र टाईम्स् २ फेब्रु. ७६ रेखा जोशी

ही स्वने म्हणजे शांताबाईंची कविता होय.

'स्वप्नानों तुमचाच अभागी जिवाला आधार' असे त्या आणखी एका कवितेत म्हणतात. कविता ही कवीची खरी आत्मसखी असते, शांताबाईंची ती आहे, असे वाटते, आपल्या मनातले हृद्‌गत उलगडताना त्यांनी म्हटले आहे–

" हर्ष खेद वा गूज मनीचे
मुक्त लाजऱ्या मनोभावना
लपवी ज्या जगापासुनी
प्रकटविले तुज पुढती त्यांना
अमृत माझी सारी स्वप्ने
तुझ्यामध्ये गे मूर्त जाहली. "

जगाचा व्याप विसरून अधोन्मीलित नयनांनी स्वप्ने त्या जपत राहतात. स्वप्नरंजन कर्त्या माधव ज्यूलीयनांचे संस्कार त्यांच्या कवितेवर अधिक असल्यामुळे त्यांची कविता मुख्यतः स्वप्नरंजनात्मक झाली आहे.

❖

तात्पर्य

या गीतांविषयी शांताबाईंची एकूण भूमिका पाहता–

१) कुणा ना कुणा सांगून, भरीला घालून, शब्दात गाठून ही गीते लिहून घेतली आहेत. या गीतांचा संस्कार मात्र लहानपणापासून त्यांच्या मनांवर होतो. जात्यावरच्या ओव्यापासून ते नागपंचमीपर्यंतच्या गीतापर्यंत लयबद्ध रचना त्या ऐकत. त्याचा परिणाम त्यांच्या गीतावर झाला आहे.

२) आई-मावशी या गीतरत्नाकरमधील गाणी गात असत. त्यांचा परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. ' मानस गीत सरोवर ' हे कृष्णाबाईं गाडगीळांचे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. आकर्षक ध्रूवपद, सोपे, नादमधुर शब्द, चित्रदर्शी वर्णनशैली, प्रासादिक रचना या साऱ्यांचा परिणाम त्यांच्या लेखनावर झाला.

३) गुजराती गीतांचा परिणाम मनावर होता.

४) रविकिरण मंडळ, भा. रा. तांबे यांच्याबरोबर, त्यांच्या काकानी त्याना सिनेमे खूप दाखविले. त्यामुळे या गीतांच्या ओळी मनांत भिरभिरत राहिल्या.

५) चालीवरून गीते रचण्याचा प्रयत्न. बहुतेक गीते, बंगाली गीते, संस्कृत श्लोक यांच्या चालीवरून त्यांनी ही गीत रचना केली.

६) शब्दाला वजन असते याची जाणीव ठेवून त्यानी गीतरचना केलेली आहे. ● ● ●

संदर्भ ग्रंथ

१) अमृत, १९६५ मंगेश पाडगांवकर
२) वर्षा, प्रस्तावना प्रा. रा. श्री. जोग
३) ललिल, १९६८ पृ. ७२
४) सरितादर्शन, पृ. ४० प्रा. किर्लोस्कर
५) तांबे यांची कविता, कुस्करू नका ही सुमने, संपादक - मायदेव
६) मराठी माती, कुसुमाग्रज
७) अमृतघट, आनंद भैरवी, बोरकर
८) रेंदाळकराची कविता – रेंदाळकर
९) ललित, दिवाळी अंक १९७५, प्रा. गिरीश
१०) स्वप्न लहरी, पृ. १०, प्रस्तावना, प्रा. गिरीश
११) विरहतरंग, पृ. २०, प्रस्तावना रा. श्री. जोग
१२) वाग्वैजयंती पृ. १११, गोविंदाग्रज
१३) मराठी लावणी, संपादक म. बा. धोंड, होनाजी बाळाची लावणी
१४) आनंदभैरवी, बोरकर
१५) मराठी वाङ्मयाचा इतिहास पृ. ५०५, डॉ.देशपांडे
१६) स्वप्नलहरी पृ. ११२ माधव ज्यूलीयन
१७) रुपसी प्रस्तावना, कुसुमावती देशपांडे
१८) नवकवितेचे एक तप पृ. ९७ रा. अ. काळेले
१९) अभिनव काव्य प्रकाश पृ. २८४ रा. श्री. जोग
२०) तोच चंद्रमा पृ. ३, ५, ६, १४, २०, ३९, ५१, ६४, ७१, ७३, ८५, ८७, ९९, १०३, १०४, १०६, १०७, ११३, ११८, शेळके
२१) वल्हव रे तारुण्या (गीत पृ. ७) संपादक रुगे
२२) मराठी छंदोरचना पृ. ३५० डॉ. ना. ग. जोशी
२३) तांबे यांची समग्र कविता पृ. १७ प्रस्तावना-जोग
२४) प्रा. म. वा. स्वरूप पृ. ९९ तळटिपा-शेणोलीकर
२५) प्रा. म. वा. स्वरूप पृ. ९९ तळटिपा-शेणोलीकर
२६) झपूर्झा, नवा शिपाई संपादक–गो. म. वि. म कुलकर्णी
२७) बाल साहीत्य एक विचार–भाऊ जोशी ललिल आक्टो. १९७५
२८) टीप टीप चांदणी पृ. १, २, शेळके
२९) चिमणचारा बालगीते ,,
३०) थुई, थुई नाचमोरा ,,
३१) महाराष्ट्र टाईम्स् २ फेब्रु. ७६ रेखा जोशी

शांताबाईंची रचना

१) कविता संग्रह –

१) वर्षा – १९४७
२) रुपसी – १९५६
३) तोच चंद्रमा – १९७३
४) गोंदण – १९७५

२) बालगीत संग्रह –

१) चिमणचारा – १९६०
२) थुई थुई नाच मोरा – १९६१
३) टिप टिप चांदणी – १९६६

३) कथा/इतर –

१) मुक्ता
२) कावेरी
३) प्रेमिक
४) काचकमळ
५) सवाळा

४) भाषान्तरीत ग्रंथ –

१) आंधळ्याचे डोळे
२) आंघळी
३) गवती समुद्र
४) चौघीजणी
५) पश्चिमरंग

५) कादंबरी

१) ओढ
२) स्वप्नतरंग
३) विझती ज्योत
४) मायेचा पाझर
५) कोजागिरी
६) धर्म


REFBK-0025613